
५ ते ११ मार्च ७७

पाच रुपये

जनविराट अंक

# माणूस



# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक चाळिसावा

५ मार्च १९७७

मूल्य पाच रुपये



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

□



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□


## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| दिल्ली फार दूर नाही, पण | श्री. ग. मा. | २ |
| ‘मुक्ता’–फळे | दुर्गा भागवत | ४ |
| आणीबाणी आणि कलाकार-नागरिक (मुलाखती) | शब्दांकन : शिरीष सहस्रबुद्धे | ८ |
| ‘चार्टर–७७’ | अनुवाद : अशोक जैन | १४ |
| पण आपली जागा खरी कुठे आहे ? | विनय हर्डीकर | १८ |
| राजकारण जनहितकारण केव्हा होईल ? | अरुणा ढेरे | २६ |
| धागा एक, प्रश्न सोडवण्याची पद्धत वेगळी | प्रकाश जावडेकर | २९ |
| सामुदायिक विचारमंथनातून तयार झालेली गीता | कुमार सप्तर्षी | ३२ |
| गैरकाँग्रेसवाद ते जनता पक्ष | इंदुमती केळकर | ३६ |
| दीनदयाळजींचा वारसा | ब. ना. जोग | ४२ |
| अर्थविचार । उपाध्याय आणि लोहिया | राजेंद्र होरा | ४४ |
| परंपरा आणि परिवर्तन | एक हिंदुत्ववादी | ४७ |
| चिती आणि विराट | नारायण | ४९ |
| मनं आणि मतं – तरुण मंडळींची | सतीश कामत | ५२ |
| चिता तुमची, लाकडं आमची | चंद्रशेखर पुरंदरे | ५४ |
| कामगार-मनाचा कानोसा | छाया दातार | ५७ |
| लोकशाहीचे पुनरुत्थान | पन्नालाल सुराणा | ६१ |
| ‘जनता’ जाहीरनामा | अशोक शहाणे | ६५ |
| चक्रमचक्री – चौथी गिरकी | दीर्घस्मृती–विश्वनाथ | ६८ |
| एनक्रुमा आणि सुकार्नो | ग. प्र. प्रधान | ७१ |
| दिल्ली निवडणूक पुरवणी | रत्नाकर महाजन | ७५ |
| मतपेटीचे शस्त्र ( लेखांक चार ) | वा. दा. रानडे | ९० |
| ता. क. नवी दिल्ली | रत्नाकर | ९७ |
| इये मिसाचिये नगरी | | ९९ |

# दिल्ली फार दूर नाही, पण !

श्री. ग. मा.

'पुरोगामी सत्यशोधक' या म. फुले प्रतिष्ठानच्या मुखपत्राच्या चालू अंकात (डिसेंबर ७६) बाबा आढावांना उदगीर तालुक्यातील वलांडी गावच्या गंपू शेटीबा बनसोडे या माणसाने पाठवलेले एक पत्र शेवटी दिलेले आहे. त्यात हा बनसोडे लिहितो —

'सध्या पोटाला मिळने कठीण झाले आहे. आपण आले वेळेस गवताचे बी तरी खान्यात येत होते (बरबडा) ते तरी आपन पाहिले आहे. आता ते देखील नाही. रोज आंबाडीचा पाला आनून सिजउन रानातील काही पाल्याची भाजी सिजउन थोडंबहुत पीठ मिळाले तर मिसळून मुटके करून खावयाचे असे रोजी आमची चालली आहे—'

बनसोडेने आणखीही पुष्कळ लिहिले आहे. गावात हरिजनांचा छळ चालू आहे. बनसोडेलाही मार बसला. पूर्वी मदत करणारे फिरले. काम नाही. अन्न नाही. 'आमच्या घरचे सारखे बिमार पडल्यासारखे खंगत व बारीक होत झालेली आहे. मी देखील दोन वर्षात होतो तशे नाही.' तरी —

आता किती दिवस हा गंपू अशा स्थितीत वलांडीला राहू शकेल ?

बाबा आढाव किंवा अन्य कार्यकर्ते तेथे जाऊन हरिजनांचा छळ थोडा फार थांबवू शकतील. छळ करणाऱ्यांना सरकार शासनही करील. पण गंपूच्या पोटापाण्याचा प्रश्न कसा सुटणार ?

एक दिवस काम मागण्यासाठी जवळच्या शहरात, पुढेमागे लांबच्या पुण्यामुंबईतही येऊन तो धडकल्याशिवाय राहणार नाही.

सुरुवातीला फुटपाथवर—रस्त्यावर राहील. बसस्टॉपच्या आडोशाला रात्री झोपेल. काम मिळेल त्या दिवशी पावमिसळ, भाजी-भाकरी काहीतरी खाईल. पण काहीही झाले तरी वलांडीला, आपल्या गावी तो परत जाणार नाही. उलट शहरातच फुटपाथवरून झोपडपट्टीत शिरण्याचा प्रयत्न करील. हळूहळू घरच्यांनाही इथेच बोलावून घेईल. झोपडपट्टी वाढत राहील. खेडेगावं ओस पडतील— अधिकाधिक उजाड होत राहतील.

हे आपले गेल्या पंचवीस-तीस वर्षातले नियोजन आहे.

शहरं वाढताहेत, वेडीवाकडी फोफावताहेत, खेड्यात काम नाही, पोटापाण्याची सोय नाही म्हणून ती रिकामीभकास होताहेत.

ग्रामीण भागात छोटे उद्योगधंदे काढून हा शहराकडचा प्रचंड लोंढा थांबवता येईल हे आता कुणाला कळायचे बाकी राहिले आहे असे नाही. विकेंद्रीकरण हवे यावर सर्वांचेच एकमत आहे. पण केंद्रीकरणाचा प्रवाह मात्र कोणालाच रोखून धरता आलेला नाही. अगदी स्वतंत्र पक्षाचे राजाजी, समाजवादी समाजरचना हवी म्हणणारे व प्रचंड सत्ता हाती असणारे नेहरू यांचाही विकेंद्रीकरणाला मुळीच विरोध नव्हता. पण घडत गेले मात्र उलटेच. असे का ?

आता जनसंघ—समाजवादी विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा आग्रह धरून जनता पक्ष रूपाने पुढे येत आहेत.

मोरारजी देसाई यांनी तर विकेंद्रीकरणाचा जोरदार पुकारा केलेला आहे. जनता पक्षाच्या जाहीरनाम्यात यावर विशेष भर देण्यात आलेला आहे.

जनता पक्षाच्या ध्वजावर तर हलधरच—नांगरधारी शेतकरी—उभा आहे.

पण काँग्रेसच्या ध्वजावर चरखा नव्हता का ?

सर्वांनाच विकेंद्रीकरण हवे आहे. मग सगळेच केंद्रीकरणाच्या दिशेने असे फरफटत का गेले ?

विकेंद्रीकरण हवे हे म्हणणे सोपे आहे, पण केंद्रीकरणामागे असणारे हितसंबंध, अंतर्विरोध मोडून काढणे अवघड आहे. नेहरू—शास्त्री—इंदिरा गांधी यांपैकी कुणालाच ते जमले नाही. मोरारजींना जमेल का ?

विकेंद्रीकरण करायचे म्हणजे शेतकऱ्याला परवडतील असे भाव बांधून द्यायला हवेत— त्याशिवाय शेतीला स्थिरता येणार नाही. पण यामुळे धान्यभाव वाढतात, शहरातील ग्राहक नाराज होतो. ही नाराजी कोण पत्करायला—अंगावर घ्यायला तयार आहे ?

ग्रामीण उद्योगधंदे समजा काढले. त्यांचा माल कोण विकत घेणार ? गिरण्यांच्या कापडापुढे हातमागाच्या कापडाचा टिकाव लागणार आहे का ? मग कुणाला तरी खूष ठेवायचे, कुणाला तरी तात्पुरते गप्प बसवायचे, अशी धरसोड चालू ठेवावी लागते. ज्या फांदीवर सरकार स्थानापन्न झालेले आहे तीच फांदी कशी तोडून टाकता येईल ?

गिरण्याच खेडेगावांत हलवाव्यात— थोडीफार सक्ती, बरेच उत्तेजन देऊन हे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर घडवून आणावे, हा एक उपाय आहे. पण गिरण्यातील कामगार, कामगारांच्या संघटना याला तयार होतील का ? मग मालकांची संमती तर लांबच राहिली. कोण स्वतःहून आपल्या पायावर धोंडा पाडून घेणार ? कामगार संघटनांचे हितसंबंधही असे केंद्रीकरणात गुंतलेले आहेत. त्या आपले शहरातले बस्तान सोडून खेडोपाडी विखुरल्या जायला तयार होणार नाहीत.

म्हणजे खेड्यातल्या मालाला—ग्रामीण उद्योगधंद्यातून तयार होणाऱ्या वस्तूंना शहरात गिऱ्हाईक नाही आणि शहरातील माणसे किंवा उद्योगधंदे खेड्यात जायला तयार नाहीत. मग विकेंद्रीकरण होणार कसे ?

दोन आघाड्यांवर एकसमयावच्छेदेकरून उठाव केला तरच ही कोंडी फुटू शकणार आहे. ग्रामीण भागात अल्पभूधारकांच्या, शेतमजुरांच्या संघटना एकीकडे उभारल्या पाहिजेत, दुसरीकडून ग्रामीण पुनर्रचनेचा एक व्यापक कार्यक्रम ठराविक काळात पूर्ण करण्याची जबाबदारी उचलली पाहिजे. पहिले काम शासनाबाहेर असणाऱ्या कार्यकर्त्यांचे, संघटनांचे आहे. दुसरे काम सत्तेवर येणाऱ्या लोकांचे आहे. ग्रामीण सुधारणांचे फुटकळ प्रयत्न आजवर झाले. इंदिरा गांधींचा वीस कलमी कार्यक्रमही या फुटकळ दृष्टिकोनाचा एक आविष्कार आहे. अशा तुटक तुटक प्रयत्नांनी काहीही साध्य होणार नाही. हे काम एक युद्ध आपल्याला जिंकावयाचे आहे या जिद्दीने पार पाडले जायला हवे. खेडेगावात रस्ते नाहीत, स्वच्छता नाही, शिक्षणाची–औषधोपचाराची सोय नाही, प्रकाश नाही, करमणुकीची साधने नाहीत. अशा स्थितीत तिथे लोक राहणार कसे ? त्यांनी तेथे राहावे हे सांगायचा शहरी पुढाऱ्यांना-कार्यकर्त्यांना तरी अधिकार काय आहे ? यासाठी खेडी सुधारण्याचा जुजबी कार्यक्रम डोळ्यासमोर ठेवून उपयोगी नाही. ती अद्ययावत् करण्याचाच दृष्टिकोन बाळगला पाहिजे. खेडी अशी आधुनिक-अद्ययावत होणार असतील, तरच शहरात येणारा लोंढा थांबेल, शहरातीलही काही लोकसंख्या खेड्याकडे आकृष्ट होईल. यासाठी नवीन खेडी योजनापूर्वक वसवली गेली पाहिजेत. जुन्या खेड्यांचे लहान लहान गट करून छोटी नगरे त्यातून साकार करायला हवीत. नवी खेडी वसवताना किंवा जुन्यांचे नूतनीकरण करतानाही स्वयंपूर्णतेचा दृष्टिकोन काही काळ तरी आवश्यक आहे. प्राथमिक गरजांसाठी होणारे स्थलांतर टाळले गेले पाहिजे. वाहतुकीच्या साधनांवरचा वायफळ खर्च थांबवला पाहिजे. स्वयंपूर्णता म्हटल्यावर आपले आधुनिक अर्थशास्त्री 'मध्ययुगीन' 'मध्ययुगीन' म्हणून ओरडा करतील, पण तिकडे दुर्लक्ष करायला हरकत नाही. स्वयंपूर्णता म्हणजे तुटकपणा नव्हे. पण खेड्यातल्या मुलाला अमेरिकेहून आयात केलेली दुधाची पावडर देणे आणि खेड्यातले दूध शहरात विकणे यात कसली शास्त्रीयता आहे ? शुद्ध आचरटपणा आहे हा. उत्पादन आणि वितरण यात काही समतोल, मेळ हवा. हा मेळ घालणे हा स्वयंपूर्णतेचा आशय आहे. उत्पादनापेक्षा वितरणात जास्त साधनसंपत्ती, मनुष्यबळ गुंतवून ठेवण्यात काही हंशील नाही. तेव्हा व्यवहार्यतेच्या मर्यादेत, स्वयंपूर्ण आणि अद्ययावत असे ग्रामसमूह निर्माण करण्याचे कार्य येत्या पाच-दहा वर्षात आपण युद्धपातळीवरून पार पाडणार असू, तरच केंद्रीकरणाचा प्रवाह उलटवता येणार आहे. नाहीतर गेली पंचवीस-तीस वर्षे जे चालू आहे तेच पुढच्या पंचवीस–तीस वर्षातही होत राहील आणि समतोल व स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था या देशात निर्माण होण्याची शक्यता आणखीनच दुरावेल.

सरकारला हे करायला भाग पाडणं आणि यासाठी आवश्यक ते लोकसंघटन गावोगावी उभं करणं हे एक महत्कार्य आहे, यापूर्वी लोकसंघटना आणि सरकार यांचा सांधा कधी जुळून आलाच नाही. लोकसंघटना अलिप्त राहिल्या, सरकार केवळ नोकरशाहीच्या बळावर योजना राबवीत गेले, दोन्ही पंख एकावेळी विस्तारले कधी गेलेच नाहीत. हा योग आता जमून येण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. जनता पक्ष सत्तेवर येवो न येवो, सत्तेला शह देऊ शकण्याइतपत तो आताच ताकदवान आहे. एक प्रचंड अनुशासनबद्ध लोकसंघटनाही पाठीशी उभी आहे. गरुडाने झेप घेण्याची ही वेळ आहे.

नाही तरी राष्ट्रवादाचा नेमका आशय काय असतो ?

गरुड होण्याचे एक भव्य स्वप्न.

उंच आकाशातला मुक्त संचार.

एक प्रबळ आकांक्षा–की हा देश वैभवाच्या शिखरावर नेऊच नेऊ.

ही आकांक्षा बाळगणारे हजारो कार्यकर्ते हे जनता पक्षाचे खरे बळ आहे.

हे बळ सगळे दिल्लीत खर्च होऊन उपयोगाचे नाही.

त्याची सर्वांत जास्त आवश्यकता आहे तिकडे ते प्रयत्नपूर्वक, जिद्दीने वळवले पाहिजे.

दिल्ली आता फार दूर नाही.

पण तो जंगलातला भिल्ल–कातकरी ?

तो बलांडीचा गवत खाऊन दिवस काढणारा बनसोडे !

ती झोपडपट्टीतली उघडी गटारे, नागडी मुले ?

हा जनविराट आहे. अथांग. अकाळविकाळ. आसेतू हिमाचल पसरलेला.

परस्परांपासून तुटलेला. वर्ण आणि वर्ग, भाषा आणि धर्म या भिंतींमुळे परस्परांपासून दुरावलेला.

हा जागा करायचा. एका मानवचैतन्याने, एकात्म भावनेने प्रस्फुरित करावयाचा !

त्याशिवाय हे धुळीत लोळणाऱ्या, घाणीत बुडालेल्या देशाचे चित्र कसे पालटणार ? एकात्म राष्ट्र म्हणून हा देश कसा उभा राहणार ?

आजवर 'विराट'चा शोध फक्त इतिहासात घेतला गेला. आता त्याचे अधिष्ठान 'वर्तमान' हे झाले पाहिजे. विराटाचे भान असणाऱ्यांनी वर्तमानाची उपेक्षा केली. वर्तमानात वावरणाऱ्यांना विराटाचे भान नव्हते. हा वियोग आता संपत आहे हे सुचिन्ह आहे. तळागाळातून या जनविराटाचे हुंकार आता उमटू देत.

दिल्ली काबीज करण्यापेक्षा हे केवढे तरी महत्त्वाचे कार्य आहे.

दहा–पाच वर्षे जरी हे कार्य निष्ठेने, दृढतेने केले तर गेल्या हजार वर्षांचा इतिहास याने बदलून जाईल. ☐

# ‘ मुक्ता ’-फळे

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा श्रीमती दुर्गा भागवत यांनी ऐन आणीबाणीत निधडेपणानें विचारस्वातंत्र्याची मशाल तेजानें तळपत ठेवली होती. एका परीनें सगळ्याच साहित्यिकांची लाज राखली होती. सरकारी पाहुणचारामुळे त्यांची ही मुक्त ‘ मुक्ता ’-फळे मध्यंतरी बंद होती. त्यातूनच ही थोडीशी वेचली आहेत अशोक शहाणे यांनी.

मी तुमच्यापुढे उभी आहे खरी. पण २६ जूनला आणीबाणी जाहीर झाली तेव्हापासून मी देखील पूर्वीची राहिलेली नाही. लेखनबंदी आली नि तेव्हापासून मला हे माझं जन्मांतर आहे की मरणांतर आहे हेच कळेनासं झालं आहे. एक अज्ञात शक्ती मला ओढते आहे. ही प्रबळ मृत्यूशक्ती जे मला सांगते आहे, तेच मी आता तुमच्यापुढं मन मोकळं करून सांगणार आहे.

आणीबाणी आली नि आपला साऱ्यांचाच मागल्या काळाशी असलेला संबंध तुटला. दुसऱ्या महायुद्धानंतरचं जग नि आधीचं जग यात काहीच सांधा राहिलेला नाही’ असं स्टीफन झ्वाइगनं म्हटलं होतं. त्याला ते जिणं असह्य झालं नि त्यानं आत्महत्त्या केली. पुष्कळ वेळा वाटतं की, आपणही तसंच करावं. पण मरण तर अटळच आहे. वेळच फक्त अनिश्चित आहे. ही परिस्थिती तर मरणासमानच आहे. मग आपण मेलो आहोत असे समजूनच आपल्याला न्याय्य वाटतं ते बोलून-करूनच परिस्थितीचं आव्हान का स्वीकारू नये ? या परिस्थितीत तर जगण्यासारखं काही राहिलेलंच नाही, मग भ्यायचं कशाला ?

हा झगडा अशासाठी करायचा की, पुढच्या पिढीनं आम्ही बुद्धिजीवी हे आव्हान न घेता गेलो एवढं तरी म्हणू नये. वास्तविक पुढच्या पिढीनं आम्हाला बरं म्हणावं असं काहीच संचित आमच्या पिढीनं निर्माण केलं नाही. गांधींसारख्यांच्या प्रेरणेनं स्वातंत्र्याचा लढा झाला. त्यात यश आलं. पण ते आमच्या मूर्ख पिढीनं विध्वंसून आज ही परिस्थिती निर्माण केली. शासनाइतकेच आम्हीही याला जबाबदार आहोत. तेव्हा आता तरी आयुष्याच्या अखेरच्या पर्वात आणीबाणीला तोंड देऊन आम्ही आमची माणुसकी नि विचारस्वातंत्र्याचं प्रेम सिद्ध करायला हवं...

लेखनावर एकदा बंधन आलं की, लेखन मरतं. लेखन मेलं की, विचार मरतात आणि विचार मेले की, संस्कृती धोक्यात येते नि विकृतीला आरंभ होतो. म्हणून सामाजिक नि सांस्कृतिक आरोग्यासाठी विचार-मुक्त विचार-हे अपरिहार्य मानले पाहिजेत.

जगात विचारस्वातंत्र्यावर निष्ठा असलेल्यांनी मुक्त विचारांची अपरिहार्यता मानलेली आहे. नेपोलियन बुद्धिमंतांना कस्पटासारखं मानू लागला, तेव्हा अनेक बुद्धिवंत नि कलावंत फ्रान्स सोडून देशोधडीला लागले. पण त्यांनी विचारस्वातंत्र्य सोडलं नाही. गेल्या दोनशे वर्षांत असे प्रसंग अनेक ठिकाणी आले, पण तिथले लेखक नि विचारवंत हे झुंज देण्यासाठी पुढं आले. त्यांनी पाठ दाखवली नाही. हजारो लेखकांत दोन जरी असे निघाले, तरी त्यांच्यामुळं राष्ट्र तेजस्वी बनतं. राष्ट्र म्हणजे व्यक्तींचा समूह नव्हे. व्यक्तिमत्त्व असलेल्यांचा समूह म्हणजेच राष्ट्र. अखंड विचारप्रवाहानं हे व्यक्तिमत्त्व घडतं. म्हणून विचारांच्या अभिव्यक्तीवरची बंधनं रद्द होणं आवश्यक आहे.

या मुक्त विचारांसाठी आपण जर उभे राहिलो नाही, तर भीतीचं राज्य निर्माण होईल. पन्नास वर्षांपूर्वी अशा भीतीच्या वातावरणात महात्मा गांधींनी प्रकाश दाखवला. त्यांचा प्रकाश इतके दिवस पुरला. आता पुन्हा अंधारी झाली आहे. मात्र या अंधारानं आपण दबून जाता कामा नये. आपल्या हृदयात जेवढा प्रकाश असेल तो सोबत घेऊन दुबळ्या पावलांनी, पण धीमेपणानं, आपण वाटचाल केलीच पाहिजे...

... डोळ्यांसमोर घडणाऱ्या घटनांना आम्ही साहित्यबद्ध करू शकत नाही. साहित्याची ही अपरिमित हानी आहे. आधी विसावं शतक मागच्या सर्व शतकांपेक्षा मानवाला अधिक उत्तेजित करणारं, क्षोभांनी भरलेलं शतक आहे. ज्ञानाची क्षितिजं हरघडी रुंदावताहेत. हिंसाही वाढते आहे. जग एकत्रित होऊ पाहतं आहे. आणि देशांची शकलंही पडताहेत. त्याचे परिपाक डोळ्यांसमोर आहेत. पण त्यांचं वर्णन सत्ताधीशांच्या केवळ गुणगौरवाखेरीज आपल्याला करता येत नाही. ही अपरिमित हानी आहे. आताच कुठं आमचा लेखक विविध क्षेत्रांतल्या लहानमोठ्या घटना व व्यक्ती यांना अपुऱ्या ज्ञानानं का होईना, पण चापसूनं पाहू लागला होता. राजकारणाला आता-आताच हात घालावा असं कुणाच्या क्वचित मनात येत होतं. गंभीर वृत्तीनं राजकारणाकडं बघावं हे कुतूहल निर्माण होतं. त्याच सुमारास बंधनं आली की, विचारांचा ओघच खंडित होतो. नुकतंच ऐकलं की, विजय तेंडुलकर व जयवंत दळवी यांची राजकीय समस्यांना किंचित स्पर्श करणारी नाटकं अडकून पडली आहेत.

मानवाला अनेक दुःखं भोगावी लागतात. अनेकांची दुःखं मुकी पण खोल असतात. त्यांना वाचा देणं हेच साहित्यिकाचं कार्य असं कामू म्हणतो. परंतु आपल्याकडं साहित्यिकांनी अशा प्रचंड दुःखांना वाचा पुरवली नाही. त्यांना वाचा दिली ती महात्मा गांधींनी व तीही राजकीय पार्श्वभूमीवर. तेव्हापासून आमच्याकडे राजकारण आणि साहित्य ह्यांचं कार्य अतूट झालं आहे. म्हणूनच साहित्य हे आता राजकारणापासून तोडता यायचं नाही....

... भारतातल्या लेखकाला लेखनावर जगण्यासारखी परिस्थिती अजून आलेली नाही. बहुसंख्य लेखकांना जगण्यासाठी दुसरे साहित्येतर उद्योग करणं भाग पडतं. हे तर मोठंच बंधन त्यांच्यावर कायमचं आहेच. ते पत्करल्यावर आपल्या या चिमुकल्या

विश्वात त्यानं आणखी काही बंधनं लादून घेणं उचित नाही. तसं झालं तर त्याच्या अस्तित्वाचाच लोप होईल...

...राजा आणि लेखक यांच्यातला आश्रयदाता आणि आश्रित हा संबंध (पूर्वीच्या) संस्कृतीतला एक आकारबंध होता. हे मान्य केलं तरी त्यालाही काही थोर अपवाद होते. ते म्हणजे संतकवींचे. ज्ञानेश्वरांनी रामदेवराव यादवाची नोंद ज्ञानेश्वरीच्या अखेरीस केली असली, तरी देखील ते यादवांचे आश्रित बनले नाहीत. समस्त वारकरी कवींची परंपरा राजाश्रयापासून कटाक्षानं दूर राहिली. आद्य वारकऱ्यांपासून कालमानानं दूर असणारे एकनाथमहाराजदेखील राजाश्रयापासून दूर होते.

परंतु राजांच्याबद्दल कसलंही किल्मष मनात न बाळगणाऱ्या काही संतांनी राजाची नुसती भेट घेण्याचंही नाकारलं आहे. अल्लाउद्दीन खिलजीचं निमंत्रण आल्यावर कबीरानं 'अल्लाचा दरबार सोडून तुमच्या दरबारी मी कुठं येऊ?' असं सांगितलं. अकबरानं आमंत्रण पाठवल्यावर तुळशीदासानंही 'रामाचा दरबार सोडून आपण कुठं जात नाही' म्हणून सांगितलं. शिवाजीमहाराजांनी आमंत्रण पाठवल्यावर तुकाराममहाराजांनी 'तुम्हाला भेटून आम्हाला काय करायचं आहे, चालण्याचा वृथा शीण मात्र आहे' असं उत्तर दिलं.

...राजाश्रयाहून अधिक मोठं नि व्यापक श्रेय ज्या द्रष्ट्यांना दिसत होतं, ते कधीही राजाश्रयाला गेले नाहीत. राजेलोकच स्वतः पुनीत होण्यासाठी अशांचं दर्शन घेत.

बादशहा अकबरासाठी तानसेन गात होता, तर त्याचा गुरू हरिदास कुठल्याही पार्थिव सत्तेला खिजगणतीत न घेता देवासाठी गात होता.

...लेखकानं राजकारणात पडू नये, या समजुतीत तथ्य नाही...आजचे आपले सत्ताधिकारी 'साहित्यिकांनी फक्त साहित्य पाहावं, राजकारण आमचं आहे, त्यात लेखकांनी पडू नये,' असं पदोपदी संधी सापडेल तिथं सांगताहेत आणि मान्यवर समजले जाणारे लेखकही 'आपल्याला राजकारणाशी काय कर्तव्य?' अशी सोयीची समजूत करून घेऊन शिवाजी, माधवराव पेशवे, दुसरा बाजीराव वगैरे जुन्या राजकारणी पुरुषांवर 'इतिहास' या गोंडस नावाखाली विपुल रचना करताहेत. जुनं राजकारण नव्या राजकारणाला कुठं भिडत नाही, अशी आपली खोटी समजूत ते करून घेताहेत आणि शासन आणि लोक दोघांकडूनही भलाई मिळवू पाहताहेत.

राजकारण माणसाच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. लोकशाहीत तर त्याचं भान क्षणभरही विसरून चालत नाही. चालू नये. अशा परिस्थितीत लेखकानं राजकारणाचं पथ्य पाळण्याचं काहीही कारण नाही. राजकारणधुरंधर गांधींनी देशालाच नव्हे तर, जगाला उत्कृष्ट वैचारिक आणि नैतिक साहित्य पुरवलं आहे. भारतीय उद्‌गारांची शान त्यांच्यामुळं जशी जगभर राहिली, तशी क्वचितच कुठं राहते.

टागोरांनाही...ब्रिटिशांनी दिलेलं नाईटहुड सोडून दिलं. एवढंच नाही तर, गांधी तुरुंगात असताना त्यांच्यावतीनं, ते गैरहजर आहेत म्हणून, त्यांनी ब्रिटिशांना भारतीयांतर्फे कैफियत देखील सादर केली. जालियनवाला बागेतल्या प्रसंगानं टागोरांना राजकीयदृष्ट्या प्रखर केलं.

मग आणीबाणीतून निघालेल्या शासकीय लेखनबंदीमुळं तुम्ही आम्ही का जागृत होऊ नये? तो आमचा जन्मजात वारसा आहे आणि आम्ही तो अभिमानानं जपला पाहिजे.

...राजकारणाचं भान गमावणं म्हणजे स्वत्वाचंच भान घालवणं आणि अस्मितेला वंचित होणं आहे. हा नुसता दुबळेपणाच नव्हे, तर अपराधदेखील आहे. साहित्य आणि संस्कृती आणि कला यांच्या आवरणाखाली शासन तुमच्या आमच्या जागृत राजकारणी जाणिवेला दडपीत आहे...हुसेनच्या कलेला शासन अमाप गौरवीत आहे. त्याचं राजकारण चालतं. कारण ते प्रचारात्मक आहे. तुमचं आमचं चालत नाही. त्यात वस्तुस्थितीतही सत्ताधाऱ्यांना बुद्धिभेद दिसतो.

वीस कलमी कार्यक्रमावरच्या गाण्यांचा उदोउदो होतो. पण टागोरांचं 'आपला माथा उंच ठेवा,' हे सांगणारं गीत आक्षेपार्ह ठरतं. गांधींची वचनं उद्‌गारता येत नाहीत. नेहरूही कालबाह्य ठरले आहेत.

...सेन्सॉरशिपच्या मगरमिठीत समग्र साहित्याची गळचेपी झाली आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी तेंडुलकरांच्या नाटकावर बंदी आली तेव्हा साहित्यातल्या मान्यवरांनी निषेधाचं पत्रक काढलं. पण आज साहित्य-काळोखी कोंदाटून आलेली असताना आणि यापुढं स्वतंत्र विचाराचा कोंब नि कोंब खुडून टाकायचा शासनाचा निर्धार व्यक्त झालेला असताना आम्ही ब्रही काढीत नाही, ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे!

...याहून अतिशय खेदजनक गोष्ट म्हणजे शासकीय कृपेची परम आवश्यकता लेखक व विचारवंतांना लागली की, ते शासनातल्या सत्ताधाऱ्यांनाही त्यांना न पेलणाऱ्या पदव्या देतात. नुकतीच हिंदी साहित्य संमेलनानं नाही का 'साहित्य वाचस्पती' ही पदवी इंदिरा गांधींना दिली?

शासकीय पदव्या आणि अनुदानांची कदर न करणारे दुर्मिळ लेखक (-कलावंत) अद्यापही या देशात आहेत, हे आमचं मोठं भाग्य आहे.

शिशिरकुमार भादुडी हे बंगालमधले रंगभूमीवरचे युगकर्ते. दिल्लीच्या संगीत नाटक अकादमीवर ते होते. राज्याच्या अकादमीवर पण होते. 'नाटकवेड्या लोकांकरिता स्वस्तात भाड्यानं मिळेल असा रंगमंच बांधून द्या' ही त्यांची मागणी कुणीच मान्य केली नाही. सरतेशेवटी शेवटच्या आजारपणात त्यांना एकदम 'पद्मश्री' दिली. हे त्यांना वर्तमानपत्रातूनच कळलं. त्यांनी पद्मश्री परत केली. 'आपल्याला रंगभूमीबद्दल आस्था आहे अशी जनतेची समजूत करून देण्यासाठी सरकारनं मला देऊ केलेली पद्मश्री मी नाकारतो. कारण खरा प्रकार काय आहे, ते मला ठाऊक आहे.' असं त्यांचं म्हणणं. बहुतेक त्यानंतरच सरकारनं आधी विचारून पदव्या देण्याची पद्धत सुरू केली.

आणीबाणीच्या काही काळ आधी बिहारचे मान्यवर लेखक फणीश्वरनाथ 'रेणू' यांनीही आपली पदवी आणि मासिक अनुदान परत केलं. ही पदवी आणि अनुदान जनतेच्या दुःखांना वाचा फोडणारं साहित्य त्यांनी निर्माण केलं म्हणूनच दिलं होतं. आता आपण निर्माण केलेल्या पात्रांच्या दुःखात प्रत्यक्ष सहभागी होण्याच्या गुन्ह्यावरूनच या जनताभिमुख रुग्ण लेखकाला कारावासात डांबण्यात आलं.

कर्नाटकचे शिवराम कारंथ साहित्य अकादमी आणि संगीत नाटक अकादमी य॰

दोहोंची पारितोषिकं मिळालेले मान्यवर लेखक. पण आणीबाणीनंतर त्यांनी 'पद्म-भूषण' पदवीचा त्याग केला आणि संगीत नाटक अकादमीचं पारितोषिकही परत केलं.

प्रख्यात सतारिये विलायतखाँ यांनाही सरकारनं पदवी देऊ केली होती. 'निवड करणाऱ्या समितीत सतारीचे जाणकार कोण आहेत?' अशी पृच्छा खाँसाहेबांनी केली. 'सर्वसाधारण सगळ्याच संगीताचे जाणकार समितीत असतात' असं उत्तर त्यांना मिळालं. यावर 'जो बहुमान आपल्या गुरूला मिळालेला नाही, तो आपण स्वीकारू शकत नाही' असे बाणेदार उत्तर देऊन या कलाकारानं सरकारी पदवीचा पोकळपणा उघडकीला आणला.

पण हे सगळे अपवाद झाले. सर्वसाधारण दशा पाहिली की भविष्यासंबंधी मन व्याकुळ होतं.

...काळाची चक्रं उलट फिरत असताना लेखकानं फार सावध राहिलं पाहिजे. स्वार्थरहित नि निर्भय झालं पाहिजे. सोल्झेनित्सिननं रशियन जनतेला दडपशाहीच्या कोंडीतून सुटण्यासाठी जे उपाय सांगितले, ते सांगताना हे उपाय आपल्याला गांधींपासून प्राप्त झाले असून गांधींच्या उपायांपेक्षा ते फार सौम्य आहेत, असं प्रांजळपणं सांगितलं आहे.

...यावेळीं भारतीय लेखकांनी आपला स्वतंत्र आणि नैतिक विचारांचा वारसा न सोडता...निखळ सत्याला सामोरं जावं....

...आज मुख्यकरून विचार-स्वातंत्र्याचा उद्घोष करावा लागतो आहे, ते लेखनबंदी आल्यामुळंच करावा लागतो आहे असं नाही. 'लेखकांनी विपुल लेखन करण्याची संधी हीच आहे, तेव्हा वीस कलमांवर लेखन करा नि समाजधारणेला मदत करा' असं यशवंतराव–शंकररावांसारखे मंत्री सांगताहेत, त्याची दखल आपण वेळीच घेतली पाहिजे. शासकीय आज्ञेला अनुसरून एकाच चाकोरीतून लेखकांनी लेखन करावं हा जो पवित्रा आहे, त्यात केवळ प्रचार–नि तोदेखील बुद्धिहीन प्रचार–अभिप्रेत आहे. लेखकांनी आणि वाचकांनी याबाबतीत काय करावं, ते स्वतःच ठरवावं. अद्याप खाजगीत विचार करण्यावर सरकारी निर्बंध आलेला नाही.

अनेक व्यवसायात पोटासाठी लोकांना लेखनकामाठी करावी लागते. ते लोकही क्वचित कुठं साहित्यिकांत मोडले जात असत. नाही असं नाही. पण आता तर हेच खरे साहित्यिक नि स्वतःचा विचार करून जागत्या नीतीला साक्षी ठेवून लिखाण करणाऱ्यांना असाहित्यिकदेखील गणलं जाईल. सच्च्या लेखकाला बिनलेखक मानलं, तरी त्याचं अडत नाही. पण समाजहितैषी लेखकानं निकटच्या नि दूरच्या भविष्यावर नजर ठेवून ज्ञानाची निष्ठा, सत्याची बूज नि नीतीची चाड कधीही सोडता कामा नये.

...सारं अंधारून आलं आहे. सुबुद्ध अस्तित्वाचा लोप होतो आहे. अशा वेळी आपण उघड मरणाला सामोरं जायला हवं. मरणात काय वाईट आहे? मरणाइतकं सत्य जीवनात दुसरं नाहीच. ज्ञान मिळवायचं ते ध्येयासाठी नि ध्येय पार पाडायचं ते सुंदर मरणासाठी.

...मृत्यूनंच जीवनाला अर्थ दिला आहे. माणसं मरतात. पण त्यांची स्वप्नं मरत नाहीत. मानवजातीबरोबर ती सतत चालतच राहतात. मरणाचं भान असलं, तरच माणूस जीवन सार्थकी लावतो. आपण मेल्यावर पुढच्या पिढीच्या नजरेतून सुखी जग पाहायची त्याला इच्छा असते. मरणाला पंख फुटले, तरच ही शाश्वत आशा टिकून राहते नि ती कार्यान्वित होते.

मरण माणसाची करुणा टिकवतं. त्याला पश्चात्तापानं शुद्ध करतं. स्वातंत्र्याची पंचवीस वर्षं विध्वंसून टाकणाऱ्या आमच्या पिढीला या पश्चात्तापाची फार गरज आहे. मरणाच्या जवळ आम्ही चाललो असताना पुढच्या पिढीला आम्ही

काळोखाची रजनी होती
हृदयी भरल्या होत्या खंती

एवढंच आजच्या परिस्थितीबद्दल म्हणून चालणार नाही. वयाचं ओझं बाजूला टाकून आम्ही नवा मनू घडताना पाहिला पाहिजे. तो घडवला पाहिजे. मनू नेहमीच नवा असतो. तो आजचाच दिवस असतो.

नव्या मनूचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे।
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे।

हे आपलं सर्वांचं समूहगीत झालं पाहिजे.

पण वीरांची गाणी ढोलस असतात. त्यातला अचूकपणा जिवंत निष्ठेचा असतो. आज आपल्याला हर अंगानं झगडायचं आहे.

□

['मुक्ता' या पॉप्युलर प्रकाशनातर्फे लौकरच बाहेर पडणाऱ्या पुस्तकातून साभार.]


## साप्ताहिक माणूस

मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन
(अधिनियम ४, नियम ८ अन्वये)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : पुणे |
| २. प्रकाशन काल | : साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | : श्री. ग. माजगावकर<br>: १०२५ सदाशिव, पुणे ३० |
| ४. नागरिकत्व | : भारतीय |
| ५. प्रकाशन संस्थेचे नाव | : राजहंस प्रकाशन |
| व तिच्या भागीदारांची नावे व पत्ते | : १. ब. मो. पुरंदरे<br>१०२५ सदाशिव, पुणे ३०<br>२. श्री. ग. माजगावकर<br>१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.
प्रकाशकाची सही

दिनांक ५ मार्च १९७७ श्री. ग. माजगावकर

पुढील अंकी

# जनता पक्ष, संघकार्य आणि भारतीय राजकारणाची नवी दिशा

लेखक

प्रा. राम बापट

एका जिव्हाळ्याच्या विषयाची समग्र आणि साधार चिकित्सा

# चित्र हवे भयशून्य, उंच होवो माथा

अन्नदाशंकर राय

## दोन मुलाखती । डॉ. श्रीराम लागू । जयवंत दळवी

# खास बारामती निवडणूक पुरवणी

# आणीबाणी आणि कलाकार - नागरिक

## मुलाखती

☐ पु. ल. देशपांडे ☐ राम शेवाळकर ☐ ग. दि. माडगूळकर ☐ शाम जोशी
☐ शि. द. फडणीस ☐ प्रभाकर पाध्ये ☐ शब्दांकन : शिरीष सहस्रबुद्धे

आणीबाणी आणि त्यानंतरच्या निवडणुकांचा निर्णय या संदर्भात काही साहित्यिक–कलाकार मंडळींच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याची कल्पना निघाली, तेव्हाच आणीबाणीचा विचार त्यांच्यापुरता, प्रामुख्यानं सामाजिक आणि सांस्कृतिक परिघात करायचं ठरवलं होतं. अर्थात आणीबाणी आणि निवडणुका या दोन्ही राजकीय घटना–प्रक्रिया असल्यामुळे या चर्चेत राजकीय पडसाद उमटलेले असणं अशक्य नाही. तरीही या मुलाखतींमागे राजकीय विचारप्रवाह नाही. साहजिकच ज्या मान्यवर व्यक्तींना मुलाखत देण्याची विनंती केली, त्यांच्या निवडीमागेही कोणतेच विशिष्ट सूत्र नाही. संवेदनक्षमता, सामाजिक जाणीवा आणि निर्भीड जागरुकता ही खऱ्या कलाकाराची वैशिष्टचं त्यांच्यात असावीत हीच कसोटी गृहित धरली गेली.

किंबहुना या मुलाखत–लेखाचा पसारा मांडण्यामागचा उद्देशच तो आहे. आपल्या संवेदनाक्षमता आणि निर्मितिक्षमतेमुळे समाजाच्या सुसंस्कृततेचे मापदंड मानल्या जाणाऱ्या या अल्पसंख्य परंतु महत्त्वपूर्ण समाजघटकांचा, या देशातल्या एका ऐतिहासिक घटनेविषयीचा दृष्टिकोन जाणून घ्यायचा आहे. मुलाखती - कलाकारांच्या असल्यानं आविष्कारस्वातंत्र्य हा स्वाभाविकपणेच चर्चेचा केंद्रबिंदू राहिला आहे. या प्रातिनिधिक कलाकारांशी चर्चा करतानी ज्या अनेक गोष्टी मला जाणवल्या, त्या लेखाच्या अखेरीस संकलित स्वरूपात स्पष्टपणे मांडलेल्या आहेतच. तथापी तत्पूर्वी ज्या त्या कलाकार–साहित्यिकाची बाजू शक्यतो त्याच्याच शब्दात मांडण्याचा हा एक प्रयत्न :

### श्री. पु. ल. देशपांडे

**आणीबाणीबद्दलची प्रारंभीच्या काळातली आपली प्रतिक्रिया ?**

आणीबाणी जाहीर झाल्याचा पहिला धक्का अत्यंत अनपेक्षित होता आणि तो वृत्तपत्रांवरील सेन्सॉरच्या आक्रमणामुळे एकदम जाणवला. हा अनुभवच नवीन, त्यामुळे आश्चर्यही वाटलं. इंग्रज राज्यकर्त्यांनीही आक्षेपार्ह मजकूर असलेला अंक फक्त जप्त करून खटले भरणं यासारखे कायदेशीर उपाय योजले होते. त्यामुळे या हल्ल्यामागे फॅसिस्ट शक्तींचा हात असावा, अशी एक प्रतिक्रिया झाली. यापूर्वी भिन्न भिन्न विचारसरणीच्या कलाकारांनाही शासकीय पारितोषिके भेदभाव न करता दिली जात होती. त्यामुळे काही विशिष्ट विचारसरणीवर सरकार असा एकदम घाव घालील अशी कल्पनाही नव्हती.

कुणास ठाऊक, कदाचित 'आपल्याप्रमाणे सर्वांचीच लोकशाहीवर श्रद्धा आहे,' हा भाबडा विश्वास करणारे आम्हीच चुकलो असू !

**या भूमिकेत नंतरच्या अठरा महिन्यांत काही बदल वगैरे ?**

हा सर्व काळ अतिशय अपमानित वाटत राहिलं. माणसाची मूलभूत प्रतिष्ठा या देशातून हद्दपार झाली आणि पुन्हा कधी ती परत मिळेल की नाही कुणास कुणास ठाऊक, अशी भावना झाली. मुख्य म्हणजे आणीबाणीच्या दीड वर्षात इंदिराजींचं नेतृत्व मानणारे तेवढे सर्व देशभक्त आणि बाकीचे सगळ तेवढे देशद्रोही, अशी दोन राष्ट्रे एका देशात तयार झाली. सत्ताधाऱ्यांना मी सलाम करणार नसेन, तर माझ्या देशात परदेशी होण्याची वेळ माझ्यावर आली. माझ्या पिढीला या हानीचं दुःख जास्त झालं, कारण नेमकं हेच मिळवण्यासाठी आमच्या डोळ्यांसमोर स्वातंत्र्यलढयाचा खटाटोप झाला होता !

**एक कलाकार म्हणून आणि एक नागरिक म्हणून, आपल्या या भूमिकेचं समर्थन आपण कसं करू शकाल ?**

कलाकाराचा अपमान आणि सामान्य माणसावरचा जुलूम यात फार अंतर नाही. 'व्यक्तिस्वातंत्र्य ही उच्चभ्रू वर्गाचीच ठेव आहे,' असं म्हणणाऱ्या माझ्या एका शेतकरी मित्राला मी हाच फरक असा सांगितला होता की, सामान्य नागरिकांना भाकरी मिळत नाही आणि 'गरिबांना भाकरी मिळत नाही,' असा आक्रोश आम्ही लेखक करीत होतो तो आमचा हक्क हिरावून घेतला गेला म्हणजेच व्यक्तिस्वातंत्र्य गेलं. सामान्य माणूस आणि लेखक यांचं नातं हे असं जुळतं.

**आपली ही भूमिका जाहीरपणे मांडण्याचे काही प्रयत्न ?**

रेडिओ, टी. व्ही. वरील बहिष्काराखेरीज, आणीबाणीचा पत्रकांद्वारे मी अनेकदा निषेध केला. राष्ट्रपतींना मराठी साहित्यिकांतर्फे पाठविलेल्या निवेदनावर साहित्यिकांच्या स्वाक्षऱ्या मिळविण्यासाठी प्रयत्न केले. दुर्गाबाईंना अटक झाल्याचे कळल्यावर सरकारला निषेधपत्र पाठवलं आणि पुढच्या साहित्यसंमेलनाचं अध्यक्षपद त्यांनाच देण्याची सूचना साहित्यपरिषदेला केली.

कराडच्या साहित्यसंमेलनात आम्ही घेत-

लेली प्रखर भूमिका वाचकांना ठाऊक आहेच. कराड आणि इचलकरंजी या दोनही संमेलनात कोणत्याही मंत्र्याबरोबर व्यासपीठावर बसण्यास मी नकार दिला होता-- प्रतीकात्मक निषेध म्हणून. सर्व दळणवळण खंडित झाल्यामुळे प्रतिकाराचं संयोजन कुणालाच नीटसं करता आलं नाही असं मला वाटतं.

**आणीबाणीच्या काळातल्या कलाकारांच्या एकंदर performance बद्दल आपण समाधानी आहात ?**

निश्चितच नाही. आम्हाला आणखी नकारात्मक, बहिष्कारात्मक असं काही जरूर करता आलं असतं. याची कारणं अनेक, पण मुख्य तीन : दहशत, व्यक्तिगत सुखासीनता आणि मनसोक्त लाचारी ! प्रत्येकाच्या त्यागाला मर्यादा असते; प्रत्येकजण सर्वस्व पणाला लावून सार्वजनिक चळवळीत उतरणं कठीण असतं हे खरं आहे, पण आमच्या निषेधपत्रकावर सह्या करतानाही साहित्यिकांनी खळखळ करावी याचा अर्थच समजू शकत नाही. एकंदरीतच सामाजिक गुंतवणूक करून घेणारे कलाकार आपल्याकडे खूप कमी दिसतात. लोकशाही मूल्यांची जपणूक करण्यासाठी व्हावेत तसे प्रयत्न नेते आणि विचारवंतांकडून झाले नाहीत, तर संपूर्ण समाजाला काही विशिष्ट सांस्कृतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न कलाकार-साहित्यिकांनी केला नाही. आणि म्हणूनच या दडपशाहीच्या दीड वर्षांत प्रतिकाराचा उद्रेक झाला नाही. स्वातंत्र्य हे मूलभूत जीवनमूल्य आहे याची जाणीव आणि ते आपण गमावलंय याची खंत कुठेच नव्हती. हे अपयश फार मोठं आहे. त्याची जबाबदारी आमच्यावरही येतेच.

कदाचित देवळात जाऊन पूजा करायच्या हक्कावर गदा आली असती तर मात्र, सगळी जनता पेटून उठली असती ! आणीबाणी कधी उठणार हे ज्योतिष्यांकडून ऐकायची वेळ आली म्हणजे विलक्षण दुःख होतं ते यामुळेच !

**आणीबाणीचे काही विशेष अनुभव !**

एक गोष्ट अशी की, आणीबाणीच्या या काळात ज्ञानसाधनं आणि विचारवंतांची अमर्याद आणि असह्य हेटाळणी झाली. "तुम्ही मूठभर, तुम्ही 'ivory tower' मधले," वगैरे वारंवार हिणवून त्यांना निष्प्रभ करायचा आटोकाट प्रयत्न झाला. प्रत्यक्षात आमचे विद्वान-विचारवंत 'आयव्हरी टॉवर' मोडण्याचा अखंड प्रयत्न करीत आलेले आहेत. महाराष्ट्रातल्या सहकारी चळवळीच्या बांधणीत कै. धनंजयराव गाडगीळांचा काहीच वाटा नव्हता का ?

आणीबाणीनं केलेलं एक मोठं नुकसान म्हणजे आणीबाणीच्या काळात जनतेची प्रजा झाली ! राज्यकर्ते हे केवळ 'लोकांचे प्रतिनिधी' ही भावना नुकती रुजू लागली होती तोच हा तडाखा बसला आणि घड्याळाचे काटे पुन्हा पंचवीस वर्षांनी मागं गेले आहेत.

---

'आविष्कारस्वातंत्र्यावरील कोणतंही बंधन हा कलाकाराचा अपमानच आहे' हा मुद्दा स्पष्ट करताना पु. ल. म्हणाले, 'एखाद्या उत्तम शास्त्रीय गायकाला 'तू वीस कलमी प्रचाराची गाणी गा' असं सांगणं हा तर उघड-ढोबळ अवमान (gross insult) झाला. पण 'आजची तुझी बैठक मालकंस रागानं सुरू होऊन बागेश्रीपाशीच संपली पाहिजे.' असे त्याला बजावणं हाही त्याचा अपमानच आहे.'

कलाकारांचे असे नानाविध अपमान, उपेक्षा आणीबाणीच्या काळात झाल्याचा संबंधिताचा दावा आहे.

यावरून एक घटना आठवते. काल्पनिक नाही, फक्त नावं देत नाही एवढंच.

एका श्रेष्ठ साहित्यिकानं लिहिलेल्या आणि दिग्दर्शिलेल्या एका नाटकाचा त्रिशतक महोत्सवी प्रयोग या काळात झाला.

'आणीबाणीच्या निषेधार्थ या प्रयोगाला कुणाही मंत्र्याला बोलावू नये, बोलावल्यास आपण स्वतः प्रयोगाला हजर राहणार नाही' अशी स्पष्ट जाणीव या साहित्यिकानं संबंधित नाट्यसंस्थेला दिली असतानाही त्याची पर्वा न करता मंत्र्यांच्या उपस्थितीत हा त्रिशतकमहोत्सवी प्रयोग झाला असं ऐकलं.

एका नाट्यसंस्थेलाही आपल्या लेखकदिग्दर्शकापेक्षा मंत्र्याचं महत्त्व अधिक वाटावं याला कालमहिमा म्हणायचं की कलाकाराची किंमत ?

*

★ 'कराडच्या साहित्यसंमेलनात शक्य व आवश्यक असूनही साहित्यिकांनी आणीबाणीविरोधात पुरेशी टोकाची (की टोकदार ?) भूमिका घेतली नाही,' हा एका प्रसिद्ध नाटककारांचा आक्षेप.

तर 'हेच नाटककार मग टी. व्ही. वर का ? आणि कराडला हजर राहण्याची तसदी यांनी का घेतली नाही ?' अशी संमेलनातील उपस्थित साहित्यिकांची प्रतिटीका.

★ 'आणीबाणीच्या निषेधार्थ साहित्यिकांनी दिवाळी अंकात लेखन करू नये,' असा बूट निघाला होता.

आणीबाणीत आलेल्या दोनांपैकी फक्त एकाच दिवाळीत हा बहिष्कार का अंमलात आला असावा ?

उपयोग होत नाही म्हणून ? एकी टिकली नाही म्हणून ? परवडत नाही म्हणून ?

★ दुर्गाबाईंच्या अटकेचा निषेध महाराष्ट्र साहित्य परिषदेनं का केला नाही, याचं एक मनोरंजक उत्तर कार्याध्यक्ष श्री. ज. जोशींनी दिलं : "त्यांच्या अटकेची बातमी, त्या सुटल्याच्या बातमीमुळेच तर आम्हाला प्रथम कळली." पण पु. ल. तर म्हणाले की, असा ठराव करण्याची सूचना मी स्वतः साहित्य-परिषदेला केली होती.

★ नाटकावरील सेन्सॉरशिपविषयीच्या एका प्रश्नाला अमोल पालेकर यांचं उत्तर : "सगळ्या आयुष्यावरच जर एक सेन्सॉरशिप आपण मान्य करू शकतो तर नाट्यचित्रपटावरच्या सेन्सॉरशिपचं काय विशेष ?"

★ असं पुष्कळ काही.

यावरही भाष्य नाही.

*

लोकशाहीत कधी न संभवणारं राजा-प्रजाजनाचं नातं आणीबाणीनं निर्माण केलं. शिवाय नोकरशाहीच्या हाती अमर्याद अधिकार सोपवून निर्बुद्ध दडपशाहीची वाट मोकळी करून दिली.

**जनता पक्षाबाबत आपली प्रतिक्रिया ?**

जनता पक्षनिर्मितीची प्रक्रिया स्वागतार्ह आहे, तथापी ती निवडणुकीपुरतीच राहू नये. निवडणूक हा एक टप्पा आहे. जनता पक्षाला जी राज्यक्रांती घडवायची आहे ती वैचारिक क्रांतिशिवाय शक्य होणार नाही. त्यामुळे एकीकडे लोकशाही रक्षणावर जागृतपणे लक्ष ठेवतानाच, ती वैचारिक जागरुकता समाजाच्या अगदी तळापर्यंत आणि खेडोपाडयापर्यंत पोचवायचा प्रयत्न जनता पक्षानं केला पाहिजे. मुख्य म्हणजे बळकट सिद्धान्त—तत्त्वप्रणालीवर आधारलेला कट्टर लोकशाहीवादी पक्ष विचारवंतांसह बांधला पाहिजे. कारण पक्षांना तत्त्वज्ञान लागतं आणि काँग्रेस जवळ ते नाही.

**कलाकारांचा राजकारणाशी संबंध कसा असावा ?**

कलाकारांनी लोककारणामध्ये शिरावं. चांगला कलाकार हा समाजजीवनाशी लिप्तच असावा लागतो. संवेदक्षमता हा त्याचा आत्मा असल्यामुळे राजकारणापेक्षा कलाकार लोककारणातच प्रभावी ठरू शकतील. 'मला काय त्याचं' ही भावना बाळगणारा बोथट मनाचा माणूस पुरेसा कलाकार असूच शकत नाही. खऱ्या कलाकाराकडून प्रत्यक्ष कृती होईल न होईल, पण त्याच्या सहप्रवाश्यांच्या दुःखांना वाचा जरूर फुटेल.

**निवडणुकीनंतर पुन्हा आणीबाणी येण्याच्या शक्यतेवर आपली प्रतिक्रिया ?**

व्यक्तिस्वातंत्र्य — आविष्कारस्वातंत्र्य ही जिथे चैन मानली जाते, तिथे असं काही घडणं काय अशक्य आहे ?

गरीब देशात दहशतीची राजवट प्रदीर्घकाळ निर्वेधपणे चालू शकते.

मुळात मला स्वतःला तरी, मिसा अस्तित्वात असेपर्यंत आपण १००% स्वतंत्र भारतीय नागरिक आहोत असं वाटणार नाही !

□

## प्रा. राम शेवाळकर

१. इंदिराजींच्या निवडणुकीचा निर्णय अनपेक्षित (आणि मला अप्रियही) होता. उच्च आदर्श घालून देण्यासाठी इंदिराजी न्यायालयाचा (किंवा पुन्हा जनतेचा) कौल घेईपर्यंत पंतप्रधानपदावरून बाजूला होतील असे वाटले होते. गांधीजींच्या 'राजकारणाचे आध्यात्मिकीकरण' या मूल्याच्या वारसामुळे ते अपेक्षितही होते. पण त्यानंतर ज्या घटना घडल्या, त्या स्वातंत्र्य व लोकशाही या मूल्यांच्या दृष्टीने नितांत कुरूप होत्या. आणीबाणीची वार्ता तत्क्षणी एकदम सुन्न व बधीर करणारी व नंतरच्या काळांत अखंड प्रक्षुब्ध ठेवणारी होती. विशेषतः सप्त स्वातंत्र्यांच्या बेदरकार अपहरणामुळे, कोणत्याही राजकीय पक्षाशी वा विचारप्रणालीशीही सोयरसुतक नसलेल्या असंख्य नागरिकांवर निर्घृण अन्याय झाला आहे. असे सारखे जाणवत व सलत होते. ती अस्वस्थता अद्याप उणावली नाही.

२. विदर्भात मी पू. विनोबांच्या आचार्यकुलाचे यथाशक्ती काम करतो. आचार्य हा निःपक्ष, निर्वैर व निर्भय असला पाहिजे, अशी विनोबाजींची अपेक्षा आहे. विषेषतः त्यातील निर्भयपणाला आणीबाणीमुळे निर्माण झालेली परिस्थिती हे एक मोठे आव्हान होते. त्यानुसार केलेल्या प्रयत्नांना मिळालेले प्रतिसाद विविध प्रकारचे व वैचित्र्यपूर्ण होते. एकाधिकारशाहीमुळे मिळालेल्या तात्काळ व तात्कालिक लाभांचा मोह, स्वार्थापोटी दडलेले भय, वाणी व कृती यांमधील विदारक तफावत वाढवणारा कचखाऊपणा, सर्वार्थसूचक व प्रामुख्याने आत्मरक्षक मौन, ह्या त्यातल्या काही प्रतिक्रिया सहज समजण्यासारख्या होत्या. पण शासकीय एकतर्फी सहेतुक प्रचाराचा अंमल बुद्धिमंतांवर पडणे हे अकल्पित होते. भय, लाचारी, खुशामतखोरी यांचे राजकीय क्षेत्रांतील वाढते साम्राज्य बुद्धिमंत पक्षांतीतांच्या मिनारातही पसरू लागलेले पाहून आश्चर्य वाटले. भोवतालच्या बुद्धिजीवी वर्गाच्या पोटात संताप, ओठांत विसंवाद व पवित्र्यात भयचकित नमत होते.

३. आचार्यकुलाचा एक पक्षनिरपेक्ष कार्यकर्ता या नात्याने आणीबाणीनंतरच्या पहिल्या तिमाहीत मी माझ्या परीने अल्पस्वल्प प्रयत्न केले. आचार्यकुलाच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या सर्व सभासदांना, सद्यःस्थितीत भयग्रस्त व भ्रांत समाजाला निर्लेप व वस्तुनिष्ठ मार्गदर्शन करण्याचे व असंख्य निरपराध स्वतंत्र नागरिकांच्या झालेल्या कोंडमाऱ्याविरुद्धची आपली ऐतिहासिक भूमिका निर्भयपणे पार पाडण्याचे केलेले आवाहन, राष्ट्रपती व पंतप्रधान यांच्याकडे अशा असंख्य अन्यायाविरुद्ध अपक्षाच्यावतीने आचार्यकुलाची शिष्टमंडळे घेऊन जाण्याची केलेली सूचना, खुद्द विनोबाजींना यासाठी विविध पत्रांद्वारे मौनभंगाची केलेली प्रार्थना, साहित्यिक, कलावंत, शिक्षणतज्ज्ञ यांच्या स्वाक्षरींचे राष्ट्रपतींकडे पाठविलेले निवेदन व महाराष्ट्र आचार्य कुलाच्या कार्यकारिणीने आणीबाणीबाबतही प्रगट केलेली आपली ठाम भूमिका यासारखे मामुली प्रयत्न आपल्याकडून झाल्याचे सांगतानाही ओशाळल्यासारखे वाटते. विश्वातील विराट अंधाराच्या मानाने हे क्षुद्र काजव्यांचे लुकलुकणे झाले. यामुळे काळोखाचा कभिन्नपणा वाढत असल्याचेच तेवढे प्रत्ययास आले.

४. या उण्यापुऱ्या दोन वर्षातला साहित्यिक—कलावंतांचा अनुभव हा त्यांच्या नित्याच्या आविष्कार-स्वातंत्र्याच्या मागणीमागील आवेशांच्या मानानें निराशाजनक वाटला. मी पाठविलेल्या सुमारे अडीचशे पत्रांपैकी, दोन हप्त्यामध्ये, फक्त सत्तावीस स्वाक्षऱ्या मला प्रस्तुत करता आल्या. माझ्या प्रयत्नांची पोच, दिशा, आशय ह्यांच्या मर्यादा, व त्याच्याशी प्रामाणिक मतभेद अशी याची आणखीही काही विचारार्ह कारणे असू शकतील. पण आलेल्या एकदशांश प्रतिसादांमध्ये बाकी मातब्बरांचे प्राधान्य होते. कला-साहित्याचे बहुमान्य नेतृत्व ज्यांच्याकडे आहे. असे श्रेष्ठ व जेष्ठ समानधर्मे भेटल्यामुळे मिळालेला दिलासा नव्हता.

५. एका राष्ट्रव्यापी व शंकातीत राष्ट्रभक्तीने स्फुरणाऱ्या शिस्तबद्ध संघटनेबाबतचा या काळातील अनुभवही नोंदवण्यासारखा आहे. या संघटनेच्या मुक्त कार्यकर्त्यांची संख्या बंदिस्तांच्या मानाने किमान तिप्पट तरी असेल. या मुक्तांच्या भयग्रस्त सावधपणाचे जे अनुभव आले ते फारच चिंताजनक होते.

केवळ शिस्त, चारित्र्य व देशभक्ती यासारख्या चिरंतन सद्गुणांसाठी अर्धशतकभर नाणावलेल्या संघटनेने खरे म्हणजे या आपत्कालात संपूर्ण देशाला धीर व आधार द्यायला हवा होता. पण स्वकीयांचे सांत्वन करण्यालाही ते अपुरे पडले असे माझे निरीक्षण आहे. हे निरीक्षण फक्त स्थानिक स्वरूपाचे ठरले तर अर्थातच मला आनंद होईल. ◻

## श्री. ग. दि. माडगूळकर

ज्या पार्श्वभूमीवर आणीबाणीची घोषणा झाली ती लक्षात घेता मला त्यात काही खास अनपेक्षित किंवा धक्कादायक असं वाटलं नाही. अराजक माजायची वेळ आली होती. कामगारांचे संप–बंद, विद्यार्थ्यांचे मोर्चे, इतर प्रक्षोभक–दंगली, महिलांनी लाटणी घेऊन सचिवालयावर चाल करून जाणं या सगळ्यांचा अतिरेक झाल्यामुळे शिस्त हवीच होती. बारा वर्षं मी काँग्रेसचा आमदार होतो, आणि मी प्रत्यक्ष अनुभवलंय की विरोधी पक्षसदस्यांनी अत्यंत हलक्या प्रतीची निदर्शनं करून, सरकारला सुरळीत कारभार करणं अशक्य करून टाकलं होतं. त्यांच्या पोरखेळांमुळे सभागृहाची प्रतिष्ठाच नव्हे तर, राज्ययंत्रणाही धोक्यात आली होती. विशेषत: या सर्व उठावांमागे परक्या शक्तींचा हात असला तर, त्यांचा बंदोबस्त होणं जरुरीचं होतं. तेव्हा अशी काही तरी कडक उपाययोजना केल्याविना गत्यंतरच नव्हतं असं मला वाटतं. माझ्या एका कवितेत मी म्हटलंय् की, स्वर्ग आणि मृत्यू यांच्या मध्येच थबकलेले हुतात्मे विचारात पडलेत की, ' फुलं गळल्यानंतर फळं येतात हा निसर्गाचा नियम आहे, तर आम्ही काय अफूची फुलं होतो का ?'–स्वातंत्र्याची अशी फळं सगळीकडे दिसत असताना थोडी बंधने घालून शांतता निर्माण करणं आवश्यकच होतं. विधान सभागृहात लोकशाहीचा राजदंड सभापतींसमोर आडवा ठेवलेला असतो, तो कधीतरी उभा करून हातात घ्यायची–वापराची वेळ येणारच.

आणीबाणीमुळे अनिश्चिता–अव्यवस्थेचा काळ संपला. अर्थात नव्यानं आलेली शांतता टिकाऊ नव्हती. त्यामुळे दीड वर्षांनंतर आणीबाणी शिथिल होणं स्वाभाविकच होतं. तशी ती झाली नसती, तरच तो अन्याय म्हणता आला असता. माझी ही भूमिका मी माझ्या भाषणातून वेळोवेळी स्पष्ट केलेलीच आहे. ' आणीबाणी ही अॅस्प्रोसारखी वेदनाशामक (Pain Killer) उपाययोजना आहे आणि ती तात्पुरतीच असणार ', हे मत मी मांडलं होतंच, या पलिकडं जाऊन कोणत्याही बाजूनं प्रचाराला उतरावं असं मला वाटलं नाही. १९६२ च्या निवडणुकीत मी प्रचारासाठी गीतं लिहिली होती, पण व्यक्तिगत व इतर कारणामुळे यावेळी तसं काही लिहावंसं वाटत नाही खरं. पण मी आणीबाणीविरुद्ध काहीतरी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आणीबाणीतून अन्याय होऊ नये एवढी जागृती आणण्यापुरतंच थोडंफार मी लिहिलं. 'आप्तवाक्य 'सारख्या माझ्या कवितांचा सूर असाच आहे. मात्र माझ्या लोकशाही सरकारविरुद्ध बंड करावं असं मला कधीच वाटलं नाही. ४२ साली मी परकी सत्तेविरुद्ध लेखणी वापरली होती. त्यानंतर राष्ट्रसेवेची निष्ठा मी काँग्रेसमध्ये घेतली. माणसं बदलली, काँग्रेस बदलली हे खरं, पण माझी श्रद्धा कायम आहे. कदाचित ती हळवी किंवा भाबडी असू शकेल.

आणीबाणीतील स्वातंत्र्यसंकोचाविषयीचा कलाकारांचा आरडाओरडा मला न्याय्य वाटत नाही. या काळात कलात्मक ललित सृजनाला पुरेसा वाव होताच. बंधनं होती ती, पत्रकार व राजकीय विषयांवर लिहिणाऱ्या मंडळींना. आणि लेखकाचा स्वत:वर अंकुश नसला तर, राज्यसत्तेचा अंकुश येणारच. समाजात अनीती–अशांती

---

आणीबाणीच्या निषेधार्थ कलाकारांनी सरकारशी शक्य त्या क्षेत्रात केलेला असहकार हे एक भलतं वादग्रस्त प्रकरण आहे.

वादग्रस्त अशासाठी की, असहकाराच्या आवाहनाला व प्रयत्नांना अनेक साहित्यिक–कलाकारांनी प्रतिसाद दिलाच नाही. दुर्गाबाई भागवतांनीही बहिष्कार घालणारे म्हणून जयवंत दळवीसारख्या एखाद्याच साहित्यिकाला धन्यवाद दिले. इतरही थोडे आहेत, पण नावं देण्यात अर्थ नाही.

श्री. प्रभाकर पाध्ये यांचा प्रश्न असा की, ' कवि वसंत बापट हे ' साधना 'चे विश्वस्त. आणि ' साधने 'वर तर सरकारनं बंदी घातलेली. मग तरीही वसंत बापट टी. व्ही. च्या कार्यक्रमात कसे ? '

पु. ल. चा प्रतिप्रश्न असा की ' केसरी ' व संलग्न संस्थांवर बहिष्कार घालायचं ठरलेलं असतानाही स्वत: पाध्ये टिळक स्मारक मंदिरात का बोलले ?

वसंत बापट यांचा खुलासा ( म्हणे ) असा की, ' माझ्या कार्यक्रमातून सरकारी माध्यमाचाच वापर सरकारविरोधी प्रचारासाठी करण्याचा माझा हेतू होता. '

पाध्यांना हे समर्थन मान्य नाही. ' असा वापर करू द्यायला टी. व्ही. चे लोक काय दुधखुळे आहेत ? ' कारण कुसुमाग्रजांनी टी. व्ही. ला दिलेल्या एका मुलाखतीमधला आणीबाणीविरोधी अभिप्राय वगळून ती मुलाखत प्रचारासाठी वापरण्यात आली. खुद्द कुसुमाग्रजांनीही वृत्तपत्रांतून याबद्दल तक्रार केली होती म्हणे.

मग काहीजण प्रश्न विचारतात की, ' पु. लं. नी तरी सगळ्या सरकारी समित्यांचे राजीनामे दिले का ? '

पु. लं. चं उत्तर असं की ' राजीनामे दिले नाहीत, कारण ते सरकारच्या पथ्यावरच पडलं असतं. सांस्कृतिक क्षेत्रातल्या यंत्रणाही सरकार प्रचारासाठी वापरू शकलं असतं. आम्ही ते थांबवू शकतो.

काहींची शंका ही की इतर वेळी नाटकावरील सेन्सॉरशिपविरुद्ध ज्वलंत लढा देणारी विजय तेंडुलकरासारखी कलाकार मंडळी या काळात टी. व्ही. वर का दिसावीत ? आणीबाणीतली बंधनं त्यांना जाचलीच नाहीत की त्यांनी ती गोड करून घेतली ?

तेंडुलकरांचे समर्थक याचं उत्तर देताना सांगतात की, ' त्या ' दोहोंचा काही परस्परसंबंध नाही.

वगैरे वगैरे.

यावर भाष्य नाही.

✲

माजेल असं काही चांगल्या साहित्यिकानं लिहू नये. म्हणजे बंधनांचा जाच होण्याच कारणच उरणार नाही. पुन्हा असा जाच झालेले कलाकार-साहित्यिकही प्रत्यक्ष कृतींच्या बाबतीत निष्क्रीय उदासीनच होते. फारच थोड्या लोकांनी आणीबाणीविरोधी आवाज उठवायचं धैर्य दाखवलं; असं का? कित्येक कलाकारांनी तर आणीबाणीविषयी कोणतीही एक निश्चित भूमिका घ्यायचंच टाळलं.

साहित्यिक-कलाकार हे समजाचेच घटक आहेत. पण ते काही संगमरवराचे घडवलेले नाहीत. देश-काल-परिस्थितीचा परिणाम त्यांच्यावरही होणार. व्हायला हवा. तत्त्व म्हणून त्यांना अबाधित स्वातंत्र्य मिळालं पाहिजे हे मान्य आहे, पण राष्ट्राचा गाडासुद्धा चालायला हवाच की. आविष्कार स्वातंत्र्य ही eternal value आहे. ती कोण अमान्य करील? पण त्यामुळे कलाकार समाज-जीवनापासून वेगळा होऊ शकत नाही. समाजाच्या प्रवाहाशी त्यानं एकरूप व्हायला हवं. अर्थात त्यानं राजकारणात उडी घेऊन हात खराब करून घ्यायला हवेतच असा याचा अर्थ नाही. त्यानं दखल घ्यावी, विचार द्यावा. पण प्रत्यक्ष त्यात उतरणं त्याला पेलेल की नाही हे त्याच्यातल्या माणसावर अवलंबून आहे. सरकारनं कलाकारांच्या आविष्कार स्वातंत्र्याच्या संकोचाविषयी वाजवीपेक्षा जास्त दक्षता घेतली असं मात्र मला वाटतं. सर्व मार्ग बंद करण्यात आले, त्याऐवजी थोडा फार विरोधी विचार मांडू दिला असता तर काही नुकसान झालं असतं असं मला वाटत नाही. सरकार त्यांना जरुरीपेक्षा जास्त घाबरलं असावं. खरं पाहता दुर्गाबाईंच्या एखाद्या भाषणामुळे लोकांचे जथे लगेच दिल्लीवर चालून जात आहेत, असं काही व्हायची शक्यता नव्हती. तथापी आदेश देणारी व पाळणारी यंत्रणा यातल्या फरकामुळे कलेची नियंत्रणं काही वेळा नोकरशाहीकडे गेली. त्यातून हे घडलं असावं.

निवडणुकांबद्दल बोलायचं तर, जनता पक्ष ही फार तात्कालिक घटना वाटते. अनेक विसंगत सोबतींवर आधारलेला हा पक्ष एकीनं नांदणं कठीण. आपल्याला भक्कम पर्यायी पक्ष हवाय, धरसोड नको. संजय गांधींचा प्रवेश आक्षेपार्ह नाही, पण त्याचे देव्हारे माजवणं गैर. कुणाचा मुलगा राजकारणात आलाय् याला महत्त्व देऊ नये. त्याला प्रथम सेवा करू द्या, आपली गुणवत्ता सिद्ध करू द्या. जगजीवनरामांचा राजीनामा बराचसा गूढ असला तरी, निवडणुका 'लढवण्याच्या' राजकारणाचा तो एक भाग आहे. आणीबाणी हा लोकशाहीवरचा घाव आहे असं म्हणणाऱ्यांना निवडणुका हे उत्तर आहे. आणि perfect democracy जगात कुठे आहे? दीडशे वर्षं पारतंत्र्य भोगलेला आणि तत्पूर्वी कधी एकसंध नसलेला पंचावन्न कोटींचा खंडप्राय देश परिपूर्ण लोकशाही भोगतोय, हे पंचवीस-तीस वर्षांत कसं शक्य आहे?

पुन्हा आणीबाणी येऊ नये असं मलाही प्रामाणिकपणे वाटतं! ◻

## श्री. शाम जोशी

आणीबाणी जाहीर झाल्याचा निर्णय हा सुरुवातीला तरी सगळ्यांनाच बुचकळ्यात टाकणारा होता; कारण ती युद्धपातळीवरची उपाययोजना समजली जाते. तथापी पुढच्या काळात या धक्क्याचा भर ओसरला, आणि 'देशहिताशी विसंगत घटनांचा व गोंधळाच्या परिस्थितीचा उलटसुलट विचार करून शहाणपणाचा निर्णय घेतला गेला,' अशी माझी आणीबाणीबद्दल दृढ भावना झाली. सद्यःस्थितीत आणीबाणी देशहिताला अत्यंत पोषक आहे, आणि ती यापुढेही चालूच ठेवावी असं माझं मत आहे.

माझं हे मत आश्चर्यकारक ठरण्याची शक्यता आहे. पण त्याला सबळ कारणं आहेत. एक तर, एवढ्या मोठ्या देशाच्या गरजा भागवायच्या तर शिस्तीची जरूरी फार आहे. इंग्लंड – अमेरिकेतल्या व्यक्तिस्वातंत्र्याची उदाहरणं इथं देणं चुकीचं होईल. तेवढी समृद्धी आपल्याकडे कुठे आहे? आणि उदाहरणंच द्यायची झाली तर, रशिया - जर्मनीतल्या शिस्तीची का नकोत? आणीबाणीमुळे शिस्तीबरोबर जबाबदारीची जाणीव यायला सुरुवात झाली होती. स्मगलर्सचा बंदोबस्त तर बहुतांशी पूर्ण झाला. स्वतःचे चोचले पुरविण्यासाठी स्मगलर्सना प्रोत्साहन देणारे लोक स्वतःचं शरीर स्वतः खात आहेत असं मला वाटतं. आणीबाणीमुळे हे बंद झालं. भाववाढीलाही काही अंशी आळा बसला आणि सरकारी कचेऱ्यात तर वक्तशीरपणा व कार्यक्षमता वाढल्याचं मी स्वतः अनुभवलंय्.

आणीबाणीचे हे फायदे मला दिसतात तशी क्रिएटिव्ह आर्टिस्ट म्हणून माझ्यावर काही मर्यादा आल्याचंही मला जाणवतं. व्यंगचित्राद्वारे मी करीत असलेल्या टीकेवर थोडी बंधनं आली हे खरं, पण माझी त्याबद्दल तक्रार नाही. लोकांना हसविण्यासाठी राजकीय उपहास, व्यक्तिगत टीका-प्रहार हेच हवे लागतात असं नाही. उलट ही बंधनं स्वीकारूनही लोकांना पूर्ववत हसवण्याचं काम मी आव्हान म्हणून स्वीकारलं. एका प्रकारे ही माझ्या टॅलन्टची परीक्षाच होती. त्याचा निकाल आता माझ्या वाचकांनीच द्यायचाय. थोडक्यात, अजूनही within the limits भरपूर स्वातंत्र्य आहे. आमच्या आविष्कारस्वातंत्र्याचा अगदी सर्वनाश झाला होता असं मला वाटत नाही. आणि ते अबाधित होतं तेव्हा तरी, कलाकारांनी त्याचा असा काय विधायक वापर केलाय? शिवाय त्यावरची बंधनं ही सर्वसामान्य मार्गदर्शक तत्वांप्रमाणे होती. त्या वैयक्तिक अटी नव्हत्या. मुख्य म्हणजे काही भरीव, रचनात्मक काम करायला या बंधनांचा काहीच अडथळा नव्हता. अटकाव झाला तो विध्वंसात्मक (destructive) कार्याला. आणि तशा कार्याला तर केव्हाही मुक्तद्वार मिळता कामा नये. त्यादृष्टीनं पाहिलं तर, विघातक कृत्य थांबून विधायक प्रवृत्ती बळावणं आणि देशाच्या गाड्यात सुसूत्रता येणं यासाठी प्रत्येकाला आपल्या एखाद्या हक्कावर पाणी सोडावं लागलं तर ती किंमत काही फार मोठी नव्हे. किंबहुना दोन लाख लोकांचं आयुष्य सुरळीत चालण्यासाठी दोन जणांवर शिस्तभंगाबद्दल इलाज करावा लागला तर त्याचं मला तरी वाईट वाटणार नाही.

आणीबाणीमध्ये सर्व संपर्कसाधनं एकतर्फी वापरली गेल्यानं निर्माण झालेली communication gap मात्र मला खटकली. आपल्या सवयीच्या बाहेरचं काहीतरी घडतंय याची टोचणी त्यामुळेच सतत लागून

राहिली. बाकी आणीबाणीचा काही तोटा मला तरी दिसत नाही. हो, सिनेमाची तिकिटं ब्लॅकनं मिळेनाशी झाली, हा एक तोटा आहे खरा. एरवी आणीबाणीत दहशतवाद बोकाळल्याचा आरोप केला जातो; पण तो विधायक कामासाठी वापरला जात असल्यानं त्यातून सुक्याबरोबर थोडं ओलं जळलं तरी काही विशेष नाही. आणीबाणी उठल्याबरोबर संप सुरू झाले, 'महाराष्ट्र टाईम्स' संपामुळे तीन दिवस बंद राहिला हे कशाचं लक्षण आहे?

आणीबाणीच्या या राष्ट्रीय जागरणाच्या काळात कलाकार राष्ट्राच्या मुख्य प्रवाहाबरोबर राहिले नाहीत, असा माझा आक्षेप आहे. बहुसंख्य कलाकार निर्लेप, unaffected राहिले. मुंबईतल्या सात आर्ट गॅलऱ्या आणि पाच-सात नाट्यगृहे या काळातही हाऊसफुल्ल होती. तथापी नव्या परिवर्तनाची दखल कलाकारांनी घेतल्याचं जाणवलं नाही. अनेकांनी तर आणीबाणीला पूर्ण पाठिंबा किंवा उघड विरोध हे दोन्ही करायचे टाळले आणि सोयीस्कर सुटका करून घेतली. त्यामुळे या दीड वर्षातल्या कलाकारांच्या वागण्याबद्दल, performance बद्दल मी समाधानी नाही. कदाचित याचं कारण असंही असू शकेल की, कलाकारांचं रंजनात्मक मूल्यच फार मोठं व इतर मूल्यांना झाकून टाकणारं आहे. एका दृष्टीनं विचार केला तर, विशेषत: ललितकलाकारांना मर्यादा फार असतात. त्यामुळेच समाजाला नेतृत्व द्यायची जबाबदारी ही विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, शास्त्रज्ञ व प्राध्यापक यांच्यावर पडते.

आणीबाणीवर केला जाणारा सत्तालालसेचा आरोप निवडणुकांच्या घोषणांमुळे खोटा ठरला आहे. निवडणुकांचं स्पष्ट चित्र माझ्यासमोर नाही, पण जनता पक्ष निवडून आल्यास देशात पुन्हा प्रचंड गोंधळ निर्माण होईल, असं मला वाटतं. जनता पक्षनिर्मितीची ही प्रक्रिया ध्रुवीकरण-प्रक्रिया मानली तरी, तिचा उगम द्वेषातून झालेला आहे. एरवी एकमेकांना पाण्यात पाहणारे विरोधी पक्षनेते एकत्र का आले असते? बाबू जगजीवनरामसुद्धा वैयक्तिक असंतोषामुळे बाहेर पडलेले दिसतात. तत्त्वनिष्ठेनं नव्हे. तेव्हा या सगळ्यांकडून काही रचनात्मक कार्य होईल का, हे काळच ठरवू शकेल. संजय गांधीच्या उदयाबाबत त्याला fair trial देण्यापूर्वीच भाष्य करणं चुकीचं ठरेल. त्याचं कर्तृत्व यापुढे दिसेल, अशा अपेक्षेनं तरुण रक्ताचं जरूर स्वागत करायला हवं.

वीस कलमी कार्यक्रमाचा विचार केल्याशिवाय आणीबाणीचं चित्र पूर्ण होऊ शकणारच नाही. आणीबाणी आणि हा कार्यक्रम यांचं नातं खोड्या करणाऱ्या मुलांना आधी वठणीवर आणणं व मग अभ्यासाला लावण्यासारखं आहे.

आणीबाणीत फार थोडी किंमत देऊन आपण बरंच काही मिळवलंय. निदान राजकीय विषय टाळूनही लोकांना हसवता येतं, हा एक सुखद अनुभव माझ्या गाठीशी आहे. ◘

## श्री. शि. द फडणीस

**आणीबाणीच्या प्रारंभीच्या काळात आपली तिच्याबद्दची प्रतिक्रिया काय होती? या भूमिकेत पुढच्या दीड वर्षांत काही बदल झाला काय?**

आणीबाणी इतकी आवश्यक असती, तरीही इंदिराजींची निवडणूक हायकोर्टानं रद्द ठरवल्यानंतर लगेच ती लादणं अयोग्य वाटलं. निदान सुप्रीम कोर्टातल्या अपिलाचा निर्णय लागेपर्यंत तरी आणीबाणी थांबवणं न्याय्य ठरलं असतं. शिवाय आणीबाणीनंतर केलेल्या घटनादुरुस्तीला धरून सर्वोच्च न्यायालयातील अपिलाचे कामकाज झाल्यानं त्यांचा निकालही fair वाटला नाही.

त्यापुढच्या काळातही आणीबाणी अस्वाभाविक वाटत राहिली. त्यामागे पक्षीय हिताची दृष्टी नव्हती असं मानलं तरीही, अशा तऱ्हेनं दडपण्याइतकं अराजक देशात माजलेलं होतं असं वाटत नाही. सरकारविरोधी असंतोष जनतेत पूर्वीही होताच.

**आणीबाणीचे काही फायदे-तोटे प्रकर्षानं जाणवले?**

आणीबाणीचे उद्देश सुरुवातीला जेवढे प्रामाणिक वाटले तेवढे प्रत्यक्षात दिसले नाहीत. कारभारात त्यामुळं शिस्त आली असणं शक्य आहे. मिसाखाली स्मगलर्सना पकडल्यानं स्मगलिंग जवळ जवळ बंद झालं हे मात्र मान्य. पण तोच मिसा राजकीय दडपशाहीसाठी वापरणं उचित नव्हतं.

या आणीबाणीनं आमच्या आयुष्यातला प्रकाश काढून घेतला. 'आपल्यापासनं खूप काही लपवलं जातंय' ही भावना निर्माण केली. विरोधाचे सर्व सनदशीर मार्ग बंद झाले. सर्व संपर्कमाध्यमं (Communication media) दडपून टाकली गेली. 'काही गोष्टी आपण उच्चारायच्या नाहीत, काही लिहायच्या नाहीत,' या जाणिवेची खंत तर फार मोठी आहे.

आणीबाणीनं लादलेलं वृत्तनियंत्रण दुर्दैवी होतं. पारतंत्र्याच्या काळातही इतकी एकांगी बंधनं वृत्तपत्रांवर नव्हती. ब्रिटिशांच्या राज्याइतकं स्वातंत्र्य जरी वृत्तपत्रांना असतं तरी पुरेसा विरोधी आवाज उठवता आला असता. शिवाय विरोधी बातम्यांची सर्व अधिकृत उगमस्थानं (Sources) सरकारनं थांबवल्यामुळे अफवांचं पेव फुटलं ते वेगळंच.

**या काळातले आपले काही विशेष वैयक्तिक अनुभव सांगता येतील?**

मला स्वत:ला तरी आणीबाणीची प्रत्यक्ष झळ जाणवली नाही. हो, 'अमुक मर्यादा सांभाळूनच व्यंगचित्रं काढा' अशी सौम्य सूचना मात्र एक-दोन वेळा मिळाली होती. राजकीय विषयांवरची व्यंगचित्रं मला काढता आली नाहीत हे खरं आहे. पण एकंदरीतच मी तसे विषय सहसा निवडत नाही. सामान्यत: ललितकलांना बंधनांचा अडथळा आला नाही, हे खरं. पण दैनंदिन जीवनाला किंवा कलाविष्काराला थेट भिडणाऱ्या गोष्टीच तेवढ्या कलावंताला जाणवतात असं नाही.

**कला आणि राजकारण ही water-tight compartments म्हणता येतील का? नसल्यास, आणीबाणीच्या काळातल्या कलाकारांच्या वर्तनाबद्दल, भूमिका-प्रतिक्रियांबद्दल आपण समाधानी आहात का?**

नाही. कला-राजकारण इतकी वेगळी नाहीत. राजकारणासाठी आपण काही वेगळी जमात किंवा आयुष्यातलं वेगळं वय राखीव ठेवलेलं नाही. आणि वर उल्लेखिल्याप्रमाणे

पृष्ठ १०१ वर

# पोलादी पडद्यामागील नागरी स्वातंत्र्य व हक्काचा नवा हुंकार

# ' चार्टर-७७ '

## झेक विचारवंतांचा ज्वलंत जाहीरनामा

पूर्व युरोपिअन देशात एक नवं वादळ घोंघावू लागलंय. कित्येक वर्षे गुदमरलेल्या भावना उफाळून आल्या आहेत, स्वातंत्र्याचा एक प्रकाशकिरण दिसावा म्हणून सारे लोक झेपावताहेत, अनेक पूर्वयूरोपीय देशांत निदर्शने झाली आहेत, झेकोस्लाव्हाकिया, पोलंड व पूर्व जर्मनीत नव्या मोहीमेची प्रसादचिन्हे उमटू लागली आहेत. अधून मधून होऊ लागलेल्या या आंदोलनामुळे त्या त्या देशातील व्यवस्था पेचप्रसंगात सापडल्या आहेत की, ही आंदोलने केवळ स्थानिक स्वरूपाची आहेत हे निश्चित व्हायचे आहे. तणाव वाढतो आहे आणि पूर्व व पश्चिमेतील संबंधांवर त्याचा परिणाम होणार असे भले भले राजकीय पंडित म्हणत आहेत.

पोलंडमध्ये सुरुवात झाली जून ७६ साली. पाच वर्षे ज्या अत्यावश्यक वस्तूंच्या किंमती गोठविल्या होत्या त्या वस्तूंच्या किमती पोलिश सरकारने एकाएकी वाढवल्या. त्यामुळे कामगार संतप्त झाले. त्यांनी जागोजाग निदर्शने केली, अखेर सरकारला माघार घ्यावी लागली आणि भाडेवाढ रद्द करायला लागली. काही आठवड्यांनंतर पोलंडच्या १४ विचारवंतांनी एक समिती स्थापन केली. निदर्शनाच्यावेळी ज्या कामगारांना अटक करण्यात आली व नोकरीवरून काढण्यात आले अशा कामगारांचे समर्थन करण्याचे कार्य या समितीने चालू केले. सरकारने ही समिती बेकायदा असल्याचे घोषित केले. परंतु तिचा व्याप वाढतो आहे व आजतागायत तिचे काम चालू आहे.

पूर्वजर्मनीत पंतप्रधान हॉर्स्ट सिडरमान यांना ते कडक वागणारे नाहीत म्हणून त्या पदावरून कमी करण्यात आले. त्यानंतर तीन आठवड्यांनी पूर्व जर्मनीचे प्रख्यात कवी व गायक वुल्फ बिअरमान यांचे नागरिकत्वच सरकारने रद्द करून टाकले!, कित्येक विचारवंतांनी या कृत्याचा निषेध केला आहे.

झेकोस्लाव्हाकियात तर मानवी, नागरी हक्कासाठी संघर्षाचं नवं पर्व सुरू झालं आहे. २४२ विचारवंतांनी ' चार्टर-७७ ' नावाचा मानवी हक्काचा नवा जाहीरनामाच गेल्या जानेवारी ७७ मध्ये काढला आहे. राजकीय व नागरी स्वातंत्र्य मिळायलाच हवे. यासंबंधीच्या दोन्ही आंतरराष्ट्रीय करारांचे पालन केलेच पाहिजे अशी मागणी या ' चार्टर-७७ 'मध्ये करण्यात आली आहे. झेकोस्लाव्हाकियातील विचारवंतांचे हे कृत्य अत्यंत धाडशीपणाचे मानले जाते. हा जनतेच्या खऱ्याखुऱ्या भावनांना, त्यांच्या स्पंदनांना शब्दरूप देणारा जाहीरनामा आहे. सरकारने हा जाहीरनामा दडपू नये म्हणून हा जाहीरनामा लिहिताना सर्व प्रकारची काळजी विचारवंतांनी घेतली. आम्ही कोठलाही राजकीय गट वा संघटना स्थापन करत आहोत असे या जाहीरनाम्यात म्हटलेले नाही. परंतु हा जाहीरनामा म्हणजे सरकारला आव्हानच होते. त्यामुळे सरकार गप्प बसले नाही. त्याने भराभर धरपकडीस आरंभ केला. स्वातंत्र्यासाठी, हक्कांसाठी झगडणाऱ्यांचे स्वातंत्र्य आणखी हिरावून घेतले गेले.

या चार्टर-७७ वर सह्या करणाऱ्या १०० जणांना पकडण्यात आले. हा जाहीरनामा झेकोस्लोव्हाकियात प्रसिद्ध झाला नाही. तो पाश्चिमात्य वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यात आला. झेकवृत्तपत्रांत या जाहीरनाम्याचा निषेध करणारी तथाकथित पत्रके मात्र प्रसिद्ध होत असतात! या चार्टरवर सह्या करणाऱ्यांपैकी ६ विचारवंतांना कामावरून कमी करण्यात आले आहे. त्यात या जाहीरनाम्याचे मुख्य लेखक डॉ. झेडनेक् मायनार यांचाही अंतर्भाव आहे. चौघा जणांवर प्रजासत्ताकाच्या पायालाच ' सुरुंग ' लावण्याचा कट केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. जिरी हाजेक व व्हॅक्लाव्ह हॅवेल यांच्यावरही गंभीर आरोप ठेवले असून त्यांना जबर कारावासाची शिक्षा होऊ शकेल.

हॅवेल हे देशातील श्रेष्ठ नाटककार आहेत, त्याखेरीज लेखक लुडविक वाकुलिक, पॅव्हेल लॅन्डॉव्हस्की, झेडनेक् डरबॉनिक आणि प्राग येथील ' विनोऱ्हाडी थिएटर 'चे दिग्दर्शक फॅन्टिसेक पावलिसेक यांना अटक करण्यात आली आहे. या स्थानबद्धांच्या घरांची झडती घेण्यात आली. त्यांना पकडल्यावर सोडून देण्यात आले तर काहींना परत पकडण्यात आले.

नाटककार हॅवेल यांची ' द गार्डन पार्टी ', ' सो डिफिकल्ट टु कॉन्सन्ट्रेट ', ' बटरफ्लाय ऑन द एरियल ' ही गाजलेली नाटके आहेत. कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र असलेल्या ' संडे प्राव्हो 'ने ' हॅवेल हा कामगारांची कधीही पर्वा न केलेल्या लक्षाधीशांचा मुलगा आहे ' अशी संभावना केली आहे. हॅवेल यांच्या नाटकावर झेकोस्लोव्हाकियात बंदी घालण्यात आली आहे.

४० वर्षे वयाच्या हॅवेल यांची व्हिएन्नाहून प्रागला फोन करून एका परदेशी वार्ताहराने मुलाखत घेतली. तेव्हा हॅवेल म्हणाले, ' सरकारी अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या दडपशाहीविरुद्धचा आमचा लढा चालूच राहील. ही केवळ विचारवंतांचीच चळवळ आहे असे नाही. त्यात शेकडो कामगार सामील झाले आहेत.

जाहीरनाम्याच्या प्रवर्तकांपैकी डॉ. जिरी हॅजेक हे ड्यूबचेक यांच्या मंत्रिमंडळात परराष्ट्रमंत्री होते, तर जान पॅटोका हे तत्त्वज्ञ

असून त्यांचे लिखाण झेकोस्लाव्हाकियात प्रसिद्ध करण्यास बंदी आहे. जिरी लिडरर या पत्रकारालाही अटक करण्यात आली आहे.

पॅव्हेल कोहोअत या देशातील आणखी एका प्रसिद्ध नाटककारावरही सरकारची गैरमर्जी झाली असून गुप्त पोलीस रात्री दरवाजा ठोठावत होते असे पॅव्हेलने लंडन टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

नंतर अधिकाऱ्यांनी पॅव्हेलचा फोन तोडून टाकला व त्याला त्याच्या बायकोसह प्राग येथील फ्लॅट खाली करून अन्यत्र जाण्यास सांगण्यात आले. पॅव्हेल कोठे गेला हे अजून समजलेले नाही.

जाहीरनाम्याचे आणखी एक प्रवर्तक डॉ. मायनार यांनी एका मुलाखतीत असे सांगितले की, 'मी कम्युनिस्ट आहे. भांडवलशाहीपेक्षा समाजवादी सरकारने लोकांना जास्त राजकीय व नागरी हक्क दिले पाहिजेत याबद्दल माझी खात्री पटली आहे. बहुतेक युरोपिअन कम्युनिस्ट पक्षांचे असेच मत आहे. तरीही माझ्या या मताबद्दल माझ्यावर जाहीरपणे देशद्रोहीपणाचा व साम्राज्यवाद्यांचा हस्तक असा आरोप केला गेला आहे!'

सबंध पूर्व युरोपात अशी नव्या जाणीवेची लाट या नव्या जाहीरनाम्यात उठली आहे "राजकारणाशी आमचा काय बुवा सबंध?" असे मतलबी उद्गार काढून, तेथले साहित्यिक, विचारवंत यापासून अलिप्त राहिलेले नाहीत. ही सुरू झाली आहे एक यात्रा. स्वतःची पायवाट स्वतःच शोधीत निघालेली. जेथे जेथे चालण्याची गळचेपी होत असेल तेथे अशाच यात्रा निघायला हव्यात. यात्रा वेगळ्या असल्या तरी त्यांचा हुंकार एकच असेल.

'चार्टर-७७' या जाहीरनाम्याचा जवळ जवळ पूर्ण मसुदा पुढीलप्रमाणे आहे. (हा जाहीरनामा झेक सरकारने बेकायदा ठरवला. तो परदेशी वृत्तपत्रांत गुप्तपणे पाठवण्यात आला. तेथे प्रसिद्ध झालेल्या जाहीरनाम्यावरून केलेले हे भाषांतर.)

## 'चार्टर-७७'

गेल्या १३ ऑक्टोबर १९७६ रोजी प्रसिद्ध झालेल्या झेकोस्लोव्हाक कायदा संग्रहातील कायदा क्र. १२० मध्ये नागरी व राजकीय हक्कांविषयीचा आंतरराष्ट्रीय करारनामा व आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांविषयीचा आंतरराष्ट्रीय करारनामा अंतर्भूत करण्यात आला आहे. या दोन्हीही करारनाम्यावर आमच्या प्रजासत्ताकाच्या वतीने १९६८ साली स्वाक्षऱ्या करण्यात आल्या असून व त्यावर १९७५ च्या हेलेसिंकी परिषदेत शिक्कामोर्तब झाले. २३ मार्च १९७६ रोजी हे दोन्ही करार आमच्या देशात अंमलात आले. त्या दिवसापासून आमच्या नागरिकांना हे हक्क प्राप्त झाले. ते त्यांचे रक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य होते.

या दोन्ही करारानुसार नागरिकांना देण्यात आलेले स्वातंत्र्य ही संस्कृतीची लेणीच आहेत. पूर्वी पुरोगामी गटांनी सुरू केलेल्या मोहीमांची हीच उद्दिष्टे होती, आणि ती प्राप्त झाल्याने आमच्या समाजाच्या मानवतावादी प्रगतीत त्यांचा फार मोठा वाटा आहे. झेकोस्लोव्हाक समाजवादी प्रजासत्ताकाने हे करार स्वीकारले याचे आम्ही स्वागतच करतो.

या करारांच्या प्रसिद्धीकरणामुळे अनेक मानवी मूलभूत हक्कांचे आम्हाला स्मरण झाले. आमच्या देशात हे हक्क केवळ कागदोपत्रीच अस्तित्वात आहेत. पहिल्या कराराच्या १९ व्या कलमानुसार देण्यात आलेले विचार स्वातंत्र्य हे केवळ आभासात्मकच आहे. सरकारच्या मतापेक्षा वेगळे मत असल्याने हजारो नागरिकांना त्यांचे व्यवसाय करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या अथवा सामाजिक संघटनांच्या पक्षपातीपणाचे व डावपेचाचे ते शिकार झाले आहेत. स्वतःचे समर्थन करायला त्यांना संधी दिली जात नाही. वर्णद्वेषाला बळी पडलेल्यांसारखीच त्यांची स्थिती झाली आहे. 'भयापासून स्वातंत्र्य' हाही हक्क शेकडो नागरिकांना नाकारण्यात आला आहे. (हा हक्क पहिल्या कराराच्या प्रस्तावनेत दिलेला आहे.) स्वतःची मते व्यक्त केली तर नोकरी जाईल, या भयाच्या सावटाखाली लोक वावरत आहेत.

दुसऱ्या कराराच्या तेराव्या कलमात शिक्षणाच्या हक्काची हमी दिली आहे. परंतु अनेक तरुणांना त्यांच्या वा त्यांच्या पालकांच्या मतांमुळे उच्च शिक्षण घेण्यास प्रतिबंध केला जात आहे. आपली मते प्रकट केली तर, आपल्याला व आपल्या मुलांना शिक्षण घेता येणार नाही याची अनेकांना भीती वाटत आहे.

पहिल्या कराराच्या १३ व्या कलमामधील दुसऱ्या मुद्द्यात देण्यात आलेला सीमांचा विचार न करता माहितीची देवाणघेवाण—मग ती मौखिक, लेखी वा प्रसिद्ध झालेली असो—करणे, तसेच कलांच्या द्वारेही ही देवाण-घेवाण करणे. हा हक्क बजावताना कोर्टाबाहेरच नव्हे, तर अंतर्गतही छळ होऊ शकतो. सर्वसाधारणतः गुन्ह्याचा दोषारोप ठेवून हे केले जाते. (अलीकडेच काही तरुण संगीतकारांच्या बाबतीत हा प्रत्यय आला.)

जनप्रसाराची सर्व साधने सरकारी नियंत्रणाखाली असून, त्यामुळे भाषणस्वातंत्र्याच्या हक्काची गळचेपी झाली आहे. सरकारी ध्येयधोरणाच्या चौकटीतून थोडेसेही वेगळे राजकीय, तात्त्विक, वैज्ञानिक व कलाविषयक मत असेल, तर ते व्यक्त करू दिले जात नाही. सामाजिक स्थितीवर जाहीर टीका करण्यास मनाई आहे. सरकारी प्रचार-यंत्रणाद्वारा केल्या जाणाऱ्या बदनामीकारक व खोट्या आरोपांना उत्तर देणे अशक्य आहे. पहिल्या करारातील सतराव्या कलमानुसार व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर हल्ला करण्याविरुद्ध निःसंदिग्धपणे कायद्याने संरक्षण देण्यात आले आहे, परंतु त्याचा उपयोग नाही. खोट्या आरोपांना जबाब देता येत नाही. आणि तसा प्रयत्न करणे अथवा कायद्याचे संरक्षण मिळवायचा प्रयत्न करणे शक्य नाही. काही वर्षांपूर्वी सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी निषेध केलेली मते व्यक्त केली वा प्रसिद्ध केली म्हणून शेकडो वैज्ञानिक, सांस्कृतिक कार्यकर्त्यांना पक्षपाती वागणूक दिली जाते.

पहिल्या कराराच्या अठराव्या कलमात देण्यात आलेल्या धार्मिक स्वातंत्र्यावर एकतंत्री लहरीनुसार पद्धतशीररीत्या नियंत्रणे घालण्यात येतात, धर्मोपदेशकांच्या हालचालींवर मर्यादा घातल्या जातात, त्यांना आपली कार्ये पार पाडावयासाठी सरकारने दिलेली संमती काढून घेतली जाईल, अशी धमकी देण्यात येते. जे आपल्या कृतींनी वा लिखाणाने आपली धर्मनिष्ठा प्रकट करतात, त्यांना नोकरीवरून काढले जाते अथवा

त्यांना अन्य दडपशाहीला तोंड द्यावे लागते. शाळेत धार्मिक शिक्षण देण्यास मनाई केली जाते.

नागरी हक्कांची पायमल्ली केली जाते, ते दडपले जातात. सत्ताधारी तसे आदेश देतात. या आदेशांचा विधिमंडळावर, प्रशासनावर, न्यायालये, कामगार संघटना, सामाजिक संघटना, अन्य राजकीय पक्ष, उद्योगधंदे, कारखाने, शाळा यांवर प्रभाव होतो आणि कायद्यावर वा आदेशांना प्राधान्य दिले जाते.

काही संघटना वा नागरिक यांचा नागरी हक्कांचा अन्वयार्थ लावताना, जर या आदेशाशी काही तंटा उत्पन्न झाला तर, त्यांना कोठल्याही अलिप्त संघटनेकडे धाव घेता येत नाही. कारण अशी संघटनाच अस्तित्वात नाही. जमाव करण्याचा हक्क व त्याला बंदी घालायला प्रतिबंध असलेली पहिल्या कराराच्या २१ व २२ कलमातील तरतूद तसेच २५ व्या कलमातील सार्वजनिक गोष्टीत सहभागी होण्याचा हक्क व २६ कलमात कायद्यापुढे सर्व समान असल्याचा हक्क या सर्व हक्कांवर कुऱ्हाड घालण्यात आली आहे.

अशा परिस्थितीत नोकऱ्या करणाऱ्यांना आपल्या आर्थिक व सामाजिक हिताच्या रक्षणार्थ मुक्तपणे स्वतःच्या संघटना स्थापता येत नाहीत. तसेच दुसऱ्या कराराच्या कलम ८, मुद्दा १ मध्ये देण्यात आलेला संप करण्याचा हक्क बजावता येत नाही.

खाजगी, कौटुंबिक जीवनात, पत्रव्यवहारात हेतुतः हस्तक्षेप करण्यास जवळजवळ बंदी (करार पहिला, कलम १७) घातली असूनही या हक्कावरही गदा आणली आहे. इंटेरिअर मिनिस्ट्री नाना मार्गांनी सर्वसामान्य नागरिकाचे रोजचे जीवनच नियंत्रित करते. टेलिफोनवरील संभाषणे चोरून ऐकली जातात, पत्रांची छाननी होते, घरांवर पाळत ठेवली जाते, नागरिकांवर पाळत ठेवली जाते, घरांच्या झडत्या घेतल्या जातात, बेकायदेशीररीत्या दडपेगिरी करून अथवा लालूच दाखवून अनेकांना खबऱ्याचे काम करायला लावले जाते.

सरकारचे हे मंत्रालय मालकांच्या निर्णयावर दडपण आणते, अधिकाऱ्यांना पक्षपातीपणा करायला भाग पाडते, न्यायालयावर देखरेख ठेवते आणि जनप्रसार साधनांद्वारा केल्या जाणाऱ्या प्रचार मोहिमांवरही नियंत्रण ठेवते. याला कायद्याचे संरक्षण नाही, हे सारे गुप्तपणे केले जाते व त्यापासून व्यक्तीला आपले संरक्षण करता येत नाही.

पहिल्या कराराच्या १४ व्या कलमात तसेच झेकोस्लाव्हाक कायद्यात आरोपी व त्यांचे वकील यांना जे हक्क दिले आहेत त्याचा भंग केला जातो. ज्यांना फाशीची शिक्षा दिली जाते त्यांना माणुसकीला लांच्छनास्पद वागणूक दिली जाते.

पहिल्या करारातील १२ व्या कलमातील (मुका. क्र. २) कोणालाही आपला देश सोडून परदेशात जाण्याचा हक्क दिला आहे. पण त्याचाही भंग केला जातो. राज्याच्या सुरक्षिततेच्या नावाखाली अडथळे निर्माण केले जातात. देशात ज्यांना पक्षपाती वागणूक दिली जाते, त्यांचे मित्र आहात म्हणून झेकोस्लाव्हाकियात काहीजणांना प्रवेश करू दिला जात नाही.

काही नागरिकांनी आपल्या कामाच्या ठिकाणी खाजगीरीत्या अथवा परदेशातील जनप्रसार साधनांद्वारा (त्यांना आपली बाजू मांडण्यासाठी हे एकमेव साधन असते) मानवी हक्क व लोकशाही स्वातंत्र्य यांची पद्धतशीर होणारी गळचेपी याकडे लक्ष वेधले व त्यावर कारवाई करण्याची मागणी केली, परंतु त्यांना काही प्रतिसाद मिळाला नाही. मात्र अशी मागणी केल्याबद्दल त्यांची चौकशी सुरू झाली!

नागरी हक्कांचे जतन करण्याची जबाबदारी सत्ताधारी सरकारवर आहे. मात्र एकट्या सरकारवरच नाही तर प्रत्येक व्यक्तीवरही आहे. देशातील परिस्थितीची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीवर आहे व त्यामुळे सुरुवातीला उल्लेखिलेले दोन्ही करार हे सरकारप्रमाणेच व्यक्तीवरही बंधनकारक आहेत.

या सह–जबाबदारीच्या भावनेतून, नवा प्रभावी आविष्कार व्यक्त करावा म्हणून 'चार्टर–७७' आम्ही तयार केला आहे. त्याचे सार्वजनिक अस्तित्व आम्ही जाहीर करतो आहोत.

विविध व्यावसायिक व राजकीय निष्ठा असलेल्या परंतु झेकोस्लाव्हाकिया व जगातील मानवी व नागरी हक्कांविषयी व्यक्तिगत व संघटितपणे लढण्याच्या प्रबळ इच्छेने एकत्र आलेल्या व्यक्तींची स्वतंत्र, अनौपचारिक व खुली संघटना म्हणजे 'चार्टर–७७' मानवी हक्कांची ही सनदच आहे.

आपले जीवन व काळ ज्या ध्येयांशी निगडित आहे त्या ध्येयाबद्दल चिंता वाटणाऱ्या लोकांच्या एकजुटीच्या व मैत्रीच्या पायावर 'चार्टर–७७' उभारण्यात आली आहे.

चार्टर–७७ ही संघटना नाही, तिचे काही कायदेकानू नाहीत, तिची कायमची मुखपत्रे नाहीत की रजिस्टर्ड सभासदत्व नाही. जो कोणी चार्टर–७७ कल्पनेचा स्वीकार करतो, तिला पाठिंबा देतो, तिच्यासाठी काम करतो तो या संस्थेचा माणूस.

राजकीय विरोधी हालचालींचा पाया चार्टर–७७ बनावे असा हेतू नाही. समान हितासाठी झगडणारी ही संघटना आहे. राजकीय व सामाजिक परिवर्तनासाठी स्वतःचा कार्यक्रम तयार करण्याची आमची इच्छा नाही, परंतु राजकीय व सरकारी नेत्यांशी विधायक संवाद करून त्यांचे लक्ष मानवी व नागरी हक्कांच्या होत असलेल्या गळचेपीकडे ओढणे हे आम्हाला करावयाचे आहे.

डॉ. जॅन पॅटोका, डॉ. व्हॅक्लाव्ह हॅवेल व प्रा. जिशी हॅजेक हे 'चार्टर–७७'चे प्रवक्ते म्हणून काम पाहतील असेही या जाहीरनाम्यात म्हटले आहे.

स्वतंत्र नागरिक म्हणून झेकोस्लाव्हाकियातील जनतेला जगता येणे शक्य व्हावे म्हणून 'चार्टर–७७' प्रयत्न करील असा विश्वास शेवटी प्रकट करण्यात आला आहे.

**अनुवाद : अशोक जैन**



आसवेच स्वातंत्र्याची आम्हाला मिळाली
अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली

# गजाआडचे मंथन


● ● विनय हर्डीकर
● ● अरुणा ढेरे
● ● प्रकाश जावडेकर
● ● कुमार सप्तर्षी

# पण आपली खरी जागा कुठे आहे ? आत की बाहेर ? बाहेर की आत ?'

विनय हर्डीकर

पुणे रेल्वे स्टेशनच्या पोलीस लॉकअपचं दणदणीत, गंजलेलं गलिच्छ दार करकरत उघडलं. आम्ही आत गेलो. पुन्हा करकर. पाऊण इंच जाडीची कडी लावताना त्या दणकट हवालदार मेजरला देखील प्रयास पडत होते. कडी लागली. १४ जानेवारी १९७६ दुपारी साधारण साडेतीन वाजता. आप्पा दांडेकरांनी पहिल्यांदा महारोगाला स्पर्श केला आणि म्हटलं, 'एक युग उलटून गेलं !' तसंच काहीतरी वाटलं.

साधारण अर्ध्या तासाचा सत्याग्रह. त्यांतली पंधरा मिनिटं पुणे स्टेशन ते खडकी स्टेशनपर्यंत डब्याडब्यांतून. खडकी स्टेशनवर गाडीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत दोन फेऱ्या. बोलून चालून ती पॅसेंजर गाडी. त्यात खडकीला बरेच मिलिटरीवाले चढणार होते, त्यामुळे जरा लांबलेला हॉल्ट आमच्या पथ्यावरच पडला. मुख्यतः घोषणाच 'आणीबाणी रद्द करा !', 'न्यायासन खिशात लोकशाही धोक्यात !', इंदिरा तेरे राजमे जगा नही है जेलमे', 'भाषण–स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे', 'जयप्रकाश झिंदाबाद', 'हुकुमशाही मुर्दाबाद', 'भारतमाताकी जय' अशा आणखीही कितीतरी. पण कैफ भरपूर होता. डब्यातले लोक घोषणा ऐकत. लक्ष नसल्यासारखं दाखवत. एकदोन ओळखीचे चेहरे दिसले. त्यांनी ओळख देण्याचं टाळलं. प्रत्येकवेळी घोषणांच्या नंतर भाषण. सातआठ वाक्यांचं. 'सद्यःपरिस्थिती, सरकारचा बेमुर्वतखोरपणा, देशभक्तांना तुरुंग–देशद्रोह्यांना हौतात्म्य, सत्याग्रही आपणा सर्वांच्या स्वातंत्र्याकरताच तुरुंगात जात आहेत, त्यांना सदिच्छा, पाठिंबा, साहाय्य असू दे !' जनता ऐकून घेई. शासनाच्या देशभर पसरलेल्या पाठिराख्यांपैकी एक काही मायेचा पूत विरोधाला उठला नाही आणि एकजण काही स्वयंस्फूर्तीनं सामील झाला नाही. 'हा देश ज्या वेळेला लोण्याच्या गोळ्यासारखा चैतन्यहीन होऊन पडला होता...'

खडकीला दोघेजण रेल्वेपोलिसांच्या हाती सापडलो. बाकीचे फळी फोडून निसटून गेले. त्यांनी खडकी बाजारात सत्याग्रह केला व चार दिवसांनंतर येरवड्याच्या कुंभमेळ्यातच त्यांची गाठ पडली. आमचा सत्याग्रह भलताच साधा. अगदी शाकाहारी म्हटला तरी चालेल. खरोखरच प्रतिकात्मक निषेध. कुणी नवापूल दीड तास अडवला होता. कुणी बसच्या टपावर चढल्यानं कोर्टात दहशतवादी ठरले होते; कुणी कॉलेज बंद पाडली होती, रेल्वेत पत्रकं वाटली होती. एकदा तर म्हणे रेल्वेची एक गाडीच मुंबईला घोषणांनी नटून सजून गेली होती. तिचं पुनर्प्रसाधन कदाचित अजून चाललं असेल. खेडच्या बाजारात तास-दीडतास धुमाकूळ घालणारे, साहित्यसंमेलन पत्रकमय करून टाकणारे, चारवेळा सत्याग्रह करून सोडून दिल्यावर परत एकदा सत्याग्रह करणारा सासवडचा एक ६५ वर्षांचा तरुण. एस.पी.कॉलेजसमोर पोलिसांच्या गाडीखाली शिरून महिला पोलीस येईपर्यंत त्यांना तंगवणारी एक बहाद्दर विद्यार्थिनी. देहू, लोणावळा वगैरे लांबच्या ठिकाणी सत्याग्रह करून येणारे दोघे–चौघेजण आणि आकाशवाणीत शिरून बालोद्यान कार्यक्रमात ताई-नाना-अण्णा-हरबा यांची मुलाहून मूल होऊन 'किलबिल' चालली असताना 'आणीबाणी रद्द करा'चा नारा एकदम महाराष्ट्रभर पोचवणारा एक किरकोळ सत्याग्रही असे सगळे 'भाद्दर' तिथं जमलेले. ओळख करून घेताना, नाव-गाव-व्यवसाय ही आपली नेहमीची प्रथा उरकताच 'सत्याग्रह कसा केला ?' याची उत्कंठा. आम्ही रेल्वेवाले रेल्वेत कमीवेळा सत्याग्रह झाल्यानं आणि शेवटच्या तुकडीत आल्यानं, 'योजनेत बाहेर राहून काम करीत होतो' अशी सर्वांची खात्री असल्यानं, पहिले काही दिवस दाबात होतो !

¤

स्वच्छतेसाठी पुणे रेल्वेस्टेशनची बरीच प्रसिद्धी आहे. पण त्याचा परिणाम पोलीस कोठडीवर काही झालेला दिसला नाही. आत अगदी भरपूर अंधार, जवळजवळ पंचवीस फूट उंच छप्पर. पिचकाऱ्यांनी, ढेकूण चिरडल्याच्या, थुंकल्याच्या डागांनी रंगवलेल्या भक्कम दगडी भिंती. कोपऱ्यात एक डबा. पाहताक्षणीच अंदमानाकडे निघालेलं सावरकरांचं चलान आणि रात्री ते जागे असताना त्यांच्यासमोरच कैद्यांचं शौचास जाणं वगैरेची आठवण झाली. दोनतीन चिरगुटं कोपऱ्यात पडली होती. पोलीसमहाशयांनी ती अंथरून बसायला फर्मावलं. बसलो. रात्रही त्याच पांघरुणात काढावी लागणार–या कल्पनेनं अंगावर काटाच आला. वातावरणातला अती कुबट गारवा, कोपऱ्यातल्या डब्यातून येणारे वास यांनी काही वेळ मन अगदी कलकलून गेलं. पलीकडेच पोलीस स्टेशनची मोरी. तिथं नळ जोरात सोडला की शितोडे आतपर्यंत उडत. मध्येच एखादं झुरळ डब्याकडून आमच्याकडे येई. मी चार घोषणा दिल्या, सरकारचा धिक्कार केला, निषेधही केला; या सगळ्याची किंमत आता वसूल व्हायला लागली आहे. आपण असे या कोठडीत किती दिवस राहणार ? आपण असे राहिल्यानं सरकारच्या सत्तेचा रोड-रोलर कसा थांबणार–? वगैरे विचार मनात आले तेही त्या

पहिल्याच तासात. नंतर येरवड्याला दाखल झाल्यावर आपण एकटे नाही, हजारो. लाखोंच्या पैकी एक आहोत हा जो साक्षात्कार झाला त्यानं अशा विचारांचं सावट कधी टिकूच दिलं नाही.

पोलीस कस्टडीचा भयानक गलिच्छपणा. त्या गळक्या डब्यातून आमच्या बसायच्या जागेपर्यंत आलेले ओघळ. त्या कपड्यातले ढेकूण-पिसवा. काल या ठिकाणी कोण असेल ? खिसेकापू ? बिगरतिकीट ? दारूडा ? भिकारी ? महारोगी ? कुणी का असेनात आज तर आपण आहोत. ढेकणांना जरा चवपालट तर झाला. शेजारच्या मोरीत पोलिसांचे निरनिराळे विधी चालत. त्याचे नाना आवाज आणि दर एका शब्दाला चार शिव्या या प्रकारचं बोलणं. शरीरअवयवांचे निर्भय उल्लेख, त्यांची परम्युटेशन्स – कॉंबिनेशन्स ! - यांचा परिणाम जबरदस्त असतो. एका दिवसातच आपण काहीतरी वेगळे झालो, बाजूला पडलो असं वाटायला लागतं. आम्हाला पाय मोकळे करायला, चौकशीला बाहेर काढत. रेल्वेस्टेशनकडे माणसांची सतत रीघ लागलेली असे. पण एकदोन दिवसांतच आपण त्यांचे कुणी नाही असं वाटायला लागलं. वागणूक बरी होती पण सहवास कठीण होता. त्या गलिच्छ जागेत अतिशय बीभत्स भाषा ऐकत थंडीनं रात्रभर कुडकुडत काढणं, पांघरुणांचा दर्प सहन करणं हीदेखील एक हॅरॅशमेंटच होती.

दिवसभर आरडाओरडा, शिवीगाळ, मारहाणीचे कोठडीतून घुमणारे धमाधम आवाज, कैद्यांचं रडणं भेकणं, इतर कैद्यांची सदा अश्लील अशी धो धो वाहणारी वाणी, एका बिडीच्या थोटकासाठी पोलिसांच्या हातापाया पडणं. रात्र म्हणजे तर माराठोकीची पर्वणीच. वाटेल ते खटले येत. नवऱ्याविरुद्ध बायकोची तक्रार आणि त्यात पोलिसांची मध्यस्थी. बहुसंख्य पोलीस कन्नड मुलखातले. त्यामुळे त्यांचे साहेब व त्यांचा छत्तिसाचा आकडा. 'सगळ्या रेल्वे पोलिसांना मानवतला पाठवले पाहिजे' हे साहेब ठाकुरांचं स्पष्ट मत. एकदा आमच्या कोठडीत इतर १०।१२ जण भरले. पाच मिनिटांतच त्यांनी सगळं असह्य–अशक्य करून टाकलं. साहेबांच्या मेहेरबानीनं पोलीस स्टेशनच्या व्हरांड्यात मुक्काम करायला मिळाला. पण तिथेही डोक्याखाली ड्रेनेजचं मॅनहोल आणि पायथ्याला उकीरडा होताच. रात्रभर आम्हाला बाहेर झोपण्याची रिस्क घेतल्याबद्दल पहारेकरी शंख करीत होते. सकाळी त्यांनी परत कस्टडीत नेलं. तर कालच्या मंडळींनी अक्षरशः उत्पात केला होता. आत सर्व विधी केलेले. तो डबा ओतून टाकलेला. पानाच्या पिचकाऱ्या टाकून जमीन लालेलाल, त्यातच अंथरुणं–पांघरुणं बुडवलेली. क्षोभ अनावर झाला. आपण हें सगळं का भोगायचं असं वाटलं; पण दहापंधरा मिनिटांनी जेलचा भंगी आला. त्याच्याबरोबर ते धुतलं. स्वच्छ हातांनी पुसून काढलं. प्रथम डावाच हात लावत होतो, नंतर स्वतःचं हसू आलं आणि दोन्ही हातांनी काम सुरू केलं. कोठडी स्वच्छ झाली. एकदम स्वतःच्या होस्टेलच्या खोलीचा भास व्हायला लागला. आम्हा दोघांच्या गप्पा त्या दिवशी जास्त चवीनं झाल्या. एकमेकांना स्तोत्रं, अभंग ऐकवले. गीतारहस्याचं एक प्रकरण वाचलं, सोळावा अध्याय म्हटला आणि तीन दिवसांच्या जागरणामुळे असेल की आणखी कशामुळं असेल, प्रथमच गाढ झोप लागली.

रेल्वे कोर्ट फिरतं असतं. चिंचवडला मॅजिस्ट्रेटपुढे हजर झालो. त्यांनी एकदाची मॅजिस्ट्रेट कस्टडी दिली. आता येरवडा. आपल्या माणसात जाऊन पडायचं. सगळे तिथं आहेत. कुणी मिसाखाली, कुणी कैदेत. येरवड्याची हवा, पाणी, स्वच्छता, व्यवस्था याची रसभरित वर्णनं पोलीस तीन दिवस ऐकवत होते. येरवडा हा तुरुंग नसून एखादं फाइव्ह स्टार हॉटेल असावं, असं वाटत होतं. आणि जेव्हा येरवड्यात शिरलो तेव्हा तर त्याहूनही जास्त वाटलं.

¤

भव्य इमारत. समोर राष्ट्रध्वज. अठराशे सद्दुसष्ट हे या तुरुंगाचं जन्मवर्ष समोरच कोरलेलं. अशोकस्तंभाची प्रतिकृती. मोठ्या दरवाज्याच्या पोटातल्या दिंडीनं आत घेतलं. नाव–गाव पत्ता चेक झाला. आईचही नाव विचारलं. कशाला कोण जाणे, पण तुरुंगाच्या रजिस्टरमध्ये आमचेही आई-बाप नोंदले गेले. झडती झाली पण आधीच सांगितलेलं होतं तेव्हा झडतीत अंडकण्यासारखं काही नव्हतं. आत शिरल्यावर पाच एक मिनिटांतच श्री. बाळासाहेब देवरस आले आणि श्रीमती ताई आपटे यांच्या भेटीला गेले. साधुसंतांच्या घरा आलो होतो. देशभक्तांच्यामध्ये येऊन पडलो होतो.

झडतीच्या ठिकाणी धमाल झालेली होती. शिवापूरच्या दर्ग्याच्या तिथून एक फकीर धरून आणला होता. त्याच्या अंगावर अनंत कपडे, भाराभर चिंध्या, गळ्यात एकमेकात गुंतलेल्या माळा, अंगावर ठिकठिकाणी गंडे, दोरे, ताईत आणि हाताच्या बोटांत असंख्य अंगठ्या, तारांची वळी. सगळा 'साजशिणगार उतरवायला त्याला बसवलं होतं. दोघे शिपाई कंटाळून शेजारी बसून होते. प्रत्येक अंगठी काढताना, वळं काढताना तो उसासे टाकी, आकाशाकडे डोळे वळवी. 'क्या करना ! 'सरकारके हाथ बहुत लंबे होते है' वगैरे टिप्पणी करून मगच पुढचं काम सुरू होई. जेलर त्याला शिव्या घालत होता. बाकीच्यांची हसून-पुरेवाट झाली होती. त्याच्या कुबडीतून मात्र पोलिसांनी एक धारदार पोलादाचं, पाणीदार, चारसाडेचार इंची पातं उपसून काढलं !

पोर्चच्या आतल्या अंगाला तसाच एक भरभक्कम दरवाजा. त्यालाही एक दिंडी. समोरचे दोन्ही दरवाजे किंवा दोन्ही दिंड्या एकाच वेळेला उघडता येत नाहीत. मधेच आतली दिंडी उघडायची आणि आतल्या डांबरी सडकेवर नजर जायची. काही कैदी, तर काही शिपाई झपाझप इकडून तिकडे जाताना दिसायचे. आमच्या ओळखीचा एखादा कार्यकर्ता तेवढ्यात आत यायचा. प्रकाश जावडेकर तिथंच भेटला. आणि पुढे दोन महिने चालू राहणार असलेल्या गप्पा, चर्चा, विचारविनिमय, बैठकी यांची सुरुवातच झाली.

येरवड्याचा तुरुंग खरोखरच छान आहे. थंड, कोरडी हवा, चांगलं पाणी, मोकळ्या माळावरचा वारा, चिंचा, रिठे, काही ठिकाणी कैऱ्या यांची झाडं. डोकं आणि सौंदर्यदृष्टी दोन्ही वापरून बांधलेल्या बरॅक्स, त्यांची मंडलांमध्ये केलेली प्रमाणशीर विभागणी. आम्ही आत गेलो तेव्हा चार हजारांच्या आसपास कैदी होते. त्यामुळे माणूसबळ प्रचंड आणि स्वच्छताही अतिशय चांगली. पोलीस कस्टडीतून आलो होतो, त्यामुळे जेलवाल्यांचं खेकसणंही गोडच लागलं. गांधीयार्डच्या समोरच्या बोळातून कडेकडेनं चालत शेवटी जेलच्या मिशी-भोजन घराजवळ पोचलो. तिथलं वाक्य मोठं मजे-

क्षार– मन लावून, चांगल्या विचारांनी आणि अन्न हे पूर्ण ब्रह्म मानून खाल्ल्यास त्याचे पचन चांगले होते, असा त्याचा आशय. अन्न हे नीट शिजवल्यास त्याचे पचन जास्त चांगलं होतं हा विचार त्यांनी सोयीस्करपणे डावलल्याचा अनुभव नंतर यायचा होता.

आमची रवानगी मंडल क्र. ३ मध्ये म्हणजे जेलच्या दुसऱ्या टोकाला झाली. मोठं वर्तुळाकार पटांगण. त्याच्या भोवती समप्रमाणात सुद्धा बरॅक्स. प्रत्येक बरॅकला पटांगण, स्वतंत्र फाटक, व स्वतंत्र कुंपण. सर्कलचा तट आठ फुटी, जेलचा १४ फुटी. सर्कलचा तट वर्तुळाकार, जेलचा चौकोनी. पाठीमागेही मोठं प्रवेशद्वार; पण मागचंच, म्हणूनं भपका कमी. एकंदर पाहिलं तर एखाद्या भुईकोट किल्ल्यात-गढीत राहिल्यासारखं वाटलं. बुरूज, जंग्या, तोफा, चोरवाटा यांचीच काय ती वाण. पण नंतर निरनिराळे निषिद्ध पदार्थ जेलमध्ये मिळू शकतात. गांजा, दारू इथपासून उत्तम बटाटे, नवलकोल यापर्यंत– हे कळल्यावर चोरट्या चोरवाटा असल्याच पाहिजेत याची खात्री झाली.

तुरुंगात कुठल्याही दरवाजाला आतून कडी नसते. संडासाच्या दाराला असू शकते पण ते दारच निम्म्या उंचीचं असतं. त्यामुळे ती असून नसल्यात जमा असते. एकदा लागलेलं कुलूप उघडणं हे महाकर्मकठीण. आतमध्ये एखादा कैदी जर सीरिअस झाला, तर सगळे सोपस्कार होऊन किल्ल्या मिळून तो जेलच्या हॉस्पिटलपर्यंत पोचायला तास-दीड तास वेळ सहज जातो. दिवसा असं होत नाही. पण तरीही वॉर्डर-चौक्या-पहारे पार करावे लागतातच. कायदा किती निष्ठुर, लहरी असतो, याची एरवी बिगरलाइट किंवा बिगर लायसन्स पकडल्यावर त्या भानगडीत 'तोड' करताना कल्पना येत नाही. पण सख्ख्या बहिणीच्या, भावाच्या लग्नासाठी पॅरोल मिळत नाही. फीट्सवर फीट्स येत असलेल्या आपल्या मित्रासाठी आपण नाकावर कांदे दाबण्यापलीकडे काही करू शकत नाही. आतमध्ये असताना बाहेर एका कैद्याची बायको मरते, तरी त्याला पॅरोल मिळतं नाही. एवढंच काय, पण तिचं अंत्यदर्शन सुद्धा घेता येत नाही. तिचं प्रेत जेलच्या दाराबाहेर घेऊन येणारे नातलग डोळे पुसत परत जातात. कैदी आत फुटलेल्या हृदयानं बसून राहतो. सर्कलच्या दारापर्यंतसुद्धा जायची बंदी, वार्डर्स वैतागले तर करू शकतात आणि जेलरची फेरी असेल त्या दिवशी बाहेर उभं राहणं, मोठ्यानं हसणं बासरी वाजवणं हा देखील गुन्हा असू शकतो. केवळ संशयास्पद म्हणून धरून आणलेली पोरं ढसढसा रडत असतात. एखाद्या कैद्याला ससूनमध्ये उपचारासाठी नेतो म्हणून रोज जेलच्या दारापर्यंत नेऊन हिडीसफिडीस करून परत पाठवतात. ६५ वर्षाच्या वृद्ध सत्याग्रह्याला मुद्दाम हातकड्या घालतात. मुद्दाम इतर कैद्यांच्यामध्ये बंद करतात. आणि या सगळ्यांवर जेलरच्या राऊंडच्या वेळी तुम्ही एखादंच वाक्य–तेसुद्धा सत्याग्रही असता म्हणून–आर्जवानं उच्चारू शकता व 'बघतो' म्हणून जेलर स्वतःची सहज सन्मानानं सुटका करून घेतो. कैद्यांना समजून घेणं वगैरे...

□

या सगळ्या पाहुणचारांसाठी आपखुषीनं आलेले हे सत्याग्रही कोण होते? कसे होते? किती होते? मी येरवड्यात गेलो तेव्हा साडेतीनशेच्या आसपास संख्या होती. सुटलो तेव्हा ५२ लोक उरले होते. पुण्यातल्या पहिल्या बॅचला साडेतीन वर्षं सक्तमजुरी दिली. येवला, भोर इथल्याही तुकड्यांना वर्षापेक्षा जास्त शिक्षा दिल्या. म्हणूनच सत्याग्रहींची संख्या वाढली होती. बरोबर साडेअठ्ठावीस वर्षांपूर्वी दिल्लीतल्या दीपोत्सवाकडे पाठ फिरवून तो महात्मा नौखालीत जवळ जवळ एकटाच निघून गेला होता. इथे मात्र गटागटांनी २६ जानेवारीचा, प्रगतिदशकाचा रोषणाईचा झगमगाट टाकून ही सगळी मुलं गोळा झाली होती. सगळे सत्याग्रही तरुण होते आणि ९० ते ९५ टक्के वयात ही तरुण होते. ९ वीतल्या शाळकरी पोरापासून ते ६५ वर्षांच्या निवृत्त, कुटुंबवत्सल गृहस्थापर्यंत सगळे होते. येरवड्यात महिला व पुरुष मिळून ही संख्या हजाराच्या घरात होती, तर मुंबईला सोळाशे सत्याग्रही व मिसा स्थानबद्ध मिळून महाराष्ट्र पाच हजार, कर्नाटक १० हजार, केरळही आठ हजार, मध्यप्रदेश चाळीस हजार वगैरे ऐकलं की, आपण एकटे नाही, उलट प्रचंड शक्तीचे प्रतिनिधी आहोत असं वाटायचं. ४२ चा कॉंग्रेसचा सत्याग्रह, ४८।४९ चा संघबंदीचा सत्याग्रह यापेक्षाही यावेळची संख्या जास्त होती. सत्याग्रही आणि मिसावाले यांचा कमीतकमी आकडा २ लाख व जास्तीत जास्त अडीच लाख मानला जाई. कारण बातम्या कळण्यास काहीच मार्ग नसे.

नाशिकसारख्या मध्यवर्ती तुरुंगात १२०० स्थानबद्धांपैकी १०५० स्थानबद्ध संघ, जनसंघ, विद्यार्थी परिषद आणि मजदूर संघ यांच्यापैकी होते. आणि उरलेले १५० काही तरी ९–१० अखिल भारतीय पक्षांचे प्रतिनिधी होते. सत्याचा हा कटू घोट गिळणे इतर पक्षीयांना जड गेलं. पण त्यांनी या वस्तुस्थितीपुढे मान तुकवली. कधी नाइलाजाने, तर कधी समजूतदारपणा तर कधी राजकीय डावपेच म्हणूनही! सत्याग्रहींच्या बाबतीत ही टक्केवारी तर अधिकच असंतुलित झाली! पुण्यात निदान विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून शंभरेक लोक आले होते. इतर पक्षांचे मिळून पंचवीससुद्धा नव्हते. स्थानिक जनसंघ कार्यकर्ते, काही कामगार भागातले त्यांचेच गट आणि एखादादुसरा समाजवादी– कम्युनिस्ट. 'मी संघटना कॉंग्रेसचा आहे' असं म्हणणारा तर एकहीजण सापडला नाही, मग इतर 'स्थानिक' आणि 'राष्ट्रीय' पक्षांची बातच सोडा! या गर्दीमध्ये खरोखर देशातील लोकशाहीच्या नरड्याला नख लागलं आहे म्हणून आपण सत्याग्रह केलाच पाहिजे अशी भूमिका घेऊनही काही तरुण मंडळी आली होती. त्यांची संख्या कमी असली तरी महत्त्वाची होती. त्यांचा गटही प्रभावी असे.

संघाविषयीची दोन मतं मी स्वतः अनुभवातून बदलून घेतली. सत्याग्रह करताना वाटलं, की संघाची योजना हे आपलं केवळ माध्यम आहे. उद्या कम्युनिस्टांनी काय किंवा समाजवाद्यांनी काय, कुणीही देशव्यापी सत्याग्रह केला असता तर, आपण त्यांच्यात सामील झालोच असतो. संघ जगतो की नाही याच्याशी आपल्याला कर्तव्य नाही. पण आतलं ते माणसांचं वैभव बघितलं आणि चक्रावलो. संघ प्रतिगामी, संघ जुनाट, शाखांचे कार्यक्रम कंटाळवाणे, संघाकडे तरुण मंडळीच नाहीत, संघाच्या धोरणात बदल व्हायचे नाहीत आणि कितीतरी...... संघस्थानावर जाणं सोडून दहा वर्षे झाली होती. पण यातलं प्रत्येक मत बदलून घेणं जरूर आहे, नाहीतर आपण

## नववीतल्या शाळकरी पोरापासून ६५ वर्षांच्या निवृत्त गृहस्थापर्यंत

स्वतःला फसवतो असं होईल, ही खात्री झाली. बेदरकार समवयस्क मित्र मिळणं यासारखा आनंद कुठला? तशा मित्रांचा एक खजिनाच येरवड्यामध्ये आपल्या लोककल्याणकारी शासनाच्या कृपेनं उघडा झालेला होता.

दुसरं फार वेळा ऐकलेलं – मांडलेलं मत म्हणजे संघातला उच्चवर्णीयांचा भरणा! ४८ च्या सत्याग्रहाचे आकडेच त्याची साक्ष देत. आता मात्र तथाकथित उच्चवर्णीय अक्षरशः मायनॉरिटीत गेलेले. संघात जातिभेद कधी नव्हताच, पण अन्य जातीय, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांच्या साठी प्रयत्नपूर्वक काम करून त्यांना संघटनेत आणलं जात आहे, याची खात्री म्हणजे झोपडपट्टी, औद्योगिक कामगार, विडी कामगार यांमधून आलेल्या, त्यांच्यापैकीच एक होऊन गेलेल्या १०–१२ जणांच्या लहान लहान तुकड्या. त्यापेक्षाही विलोभनीय असाग्रच ते त्यांच्यामधलं सौहार्द. प्रमुख कार्यकर्त्याला प्रेमाने जपणं आणि चुकतमाकत का होईना, राष्ट्रविचार मांडण्याचा प्रयत्न करणं. दुसऱ्याचे ऐकून घेण्यासाठी धडपडणं. ही शक्ती निर्माण करणारी यंत्रणा-काही बदल करून हे तर गृहीतच – जपली पाहिजे. वाढली पाहिजे, ही वस्तुस्थिती आहे.

त्यामुळे प्रतीकात्मक सत्याग्रह करावा, आतमध्ये काही वाचनमनन करावं (म्हणून गीतारहस्य – नाथभागवत नेलं होतं.), अशी मर्यादित भूमिका घेणं शक्यच झालं नाही. मी तर काय जुना – मग कितीही बंडखोर असो, कार्यकर्ताच. पण एकट्यादुकट्या समाजवादी, कम्युनिस्ट सत्याग्रहींनाही जमलं नाही. कडाडून वादविवाद होऊन देखील स्नेह टाळता आला नाही. मैत्रीचा मोह बाजूला सारता आला नाही. नाशिक जेलमधून एखाद्या समाजवादी कार्यकर्त्यानं 'संघवाल्यांचा निरोप घेताना जमाते इस्लामीच्या कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले' अशी पावती द्यावी, यासारखा आनंद नाही.

मोठी गंमत होती! गांधीजींचे मारेकरी मानले गेलेले लोक गांधीयार्डमध्ये राहत होते आणि त्यांचा निर्भय मार्ग अनुसरल्याबद्दल पकडले गेले होते. गांधीजींचे वारस म्हणवणारे त्यांना पकडत होते आणि कोणत्याही जुलमी राजवटीत असतात तसे अत्याचारही काही प्रांतांत करत होते. एकीकडे हुकूमशाहीशी, हिटलरशाहीशी जवळचे मानले जाणारे, आता लोकशाहीसाठी कटिबद्ध होण्याचं पथ्य शिकत होते आणि तथाकथित लोकशाही समाजवाद आणण्यासाठी देशात दहशत, संशय, धरपकड यांचं वातावरण निर्माण करण्यात आलं होतं. नेहमी ज्यांनी राजकीय व्यासपीठांवरून एकमेकांना शिव्या दिल्या ते कुरकुरत, धुसफुसत आणि क्वचित प्रसंगी बाचाबाची करत का होईना, पण परत परत 'आपल्याला एकत्र राहायचं आहे' असाच निश्चय करत होते आणि स्वतःच्याच पक्षात बंडाळी होऊन देशाऐवजी आपणच रसातळाला जाऊ, या भीतीनं पंतप्रधान देशातल्या जनतेच्या सर्व स्वातंत्र्याचा, मूलभूत हक्कांचा बळी देण्यास सिद्ध होत्या. कालाय तस्मै नमः हेच खरं. तो कुणावर तरी सूड घेत होता आणि त्याचवेळी कुणाला तरी सुवर्णसंधीही प्राप्त करून देत होता. 'की तोडिला तरु फुटे आणखी भरानें' ही उक्ती त्यालाही माहीत असावी. मनात सारखं येई, ही आपत्ती खरंच इष्टापत्ती ठरणार असेल, या देशातले विरोधी पक्ष खरंच एक होणार असतील, तर आपण दहावेळा सत्याग्रह करायला तयार आहोत! □

सकाळचे साडेपाच – पावणेसहा वाजलेले असतात. बहुतेक सर्व सत्याग्रहींच्या झोपा चाळवलेल्याच असतात. मार्गशीर्ष–पौष–माघ म्हणजे चावऱ्या थंडीचे दिवस. त्यातून बरॅकसच्या बांधकामात भिंतीपेक्षा खिडक्यादारंच पण भक्कम मजाची, जास्त. थंडगार वारे वाहत असतात–सहाचे टोले पडताच उठा उठा ची हाकाटी सुरू होते. पांघरुणं ओढणं, हलवणं सुरू होतं. 'उठा उठा हो सकळीक' ही भूपाळी सुरू होते. त्यातल्या 'हाती मोदकाची वाटी' वगैरे ओळी तुरुंगातल्या सकाळी मोठ्या विनोदी वाटतात. मग येतं बरंचसं बदललेलं पण लांबसडक भारतभक्तिस्तोत्र! जो त्यातले २–४ दणदणीत श्लोक गाळील त्याला फारसे शिव्याशाप मिळत नाहीत. जो अती सावकाश सांगतो त्याच्या नावानं सगळे बोटं मोडतात. कडीचा आवाज होतो. किल्ल्यांचे जुडगे खळखळतात. गिनतीसाठी वॉर्डर येतात. अजूनही झोपून राहिलेल्यांना उठून बसावंच लागतं. पांघरुणाखाली माणूस आहेच हे सिद्ध करावं लागतं!

सावकाश बोटं मोजत घेणाऱ्यांची गिनती चुकते आणि धडाधड घेणाऱ्याची नेमकी बिनचूक! त्यातच गिनती घेणाऱ्याला नमस्ते करून त्याची एकाग्रता घालवण्याचा व्रात्यपणा चालूच असतो. एकदाची गिनती जुळली की दारं उघडतात. धडाधड उड्या टाकत मंडळी अंगणात येतात. साडेसहाचा सुमार असतो. गारठा वाढलेला असतो. स्वखुषीनं आत आलेले सत्याग्रही १२ तासांकरता मर्यादित अर्थानं का होईना, मोकळे होतात.

शरीरधर्म तर उरकायचे असतातच, पण सकाळी ऊन खाणं व गप्पा ठोकणं! चहासाठी धावत सुटणं हे एक रोजचं सेन्सेशन. ज्याला चहा मुळीच नको असतो त्याला रोज ऑफर करणं आणि अजून त्याचा नेम मोडलेला नाही याची खात्री करून घेणं! पावणेआठच्या सुमारास लपलप करत वाशाला टांगलेल्या कांजीच्या बादल्या येतात. त्यांना फावडी का म्हणतात ते येरवडेकरच जाणे! सर्कलच्या रेडिओवर विविध भारतीचा संगीत कार्यक्रम चालू होतो. शास्त्रीय संगीताचे शोकीन तिथं गोळा होतात. वृद्ध सत्याग्रही निष्ठावंतपणे मैदानाला फेऱ्या मारतात. अभ्यासेच्छू असली तर, काही पोरं उन्हात अभ्यासाला बसतात. कुठे ज्ञानेश्वरी, गीता यांची पारायणं – सार्थ नव्हेत – चालू असतात. सनातनी कर्मठ मंडळी तशा गारठ्यातही गार पाण्यानं आंघोळी करतात. त्याहूनही कर्मठ म्हणजे जवळजवळ अमानुषच असणारांनी या आधीच उरकलेल्या असतात.

मग सुरू होते मिसाकडे जाण्याची गडबड–अभ्यासासाठी, भेटण्यासाठी, औषधासाठी, चर्चा करण्यासाठी आणि काहीच नाही तर नुसतं पाहण्यासाठी. कधी परवानगी घेऊन, तर कधी वॉर्डरांच्या सहकार्यानं, तर कधी दडपून गटागटांनी मंडळी बाहेर पडू लागतात. मिसामधले ९०% लोक संघटनाप्रधान होते, त्यामुळे आजाऱ्याची काळजी, एकत्र जेवण, गप्पागोष्टी, घरच्या चौकशा, कायदेशीर सल्ला वगैरे नेहमीचीच तंत्रं वापरून त्यांनी वॉर्डर्स आपलेसे केलेले असतात. मिसामध्ये मात्र सत्याग्रहींचं फार मोठं स्वागत असतं. आपल्या गावचा, पक्षाचा, शाखेचा, वयाचा वगैरे साम्ये तर असतातच, पण आपल्या भयाण एकांतवासात सोसासोसानं हे लोक आले, आपले साथी बनले, पोलीस, कोर्ट, तुरुंग यांना धाबरले नाहीत, याबद्दल कौतुक असतं।

आगळंच समाधान असतं. एकमेकांशी चर्चा करून दमलेल्या नेते-मंडळींना फार तरणी पोरं आपल्या विचारांकडं वळतील, अशी आशा असते आणि आपल्याकडची पोरं भलत्यांच्याच नादी तर लागायची नाहीत ना, अशी इतरांना चिंता असते.

साडेदहा–पावणेअकराला भत्ता येतो. प्रत्येकी सहा पोळ्या किंवा तीन भाकरी आणि कालवण. पिठलं–मुगाची उसळ ही पक्वान्नं. बावनपत्ती नामक भाजीनं 'गजब ढाया' अशी परिस्थिती निर्माण केलेली असते. बीट, मुळा, अळू, कोबी, फ्लॉवर वगैरे भाज्या मुळासकट अगदी मुळाच्या मातीसकट उपटून खायला घातलेल्या असतात. तेवढं सगळं खाऊनही कित्येक पोरं दोन दोन थाळ्या भरून पाणी ढोसतात तेव्हा पोट भरतं. यामध्ये ओॲसिस म्हणजे मिसातून येणारी पाव-उसळ, कधी कधी जेलरच्या परवानगीनं मिळणारा शिरा किंवा खिचडी. संक्रांतीच्या वेळेस आलेल्या गुळाच्या पोळ्या, तिळाचे लाडू आणि अधूनमधून मिसामागे येणारे घरचे डबे...पण मस्तीमध्ये असतात सगळे! जेवताना 'आणखी जरा जिलबी आणा,' 'गुलाबजाम वाढा' वगैरे आरोळ्यांच तोंडी लावायला असतात. 'सहनाववतु' म्हटल्यांवरच जेवायला सुरुवात करायची सूचना रोज दिली जाते आणि रोज मोडली जाते.

दुपारची विश्रांती आणि नंतरचं भाषण म्हणजे बऱ्याच वेळा स्वप्नातून दारुण सत्यात असा प्रकार ठरतो. निम्म्याहून अधिक वक्त्यांचा श्रोत्यांच्या शिस्तीवर आणि सोशिकतेवर भरवसा असतो आणि त्यांची भाषणं सोसावीच लागतात. संयोजकांची दुपारची झोप कधीच उडालेली असते. रोजची तयारी, रोजच्या सूचना, रोजची टाळाटाळ—

तुरुंग हे एक विद्यालयच आहे, या गांधीजींच्या तत्त्वाबद्दल त्यांचं कौतुक करणं वेगळं, आणि ती शाळा स्वतःच शिक्षक बनून किंवा विद्यार्थी बनूनं चालवणं वेगळं. त्यातच रोज आमच्या मंडळात तुरुंगाच्या आतली शाळा भरते. 'नाना, दादा, मसाला पान खा' हा पहिला धडा! 'अहमद हरण धर' (की बघ?) शी तुलना करून सगळ्यांचं भरपूर मनोरंजन झालेलं असतं. परंतु दुपारची साखरझोप टाकून राष्ट्रविचार करायला बसणं, हे जरा जडच वाटतं. एकीकडे बऱ्याच दिवसांनी तरुण मुलं भेटली आहेत आणि गज्राआड का होईना, भाषणस्वातंत्र्य आहे म्हणून सहा महिन्यांच्या मौनाची उपासमोड करायला आतुर झालेले विचारवंत, लेखक, कार्यकर्ते, राजकारणी आणि कोण कोण–त्तर दुसरीकडे ज्यांच्यासाठी आपण सत्याग्रह केला ते काय म्हणतात, ते ऐकायला उत्सुक असलेले युवक, 'सगळं सारखंच आहे' असा साक्षात्कार झालेले प्रौढ सत्याग्रही आणि 'आता तुमचं ऐकून आलोय ना आत? मग का सतावता' असा कावून प्रश्न विचारणारे काही मोजके लोक–मुख्य म्हणजे मिसातून येणारा प्रत्येकजण देशभक्त वगैरे असला तरी, वक्ता म्हणून कसा असेल, याची गॅरंटीच नसते. तेव्हा धास्ती असते, साशंकताही असते. एका इतिहाससंशोधकांचं भाषण होतं. ते दर पाच–दहा वाक्यांनी म्हणतात की, 'हा पुरावा कसा मिळाला, याची हकीकत फार मनोरंजक आहे. पण त्या भागात मी आता शिरत नाही!' जीव दमून जातो. काही वक्ते येतात ते नेहमीचे खुळखुळे वाजवत. संघटना, अनुशासन, योजना, समर्पण, रक्ताचे सडे यांचे किंवा वर्गलढा, दलित जाती, सांस्कृतिक क्रांती, चातुर्वर्ण्य यांचे किंवा महात्माजी, सरदार, नेहरूंची लोकशाही वृत्ती आणि आताच्या नेतृत्वाची भ्रष्टता यांचे. सगळे खुळखुळे सारखेच अर्थहीन! दुपारी तीनच्या टळटळीत वेळी योगासने या विषयावर सप्रात्यक्षिक भाषण होणार, अशी अफवा उठताच अनुभवी लोक अक्षरशः हातापाया पडून 'तेवढं टाळा बुवा' अशी गयावया करतात. पण हे नेहमीच होत नाही. कधी तरी अचानक पन्नाशी उलटलेले, सुदृढ, हसऱ्या मुद्रेचे, पाणीदार डोळे चष्म्यातून रोखून, 'हं' असं प्रेमानं गुरकावणारे एकजण येतात आणि ठिकठिकाणी चाललेली सामाजिक, शेतीविषयक, जातिनिर्मूलनाची, शुद्धीकरणाची कामं, आदिवासी भागातले लढे ही सगळी कामं आपलीच आहेत, हे ठासून सांगतात. ही करणारांनी रोज शाखेत नाही गेलं तरी चालेल, हे सुचवून ठेवतात. असं काम वर्षभर करायचं असेल तर माझ्याकडं या, वाटेल तितकी कामं देतो, माणसं, पैसा गोळा करून देतो, असं ठणकावून सांगतात. प्रसन्न विनोदाचा शिडकावा भाषणातून सतत चालू असतो आणि श्रोते केवळ मोहून, वाहून जातात. हेच ते डॉ. केशवराव केळकर, विश्व हिंदू परिषदेचे आयुर्वेदिक निष्णात डॉक्टर आणि मुख्य म्हणजे बदलत्या परिस्थितीतल्या प्रश्नांना उत्तरं Dynamic विचारातूनच देता येतील, याच्यावर गाढ विश्वास असलेले हिंदुत्ववादी कार्यकर्ते! सत्याग्रहींना केशवरावांची कितीही भाषणं ऐकण्यात कधीच श्रम वाटले नाहीत. साताराचे विनायकराव ढवळे! आपले अनेक उपद्व्याप त्यांनी, विशेषतः स्वातंत्र्याच्या चळवळीतले, ४२ च्या लढ्यातले अशा सच्चा नम्रतेने, Understatement नं ऐकवले की, श्रोते थक्क झाले. कधी कधी प्रा. ग. प्र. प्रधान यांनी हाजीपीर–सोनार बांगलामधले अनुभव परत सांगून मुलांना गुंगवलं. प्रा. शास्त्रींच्या वंदेमातरमच्या इतिहासकथनात अंगावर रोमांच आले. प्रा. सदानंद वर्दे, बाबूराव सामंत यांचीही भाषणं प्रभावी ठरली, विचारांना चालना देऊन गेली. नव्या जाणीवा, नवीन संशोधन, जुन्या समाजप्रेमाला नवीन स्वरूप, नवा कार्यक्रम, नवी वास्तविक बैठक देण्याची निकड, धडपड या सगळ्यांतून जे चैतन्य निर्माण होतं तेच महत्त्वाचं असतं. एखाद्या दिवशी चांगलं भाषण झालं की, त्याचे पडसाद संध्याकाळी, रात्री, दुसऱ्या दिवशी सकाळी एकमेकांत चालणाऱ्या प्रकट, अप्रकट चर्चांतून उमटत राहतात. त्यांचा संस्कार हा परत परत होत राहतो. संस्कारक्षमता टिकविलेल्या कार्यकर्त्यांवर तर विशेषच परिणाम होतो.

दुपारचा वैचारिक कार्यक्रम साडेचारपर्यंत संपतो. चांगलं भाषण झालं असेल तर त्याचा आनंद, वाईट झालं असेल तर, सुटकेचा आनंद, कुणाची पत्रं आलीत म्हणून आनंद, डबे आलेत म्हणूनही आनंद, भाषण दिलेले वक्ते गप्पा मारायला थांबलेत म्हणून आनंद, आंघोळ करायची म्हणून आनंद, आता दोन तास मोकळीक म्हणूनही आनंदच, हवेत उबदार गारवा असतो म्हणूनही. सबंध दिवसात हे दीड–दोन तास फार आनंदाचे जातात. सर्कलच्या पटांगणात (म्हणजे डेक्कनवर) गटागटांनी फेऱ्या सुरू होतात. विशेष एकांत हवा असेल तर तिघा–चौघांना बरोबर घेऊन मोठ्यानं 'आज एकनाथी भागवतावर बोलू या' किंवा 'गीतेचा दुसरा अध्याय ना आज?' एवढं म्हटलं की, आसपासचे अनावश्यक लोक भराभरा पसार होतात आणि मग आपल्या चौघांपैकी एकाजवळच्या शेंगदाण्यातही

कमी वाटण्या पडतात, चिंचेची बोटकं प्रत्येकाच्या वाटचाला जरा जास्त येतात, मनसोक्त गप्पा मारायला मिळतात. पण अशी गटबाजी क्वचितच असते. एरवी मात्र रोज नव्या खांद्यावर आपला हात आणि आपल्याही खांद्यावर नवा, काल–परवापर्यंत अनोळखी असलेला हात असंच घडतं. घरी माणूसघाणा म्हणून प्रसिद्ध असलेला एखादा युवक गेल्या महिन्याभरात आपल्या अडीचशे लोकांशी ओळखी झाल्या, याचा आनंद साश्चर्य व्यक्त करत असतो.

संध्याकाळची बंदी येते. माडगूळकरांच्या बनगरवाडीमधल्या मेंढरांसारखे कैदी बरॅक्सकडे जातात आणि त्या धनगरांच्याच सराइतपणानं वॉर्डर्स त्यांना आत कोंडतात आणि मेंढरांप्रमाणेच आपापल्या मित्रांना–कैदी–सत्याग्रही हाका मारतात. रोजच्या दिवसातले शेवटचे तास, नाजूक आणि हळवेपणाचे क्षण आता सुरू होतात. कदाचित कोंडल्याच्या जाणीवेनं असेल पण क्षुल्लक गोष्टीही उग्र रूप धारण करतात. आपला आवडता मित्र आपल्या जवळच असावा असं वाटतं. दुसऱ्याच्या साध्या प्रश्नांना सरळ अर्थ नाही असं वाटतं आणि मन हळवं, चिडचिडं बनतं. चौकशीचा अर्थ सरळसरळ intrusion on privacy असाच होतो. नाही म्हटलं तरी तुरुंगातल्या वातावरणाचा मनावर परिणाम होतोच. आपल्या अपराधाबद्दल मनात असतं ते एक अतिशय glorified स्वरूप. सत्याग्रह, गांधींचा मार्ग निर्भयता, देशभक्तां प्रसाद बंदिशाला–पण संध्याकाळी सहा साडेसहाच्या सुमारास जेव्हा रोजच्या आयुष्यात सुंदर कपडे घालून, सुंदर भांग पाडून रंगीत दुनियेत जायला बाहेर पडायची सवय असते, तेव्हा खेकसून घेणं, स्वतःला बंद करून घेणं, मोजून घेणं, बारा तासांसाठी स्वतःचं स्वातंत्र्य पूर्णपणे गमावणं यातून आपण सरकारच्या सत्तेवर आघात करतो आहोत असं मानण्यापेक्षा शेजारच्या मित्रावरच क्षुल्लक कारणासाठी चिडणं हेच जास्त सोपं असतं, मानवी तर असतंच ! पाणी घ्यायला कुणीतरी पुढे सरसावतो, आपलं अंथरुण कुणीतरी जोरजोरात झटकतो, कुणाच्या तरी हातून दुसऱ्याचे धुतलेले कपडे धुळीत पडतात, न विचारता डबा खाऊन फस्त होतो, इतक्या साध्या गोष्टी. पण त्यातून भडका उडू शकतो, मारामारी होते. वकूबाप्रमाणे शिवीगाळही होते आणि बरॅक्स प्रमुखाला तापलेल्या तव्यावर बसल्यागत वाटतं !

त्यामुळे संध्याकाळचे कार्यक्रम बहुरंगी, बहुभावनिक असे होतात. भांडणांची मिटवामिटव असं वातावरण असलं की,ते भीमरूपी स्तोत्र –पसायदान, सावरकरांचे श्लोक, एखादं पद्य हे अगदी खालच्या आवाजात, नंतर चर्चा असेल तर नॉर्मल वेगानं, कथाकथन वगैरे असेल तर भरभर उत्कंठेनं, उत्साहानं, आणि काहीच नसेल तर सावकाश, चाखत चाखत गंमती करतं ! tension नसेल त्या दिवशी संध्याकाळ छान जाते. मध्येच कुणीतरी गणपतीतला नाच सुरू करतं, भत्त्याच्या पेटीचा ढोल होतो आणि थाळ्यांवर टूथब्रशच्या आघातांनी ताशा बडवला जातो. मजा येते. चंद्रशेखर आझादांसारख्या क्रांतिकारकांच्या कथा ऐकायला मिळताच तुरुंगाच्या अन्नामुळे जरा अशक्त झालेली छाती परत भरून येते. कधी पद्यगायनाचा कार्यक्रम होतो आणि भलेभले लोक आवाज लावून घेतात. आपलं हसं आणि दुसऱ्यांची करमणूक करतात. त्याचवेळी आठच्या सुमाराला विविध भारतीवर मराठी गाणी सुरू होतात. आणि कंटाळवाणी चर्चा वगैरे असेल तर 'बोलो इंद्रिया लागे कळंभा' असंच होतं. एखादेवेळी fishpond punishments असे शुद्ध करमणुकीचे (कारण पद्य काही 'शुद्ध' करमणूक करत नाही.) कार्यक्रमही होतात. मी सत्याग्रह का केला ? सत्याग्रह झाला, पुढे काय ? विधायक कार्याची आवश्यकता ! संघाच्या कार्यपद्धतीत बदल करावा काय ? शिक्षणपद्धतीत क्रांती, जातिवादाशी सामना अशा विषयांवर चर्चाही याच वेळी चालतात आणि त्या चर्चा विषयाशी फटकून वाढायला लागल्या की, आपण बरॅक्समध्ये नसून गोखले हॉल, मसाप किंवा भाइसंमं मध्येच आहोत असं वाटू लागतं. 'बाप मेला की श्राद्धाला यावं लागतं म्हणून संघावर बंदी आल्यावर सत्याग्रहात आलो,' असा एखादा बाँबही अनपेक्षितपणे फुटतो आणि सर्वांची दाणादाण होते, त्या दिवशीची चर्चा अधिकृत समारोपानंतरही चालूच राहते, पार मध्यरात्रीपर्यंत–

संपूर्ण वंदेमातरम् होऊन– त्या सर्व दिवसांत वंदेमातरम् ऐकताना अंगावर रोमांच आले नाहीत–असं एकदाही घडलं नाही. संध्याकाळचा कार्यक्रम संपतो. त्याच मूडमध्ये रात्रीची जेवणं आटोपतात. भात-आमटी मिळेल त्या दिवशी विशेष उत्साह, का-कोण जाणे, पण असतो ! भराभर पथाऱ्या पडतात पांघरुणांची मित्रत्वानं, शत्रुत्वानं पळवापळव चालते. एखाद्यावर पाळत ठेवून दणादण रबडी पडते. (म्हणजे चादर टाकून धोपटण्यात येते.) कुणी पत्ते काढतात, हलक्या आवाजात गाणी, अभंग चालतात, कुणाचा अभ्यास–वाचन चालू असतं, नाही तर शिळोप्याच्या गप्पा असतातच. क्वचित अंग रगडून देणं, मालीश करणं, पोट शेकणं, औषध देणं हे प्रकारही चालतात. एखादा romantic युवक आपली काव्यमय डायरी लिहून आज राष्ट्राला आर्त हाका घालतो. उद्या त्याच्या या हाका सार्वजनिक होणारच असतात, पण आज मात्र तो एकटाच लिहीत असतो.

एकेक आवाज विरत जातो. पहारेकरी व तासांचे टोले यांच्या साथीला कुणाचा तरी घोरण्याचा खर्ज–बाकी सर्व शांत होतं. समोरासमोरच्या प्रचंड खिडक्यांतून चावऱ्या गारठ्याचे झोत येतात. जातात. बरॅकच्या तुळयांवरून उंदीर धावू लागतात. रात्रीतून एकदोनदा बरॅक प्रमुख उठतो आणि सगळेजण नीट झोपलेतना हे पाहून येतो. कुणी जागं असल्यास चौकशी करतो. सर्वांनी नीट झोपणं महत्त्वाचं असतं. 'आणि सगळं ठीक आहे ना ?' या मिसातल्या वरिष्ठांच्या प्रश्नाचे अनेक अर्थ त्याला ठाऊक असतात. नंतर तोही झोपी जातो ! उद्या सकाळच्या सहाच्या टोल्यांची वाट पाहात. मुक्काम पोस्ट येरवड्याचं कॅलेंडर आणखी एका बंदिस्त दिवसात पुढे जातं !

□

संपूर्ण देशभरच्या हजारो तरुणांनी सत्याग्रहात भाग घेतला. शिक्षा कमी–जास्त झाल्या, हालही कमी–जास्त झाले. विशेषतः दिल्ली, पंजाब, केरळ, आंध्र, राजस्थान या प्रांतांत सत्याग्रहींना अत्यंत सूडबुद्धीनं वागवण्यात आलं; त्यामानानं इतर प्रांतांत कमी त्रास झाला. गुजराथसारख्या राज्यात राष्ट्रपती राजवट येईपर्यंत तर पुष्कळच मोकळीक सत्याग्रहींना होती. पण हजारो तरुण या एका नव्या अनुभवातून गेले.हे तर खरंच. ४८ व्या दुरुस्तीनं नादुरुस्त

**इतक्या साध्या गोष्टी. पण त्यातून भडका उडू शकतो.**

झालेली घटना परत दुरुस्त होऊन भारतात खऱ्या अर्थानं लोकशाही प्रजासत्ताक स्थापन झालं की, या तरुणांच्या तुरुंगवासाचं थोडंफार चीज झालं, असं म्हणता येईल. कारण भारतीय 'लोकशाहीवाद्यांचा लढा घटनात्मक, राजकारणी पातळीवर आहे. हे खरं असलं तरी सामान्य जनमानस 'अस्मानी सुलतानी', 'राजा कालस्य कारणम्' अशा मध्ययुगीन भ्रमातून बाहेर काढणं आणि लोकशाही म्हणजे केवळ एक आदर्श म्हणूनच अशक्य संकल्पना नसून ती एक शक्य व्यवहार्य अशी जीवनपद्धती, विचारधारा आहे, ही खात्री सामान्य लोकांची व या सर्व सत्याग्रहींचीही होणं हे महत्त्वाचं काम अक्षरशः काही पिढ्यांचं आहे. इतक्या दूरच्या दिशेनं फारसा प्रवास या सत्याग्रहींचा किंवा मिसा स्थानबद्धांचाही झालेला नाही. या प्रवासाची सुरुवात काहीजणांच्या बाबतीत झाली एवढंच. परंतु तरीही विचारमंथन पुष्कळच झालं आणि पुढे नेणारं झालं हे निर्विवाद—तेच या सत्याग्रहाचं खरं फलित !

सत्याग्रहामुळे अनेकजणांचे अनेक बाबतीत डोळे उघडले. उजव्यांच्या संघटनात्मक ताकदीची जाणीव डाव्यांना झाली. त्याचप्रमाणे आदिवासी, भूमिहीन, दलित• यांच्यासाठी मुख्यतः आर्थिक उत्पादनक्षमता असणारे कार्यक्रम आपण हाती घ्यायलाच हवेत ही महत्त्वाची जाणीव केवळ संघटनेसाठी संघटना करणारांना पटली. काही लोकांनी इतके दिवस नुसता मांजा केला होता. काहींनी बिनमांजाचे पतंग करून ठेवले होते. आता मांजा आणि पतंग जवळ आले. थोडा मांजा तुटला, दोनचार पतंग फाटले, एवढं चालायचंच ! If we do not hauing together, we shall be hanged separately ही जाणीव सर्व विरोधी पक्षांना झाली. तीही त्यांचे डोळे उघडल्यामुळेच.

सरकारनं ज्याप्रकारे आणि धैर्यानं (नीतिधैर्यानं नव्हे) सत्याग्रहाला तोंड दिलं, त्यामुळेही सगळ्यांचे डोळे उघडले. येरवड्यात गेलो तेव्हा हजारोंच्या तुरुंगवासाच्या आर्थिक व नैतिक दबावाखाली सरकार दमले, नमले, आणीबाणी उठेल असं मानलं होत, काहींना खात्री होती. पण येरवड्याच्या बी. या वॉर्डमध्ये नव्या बरॅक्स बांधण्याची तयारी चालू होती आणि कल्याणला नव्या बरॅक्स झपाट्यानं उभ्या होत आहेत, इतर अनेक तुरुंगांतही उभ्या होत आहेत हे कळलं आणि आपल्या सत्याग्रहाचं तात्कालिक राजकीय फलित शून्य असणार हेही कळून घ्यावं लागलं. एक डाव हातचा गेला पुढचा तर खेळता येत नाही, ही जाणीव तुरुंगात फार त्रास देणारी असते, डोकं भणाणून टाकते. भारतीय लोकशाहीसाठी आयुष्यभर तुरुंगात राहण्याची भाषा त्यापूर्वीही बोलली गेली होती. पण त्या उद्‌गारात वर्तमानपत्री वक्तृत्वाचा भाग बराच होता. आयुष्यभराचा तुरुंगवासही एक शक्यता बनली. आणि परत एकदा सर्वांचे डोळे उघडले. सरकारविरोधी लढा चालवायचा सर्वांत प्रतिष्ठित मार्ग म्हणजे असा सत्याग्रह करणं— तो आता पुन्हा चोखाळण्यात अर्थ आहे का ? की सरकार खड्ड्यात जाऊ दे, आपण समाजात अधिकाधिक विधायक, राजकारणबाह्य काम करूनच स्थान मिळवणं अधिक शहाणपणाचं आहे ? असे प्रश्न आपोआपच निर्माण झाले. चर्चांच्या समारोपाचा सूर विधायक कार्याकडे जास्त झुकायला लागला. आपला सत्याग्रह हे दीर्घकाळ करायच्या लढाईचं पहिलं पाऊल आहे, अशी अंतर्मुख करणारी, संयमी भाषाही उत्तरोत्तर जास्त प्रचारात आली. विचारातही आलेली होतीच !

काम आणि तत्त्वज्ञान कोणतंही असो, त्यासाठी निरलस, निःस्वार्थी कार्यकर्ते अत्यावश्यक असतात हे तर खरंच, पण किमान अनुशासनाशिवाय काम उभं राहत नाही हेही खरं. येरवड्यात समाजवादी मंडळींचं वर्तन पाहताना हाच विचार मनात येत असे. प्रतिभा, नवविचार, अर्थशास्त्राचा अभ्यास, दलितांचा कैवार हे सगळं समाजवाद्यांचं सामर्थ्य. केवळ बेशिस्तीमुळे, काल झालेला निर्णय जर सहा महिन्यांसाठी असेल तर मी, आज सकाळी मला नवीन साक्षात्कार झाला असला, तो अगदी सच्चा असला, तरी त्या निर्णयामागची काठी काढून घेता कामा नये, हा संयमच नसल्यामुळे अक्षरशः वाया जाताना पाहून मनस्वी दुःख होई. नाशिक व येरवडा या दोन्ही तुरुंगांत जे काही पेचप्रसंग निर्माण झाले, ते केवळ शिस्त नसल्यामुळेच. एखाद्या कार्यकर्त्यानं नाशिकच्या तुरुंगातून काही पत्रं पाठवली तरी ते साधनेच्या संपादकांनी छापावं आणि मग काळदाते, धारिया, प्रधान यांनीच सर्वांची माफी मागावी ही बेशिस्त नाही तर दुसरं काय ? हे लोक आपापसात सुद्धा इतक्या झटपट हमरीतुमरीवर कसे येतात ? मोठमोठे कार्यकर्ते, पण समजूतदारपणा मात्र शून्य ! एकदा मी प्रा. प्रधानांशी बोलत असताना तिथे एक थोर कार्यकर्ते आले आणि अगदी क्षुल्लक कारणावरून प्रा. प्रधानांशी इतक्या हमरीतुमरीवर आले की, आश्चर्य• आणि दुःख यांनी मीच तिथून निघून गेलो. खरोखरच महाराष्ट्रातले समाजवादी फारच बेशिस्त आहेत. राजकीय पक्वता, मुरब्बीपणा त्यांच्यात कसा तो नाहीच. कलंदर, कलासक्त वृत्तीनं कार्य करण्याचं हे क्षेत्र नाही. इथे चिकाटी लागते, कोडगेपणा लागतो, दूरच्या ध्येयावर सतत नजर ठेवावी लागते हे काय त्यांना कळत नाही ? मग वळत कसं नाही ? माझ्या या उद्‌गारांना प्रतिगामी म्हणून झटकून टाकणं सोपं असलं तरी त्यांनी ते करू नये ! अनेक समाजवादी मित्रांशी मी अगदी हेच विचार बोलून दाखवले. त्यांनाही हेच प्रश्न पडलेले आहेत. 'आमच्या लोकांचं काम सगळं वळवाच्या पावसासारखं आहे !' असं एकजण मला म्हणाले. त्यात कौतुकापेक्षा खेदाचाच भाग अधिक होता. ग. प्र. प्रधान यांच्यासारखा कार्यकर्ता या सगळ्या गटात वेगळा भासला, नेहमीच भासत आलेला, आहे याचं कारण त्यांचा समजूतदारपणा आणि खराखुरा उदारमतवाद हे त्यांच्या मित्रांना समजत कसं नाही ? का एकप्रकारच्या Tragic end कडेच त्यांचा प्रवास नाइलाजानं, स्वतःच्या मर्यादा ओलांडता न आल्यानं चालू राहणार आहे !

माणसानं माणसाकरता चंदनापेक्षाही जास्त झिजावं आणि या संबंधाला काहीतरी तात्त्विक बैठक असावी, हे संघटनेचं सूत्र मी परत एकदा अनुभवलं. एकदा मिसामध्ये असा वाद निघाला की, सगळे सत्याग्रही हे जनता आघाडीचे आहेत, तरीही केवळ संघाचे, जनसंघाचे स्थानबद्धच त्यांच्याशी संबंध ठेवतात, इतरांची भाषणं, व्याख्यानं होऊच देत नाहीत. या म्हणण्यात अगदीच तथ्य नव्हतं असं नाही. अर्थात समाजवादी, साम्यवादी, संघटना कांग्रेस या सर्व पक्षीयांची भाषणंही झाली होती. जमाते इस्लामीचे कार्यकर्तेही चर्चेसाठी येत होते. पण या उद्‌गारात एक भाबडा विश्वास होता.

केवळ विचार सांगून संघटना उभी राहील हाच तो भाबडा विश्वास. खरं म्हणजे संघात बौद्धिक हा प्रकार ९५% वेळा इतका कंटाळवाणा असतो की, ती संघटना केव्हाच छिन्नभिन्न व्हायला हवी होती. माणसाचं हृदय जिंकणं हे इतकं सोपं काम आहे? येरवड्यातच संघाच्या काही स्थानबद्धांनी मुलांसाठी काय काय केलं? औषधं देणं, कपडे धुऊन, इस्त्री करून आणून देणं, रोज पिशवीभर तुटक्या चपला नेणं आणि त्या जोडून आणणं, पत्र आणून देणं, ज्याचा डबा त्यालाच पोचता करणं, काही मुलांना इतर कैद्यांच्या सहवासानं खवांचा प्रसाद मिळाला, त्यांना औषध देणं, कुणाची खरूज बरी कर, कुणाला साबण चालत नाही म्हणून शिकेकाई-रिठे पाठव, तोंड आलं तर आणखी काहीतरी पाठव, आजाऱ्यांच्यासाठी रोज पाव वगैरे द्याद–एक ना दोन! बरं, हे सगळ्यांसाठी केलं. सत्याग्रहीत तर पक्षभेद वगैरे केलाच नाही, पण वॉर्डर, पहारेकरी या सगळ्यां-नाही असं जिंकून टाकलं. दगडात सुद्धा उगवेल असं हे संघटनेचं मास्टर तंत्र. ते काही फक्त संघवाल्यांनी केलंय असं नाही, पण तेच तंत्र राबवावं लागतं. मधुकर देवलांना यश मिळतं. पण एक गाव एक पाणवठा ही चळवळ म्हणावी तशी उभी राहत नाही, याचा अर्थ बोलका आहे, अतिशय बोलका आहे! समाजाच्या कोणत्याही थरात काम करताना त्या वर्गाच्या सुखदु:खांची गाडून घ्यायला लागतं, ही जाणीव म्हणजे समाजवाद. हे सानेगुरुजींना कळलं, बाबा आमटयांना कळलं, खानदेशात आदिवासी लढे उभे करणाऱ्या मुलांना कळलं. त्यांचं अनुकरण ही नेतेमंडळी कधी करणार? परीटघडीच्या, वैचारिक समाजवादाची ही शोकांतिका टाळायला हवी आहे. अगदी मुक्त विचार पसरायचा असला तरी त्यासाठी शिस्तबद्ध संघटनाच लागते.

☐

'सत्याग्रह झाला, पुढे काय?' हा चर्चेचा सगळ्यात महत्त्वाचा आणि पॉप्युलर विषय! साधारणपणे दोन दिशा असत. एक म्हणजे आतापर्यंत झालं ते चुकलं. आता राजकारण-अर्थकारण यात प्रत्यक्ष उडी घ्यायला हवी ही एक दिशा, तर आतापर्यंतचं बरोबरच होतं, अशी हळूहळू ताकद निर्माण करतच झेप टाकायची असते, ही जुन्या पद्धतीवर ठाम निष्ठा व्यक्त करणारी दुसरी दिशा! दोन्ही विचार अर्धसत्यच आहेत. संघटन सोडून केवळ राजकारण करणं ही दिशा-भूलच. ती टाळली गेली म्हणून तर इतके सत्याग्रही उभे राहिले, हे तर मान्यच, पण म्हणून आतापर्यंतचं सगळं 'आपल्या लोकांनी व्यवस्थित केलं' हेही खरं आहे का? संघाच्या यंत्रणेत एक फार मोठा वर्ग अशा लोकांचा आहे आणि सध्या तर जयप्रकाश नारायण यांच्यापासून सर्वांनीच संघटित बळ हे संघाचं यश मान्य केलेलंच आहे; हा केवळ राजकारणाचा भाग नाही, उशिरा घडलेली ती एक चांगली घटना आहे. त्यांच्या पावतीमुळे संघातल्या अनेकांची जुन्याच तंत्रावर परत दृढ निष्ठा झाली तर काळजी करण्याजोगी बाब आहे. सगळं व्यवस्थित झालं असतं तर, म्हैसाळ प्रकल्प, ज्ञान-प्रबोधिनी यांसारखी अनेक कामं करायला लोक संघाबाहेर कशाला गेले असते? संघाबाहेर जाऊन विविध क्षेत्रांत विधायक कामं उभी करणारांची एकनाथजी रानडे यांच्यापासून सुरू होणारी यादी मोठी आहे. पण त्यांनी त्यांची कामं देशाची म्हणून उभारली, संघाची म्हणून नाहीत हेही खरं आहे. तेव्हा सगळं व्यवस्थित झालेलं नाही, पण सगळंच गमावलं नाही. संघटित ताकद व्यसन म्हणून निर्माण करणं आणि एकेका पिढीच्या जीवनात ती एखाद्याच वेळी पणाला लावणं यातला धोका आता परत परत पत्करण्यात अर्थ नाही; तर ताकद निर्माण करण्याचं हुकमी तंत्र आणि समाजाचे सध्याचे प्रश्न यांची सांगड घालायला हवी आहे. म्हणजेच आदिवासी, दलित यांच्यात संघटित ताकद, धाक वाटावा अशी ताकद, उभी करून तिचा उपयोग आता सुधारकांचे लढे, जातीवादनिर्मूलन आणि सामाजिक समता यांच्यासाठी व्हायला हवा आहे. दुबळा घटक आर्थिकदृष्टया उत्पादक करायला हवा आहे. म्हैसाळ, तळासरी या प्रकल्पांचं यासाठीच स्वागत केलं पाहिजे. एवढंच नाही तर, सरळ सरळ अनुकरण करावं लागेल.

हा प्रश्न केवळ कार्यक्रमाच्या पातळीवरचा नाही तर वैचारिक पातळीवरचाही आहे, थोडासा गुंतागुंतीचा आहे. तो गुंतागुंतीचा भाग नम्रपणे नमूद करतो. असं जाणवत होतं की, श्री. बाळासाहेब देवरस सरसंघचालक झाले आहेत ते कागदोपत्री, मनावर सत्ता अद्याप श्रीगुरुजींचीच चालते. हे साहजिक होतं. ३२ वर्षांचं एकचालकानुवर्तीत्व, त्यात गुरुजींच्या व्यक्तित्वाचा प्रभाव यातून दोन-अडीच पिढया गेल्या. डॉ. हेडगेवार यांचं फारसं विचारधन उपलब्ध नाही (त्यांचं विस्तृत चरित्रसुद्धा गुरुजींच्या चरित्रानंतर लिहिलं गेलं) आणि बाळासाहेब देवरसांचं काम तर मुख्यतः प्रशासक, नियंत्रक, संघटक अशा स्वरूपाचं असल्यानं त्यांचे विचार तितके पाझरले नाहीत (Percolate या अर्थानं). छापील वाङमयही गुरुजींचंच विस्तृत आहे आणि विपुलही आहे. आता बदलत्या परिस्थितीत गुरुजींच्या अनेक भूमिका सोडाव्या लागतील. चातुर्वर्ण्य हा काही एकच अडचणीचा मुद्दा नाही! नवीन कामं उभी करणारांबद्दलची भूमिका, एकूणच राजकारण–समाजकारण यातली अलिप्तता, कार्यक्रमाविषयी प्रश्न–मतभेद झाले की बौद्धिक, तात्त्विक चर्चा उपस्थित करण्याची हुकमी सवय, थोडीशी अनावश्यक आध्यात्मिकता, या सर्व सामाजिक प्रश्नांवर संघटन हेच एक औषध सांगणं, या सगळ्या भूमिका अजून चालूच ठेवायच्या की काय? याचा विचार सुरू झाला पाहिजे. लोकशाही व विचारस्वातंत्र्याच्या बाजूने उभे राहिल्यावर तर झालाच पाहिजे. श्री. बाळासाहेब देवरस यांची काही वाक्यं खरंच क्रांतिकारी आहेत. 'शाखेवर हॉकी–फूटबॉल खेळायला हरकत नाही', 'आपल्या हरिजन–गिरिजन बांधवांसाठी आपण कार्य केलं पाहिजे' या वाक्यांना जर संघटित शक्तीनं गुणलं तर त्यांची सुप्त शक्ती (potential) किती वाढते ते लक्षात येईल. आणखी एक शेवटचा क्रांतिकारी वळसाही श्री. बाळासाहेब देवरस देऊ शकतील. (शकतील का?) आपल्या एकचालकानुवर्ति–अधिकारात ते एकचालकानुर्तित्व कायमचं बाद करून त्या ठिकाणी काही

## शेवटचा क्रांतिकारी वळसा दिला गेला तर ?

सहविचारात्मक किंवा लोकशाही पद्धत आणतील का? एखादी राष्ट्रीय कार्यकारिणी सरसंघचालक पदाऐवजी येईल का? गुरुजींच्या यशापयशाला हे एकचालकानुवर्तित्वच जास्त कारणीभूत झालं असं जाणवतं. या तंत्राचा अतिरेक झाला नसता, तर काही भूमिका वेळीच सुधारून घेता आल्या असत्या. आणि एकाच व्यक्तीच्या हाती अमर्याद सत्ता केंद्रित करणं हेच जर चालू ठेवायचं असेल तर, इंदिरा गांधींना विरोध तरी कोणत्या दृष्टिकोनातून करणार? त्या भूमिकेचं तात्त्विक समर्थन कसं करणार? हे प्रश्न संघात चर्चिले जायला हवेत. एका वेगळ्या अर्थानं 'सांस्कृतिक क्रांती' व्हायला हवी आहे. तरुण कार्यकर्त्यांना, विचार करणारांना तिची भूक आहे, तहान जाणवते आहे.

कोर्टात जाऊन रीतसर शिक्षा झालेला प्रत्येक कैदी कधी ना कधी सुटतोच, तसे सत्याग्रही सुटतच होते. अनिश्चित काळ तुरुंगात ज्यांना राहायचं होतं ते स्थानबद्ध त्यांना प्रेमानं निरोप देत होते. ज्यांना आणीबाणी लागताच पकडलं ते स्थानबद्ध नोव्हेंबरपर्यंत अगदी एकाकी होते. नोव्हेंबरमध्ये पंडित नेहरूंच्या जन्मदिवसापासून सत्याग्रह सुरू झाले आणि त्यांच्या जीवनात चैतन्य आलं. पहिल्या काही बॅचेसचं तर जेलच्या दारात येऊन मनापासून स्वागत करण्यात येत असे. प्रत्येक ठिकाणचे स्थानबद्ध सत्याग्रही आल्यावर भारावले. आपल्यामागे तरुण मुलं येतात म्हणून हरखले. या सत्याग्रहामुळं 'तुरुंग, तुरुंग असा काय असतो म्हणून सांगता! आम्ही पाहिलाय तुरुंग' असं बेदरकार उत्तर देणारे अनेक हजार युवक तयार झाले, पोलीस कस्टडीतून शेकडो पार झाले; काहींनी देहदंड सोसला व निर्भय झाले. ही तर सर्व कमाई झालीच, परंतु ज्यांनी जीवनभर वेगवेगळ्या (क्वचित प्रसंगी परस्परविरोधी) मार्गांनी केवळ या समाजाची सेवाच केली, व्यक्तिगत सुखदुःखं दूर सारली आणि वर्षानुवर्षं वेळ, पैसा, ज्ञान, शक्ती यांचा विनियोग समाज कार्यासाठीच केला, अशा अनेक उपेक्षा, सूड, दडपशाही यांच्या अंधारात सापडलेल्या स्थानबद्ध कार्यकर्त्यांच्या जीवनात जो अनोखा आनंद सत्याग्रहींनी निर्माण केला ती खरी कमाई. हे कार्यकर्ते मुक्त होऊन परत समाजहिताचीच कामं करतील. ती उभारी त्यांच्या ठायी टिकून राहील याला कारणं दोन. एक त्यांची व्यक्तिगत निष्ठा आणि दुसरं या सत्याग्रहात त्यांनी अनुभवलेलं तरुण मनाचं पाठबळ! □

•

दोन महिने हा हा म्हणता गेले. आत गेलो तेव्हा सकाळ होती, स्वच्छ प्रकाश सर्वत्र पसरला होता. सुटलो तो संध्याकाळी, सूर्यास्त झाल्यावर. आत जाताना अनेक प्रश्नांना एकच उत्तर घेऊन गेलो, बाहेर पडताना प्रश्नोत्तरांचे गुणाकार–भागाकार अधिकाधिक गुंतागुंतीचे झाले होते. आत जाताना आपल्या मतांसाठी रास्त किंमत आपण देतो आहोत याचा अभिमान होता, बाहेर पडताना आपण किती थोडी किंमत दिली आणि तिचा केवढा थोडा परिणाम झाला त्याची जाणीव होत होती. अत्यंत घनिष्ट अशा मित्राच्या मागे बसून जात होतो, पण तो आणि आपण आता बरेच वेगळे आहोत, असं वाटत होतं. रस्ते, झाडं, इमारती तर जशाच्या तशा होत्या, पण लोकही जवळ जवळ तसेच्या तसेच होते. वाहन पुढं धावत होतं–मन मात्र मागे जात होतं. मात्र शाकुंतलातल्या दुष्यंताची ओढ व्यथवान त्याला नव्हती! एकच प्रश्न परत परत पडत होता. आपण बाहेर आलो खरे–पण आपली खरी जागा कुठे आहे? बाहेर की आत? आत की बाहेर? □ □

# राजकारण जनहितकारण केव्हा होईल?

अरुणा ढेरे

गेल्या वर्षी याच दिवसात अगदी छोटीशी म्हणजे दोन महिन्यांची तुरुंगवासाची सजा भोगून मी बाहेर पडले. त्या दोन महिन्यांनी एवढे दिले होते की, जे आजवरच्या सतरा-अठरा वर्षांनीही दिले नव्हते. आजवरचे जीवन कसे एका आखीवरेखीव मध्यमवर्गीय चाकोरीतून चाललेले. रस्ता सोडून डोंगर-वाटेचे चढउतार अनुभवण्याची, स्वतःच्या पायांची ताकद अजमावण्याची वेळच आली नव्हती. आणि म्हणूनच कारावासातले अनुभव कुठेतरी लिहायला हवेत, शब्दबद्ध व्हायला हवेत असं वाटत होते. पण ज्या घटनेने आम्हाला लिहिण्या–बोलण्यासह सात स्वातंत्र्य, आमचा व्यक्ती म्हणून असलेला जन्मसिद्ध अधिकार म्हणून बहाल केली होती; तीच घटना विवंचित झाल्यावर तिला श्रद्धांजली प्रकटपणे वाहण्याची मुभा तरी आम्हाला कुठून असणार? जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रांमधल्या ह्या अन्याय्य मुस्कट-दाबीमुळे आजवर दबून राहिलेले विचार आणीबाणीची बंधने जरा सैल झाल्यावर आता सगळ्या बाजूंनी उफाळून आले तर नवल नाही.

आज गेल्या वर्षीच्या कारावासातल्या घटनांची उजळणी करताना त्या दोन महिन्यांतला प्रत्येक दिवस माझ्या डोळ्यासमोर अगदी लख्ख आहे. त्या दिवसातल्या प्रत्येक क्षणामागे असणारी संगती आज स्वच्छ दिसते आहे. त्या अनुभवातलं 'खास' असे जे होते ते खरे तर मनातून बाजूला कधी झालेलंच नाही. त्याच्याभोवती अनेक भावनांचा, कल्पनांचा आणि वल्गनांचा गुंता आहे. घटनांचा गुंता तर अजून वाढतोच आहे.

आणीबाणीची, मूलभूत हक्क काढून घेतल्याची घोषणा, प्रेस कौन्सिल रद्द केल्याचा जाहीरनामा, कऱ्हाड साहित्य संमेलनातले यशवंतरावांचे भाषण आणि रोज वृत्तपत्रांतून येणाऱ्या बातम्या ह्या

सर्वांचा परिपाक अखेर आम्हा तरुण मुला-मुलींच्या तारुण्यालाच आव्हान देणारा झाला. प्रचंड अस्वस्थतेच्या दडपणाखाली विचारवंत वावरताना दिसत होते. दुर्गाबाईंच्या बेधडक वक्तव्याचा अपवाद सोडला, तर लेखक, साहित्यिक मूग गिळून बसले होते. विरोधी आवाज उठवणारे सर्व राजकीय नेते तुरुंगात डांबण्यात आले होते. सामान्य माणसं नुसतीच धुळधुळत होती. अशा परिस्थितीत तरुण मुलांनी संघटितपणे काही केलं पाहिजे, असे युवक संघटनांना वाटले तर नवल नव्हते. सत्याग्रहाचे आवाहन करण्यात आले आणि सतरा वर्षांपासूनची आम्ही मुलेमुली काही महिन्यांची शिक्षा होऊन तुरुंगात रवाना झालो.

मी येरवडा जेलमध्ये या काळात जे पाहिले अन् अनुभवले ते माझ्या आयुष्याच्या विशाल अनुभव शिदोरीमधले पहिले संचित आहे असे मी म्हणेन. आम्ही साठसत्तर मुली आणि शंभराच्या आसपास महिला येरवड्याच्या महिला कारागृहात एकत्र आलो होतो. मिसाखाली अटक झालेल्या प्रमुख राजकीय नेत्या वगळता आम्ही सत्याग्रही महिला वा मुली राजबंदी नव्हतो, पण हा भेद सरकारी खात्यापुरताच मर्यादित राहिला. कारण रात्री स्वतंत्र बराकीत झोपणे एवढा भाग सोडला, तर आम्हाला वेगळं काढणं अशक्य होते. इतक्या आम्ही साऱ्या एक झालो होतो.

अगदी खरे बोलायचे म्हणजे आम्हा मुलींच्या, केवळ राजकीय दृष्ट्याच नव्हे तर, सर्वच दृष्टीने अनभिज्ञ अशा जीवनात आलेला हा पहिलाच प्रसंग. आम्ही क्रांतीची लाल आच पूर्वी अनुभवली नव्हती. स्वातंत्र्य-पूर्व काळातले भीषण थैमान पाहिले नव्हते; काहीच सोसलेही नव्हते. पण आमच्या कृतीचे पहिलेवहिले मनापासून कौतुक केले इथल्या सर्वपक्षीय मिसाबंदी महिलांनी! आणि सगळ्या महिला आम्ही मुलींच्या मावश्या बनल्या आणि एक प्रचंड कुटुंबच तयार झाले. आमचा दिनक्रमही ठरून गेला. लग्नसमारंभासाठी एकत्र आलेल्या गोतावळ्यासारख्या आम्ही वावरू लागलो.

या गोतावळ्यात अहिल्या रांगणेकरांसारख्या कम्युनिस्ट नेत्या आणि त्यांच्या सहकारी महिला होत्या,- प्रमिला दंडवते, शांता नायक, इंदुमती केळकर यांच्यासारख्या समाजवादी विचारसरणीच्या महिला होत्या. हंसाबेन राजदासारख्या संघटना काँग्रेसच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या, सुमतीबाई सुकळीकर, निर्मला शेंडे, जयवंतीबेन मेहता, प्रमिला टोपले या आणि इतर अनेक जनसंघाच्या क्रियाशील कार्यकर्त्या होत्या. आमचा गोतावळा असा संमिश्र होता. अनेक पक्षांचे, विविध भागांतले, वेगवेगळ्या समाजथरांतले आणि वेगवेगळ्या प्रवृत्तींचे लोक अगदी योगायोगाने एकत्र आले होते. हा योगायोग पुढे जनता पक्षाचा भाग्ययोग ठरला, असे आज अभिमानाने म्हणावेसे वाटते.

खरोखर सुरुवातीच्या काळात जेव्हा रोजच्या वागण्यातली औपचारिकता संपून जवळीक वाढू लागली तसतसे रोज नवेनवे कार्यक्रम आमच्या डोळ्यांपुढे येऊ लागले. मग रोजच्या गप्पांच्या अड्ड्यांना एक बांधीव कार्यक्रमाचे स्वरूप द्यावे असे वाटायला लागले. आम्ही सगळ्या मुली तसे म्हटले तर कुठल्याच राजकीय पक्षाशी बांधील नव्हतो. आणीबाणीच्या अन्याय्य वटहुकुमाविरुद्ध आवाज उठवणे हे आपले कर्तव्य आहे या भावनेने आम्ही सत्याग्रहात उडी घेतलेली. तेव्हा आमच्यापुढे पक्षाची रेषा आखलेली नव्हतीच. पण गंमत अशी की, हळूहळू इथल्या सर्वचजणी पक्षाची मर्यादा पुसट करू लागल्या होत्या. हे काम नकळत होत होते. सद्य:परिस्थितीत एकाच अन्यायाविरुद्ध आम्ही सगळ्या उभ्या ठाकलो होतो. आजवर आम्ही वेगवेगळ्या भागांनी भारताच्या हितासाठी झटत होतो. म्हणजे आमचे ध्येयही एक होते आणि आमच्यावर झालेल्या अन्यायाचे स्वरूपही सर्वांना सारखेच भयानक, जाचक होते. त्यामुळे आमच्या विचारांचे विषय एकच होते आणि त्यावरचे भाष्यही समांतरच होते.

मला आठवतेय की, येरवडा जेलच्या आवारात जी शिरिषाची मोठमोठी आणि देखणी झाडे उभी आहेत. त्या झाडांच्या सावलीत दुपारी चार वाजता आम्ही गोल करून बसायचो. थाळी घंटेसारखी वडवली जायची आणि बराकीत दुपारभर पसरलेली सतरंजी भराभरा गोळा करून, दुपारी वाचायला घेतलेले राममनोहर लोहिया, सानेगुरुजी किंवा म. फुल्यांचे पुस्तक बाजूला ठेवून सगळ्याजणी झाडाखाली गोळा व्हायच्या. सुरुवातीला इंदिराजींचा वीस कलमी कार्यक्रम आणि त्यावरच्या आमच्या (विरोधकांच्या) प्रतिक्रिया, लोकसभा, विधानसभेचे कामकाज अशा विषयांवर चर्चा रंगल्या. विरोधाची धार तीव्र झाली आणि एकमेकींना एकमेकींची ओळख पटत गेली ती ह्या सुरुवातीच्या चर्चांमधून. कारण चर्चा संपल्यावर 'शाब्बास, छान प्रश्न विचारलेस हं!' म्हणून शांता नायक एखाद्या मुलीची पाठ थोपटत होत्या तर, 'प्रमिला, आज तू फार छान बोललीस!' म्हणून सुमती सुकळीकर प्रमिला दंडवत्यांचे कौतुक करत होत्या.

आमच्या महिला जेलसमोरच पुरुषांचे कारागृह होते. आमच्या बोली भाषेत ते 'समोरचे जेल' होते. असे अनेक जेलचे पारिभाषिक शब्द तयार होत होते. 'मिसा'च्या मावश्या-रात्री ९ वा. बराकीत बंद होत, तर आम्ही ६ वाजताच. मग ७॥-८ ला आमच्या बराकीच्या गजांच्या बंद दाराबाहेर त्या आणि दाराच्या आत आम्ही अशी आमची सायंप्रार्थना चालायची. प्रार्थनेनंतर 'मिसा'वाल्यांच्या खास दैनिकाचे 'पासकिन'चं वाचन व्हायचं. (हा 'पासकिन' शब्द एका गाण्यातला हं!) हे दैनिक येरवड्यातल्या अंतर्गत हालचाली, समोरच्या जेलच्या गुप्त (!) बातम्या आणि वर्तमानपत्रांतून येणाऱ्या राजकीय घडामोडींवर विनोदी टीका करायचं. आम्ही सत्याग्रही मुलींनीही आमचं 'जनवाणी येरवडा केंद्र' स्थापन केले होते. याच जनवाणीवरून

'जेव्हा महिरावणांच्या महिम्यापुढे
महारथी कोलमडतील,
धनुर्धर धास्तावतील
चक्रधर चक्रावतील
तेव्हा–हे लवकुशादि कुमारांनो
कुशाच्या दातांखाली
चिमणे ओठ रगडीत
पविश्यात उभे राहा'

ही वसंत बापटांची कविता,

'आसवेच स्वातंत्र्याची आम्हाला मिळाली
अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली'

ही सुरेश भटांची कविता आम्ही ऐकवली. याच जनवाणीतून आम्ही कधी विचारवंतांचे

स्वातंत्र्यविषयक उतारे सादर केले, तर कधी स्वतःचे भावाविष्कार !

कारागृहाच्या आठवणींमध्ये पत्रांचा वाटा फार मोठा आहे. प्रत्येक पत्र, त्यातलं प्रत्येक वाक्य हवेसे वाटायचे. मित्र-मैत्रिणी, आई-वडील, नातेवाइकांच्या पत्रातला स्नेह सुखवायचा. पण कारागृहात अशीही काही पत्रे मला वाचायला मिळाली की, जी पत्रे आयुष्याचे धन ठरतील. जयप्रकाशांचे इंदिरा गांधींना लिहिलेले प्रकट पत्र आम्ही एकत्र बसून वाचले आणि त्यानंतरच्या प्रत्येकीच्या एका सात्त्विक संतापाने आणि स्वाभाविक आवेशाने झालेल्या प्रतिक्रिया मला अजून आठवतायत.

एक दिवस बंगलोर सेंट्रल जेलमधून मला खासदार मधू दंडवत्यांचे पत्र आले. मी जेलमध्ये केलेली एक कविता त्यांच्यापर्यंत पोहोचली तेव्हा त्यांनी तिचे रसग्रहण करताना फार सुंदर पत्र मला लिहिले. देशातील सद्यःस्थिती, आम्हा तरुणांची कर्तव्ये, तरुणांनी काय वाचावे यासंबंधी आपले विचार सांगताना त्यांनी फुले आणि आगरकरांच्या साहित्याचा आवर्जून उल्लेख केला. 'कारागृहातील कारुण्य अनुभवायचे असेल तर, सावरकरांचे 'माझी जन्मठेप' आणि अर्नं स्टोलरचे 'letters from the prison' जरूर वाच. ॲनी फ्रँकने दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिटलरी सैतानांची नजर चुकवून लिहिलेली The diary of Anee frank मन अस्वस्थ करणारी आहे. तिच्या मृत्यूनंतरही जिवंत आहे. ती न विसरता वाच !' असे त्यांनी मला लिहिले होते.

दुर्गा भागवतांच्या प्रक्षुब्ध भाषणांच्या बातम्या आमच्या कानांवर येत होत्या. जेलमधून प्रातिनिधिकरीत्या मी दुर्गाबाईंना जे पत्र लिहिलं होतं त्यात मी त्यांना आपण होऊन सत्याग्रह न करता, आपल्या विचारांनी दुबळ्या जनतेला आगे करण्याची विनंती केली होती. कारण विचार, आचार आणि ध्येय यांची फार मोठी उंची गाठलेल्या त्या तपस्विनी विदुषीच्या शब्दांची त्या काळात समाजाला खरी गरज आहे असं आम्हाला वाटत होतं. 'मी तेच करते आहे आणि करणार आहे,' असं दुर्गाबाईंचं उत्तर आलं तेव्हा आम्हाला कोण उत्साह वाटला ! नांदेडचे समाजवादी विचारवंत प्रा. नरहर कुरुन्दकर यांनी त्यांच्या पत्रात मला लिहिले होते, 'अरुणा, तुरुंगाची सर्वात मोठी देणगी ही असते की, माणूस विचार करू लागतो. सत्य जरी कळले तरी, ते प्रकट करण्याचे धैर्य देणाऱ्या ध्येयवादाला, चारित्र्याला जगात महत्त्व असते.' ही पत्रे प्रत्येकीच्या हातातून फिरत होती. विचारांना दिशा मिळत होती.

पुढे मग प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपला पक्ष, त्याची विचारसरणी, ध्येयधोरणे ह्यांचे विवरण करावे असे वाटले आणि ही योजना अंमलातही आणली. गैरसमज दूर होऊ लागले. बॅ. नाथ पै, पं. दीनदयाळ उपाध्याय ह्यांचे स्मृतिदिन आम्ही सर्वांनीच मनापासून साजरे केले. नाथ पैंच्या स्मृतींची उजळणी करताना मला 'लोकशाहीची आराधना' या त्यांच्या पुस्तकाची तीव्रतेने आठवण झाली. १९७० साली पुण्यात झालेल्या एका भाषणात नाथ पै म्हणाले होते, "मला नेहमी खंत वाटत राहिली की, रावसाहेब पटवर्धन, जयप्रकाश लोकसभेत कधी आले नाहीत." त्यांची खंत ही आमचीही खंत होती. '७० सालीच घटनादुरुस्ती विधेयकाच्या संदर्भात बोलताना नाथ पै म्हणाले होते की, "स्वराज्यात वीस वर्षांनंतर जे सतत करण्याजोगे आहे त्यात 'घटना' आहे. बहुतेक सगळे जात आहे, जाऊ लागलेले आहे; पण जे टिकवले पाहिजे त्यात घटना आहे. 'हम करे सो कायदा' अशी घटना असू शकणार नाही. असणार नाही." येत्या काही वर्षांत देशातल्या लोकशाहीला फार मोठ्या कसोटीला तोंड द्यावे लागणार आहे असं नाथ पै तेव्हा म्हणाले होते. त्यापायीच तुरुंगवास पत्करलेल्या सर्व कार्यकर्त्यांना त्या दिवशी या विधानाची सत्यता पुरेपूर पटली.

असे नाना विचारवंत, नाना क्रान्तिकारक त्या दिवसांत सतत आठवत होते. रोजच्या चर्चांमधून त्यांच्या आठवणी येत होत्या. कधी बिहार-आंदोलनावर, कधी गुजराथ आंदोलनावर, कधी फ्रेंच राज्यक्रांतीवर तर कधी गांधींच्या तत्त्वज्ञानावर बैठकी रंगत होत्या. कधी संघटना म्हणजे काय, कधी स्वातंत्र्याचा नेमका अर्थ काय याचा गंभीर विचार होत होता, तर कधी कारागृहाच्या भिंतीआड कुठेकुठे घडलेल्या अन्यायांची बातमी ऐकून दिवस बेचैनीत जात होता. गाणी, गप्पा, अगदी नाच, नाटक, कव्वाली, मग इथपर्यंतचे करमणुकीचे कार्यक्रम रोजच चालले होते आणि एकीकडे ही अंतरंग उजळून घेण्याची प्रक्रियाही ! कारागृहात साजरा झालेला 'लोकशाहीचा जन्मदिन-२६ जानेवारी' हा आम्ही खरंच अविस्मरणीय म्हणून सतत आठवत राहू. आठवणी कृतीला प्रेरणा देतात हे आज अधिक तीव्रतेने पटलंय, कारण तुरुंगातून बाहेर पडलेला प्रत्येकजण आज दुप्पट वेगाने कामाला लागला आहे. जेलमध्ये बिहार आंदोलनावर विचार करताना जयप्रकाशांचे मनोगत वाचले होते. जयप्रकाश तेव्हा म्हणाले होते की – 'यह आंदोलन नौजवानोंके बीचसे–नये और सच्चे नेतृत्वको जन्म देगा–और यही नेतृत्व देशके भविष्यको बना सकता है । इसके सामने तमाम छोटी-छोटी पार्टियाँ खत्म हो जायेंगी और उनके अवशेषसे एक नयी पार्टी पैदा होगी जो कि सचमुच जनता की पार्टी होगी।'

जयप्रकाशांचे हे ७४ सालचे उद्गार आज त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष म्हणून आमच्यापुढे आहेत. लोकशाहीचा हा लढा असाच चालू राहणार आहे तोपर्यंत, की जोपर्यंत आमच्या देशातल्या प्रत्येक नागरिकाला त्याच्या लोकशाहीतील हक्कांची आणि कर्तव्यांची जाणीव होऊन तो समाजविकासासाठी प्रयत्नशील होणार आहे.

आणीबाणी सैल झाली म्हणजे काही फार मिळाले नाही हे निश्चितच. कारण डॉ. लोहियांच्याच शब्दांत सांगायचे झाले तर 'दिल्ली एक हृदयहीन वेश्या आहे... आपल्या 'क्रीडाविलासाला' ती 'देशाबद्दलचे पवित्र कर्तव्य' म्हणू शकते आणि देश आधुनिक बनवण्याच्या नावाखाली भारतीय जनतेपासून चैनीत दूरही राहू शकते. त्यापायी ती आणि तिचे दरबारी, स्वार्थी आणि क्रूर होऊ शकतात आणि झालेलेही आहेत.'

आज प्रश्न एवढाच आहे की, वेश्यावृत्ती सोडून जनतेबरोबर एकात्मता दिल्ली कधी साधेल ? राजकारण जनहितकारण केव्हा होईल ?

आम्ही कारागृहातून एकात्मतेचे धडे गिरवणाऱ्या नागरिकांनी ह्या प्रश्नाचे उत्तर मिळवण्याची, नव्हे ते उत्तर सिद्ध रूपात जगासमोर गिरवण्याची शपथ घेतली आहे, एवढेच शब्दात सांगता आले. बाकी सारे कृतीतून व्यक्तवण्याची प्रत्येकाची धडपड चालू आहे–चालू राहील. □ □

# धागा एक, प्रश्न सोडवण्याची पद्धत वेगळी

प्रकाश जावडेकर

जानेवारी महिन्यात राजकीय निरीक्षकांना दोन धक्के बसले. पहिला धक्का निवडणुकीच्या घोषणेचा. 'निवडणुका मार्च ७८ मध्येच होणार.', 'आता निवडणुकीचा विचार नाही.' अशा घोषणा होऊ लागल्या. काही वृत्तपत्रांनी 'यंदाच निवडणुका होणार' अशा बातम्या दिल्या. पण लगेच केंद्रीय गृह-राज्यमंत्री श्री. ओम मेहता यांनी 'असल्या अफवांवर विश्वास ठेवू नका' असे जोरदार भाषण केले. पण एकदम काहीतरी झाले. आणि निवडणुका जाहीर झाल्या. तारीख १८ जानेवारी १९७७. कारावासातील लोकांना तरी हा दिवस निश्चित लक्षात राहील. कारण जो संघर्ष आणीबाणीच्या पहिल्या क्षणापासून सुरू झाला त्यात एका टप्प्यावरचा हा विजय होता. शासनाला प्रथमच एक पाऊल मागे जावे लागले. ही निवडणूक-घोषणा हा तर सगळ्यांनाच धक्का होता. आता ओम मेहतांची गंमत बघू. ज्यावेळी निवडणुकीच्या बातम्या उठायला लागल्या त्यावेळी त्यांनी या बातम्या खोट्या आहेत, वगैरे तोंडभरून सांगितले. पण निवडणुकीची घोषणा झाली आणि ओम मेहता तोंडघशी पडले. अर्थात मा. इंदिराजींची निर्णयपद्धतीच अशी आहे की, त्यांच्या ज्येष्ठ सहकाऱ्यांना अनेकवेळा तोंडघशी पडावे लागते आणि त्यांचे हसे होते. पण लाचारीमुळे या मंडळींना काही वाटत नाही. एखादा मंत्री ठामपणे सांगू लागला की; कारागृहात असा अंदाज बांधला जायचा की, याच्या विरुद्ध निर्णय झाला असणार. आज ओम मेहतांना दोनपैकी एक गोष्ट मान्य करावीच लागेल की, एक तर खुलासा करताना ते खोटे बोलले किंवा त्यांना निर्णयाची खरंच माहिती नव्हती. (याला जगजीवनरामांची पुष्टी आहे.) अर्थात काहीही मान्य केले तरी श्री. मेहता अडचणीत येतात. जाऊ दे. राजकारणात असे कुणाला अडचणीत आणू नये हेच खरे. लोकांची स्मरणशक्ती थोडी आहे या भरवशावर मंत्रिमहोदय असे उलटसुलट बोलत असतात. लोकांनी असल्या गोष्टी लक्षात का ठेवाव्या ?

तर हा पहिला धक्का— निवडणूक घोषणा. दुसरा धक्का— जनता पक्षाची स्थापना. पहिल्या धक्क्यापेक्षा दुसरा धक्का जास्त मोठा आहे. आजपर्यंत आघाड्या झाल्या. मोडल्या. दोन पक्ष एक झाले. परत दोन झाले. परत आघाडी. परत फुटल्या. हे दुष्टचक्र लोकांनी अनुभवले होते. या देशात एकच एक समर्थ विरोधी पक्ष राहील हे केवळ सभेमधले वाक्य ठरायचे. 'एकास एकचे' प्रयोगसुद्धा फसले होते. त्यामुळे विरोधी पक्ष खऱ्या अर्थाने एकत्र येतील असे कुणाला वाटतच नव्हते. पण जे वाटत नव्हते ते घडले. जे स्वप्न होते ते सत्य झाले. सर्वश्री मोरारजी, अटलजी, अडवानीजी, नानासाहेब, एसेम, मृणालताई एका व्यासपीठावर आले. एवढेच नाही, चरणसिंग, राजनारायण, शांतिभूषण, बलराज मधोक, अशोक मेहता हेही त्याच व्यासपीठावर एकत्र आले. जनता पक्ष स्थापन झाला. ध्वज मिळाला. निवडणूक तडजोडी सुरू झाल्या. उमेदवार जाहीर होऊ लागले. श्री. अडवानी व सुरेंद्र मोहन पत्रकार परिषद घेऊन घोषणा करू लागले. निवडणूक जाहीरनामा आला. एवढे सगळे होऊनही भांडण नाही. काँग्रेसमध्ये तिकीट वाटपासाठी जेवढ्या मारामाऱ्या झाल्या तेवढ्याही झाल्या नाहीत. चारी पक्ष वेगळे नारे लावणारे एकत्र आले कसे ? हे खरंच आश्चर्य आहे. सामान्य माणसाला तरी 'हे कसे घडले ?' हा प्रश्न पडला आहेच.

म्हणून मी कथा सांगतो जनता पक्षाची. आपोआप, एका क्षणात काही घडले नाही, घडत नाही. कारावासात एकोणीस महिने सर्व पक्षांची मंडळी एकत्र राहिली यात त्याचा पाया आहे. वैचारिक पार्श्वभूमी तयार होत होती. त्याला १९६७ पासूनचा एक धागा आहे. १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेस ८ राज्यांत पराभूत झाली व 'संविद' सरकारे आली. एकत्र कामाचा हा पहिला अनुभव. परत गावोगाव एकत्र काम करू लागले. पण भांडणेच जास्त झाली. परत एकदा १९७१ ला 'बडी आघाडी.' तो अनुभव पण क्षणजीवीच ठरला. परत गुजरात व बिहार. एकत्र आंदोलन. मा. जयप्रकाशजींच्या प्रेरणेने लोकसंघर्ष समिती. गावोगाव हातात हात घालून विरोधी पक्ष नांदू लागले. पण पूर्ण एक येत नव्हते. मनातला संशय आटत नव्हता. श्रेयाचे भांडण संपत नव्हते. आणि अशाच अवस्थेत एकदम आणीबाणी आली. सर्व प्रमुख कार्यकर्ते गजाआड टाकले गेले. येथेच कहाणी सुरू होते. जेलमधल्या घटना आपल्यापुढे मांडतो. हा एक पक्ष खरा 'एकपक्ष' कसा घडत गेला ते समजेल.

येरवडा कारागृह तसे प्रशस्त आहे. ३५० ते ४०० अशा संख्येत 'मिसानगर'मध्ये मुक्काम करत होतो. भरपूर झाडी. चांगले बांधकाम. रस्ते, पायरस्ते चांगले. थोडक्यात एखादे छोटे खेडेगाव आणि त्याचे आम्ही चारशे प्रजाजन. यात नाना प्रकारचे लोक होते. भाई वैद्य, राजहंस, बागाईतकर, बाबा आढाव, भाऊ फाटक, सदानंद वर्दे, बापूराव सामंत आदी समाजवादी मंडळी. रामभाऊ म्हाळगी, आ. कानिटकर, बाळ धारप, डॉ. ठेले, बापूसाहेब पळशेकर, गोपाळराव माने, लखन भतवाल असे जनसंघी. रतनसिंह

राजुडा, प्रभाकर गुप्ते, धावडे मास्तर असे संघटना काँग्रेसचे. श्री. पेठकर, श्री. देशमुख हे भालोदचे.. सरसंघचालक प. पू. बाळासाहेब देवरस, श्री. वसंतराव भिडे, डॉ. पूर्णपात्रे (सोनालीवाले), डॉ. आचार्य, वसंतराव अनंतराव देवकुळे असे संघाचे. कॉ. खोपकर, ठेकेदत्त, गरुड, माळी इ. कम्युनिस्ट. स्वामी चिन्मयानंद अवधूत, धर्मामित्रा इ. आनंदमार्गीय. तर डॉ. वागळे, प्रा. केणी असे अपक्ष. श्री. सरफराज, हुसेन आदी जमाते इस्लामवाले, असे एक ना दोन नाना प्रकारचे लोक एकत्र आणले गेले. एकत्र राहू लागले. आता तुरुंगात तसा वेळ मोकळाच. त्यामुळे एकत्र जमावे असे प्रयत्न झाले. आणि दररोज एकेक जण आपापले म्हणणे मांडू लागले. पोटतिडकीने आपण ज्या कामाचा सतत पुकारा केला त्यातले अनुभव प्रत्येकजण सांगू लागले. प्रत्येकाचे अभिनिवेश, रंग, स्वभाव, वागण्याची—बोलण्याची, प्रश्न सोडवण्याची पद्धत वेगळी होती. पण हळहळू लक्षात आले की, लोकशाही प्रेमाचा, लोकसेवेचा, देशभक्तीचा, शुद्धतेचा धागा सगळ्यांचा सारखाच आहे.

मी सत्याग्रहातून जेव्हा 'मिसानगरीत' पाऊल ठेवले त्या बरॅकमध्ये संघाचे अनेक पदाधिकारी, आनंदमार्गी व जमाते अशी सगळी मंडळी एकत्र राहत होती. पहिल्या दिवशी मलाच आश्चर्य वाटत होते की, ही भिन्न भिन्न प्रवृत्तीची माणसे एकत्र कशी राहतील ? पण प्रत्यक्षात व्यवहार वेगळाच दिसला. सगळे वादविवादसुद्धा चांगल्या पद्धतीने होत. एकत्र राहणे, एकत्र पत्ते, रिंग खेळणे, एकत्र भोजन यांनी हळहळू माणसे जवळ जवळ यायची. एकमेकाला समजावून घ्यायचा प्रयत्न असायचा. अर्थात जमाते व आनंदमार्गी यांचा एकपक्षाच्या प्रक्रियेशी संबंध नसला तरी, स्थानबद्धांचे जे 'एकत्र जीवन' असायचे त्यात ही मंडळी असायची. त्यांनी कुराण दिले. आमच्या मंडळींनी वाचले. आम्ही गीता दिली. त्यांनी वाचली. त्यांचे नमाज चालायचे. आमचे गीतापठण चालायचे. हे सर्व एकाच बरॅकमध्ये सुरळीतपणे चालत होते. कुठेही अडले नाही. खुपले नाही.

माणसं एकत्र येण्याची ही सुरुवात.

इकडे राजकीय मंडळींनी राजकीय व्यासपीठ सुरू केले. 'मला अपेक्षित राजकीय परिवर्तन' या विषयावर रोज एक-दोघे विचार मांडायचे. ऐकायला सगळे स्थानबद्ध असत. प्रत्येकाच्या मनात स्पंदने उमटायची 'अरे, हे आपल्याला पटणारे आहे. हे आपल्याशी जुळणारे आहे.' धागा धागा जुळत राहायचा. नकळत. मतभेद कोणते ? तेही स्पष्ट होऊ लागले. जमीन सुधारणेपासून झोपडपट्टीपर्यंत यच्चयावत सर्व विषय चर्चिले जाऊ लागले. प्रत्येकजण आपापली शिदोरी उघडी करत होता. मग गोपाळराव माने यांनी वेश्यांच्या पुनर्वसनासाठी जे अथक व प्रचंड प्रयत्न चालवले आहेत ते ऐकले की, जनसंघी प्रतिगामी, मध्यमवर्गीय असली विश्लेषणे आपोआप बाद होऊ लागली. लखन मतवाळांनी धुळ्यातल्या आदिवासींमधले काम सांगितल्यावर तर प्रत्येक पक्षाला आपल्याला हेच करायचे आहे असे वाटू लागले. डॉ. बाबा आढावांचा एक गाव एक पाणवठा तर सर्वांनाच जवळकीचा वाटला. जाता जाता या पुस्तकाचे प्रकाशनसुद्धा कारागृहात झाले.

असे एकेक मुद्दे सुटे, स्पष्ट होऊ लागले. अर्थात काही मतभेद तीव्र असायचे. ते कधी कधी उघडे व्हायचे. भांड्याला भांडे लागायचे. गेल्या वर्षी २६ जानेवारीला एक प्रसंग घडला. एकत्र करमणुकीचा कार्यक्रम होता. दोन–तीन तास करमणुकीचा कार्यक्रम रंगला. वगनाट्य झाले, गाणी, कव्वाली, अगदी 'माझी लाडकी सुशीला' हे पूर्वीच्या काळातील प्रसिद्ध गाणेसुद्धा खास पांड्या केसांसाठी झाले. कार्यक्रम संपवताना मी 'आता वंदेमातरम होईल' असे सांगितले. वंदेमातरम सुरू झाले. गीतगायकाने संपूर्ण वंदेमातरम सुरू केले. आणि एकदम तीन–चार लोकांनी 'हे आम्हाला मान्य नाही' असे म्हणून निघून जायला सुरुवात केली. अर्थात हे वाटणे व्यक्तिगत होते व त्याचे व्यक्तिगत आविष्करण झाले. पण वंदेमातरम प्रकरण नंतर पेटले. खूप चर्चा, वादविवाद, भांडणे झाली. वंदेमातरम पूर्ण म्हणायचे का, दोन कडवीच म्हणायची ? खरे राष्ट्रगीत, त्याची मान्यता, इतर धर्मियांना दुखावणे, असे अनेक मुद्दे उपस्थित झाले. चार दिवस रुसवा–फुगवासुद्धा झाला. अर्थात चार दिवसांत प्रश्न संपला. खूप विचारमंथन झाले. आपोआप काही संकेत निर्माण झाले. पुन्हा हा प्रश्न निर्माण झाला नाही. गेल्या २६ जानेवारीला असे मतभेद झाले, पण पुढील एक वर्षात एकमेकांच्या भूमिका इतक्या नीट समजल्या की, यंदा २६ जानेवारीला 'जनता पक्षाचा' ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी जाणवलेली एकरसता ही एकपक्षाच्या यशाची ग्वाही आहे. थोडक्यात, २६ जानेवारी १९७६ ते २६ जानेवारी १९७७ हा प्रवास 'मनोमालिन्याकडून मनोमीलनाकडे' नेणारा ठरला.

हा प्रसंग मी का सांगितला ? हाच प्रसंग जेव्हा बाहेर घडला, तेव्हा आमचे एकमेकांविषयी अनेक गैरसमज तसेच राहिले. पण येथे कारावासात एकत्र चोवीस तास राहण्याने आपोआप ते नाहीसे झाले. याच 'वंदेमातरम' प्रकरणाने पूर्वी एकदा धमाल उडाली होती. बिहारची चळवळ जोरात होती. त्यावेळी पुण्यातही लोकसंघर्ष समिती म्हणून विरोधी पक्ष एकत्र कार्यक्रम करत असत. त्यावेळी दिल्लीचे युवकनेते अरुण जेटली आले होते. त्यांच्या सभेच्या शेवटी असेच पूर्ण वंदेमातरम् म्हटले गेले व समितीत एकच वाद निर्माण झाला होता व त्या वादामुळे निर्माण झालेले गैरसमज तसेच राहिले. पुरते संपले नाहीत. पण हाच प्रसंग जेलमध्ये घडल्यावर मात्र सततच्या एकत्र राहण्याने व मूळ भूमिका (एकमेकांच्या) समजल्याने परत एकतेचे वातावरण निर्माण झाले, टिकले. तात्पर्य, मतभेदाचे प्रसंगसुद्धा सर्वांना एकत्र आणण्यास कारणीभूत झाले. जाता जाता एक गंमत म्हणजे बडोदा कारागृहात सुद्धा असाच प्रसंग निर्माण झाला होता. म्हणजे मतभेदांचा उद्रेक सुद्धा समान होता.

ज्यांनी आपापल्या मतांसाठी अभिनिवेशाने वीस-तीस वर्षे काम केले आहे, अशा ज्येष्ठ कार्यकर्त्यांमध्ये जवळीक व्हायला वेळ लागणे स्वाभाविकच आहे. पण तरुणांचे विचार व काम करण्याची समान पद्धती यामुळे सर्वपक्षीय तरुण मात्र चटकन एकत्र आले. येरवड्यात समाजवादी युवजनचे राम कांबळे, विकास देशपांडे, विद्यार्थी परिषदेचे सुधीर जोगळेकर, मुकुंद तापकीर, मी, जनसंघ युवक आघाडीचे धरम चोपडिया, चंद्रचूड, वैद्य इ. तसेच युक्रांदचे कुमार सप्तर्षी, अजित सरदार, दलित पँथरचे

संजीव चव्हाण; संघाचे अनेक तरुण, हे सर्वजण एकत्र काम सहजतेने करू लागले. आपापले दृष्टिकोन प्रभावीपणे मांडून, दुसऱ्याचे समजावून घेण्याचे प्रयत्न तरुणांच्यात जोरात सुरू असायचे. वारंवार तरुण मंडळी एकत्र येऊन कार्यक्रम व्हायचे. कॉलेज-कॉलेजमध्ये एकमेकांविरुद्ध भाषणे करणारी आम्ही मंडळी एका मूलभूत एकतेने जवळ आली. सर्व तरुणांचा आग्रह असे की, हुकूमशाहीला टक्कर देण्यासाठी सगळ्यांनी खऱ्या अर्थाने एकत्र यायला पाहिजे. जेव्हा एकपक्षाच्या प्रक्रियेला वेळ लागू लागला तेव्हा सर्व पक्षांच्या प्रमुख नेत्यांना आपला राग कळवावा, असा आमचा विचार चालला होता. गेले काही दिवस तरुणांनी ' क्रांती व्याख्यानमाला ' चालवली होती. त्या त्या देशात हुकूमशाही अत्याचारांशी, संघर्ष करण्यासाठी जनतेला कसे संघटित केले गेले, याचे धडे आम्ही एकत्र गिरवले. ' तिलक लगाने तुम्हे जवानो क्रांतिद्वारपर आयी है। जयप्रकाशका बिगुल बजा तो जाग उठी तरुणाई है। ' हे गीत आम्हा सर्व तरुणांना सारखेच प्रेरणादायी वाटे. त्यामुळे वेळप्रसंगी इतर मंडळींच्यात कुरबूर झाली तरी तरुणांची एकी केव्हाही भंग पावली नाही. आणि याचे प्रत्यंतर बाहेर काम करताना आज आम्हाला दिसत आहे. परवाच लोकतांत्रिक युवामंच या तरुणांच्या नव्या मंचाची महाराष्ट्र शाखा स्थापन झाली. पूर्वी अशा सर्वपक्षीय समित्या होताना अध्यक्ष ह्यांचा तर उपाध्यक्ष त्यांचा, ह्यांना दोन पदे तर त्यांनाही दोन पदे मिळालीच पाहिजेत, असे वाद चालायचे. परवाच्या सभेमध्ये मात्र याच्या उलट घडले. कार्यक्रमाविषयी भरपूर चर्चा झाली. कामे वाटून घेतली व नंतर समिती व पदाधिकाऱ्यांचा विचार झाला. त्यावेळी निमंत्रक मुकुंद तापकीर होते. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी कोण असावेत अशी चर्चा सुरू झाली. पण तेवढ्यात विकास देशपांडेने सूचना केली. पदाधिकारी कशाला हवेत ? निमंत्रक मुकुंद तापकीर व बाकी सर्व सदस्य राहतील !. घटकात सगळ्यांनी सूचना मान्य केली. वाद नाही, भांडण नाही, चर्चा नाही, काटाकाटी नाही, कारण एकच आदेश तरुणांच्यात निर्माण झाला आहे, तो म्हणजे– ' क्या बंदुके रोक सकेगी बढते हुए जवानोंको ?' तरुणांच्या या एकत्रीकरणाकडे प्रसादचिन्ह म्हणूनच पाहिले पाहिजे.

समान संकट, समान आकांक्षा यामुळे एकपक्षाची ही प्रक्रिया कारावासात चोवीस तास होत राहिली. किती उदाहरणे देऊ ?

रात्रीची वेळ. तेवढ्यात गलका झाला. बरॅकबाहेर धावत गेलो तर, कम्युनिस्ट कार्यकर्ते श्री. दामोदर माळी यांना साप चावला होता. तसे येरवड्यात वारंवार साप निघायचे. त्यांनी लगेच तो मारला. डॉक्टरमंडळी (म्हणजे स्थानबद्धांपैकी) उपचार करू लागली. तोपर्यंत काहीजण जेलरना बोलावून घेऊन माळींना ससूनला पाठविण्याची तयारी करू लागले. रात्री त्यांना ससूनला नेले. आम्ही आग्रह धरला की, एका जेलरने तेथे थांबून काय होते ते सांगावे. त्याप्रमाणे त्यांनी दोन तासांनी येऊन सांगितले की, तब्येत ठीक आहे, तेव्हा सर्वांच्या जिवात जीव आला. आपला सहकारी संकटात आहे, पण आपण त्याच्या साहाय्याला जाऊ शकत नाही, ही असाहाय्यतेची जाणीव होती व कारावासात सगळेजण एकाच विशाल परिवाराचे घटक झालो होतो. येथे कोण कम्युनिस्ट ? कोण समाजवादी ? कोण जनसंघाचा ?

दुसरे एक स्थानबद्ध श्री. माहेश्वरी ह्यांना एक दिवस दुपारी हृदयविकाराचा सौम्य झटका आला. स्थानबद्ध डॉक्टर्स त्यांच्यावर उपचार करू लागले. जेलच्या डॉक्टरांकडे आवश्यक ती उपकरणेही नव्हती. शेवटी ॲम्ब्युलन्स मागवून त्यांना ससूनमध्ये नेले. त्या दिवशी सर्व स्थानबद्धांची जी मनःस्थिती होती ती पक्षातीतच असे. श्रीमती मृणालताईंना जेव्हा पुण्याहून धुळ्याला न्यायचे ठरले तेव्हा आम्ही सर्वजण चिडलो होतो. कारण एकटीला दुष्टपणाने असे दूर नेऊन ठेवणे हे योग्य नव्हते. आणि हा राग सर्व स्थानबद्धांचा होता. कारण हुकूमशाहीचा वरवंटा सर्वांवर सारखाच फिरत होता.

समाजवादी, जनसंघ यांच्या कार्यकर्त्यांत एकमेकांविषयी खूप गैरसमज होते. कधी कधी वैचारिक एकतानतेमुळे वरिष्ठ नेते एकत्र येऊ शकतात, पण प्रत्यक्ष खेड्यात व शहरात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्यात एकत्र येण्यात खूप अडसर असतात. जेलमध्ये पं. दीनदयाळ पुण्यतिथी व डॉ. लोहिया जयंती हे कार्यक्रम मोठे झाले. दोन्ही वेळी दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते बोलले. पंडित उपाध्याय व डॉ. लोहिया या दोन दूरदृष्टीच्या नेत्यांनी एकपक्षाची कल्पना पाहिली होती. त्यांनी वेळोवेळी एकत्र येण्याविषयी विचार व्यक्त केले होते. एका अर्थाने त्यांनी पाहिलेले एकत्रीकरणाचे स्वप्नच आज साकार होत आहे. त्यामुळेच हे दोन महापुरुष हे एकपक्षाचे प्रेरणास्थान बनले. दोघांच्या विचारधनाचा फार मोठा परिणाम कारावासातील स्थानबद्धांवर झालेला आढळेल.

सरसंघचालक प. पू. बाळासाहेब देवरस यांच्या राहण्याने तर येरवड्याला एक खास महत्त्व आले. त्यांच्या हालचालींवर जेलची दरीच जाचक बंधने असत. पण तरीही त्यांचा ठसा सबंध कारावासावर उमटलेला असायचा. दलित पँथरचा संजीव चव्हाण याने एक मोठी प्रश्नावली तयार केली. दलित समस्यांवर सरसंघचालकांची मते त्याला हवी होती. त्याच्या प्रश्नांना इतकी समर्पक व योग्य उत्तरे प. पू. बाळासाहेबांनी दिली की, तो प्रभावित झाला. सर्व स्थानबद्धांचे ते जणू पालक होते व त्यांच्याकडे जाऊन आपल्या कोणत्याही शंका त्यांना विचाराव्यात, असा जणू परिपाठच होता. सर्वजणांशी ते चर्चा करत, आपल्या प्रखर विनोदबुद्धीने सर्वांना हसवत ठेवत, सामुदायिक जीवनाचा एक चालता–बोलता आदर्श असेच ते एक दर्शन आहे. सर्व स्थानबद्धांना आपले हक्काचे असे ते ठिकाण वाटत असे. त्यांचे सुस्पष्ट विचार व मार्गदर्शन यामुळे सगळ्यांच्या मनातली किल्मिषे नाहीशी झाली.

गेले दीड वर्ष एकपक्षाची प्रक्रिया चालली होती. या बाहेरच्या प्रक्रियेचे परिणामही

## सामुदायिक जीवनाचा एक चालता–बोलता आदर्श

आत घडत असत. कारावासात तर एकपक्षाची इतकी ओढ सर्वांना लागलेली असे की, एकपक्ष मे महिन्यात स्थापन होणार असे दिसताच कारागृहातील वातावरणच बदलले. एकत्वाच्या भावनेने सर्व व्यवहार होऊ लागले. पेढे वाटले गेले. एकपक्षाची जाहीर सभा झाली व त्यात सर्वजणांनी एकपक्षाचे स्वागत केले. त्या दिवशी आनंदाला उधाण आले होते. आणि एक वर्षाच्या सहवासाने हे स्वाभाविक होते. त्या दिवशी 'सिंहासन खाली करो, जनता आती है' असे वाक्य व्यासपीठावर होते. जेलच्या अधिकाऱ्यांनी दोनशे पोलीस आणून शासकीय धोरण स्पष्ट केले. परंत एकदा आमचा शत्रू समान होता. आमचे संकट समान होते.

गौतम बुद्धाला बोधीवृक्षाखाली साक्षात्कार झाला. येरवड्यातसुद्धा हे सर्व विचारमंथन, चर्चासत्रे ही बोधीवृक्षाखाली होत असत. सामाजिक एकरसतेसंबंधी फार मोठी व्याख्यानमाला कारावासात झाली व त्या व्याख्यानमालेने सर्वांच्या सामाजिक दृष्टिकोनातली जाणीव स्पष्ट झाली. बागाईतकर, आढाव, गोपाळराव माने, आण्णा जोशी यांच्या सामाजिक जाणीवा सारख्याच प्रगल्भ आहेत, सामाजिक विषमतेवरील राग व ती निपटण्यासाठी खरे प्रयत्न, त्याची कळकळ सारखीच. 'हे हितसंबंधी', 'हे आक्रस्ताळे' अशी विशेषणे आपोआप नष्ट झाली. जेथे मतभिन्नता होती तेथे परत विचार करण्याची तयारी होती.

तुरुंगात आमचे फार लाड केले असा एक खोटा प्रचार शासनातर्फे केला जातो. पण प्रत्यक्षात वैद्यकीय गैरसोयी, अपुरे अन्न यामुळे फार त्रास होत असे. घरुन गव्हापासून इतर गोष्टी मागवूनच आम्ही तेथे ठीक राहू शकत होतो. अन्यथा ३ चपात्या व मसूराची डाळ असलेल्या पासष्ट पैशातल्या जेवणाने आमचे काय झाले असते? नियमानुसार सप्ताहात चार-पाच वेळा मसूर खावा लागे, त्यामुळे जन्माचा मसूराचा कोटा खाऊन झाला. रोज ७० रुपये खर्च वगैरे जे खोटे प्रचार चालत ते आम्हाला आत निमूटपणे सहन करावे लागत. कारण उत्तर द्यायला संधी नसे.

कारागृहातला दवाखाना इतका छान होता की, 'ससून' सुद्धा शतपटीने बरे वाटायचे. निम्म्यापेक्षा अधिक मंडळी वर्षभरात आजारी पडली व त्यांना योग्य उपचार मिळू शकले नाहीत. आमच्याबरोबर अनेक डॉक्टरमंडळी आत होती म्हणूनच आमचा निभाव लागला, अन्यथा जेलमध्ये सर्व रोगांवर एकच रामबाण औषध, ते म्हणजे ए. पी. सी.

या व अशा अन्यायामुळे वारंवार जेल अधिकाऱ्यांशी, शासनाशी आम्हाला भांडावे लागे. या अन्यायाविरुद्ध आम्हाला एकत्र यावे लागे व सर्वांचे दुःख वेशीवर टांगावे लागे.

या वैद्यकीय गैरसोयीतूनच डॉ. गुळवणी व श्री. गोपाळराव देशपांडे यांना मृत्यू आला. एका लढ्यातील सहप्रवाशांचे हे बलिदान आम्हाला एकत्र बांधून ठेवणार आहे.

या सगळ्या प्रकारांमुळे तब्बेत ठीक ठेवणे हा एक उद्योग असायचा व योगासने, वेटलिफ्टिंग, जोर, बैठका इ. गोष्टी सामुदायिकपणे सुरू असायच्या. या दैनंदिन कार्यक्रमात सर्वजण एकत्र राहिल्याने एक वेगळे वातावरण तयार झाले हे खरे.

४२ वी घटना दुरुस्ती हा कारावासातील सगळ्यात खळबळजनक विषय होता. मूलभूत स्वातंत्र्य संपवून टाकणारी ही दुरुस्ती हा आमच्या रागाचा विषय होता. त्यावर एक मोठे चर्चासत्र चालू झाले. त्यातही सर्वपक्षीयांचे विचार एकच आहेत, हे लक्षात आले.

अशा तऱ्हेने मोठ्या प्रमाणावर झालेले विचारमंथन, एकत्र सहवास, समान संकट, समान आचार, समान शुद्धता यामुळे ही सगळी माणसे एकत्र आली. त्यातूनच एकपक्षाची ही पेढी ठीक बसली आहे. 'समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी, भारतीय उच्च मूल्यांवर आधारित गांधीवादी विकेन्द्रीकरण' या ध्येयाभवती आज सर्वजण एक आले आहेत. ही आघाडी नव्हे, हे कडबोळे नव्हे, हे Mixture नव्हे, तर खराखुरा एकपक्ष (एकरस) झाला आहे. या होण्यामागे कारावासात काय घडले याचे हे छोटे छोटे तुकडे आहेत. आजही अनेक स्थानबद्ध आत आहेत व सर्व सांगण्याचे पूर्ण स्वातंत्र्य नाही, यामुळे केवळ प्रक्रिया समजावून घ्यायला उपयोगी पडतील अशा काही गोष्टी सांगितल्या. □

# सामुदायिक विचारमंथनातून तयार झालेली गति

कुमार सप्तर्षी

२६ जूनला येरवडा तुरुंगात राजकीय स्थानबद्धांची भरती व्हायला सुरुवात झाली. मी म. गांधी जयंतीच्या दिवशी म्हणजे २ ऑक्टो. १९७५ रोजी भरेदाखल झालो. २६ जानेवारी (७७) रोजी आम्ही बरेचजण सुटलो. दीड वर्ष एकत्र राहिल्यामुळे काही भावनानुबंध जुळले. त्यामुळे दीडशे-दोनशे स्थानबद्ध मित्रांना तुरुंगात सोडून बाहेर पडताना दुःख होत होते. बाहेर जाऊ नये असे वाटत होते. सगळे एकत्र सुटलो असतो तर, जल्लोष करीत बाहेर पडलो असतो. आता पावले जड बनत होती. वास्तविक राहणारे आणि बाहेर पडणारे एका संघटनेचे, एका ध्येयाचे साथी नव्हते. किंबहुना ध्येय, विचारसरणी या दृष्टीने पूर्वी अनेकवेळा विरोधात उभे ठाकलेले होतो. शंकराचार्य व चातुर्वर्ण्य यासंबंधी आम्ही एकमेकांवर तुटून पडलो होतो. मग विदा होताना पावले जड का व्हावीत? डोळ्यात पाणी का साचावे? ही किमया होती तुरुंगवासाची.

परस्परांचे विचार जाणून घेण्याची सरकारने जबरदस्तीच केली होती आमच्यावर.

विचारांच्या पलीकडे जाऊनही माणसे म्हणून आम्ही दीड वर्ष एकत्र राहिलो, एकत्र खाल्ले. एकाकडे खाण्याचा डबा आला तर

सर्वांनी तो वाटून घेतला.

जेलमध्ये जीवनाची गती थांबलेली असते. प्रत्येक दिवस तोच तोच दिनक्रम घेऊन उगवतो अन् मावळतो. एकाच मजकुराच्या अनेक सायक्लोस्टाइल्ड प्रती काढाव्यात त्याप्रमाणे तीनशे साठ दिवसांच्या मजकुरांची प्रत तीच. फक्त रोज तारीख बदलायची.

तरीही जीवन स्वतःचा आकार घेते. कृत्रिम का होईना, पण स्वतःची गती, लय पकडते.

माणसाच्या डोक्यात विचार येतात. त्यांची इतर माणसांबरोबर तो देवाणघेवाण करू शकतो. विचारांच्या क्रिया–प्रतिक्रिया निर्माण होतात.

तुरुंगात जीवनाच्या व्यवहारातून गती जन्म पावत नसली तरी, विचारांच्या क्रिया-प्रतिक्रियांतून एक वेगळी गती निर्माण होते. व्यवहार स्थिर आणि विचार गतिशील बनतो.

बंदी वाचतात, विचार करतात, दुसऱ्या-जवळ बोलतात, दुसऱ्यांचे ऐकतात. दिवस-रात्र विचार, हाच साथी. चिंतनाच्या रूपाने, स्मृतींच्या चाळवणीच्या रूपाने, कधी वाचनाने, लिखाणाने, गप्पांच्या रूपाने, अभ्यास-मंडळे, सभा, परिसंवाद, व्याख्याने यांच्या रूपाने, कधी एकांतात विचार साथ करतो, तर कधी सामुदायिक चिंतनाच्या रूपाने तो भेटतो.

डाव्या कम्युनिस्टांपासून आनंदमार्गी, जमाते इस्लामीपर्यंत एकमेकांची माहिती विचारली जायची.

शिवाय जेलमध्ये माणसे बाहेरच्या जगा-पेक्षा अधिक खरे बोलतात.

सुटका झाल्यानंतर 'माणूस' कार्यालयात काही मित्रांसमवेत गप्पा मारत बसलो होतो. जेलमधल्या गोष्टींबद्दल गप्पा चालल्या होत्या. सर्वांच्या मनातला एक प्रश्न होता. चार राजकीय पक्ष एकत्र येऊन जनता पक्ष निर्माण झाला. हुकूमशाही राजवटीला विरोध करायला शक्ती संघटित होतेय, समर्थ शक्तिकेंद्र निर्माण होतेय, याबद्दल सर्वांच्या मनात आनंदाची भावना होती. पण त्याचबरोबर त्या आनंदाच्या भावनेला काळजीच्या सुराची छटा होती. मी त्यांची काळजी अनाठायी नाही हे मान्य करूनही काही वेगळे आडाखे सांगत होतो. १९६७ साली सर्व काँग्रेस विरोधक एकत्र आले. बऱ्याच राज्यांत काँग्रेसचे राज्य संपुष्टात आले. पण त्या वेळच्या संविद सरकारांना एकत्र राहता आले नाही. जनतेची इच्छा काँग्रेस सरकार नाकारण्याची असूनही संविद सरकारांना जनतेच्या इच्छेशी इमान राखता आले नाही. विरोधकांच्या आघाड्या फुटल्या त्यादेखील जनतेच्या प्रश्नावर न फुटता सत्ता भोगण्याच्या प्रश्नावर मारामाऱ्या, सुंदोपसुंदी झाली. आयाराम–गयारामचे पीक वाढले. अस्थिरता निर्माण झाली. जनता पुनः स्थिरतेच्या इच्छेमधून काँग्रेसच्या मागे गेली. त्यातून निरंकुश सत्ता, विशिष्ट कंपूची मनमानेल अशी राजकीय वागणूक निर्माण झाली. जनता पुनः हताश बनली. हा ताजा इतिहास आमचे मित्र विसरू शकत नव्हते. त्यामुळे त्यांना वाटणाऱ्या काळजीत तथ्यांश होता. पुनः सत्तेच्या उपभोगावरून जनता प्रतिकारासाठी सिद्ध होणार नाही, हे भय तर्कशुद्ध होते. मी वेगळे म्हणत होतो. त्यातून या विषयावर लेख लिहिण्याची कल्पना निघाली.

१९७१ च्या इंदिरा लाटेनंतर सर्वच विरोधी पक्षांत आत्मपरीक्षण चालले होते. पण त्याची परस्परांना माहिती नसावी. इंदिरा गांधींच्या हाती निरंकुश सत्ता येऊनही जनतेच्या आशाआकांक्षा त्यांच्या राजवटीत प्रतिबिंबित होत नव्हत्या. काँग्रेस पक्ष हीच एक संयुक्त आघाडी आहे. सत्तेचे आपापसात वाटप हाच त्या पक्षाचा आधार! जनतेत असंतोष वाढू लागला. पण तरीही जनता विरोधी पक्षांचे मागे जायला उत्सुक नव्हती. सत्तेपेक्षा जनतेच्या प्रश्नाला त्यांची निष्ठा आहे, असे वाटल्याशिवाय जनता त्यांचे नेतृत्व कसे मान्य करणार? त्यांनी राजकीय विश्वासार्हता गमावली होती, पण त्याचवेळी विद्यार्थिवर्ग, तरुणवर्ग याने जनतेच्या असंतोषाचे नेतृत्व स्वीकारले. जयप्रकाश नारायण यांच्या म्हणजेच राजकीय पक्षाबाहेरील नेतृत्वाचा जनतेने व तरुण पिढीने स्वीकार केला. या घटनेनंतर विरोधी- राजकीय पक्षात अधिक सखोल आत्मपरीक्षण झाले असावे. नैतिकता, जननिष्ठा, अहिंसा यांचा अंतर्भाव जे. पीं. मुळे भारतीय राजकारणात पुनः एकदा झाला. त्या जनशक्तीपुढे ज्युनिअर भूमिका घेऊन राजकीय पक्ष सामील झाले, पुनः जनतेचा विश्वास हळूहळू बसू लागला. इंदिरा गांधी अधिक दमन करू लागल्यामुळे जनतेपासून अलग पडू लागल्या. पोलीस, बॉर्डर सिक्युरिटी फोर्स, नोकरशाही आणि त्यांचे एजंट म्हणून काम करणारे मुख्यमंत्री हाच त्यांच्या सत्तेचा आधार उरला. गुप्त-हेरखाते प्रमुख सल्लागार बनले. रेल्वेसंपा-नंतर दमनयंत्रणेचे भयकारी स्वरूप जनतेसमोर उघडे झाले.

२६ जूनला आणीबाणी जाहीर झाली. पंतप्रधानांच्या विरोधकांना तुरुंगात डांबण्यात आले. जे. पीं. च्या नेतृत्वाखाली संपूर्ण क्रांतीची भाषा बोलणारे पक्ष, भांडवलशाही व सरंजामदारी रचनेमधील सुप्त हिंसक शक्ती पाहून चकित झाले. एका फटकाऱ्यासरशी वृत्तपत्रे, छापखाने यांची गळचेपी करण्यात आली. विरोधकांची मर्म-स्थाने हेरून नेमका हल्ला करण्यात आला. भयग्रस्त व हुकूमशाही वातावरणात जनतेबरोबर संपर्क साधण्याची कार्यक्षम यंत्रणा कोणाही पक्षांजवळ नव्हती. अर्थात उघडपणे काम करणारांकडे तशी यंत्रणा नसणे स्वाभाविक होते. मार्क्सवादी विचारसरणीची भिन्न भिन्न राजकीय धोरणे पुढे आली. अगदी परस्पर विरोधी. शास्त्रशुद्ध विचार-पद्धती म्हणून जो दावा होतो तो फोल ठरला. शब्दांची आग ओकणारे शब्दांच्या कोलांट्या उड्या मारू लागले. १९७१ पासून सुरू झालेले आत्मपरीक्षण, आणि जयप्रकाशजींच्या आंदोलनातून घेतलेले शिक्षण घेऊन राजकीय पक्ष तुरुंगात आले.

रा. स्व. संघ केवळ व्यक्ती घडविण्यावर, संघटनाशास्त्र सूक्ष्मतम बनविण्यावर भर देणारा, विचारसरणी भूतकाळातील, गांधीवादाला विरोध. ते जयप्रकाशांचे नेतृत्व स्वीकारून सत्याग्रहपर्वात उतरले. त्यांच्या कामाच्या धाटणीमध्ये हा मूलगामी बदल होता. १९४२ च्या आंदोलनात रा. स्व. संघ अलिप्त राहिला, पण आता तो राष्ट्रीय राजकारणाच्या प्रमुख प्रवाहात उतरला. त्यांच्या संघटनकौशल्याचा सत्याग्रह आंदोलनाला फार उपयोग झाला. १९४८ मधील म. गांधींच्या खुनानंतर आलेल्या संघबंदीच्या वेळी संघाला कोणी मित्र नव्हता. पण त्यावेळी लागलेला डाग आता धुऊन निघाला. संघबंदी उठविण्यासाठी सारे पुढे आले.

परिस्थितीच्या भोवऱ्यात काही मनाने व काही दडपणाने शिकून जेलमध्ये आले. परस्पर टोकाच्या विचारसरणी व तीस-चाळीस वर्षे उराशी बाळगलेले पूर्वग्रह, गैरसमज घेऊन तुरुंगातील सर्वांचे जीवन सुरू झाले. साहजिकच खटके उडू लागले. संघर्ष झडू लागले. पण आता परिस्थितीमध्ये गुणात्मक फरक पडला होता. सर्वांचा शत्रू एक होता. सर्वांना एकत्र बांधणारा तो एक बळकट धागा होता. संघर्ष झडले तरी मुख्य शत्रू विसरायचा नाही, याचा जणू निश्चय झाला होता. त्यामुळे जेलमधील संघर्ष परस्परांना समजून घेण्याच्या दृष्टीने उपकारक व हितकारक होते. संघर्षांमुळे मने तळागाळापासून ढवळली जात होती. तुरुंग व वृत्तपत्रबंदी यामुळे संघर्षाला गंभीरपणा होता. स्वस्त लोकप्रियतेसाठी चाललेली ती स्पर्धा नव्हती. त्यामुळे संघर्षांनंतर परस्परांना सच्चेपणाने समजून अधिक जवळीक निर्माण होई. सर्वजण एकमेकांना आणि स्वतःला सूक्ष्मदर्शक यंत्रातून अठरा महिने पाहात होते. जेलमध्ये सद्यःस्थिती, सामाजिक एकरसता, संपूर्ण क्रांती, इ. एकेका विषयावर तीन-तीन महिने नित्य चर्चा चाले. एकमेकांचे म्हणणे नाइलाजास्तव का होईना ऐकून घ्यावेच लागे. आपापले भिन्नत्व जपून ठेवण्याची धडपडही असायची पण त्याचबरोबर सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत झिरपणारा दुसऱ्याचा विचार रोखणे अशक्यप्राय होते. कार्यकर्ते व्यक्तिगत पातळीवर दुसऱ्या संघटनेच्या नेत्यांबरोबर जवळीक करत होते. अनेक वर्षे जोपासलेला दुरावा आपापतः गळून पडत होता. पंतप्रधान इंदिरा गांधींच्या धोरणामुळे सर्वांच्याच अस्तित्वाला धोका प्राप्त झाला होता. एकटे राहणे, अलगत्व राखणे म्हणजे हुकूमशाहीच्या रेट्यापुढे अस्तित्व मिटविणे. म्हणून अस्तित्व मिटू द्यायचे की, बहुरंगी, बहुढंगी विचारांचा तोंडावळा स्वीकारून एक बनायचे ? असे दोनच पर्याय समोर होते.

इंदिरा गांधींनी आणीबाणी दोनचार महिन्यांत उरकली असती किंवा काही पक्षांबरोबर समझोत्याची बोलणी करायची असा डाव टाकला असता तर जेलमध्ये परस्परांबद्दल संशयाचे वातावरण पसरले असते. त्यांनी तशी पावले न उचलल्यामुळे व घटना दुरुस्ती करून आपली चाल सुस्पष्ट केल्याने प्रसंगोपात निर्माण झालेले दुरावे, संशय आपोआप वितळून जात. चव्वेचाळिसाव्या घटना दुरुस्तीनंतर आजच्या सत्तारूढ पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे घटनात्मक पद्धतीने सत्तान्तर होऊ शकेल, ही संभाव्यता लोपली. त्यामुळे सत्तेच्या उपभोगाचे जुन्या काळातील संयुक्त आघाड्यांचे राजकारण परत करता येणार नाही, याची खात्री झाली. मूलभूत वाणीस्वातंत्र्य, संघटनस्वातंत्र्य नष्ट झाल्याने सर्वप्रथम अग्रक्रमाचे ध्येय ठरले की, आजची हुकूमशाही संपवायची. शिवाय जयप्रकाशजींचा राजकीय पक्षांनी एकत्र येऊन एकच पर्यायी विरोधी पक्ष बनविण्याबाबतचा रेटा ! खरोखर एक पक्ष होण्यात जयप्रकाशजींचा प्रमुख वाटा आहे. तो घटक इतका महत्त्वाचा आहे की, चार पक्षांच्या नेतृत्वाच्या साऱ्या त्रुटी एकट्या जे. पीं. मुळे भरून निघतात. जे. पीं. ची तब्येत काळजी वाटावी अशी आहे. त्यांच्या प्रकृतीची चिंता आणि एकपक्षाच्या प्रकृतीची चिंता यांचा विचार एकत्रच करावा लागतो. पुढील दोन वर्षांच्या काळात जे. पीं. ची तब्येत सुदृढ राहिली तर जनता पक्ष फुटेल की काय, याबद्दल फारशी चिंता करण्याचे कारण उरणार नाही.

ज्यावेळी लोक विचारतात, जनता पक्ष भिन्न भिन्न विणारसरणींच्या टकरावाने चिरफाळला जाणार नाही काय ?' त्यावेळी, राजकारणात कोणीच कधीही कायमची ग्वाही देणारे भविष्य वर्तवू शकत नसले तरी, अंतर्गत लोकशाही असलेला पक्ष म्हणून नव्या पक्षाचे अस्तित्व राहील असे म्हणता येईल. जनता पक्षाच्या चार घटक पक्षांत टोकांची क्रांतिकारक विचारसरणी असलेला एकही पक्ष नाही. फरक आहे तो कार्यपद्धती, संघटनाशास्त्र, नेतृत्वाचा ढंग, शैली, भाषा यांमध्ये. म्हणून या पक्षात अंतर्गत लोकशाही व किमान शिस्त सतत शिल्लक राहिली तर भिन्न भिन्न विचारप्रवाह एकत्र नांदू शकतील, असे म्हणणे फारसे गैर ठरणार नाही. स्वातंत्र्यलढ्यातील काँग्रेसचे जसे बहुढंगी स्वरूप होते तसे या पक्षाचे राहील. प्रश्न आहे तो सच्चेपणाने उदारमतवादी लोकशाहीनिष्ठा आत्मसात केलेले, जनतेशी सदैव लय साधणारे, कार्यकर्त्यांना विश्वास देणारे, व्यापक व सर्वसमावेषक नेतृत्व नवा पक्ष निर्माण करू शकेल किंवा नाही, हा. अशा नेतृत्वाची एकसंध फळी, ऐतिहासिक प्रक्रियेतून निर्माण झाली तर हे तारू फुटणार नाही.

जनता पक्ष मूलभूत समाजरचना आमूलाग्र बदलण्याची बांधीलकी मानणारा पक्ष नाही. आणीबाणीच्या अठरा महिन्यांच्या काळात नागरिकांच्या जीवनात जी असुरक्षितता झाली व भयाचे साम्राज्य पसरले, त्यापासून तो नागरिकांना वाचवू शकेल. अशा पक्षामुळे, शांततामय जनक्रांतीवर विश्वास असणाऱ्यांना दलित जनतेचे क्रांतिकारक संघटन बांधायला वाव मिळू शकेल.

पूर्वी ज्या मुद्द्यांवरून या चार घटकपक्षांत वादंग माजण्याची शक्यता होती. बहुतेक त्या सर्व मुद्द्यांवरून अठरा महिन्यांच्या तुरुंगवासात संघटनात्मक वादंगे होऊन गेली. त्यामुळे तुटेपर्यंत पुढील काळात कोणी ताणेल असा संभव कमी. उदा. जानवी तोडली पाहिजेत, संपूर्ण वंदेमातरम् म्हणणे ही राष्ट्रभक्तीची प्रमुख कसोटी आहे किंवा नाही, एकचालकानुवर्तित्व हा संघटनात्मक ढाचा असावा काय ? इ. विषयांवर महाराष्ट्रातील जेलमध्ये जनसंघ, संघ व समाजवादी यांमध्ये तुटेपर्यंत ताणून झाले आहे. म. गांधी व गांधीवाद यावरून सर्वोदयी, समाजवादी, संघटना काँग्रेस व संघपरिवार यांच्यात तारस्वरात वाद होऊन गेले आहेत. तसेच समाजवादीपक्षाच्या खाजगी संपत्तीच्या निर्मूलनाचा आणि संघटनात्मक बेशिस्तीचा, स्वेच्छावादाचा, व्यक्तिवादाचा इतर पक्षांनी घेतलेला धसका, कालानुक्रमाने कमी झाला आहे. थोडक्यात सांगायचे तर संघ-जनसंघाने हिंदुत्ववाद सोडला नाही, पण मुस्लीमविरोध निश्चितपणे सोडला आहे असे वाटते. चातुर्वर्ण्य प्रेम पातळ होऊन दलित प्रश्नांची जाणीव वाढली आहे. संघाची शिस्त खाजगीत समाजवादी मान्य करू लागले आहेत. समाजवाद्यांच्या, निदान त्यांच्यापैकी काही व्यक्तींच्या चिंतनशील व्यासंगाचे संघपरिवारातील तरुण मंडळी मोकळ्या मनाने कौतुक करू लागली आहेत. त्यांच्याकडे आदराने पाहतात. खाजगी संपत्तीच्या निर्मूलनाचे आग्रह पातळ करून समाजवादी, समतावादी बनले आहेत. मथितार्थ हा की, जनता पक्ष हा उदारमतवादी लोकशाहीच्या चौकटीत अनेक विचारसरणींचे व्यासपीठ बनू पाहत आहे. त्यामुळे, भविष्यकाळात तावडतोबीने फाटाफुटीची शक्यता नाही. अर्थात, क्रांतीच्या, संपूर्ण क्रांतीच्या कसोटीवर जनता पक्षाची परीक्षा करणे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे होणार आहे. तुरुंग, सत्याग्रह म्हणजे रणांगण ! या रणांगणावर गेली अठरा महिने सामुदायिक विचारमंथनातून उदारमतवादी-लोकशाहीची गीता तयार झाली आहे. गीतेचा उपयोग जीवनसंग्रामासाठी करून घेणारे अर्जुन अद्यापि सिद्ध व्हायचे आहेत. तरीही वनवासानंतर युद्धाला सज्ज असलेली ही मंडळी आहेत, म्हणून उदार मनाने त्यांचे स्वागत व्हावे असे वाटते. ○ ○

# महामानव

गीतेत भगवत्प्रिय माणसाविषयी सांगताना सांगितले आहे :

" यस्मान्नद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैः मुक्तो यः स च मे प्रियः । "

म्हणजे ज्याच्यापासून लोकांना त्रास होत नाही आणि लोकांमुळे जो त्रस्त होत नाही; हर्ष, क्रोध, भय, बेचैनी यांपासून जो मुक्त आहे तोच माझा प्रिय भक्त होय.

पं. दीनदयाळ खरोखर अशाच योग्यतेचे महामानव होते. ते अतिशय प्रसन्न व उदार व्यक्तिमत्त्वाचे आणि आपल्या ध्येयावर अतिशय दृढ श्रद्धा ठेवणारे होते. त्यामुळे आमचे मतभेद असूनही ते आम्हाला आमच्यातलेच एक वाटत. आमचे मार्ग वेगवेगळे असले तरी, आम्ही एकाच राष्ट्रदेवतेचे उपासक आहोत आणि आमचे अंतिम उद्दिष्ट एकच आहे, अशीच आमची धारणा होती. आज देश संकटांनी ग्रासला आहे आणि देशवासी स्वतःच आपली अस्मिता, आपले भारतीयत्व विसरले आहेत. अशा वेळी ज्यांच्या रक्ताच्या थेंबाथेंबांत राष्ट्रीयत्व भरलेले होते आणि ज्यांच्या देहाचा प्रत्येक अणू राष्ट्रीय होता, राष्ट्रासाठी होता त्या पं. दीनदयाळजींचे स्मरण अतिशय प्रेरणादायी ठरेल. अपरिपक्व राष्ट्रवादाचा विचार टाकून संपूर्ण, प्रखर राष्ट्रवादाचे आपण उपासक बनावे, हाच त्यांच्या जीवनातून आपल्याला मिळणारा संदेश आहे.

—नाथ पै

# गैरकाँग्रेसवाद ते जनता पक्ष

इंदुमती केळकर

'माणूस' चे संपादक श्री. माजगावकर या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घरी आले आणि डॉ. लोहिया, दीनदयाळ उपाध्याय आणि जयप्रकाश असा एक संयुक्तांक काढावा अशी कल्पना त्यांनी मांडली. श्री. केळकरांना आणि मला–आम्हा दोघांनाही ती कल्पना आवडली. डॉ. लोहियांनी आपल्या हयातीत एकच एक विरोधी पक्ष काँग्रेसच्या विरोधात उभा राहावा म्हणून सतत प्रयत्न केला आणि त्या दृष्टीने विरोधी नेत्यांशी त्यांचा सतत संवाद चालत होता. त्याची स्मृती श्री. माजगावकरांनी ठेवली, याविषयी लोहिया विचार मानणाऱ्यांना कृतज्ञताच वाटेल.

श्री. माजगावकरांशी चर्चा करताना दीनदयाळ उपाध्याय व लोहिया यांचे हिंद–पाक महासंघाबाबतचे संयुक्त पत्रक, १९६३ साली गाजलेल्या दीनदयाळ उपाध्याय, कृपलानी व लोहिया यांनी लढवलेल्या अनुक्रमे जौनपूर, अमरोहा व फरुकाबाद येथील लोकसभेच्या पोटनिवडणुका आणि त्या वेळची जनसंघ व संसोपाची काही प्रश्नांबाबतची मिळतीजुळती भूमिका, चिनी आक्रमणानंतर कट्टर राष्ट्रवादी पक्षांचा झालेला तीव्र संताप, काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी मोडण्याचा निर्धार असे अनेक विषय निघाले. या चर्चेतूनच सरकारविरोधी एकच एक पक्ष उभा करण्यामागच्या इतिहासाची उजळणी करणारा आणि त्या कालखंडातील काही घटनांचे आताच्या घटनांशी असलेले साम्य, विरोधकांमधील वैचारिक ऐक्य दाखवणारे प्रसंग, विरोधी राजनीती करणारांना जाणवलेले धोके इत्यादी गोष्टींचा समावेश असणारा लेख लिहिण्याचे ठरले.

१९६२ हे साल विरोधी राजकारणाला कलाटणी देणारे वर्ष होय. त्यापूर्वी सामान्यपणे प्रत्येक पक्षाची भूमिका आपापला पक्ष बांधण्याची होती असे म्हणता येईल. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण करून मायभूमीचे लचके तोडले. त्यामुळे उभ्या जगात भारताची विटंबना झाली. त्या मानखंडनेमुळे विरोधी पक्ष अंतर्मुख होऊन विचार करू लागले.

तसे तर त्यापूर्वीही या प्रक्रियेला थोडाफार प्रारंभ झाला होता. निरनिराळ्या प्रश्नांवर विरोधकांमध्ये सहमती असू शकते असे दिसू लागले होते. उदाहरणार्थ. 'अंग्रेजी हटाओ' आंदोलनाला जनसंघाचे पूर्ण समर्थन प्राप्त झाले होते १९५९ साली नाशिक येथे पहिले अंग्रेजी हटाओ संमेलन झाले. त्या संमेलनाला विविध साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत यांचा पाठिंबा लाभला. अशाच प्रकारची 'हिमालय बचाओ', 'जाती तोडो', 'दाम-बांधो', 'हिंद–पाक महासंघ बनाओ' इत्यादी लोहियाप्रणीत एक लक्ष आंदोलने याच सुमारास संघटित झाली आणि त्यात विविध पक्षीय आणि अपक्षीय अशी मंडळी सामील झाली.

सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आणि दिशाहीन राजकारणामुळे जनता विरोधी असे जे प्रश्न निर्माण झाले त्यांच्याविरुद्ध सत्याग्रहाच्या मार्गाने सतत लढणाऱ्यांची एक शक्ती देशात निर्माण व्हावी अशी लोहियांची इच्छा होती. जनतेने सतत संघर्षरत राहावे, सामुदायिक प्रतिकाराचे हत्यार सदैव धारदार ठेवावे, यासाठी लोहिया धडपडत होते. देशातील अन्यायांविरुद्ध त्यांचा विद्रोही आत्मा सतत खवळून उठे. सत्याग्रहात बुद्धी व सामर्थ्य यांचा मनोज्ञ संगम असल्याने सामान्य माणसातले सामान्य शौर्य प्रकट करणारा तो मार्ग आहे असे त्यांना वाटे. या मार्गाने कोटयवधींचे मन बदलून त्यांची हिंमत वाढेल याची जाणीव असल्याने निरंतर सत्याग्रहाची कल्पना त्यांनी हिरीरीने मांडली. लोहियांना तुरुंगाबद्दल तिरस्कार होता; पण ते म्हणत, जगात जोवर अत्याचारी आहेत, तोवर तुरुंगाची घृणा करणारांना तुरुंगात जातच राहावे लागेल. जनसंघ आणि कम्युनिस्ट त्यांच्या कल्पनेप्रमाणे समाजवादी नव्हते तरीही ते दोन्ही पक्ष परिवर्तन घडवू पाहणारे पक्ष आहेत याबद्दल त्यांना शंका नव्हती. सध्याच्या परिस्थितीबद्दल हे पक्ष इतके नाराज आहेत की ती बदलवण्यासाठी कायदेभंग करण्याची, हरताळ करण्याची, तुरुंगात जाण्याची त्यांच्या ठायी क्षमता आहे असे त्यांना वाटे. ही नाराजी व तो असंतोष संघटित स्वरूपात प्रकट व्हावा यासाठी एकत्र येऊन संघर्ष करावा, यावर लोहियांनी फार जोर दिला. विरोधी शक्तींना एकत्र आणणारा संघर्ष हा एक प्रभावी मार्ग त्यांना वाटे.

चीनप्रकरणी कलंकित आणि लज्जाजनक ठरलेले काँग्रेस सरकार लवकरात लवकर सत्ताभ्रष्ट करण्यासाठी विरोधकांनी एका विशाल राजकीय मंचावर एकत्र यावे यासाठी प्रयास करताना लोहियांना एक अडचण जाणवली. विभिन्न विरोधकांमध्ये अंतिम उद्दिष्टांबाबत असलेले मूलभूत मतभेद हीच ती अडचण होय. मूलभूत विचारांबाबत एकवाक्यता घडवून आणण्याच्या आग्रहामुळे तात्काळ संभवनीय असणारे ऐक्य दुरावते असाही त्यांना अनुभव आला. म्हणून ताबडतोबीच्या भरीव कार्यक्रमावर एकमत करून अंतिम उद्दिष्टांसंबंधीची सतत चर्चा चालू ठेवावी असा उपाय लोहियांनी सुचविला. एकाच विशिष्ट मार्गावरून वाटचाल करीत राहिल्यानंतर वाटसरू देखील सुधारतील असा त्यांना विश्वास वाटत होता.

१९५२, १९५७ व १९६२ या तिन्ही निवडणुकांमधला अनुभव होता की, विरोधकांना बहुमत मिळूनही विरोधी मतांचे विभाजन

झाल्यामुळे अल्पमतातल्या काँग्रेसने जास्त जागा जिंकल्या व ती सत्तारूढ झाली. यावरचा तोडगा म्हणजे विरोधी मतांचे विभाजन टाळणे हाच होता. त्या दृष्टीने लोहियांनी एक भूमिका आग्रहपूर्वक मांडली. हिंदुस्थानातील कम्युनिस्ट कमीअधिक प्रमाणात भांडवलशाहीच्या संदर्भात क्रांतिकारी आहेत. पण त्यांच्यातील खोटा आंतरराष्ट्रीयवाद, हिंसा व लोकशाहीचा अभाव नष्ट झाला पाहिजे.तसेच त्यांची क्रांतिकारक दृष्टी जाती, भाषा याहिबाबतीत दिसली पाहिजे. भारतातील विपुल लोकसंख्या, भांडवलाची कमतरता, अल्प जमीन आणि जातिव्यवस्था या संदर्भातच त्यांनी समाजवादाचा विचार करावयास हवा. कम्युनिस्टांमध्ये असा बदल झाला तर नव्या एकच विरोधी पक्षाचा ते घटक बनू शकतील, असे लोहियांना वाटे.

नानाजी देशमुख, प्रो. राजेंद्रसिंह वगैरे जनसंघ नेत्यांशी चर्चा झाल्यावर त्यांच्या विचारातील परिपक्वता पाहून लोहिया प्रभावित झाले. ते म्हणाले, रा. स्व. संघ व जनसंघ यांच्यातील मुस्लीम विरोधी भावना व व्याखान्यांना हितकारक ठरणारे त्यांचे धोरण यात बदल झाला तर नव्या विरोधी पक्षाचे ते मूल्यवान घटक बनतील. त्यांची राष्ट्रीयता मला नेहमीच प्रशंसनीय वाटते; पण त्याचबरोबर त्यातील संकुचितपणा मला टीकार्ह वाटतो. "

### डोळस भारतीयत्व

लोहियांच्या साऱ्या चिंतनात एक प्रकारचे डोळस भारतीयत्व सतत डोकावताना दिसते. म्हणूनच जनसंघाच्या विचारसरणीची भारतीयत्वाची बैठक लोहियांना स्वागतार्ह वाटली. आधुनिक काळाचे भान ठेवून भारतीय व राष्ट्रवादी विचारांचा आधार घेतला तरच, भारतीय जनविराटाचे विशाल ऐक्य साधता येईल, त्याचा पुरुषार्थ देशाच्या मूलभूत परिवर्तनसाठी जागृत करता येईल, अशी लोहियांची धारणा होती. पाश्चात्य चिंतनाचे अंधानुकरण किंवा दास्य पत्करणाऱ्या शक्ती भारतात आमूलाग्र क्रांती करूच शकणार नाहीत, असे लोहियांचे मत होते. लोहिया भ्रामक राष्ट्रवादी नव्हते, तसे भ्रामक आंतरराष्ट्रीयवादीही नव्हते. समाजवादी होते पण मार्क्सवादी नव्हते. लोकशाहीवादी होते पण सत्याग्रही लोकशाहीवादी होते. लोहियांना औद्योगीकरण हवे होते, पण उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण नको होते. त्यांना आधुनिकता हवी होती पण पाश्चात्यांची भ्रष्ट व न परवडणारी विलासी नक्कल नको होती. या व इतर काही बाबतीत आपल्या विचारात काहीशी समानता आहे, याची जाणीव लोहिया, नानाजी देशमुख, दीनदयाळ उपाध्याय इत्यादींना होती.

असे होते तरी लोहियांनी भारतीय परंपरेतील उणीवा व विसंगती दाखवून देऊन त्यांचा त्याग केल्याशिवाय भारतीयत्वाचा विचार देशाच्या नवनिर्मितीसाठी उपयोगी पडणार नाही असे स्पष्टपणे बजावले. शेंडी-जानवे, मंगळसूत्र-बांगड्या, सणवार-व्रतवैकल्ये, चातुर्वर्ण्य यातच भारतीयत्व आहे असे मानणारा परंपरावाद लोहियांनी त्याज्य मानला. ऐहिक संपत्तीविषयीची संपूर्ण निर्मोहवृत्ती, अद्वैत, पशुपक्ष्यांसह सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करण्याची शिकवण इत्यादी भारतीय आध्यात्मिक परंपरेतील महान तत्त्वे लोहियांना विचारणीय वाटत. परंतु त्याचवेळी ते असेही म्हणत की, निर्गुण तत्त्वांच्या सगुण आचरणाचे बाबतीत भारतात जेवढी दांभिकता दिसून येते तेवढी अन्यत्र कोठेही दिसत नाही. भारताच्या अधःपतनाचे हे एक प्रमुख कारण आहे.

काँग्रेसविरोधी विशाल जनमोर्चात देशातील दलित समाज नसेल तर, संपूर्ण जनविराटाच्या आकांक्षांचा तो मोर्चा प्रतीक आहे असे म्हणता येणार नाही. परंतु काँग्रेसबरोबर सत्तेत भागीदारी व लाचारी पत्करून या समाजाला आपले न्याय्य स्थान मिळविता येणार नाही, असे लोहियांचे मत होते. १९६५ साली रिपब्लिकन पक्षाने भूमिसत्याग्रह केला. दलित समाजावर स्वाभिमानाची व प्रतिकाराची सामूहिक भावना उदय पावत असल्याचे ते चिन्ह होते. या सत्याग्रहात ६० हजारांवर स्त्री-पुरुष तुरुंगात गेले. लोहियांनी या सत्याग्रहात भाग घेण्याची इच्छा व्यक्त केली.

केरळमध्ये त्याच वर्षी विधानसभा निवडणुकांपूर्वी सहा आठवडे बिनाआरोप सर्व कम्युनिस्टांना पकडले होते. त्यावेळी लोहिया म्हणाले, गोपालन आणि राममूर्ती हे लालबहादूर शास्त्री व नंदा यांच्याइतकेच चांगले अथवा वाईट देशभक्त आहेत. कम्युनिस्ट एखाद्या समारंभात माओ त्से तुंगचा फोटो लावण्याचा मूर्खपणा करतात, तर आपला बराचसा भूभाग बळकावलेल्या चीनला सरकार सुखसाफल्याचा संदेश पाठवते. चीनने सीमेवर बांधलेले रस्ते जनतेपासून लपविण्याची सरकारची इच्छा असते. कारण भारतीय जनता चिनी सरकारविरुद्ध खवळून उठू नये असे सरकारला वाटते. चीनने बळकावलेली भूमी उजाड निर्जन होती, असे म्हणण्यापर्यंत मजल नेहरूंनी गाठली.

लोहिया म्हणाले की धरून चाला," की कम्युनिस्ट देशद्रोही आणि जनसंघ जातीयवादी आहे. पण देशद्रोह आणि जातीयवाद या काही निराकार गोष्टी नव्हेत. राजकारणातील त्यांचे साकार रूप पाहावयास हवे. देशाच्या राजकीय चिंतनात आजवर एक फार मोठी चूक झाली आहे. सर्व राजकीय पक्षांचे विचार आणि कार्यक्रम यांना सारख्याच मापाने मोजण्यात आले. काँग्रेस, कम्युनिस्ट, जनसंघ, समाजवादी यांची शक्ती समान मानण्यात आली. ही चूक आहे. प्रत्यक्षात तसे नाही. "यांपैकी एका पक्षाच्या—काँग्रेस सरकारच्या हाती सरकारी सत्ता आहे. सुमारे सव्वा कोटी सरकारी नोकरांची फौज दिमतीला आहे. वर्षाकाठी सुमारे ५५०० कोटी रुपये खर्चायला आहेत. अशा काँग्रेसची व अन्य पक्षांची तुलना कशी करता येईल ? त्यांना एका मापाने मोजून कसे चालेल ? सत्तारूढ काँग्रेसचा तिळभर जातीयवाद जनसंघाच्या पहाडाएवढ्या जातीयवादापेक्षा अधिक घातक आहे. काँग्रेस सरकारचा तिळमात्र देशद्रोह कम्युनिस्टांच्या पहाडाएवढ्या देशद्रोहापेक्षा देशाला खड्डयात घालणारा आहे. म्हणून जनसंघ आणि कम्युनिस्ट यांना थाबरून त्यांच्यापेक्षा काँग्रेस बरी ही विचारसरणी विरोधी राजकारणाला मठमाती देणारी आहे. "

चिनी आक्रमणामुळे झालेली मानखंडना भरून काढण्याची, त्या अपमानजनक परिस्थितीचा सूड घेण्याची एक संधी योगायोगाने चालून आली. फरुखाबाद, अमरोहा व जौनपूर येथे लोकसभेच्या पोटनिवडणुका उद्भवल्या व अनुक्रमे लोहिया, कृपलानी आणि दीनदयाळ उपाध्याय हे तीन खंदे वीर रणमैदानात उभे राहिले.

या फोटनिवडणुका परस्पर सहाय्याने लढल्या गेल्या. लोहियांविरुद्ध ते जातीयवादी बनल्याची कावकाव सुरू झाली. तेव्हा त्यांनी विचारले, नेहरूंना इतरांचा पाठिंबा मिळतो तेव्हा ते राष्ट्रीय नेता ठरतात आणि मला मिळाला की, मी जातीयवादी ठरतो, हे कसे काय ? या निवडणुकांच्या वेळी जनसंघ नेते श्री. नानाजी देशमुख यांनी लोहियांना पाठिंबा देणारे पत्रक काढले. आणि त्यांत, " जनसंघ व समाजवादी पक्ष यांच्या धोरणात काही फरक आहे असे मला वाटत नाही. जनसंघ लोहियांनाच या देशातील खऱ्याखुऱ्या समाजवादी विचारांचा प्रवर्तक समजतो. लोहिया, कृपलानी व दीनदयाळ उपाध्याय लोकसभेत जाणे अत्यंत आवश्यक आहे म्हणून सैनिक दुष्मनाशी सीमेवर ज्या प्रखरतेने लढतो तितक्याच गंभीरपणे या नेत्यांना विजयी करण्यासाठी जनतेने कार्य केले पाहिजे," असे म्हटले.

या निवडणुकांचे वेळी सारा देश चैतन्याने फुलून निघाला. ठिकठिकाणचे स्त्रीपुरुष कार्यकर्ते वरील तिन्ही रणक्षेत्रात कंबर कसून उतरले. कृपलानी व लोहिया यांनी कॉंग्रेसला चारी मुंड्या चित केले. पण दुर्दैवाने दीनदयाळ उपाध्याय मात्र पराभूत झाले. सर्व विरोधी शक्ती एकत्र आली तर काय होऊ शकते याचे ते प्रथम दर्शन होते. नेहरूंनी प्रतिष्ठेच्या मानलेल्या जागा जिंकून कॉंग्रेसला नेस्तनाबूत करण्यात विरोधकांना यश मिळू शकते, हे सिद्ध झाले.

## सुधरो या टूटो

यानंतर लोहियांनी बिगरकॉंग्रेसवादाचे एक तत्त्वज्ञान बनवून ते सर्वत्र मांडण्याचा उपक्रम सुरू केला. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यासाठी जसा एक मोठा व्यापक मोर्चा ब्रिटिश-सत्तेविरुद्ध कॉंग्रेसच्या रूपाने बनला होता तसा आता कॉंग्रेसविरोधी मोर्चा बनला पाहिजे, आणि त्याने कॉंग्रेसला तुम्ही प्रथम चालते व्हा असे सांगितले पाहिजे, असे मत लोहियांनी प्रदर्शित केले. विरोधी शक्ती एकत्र येऊ नयेत यासाठी हितसंबंधियांकडून जनसंघ, कम्युनिस्ट, स्वतंत्र, रिपब्लिकन इत्यादी पक्षांवर जातीयवादी, देशद्रोही, प्रतिगामी वगैरे ठराविक शिक्के मारून ठोकळेबाज टीका करण्यात येत होती. लोहियांना ती मान्य नव्हती. सर्व विरोधक एका स्थित्यंतराच्या अवस्थेतून जात असल्याने त्यांना आपल्या उणीवा कळू लागलेल्या आहेत. परस्परांपासून दूर राहून नव्हे तर परस्परांच्या खांद्याला खांदा लावून संघर्ष आणि निवडणुका या क्षेत्रात उतरल्यास कॉंग्रेसला पराभूत करता येईल असा विश्वास लोहियांना वाटत होता. या दृष्टीने प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या आधारावर विरोधकांमधील सहमतीची क्षेत्रे शोधण्याचा लोहियांचा प्रयास होता. देशांतील कॉंग्रेससह सर्व पक्षांतील व्यक्तींना व शक्तींना एकत्र येण्याचे आवाहन लोहियांनी लोकसभेतही वारंवार केले. कॉंग्रेस सरकारविरुद्ध एक ओळीचा अविश्वासाचा ठराव हा सर्वांना एकत्र आणण्याच्या लोकसभेतील प्रयत्नाचाच एक भाग होता. या त्यांच्या उपायाला प्रतिसादही चांगला मिळाला. अशा आवाहनात फूट पडण्याची एक सुप्त शक्ती होती याची जाणीव होऊन लोकसभेत महावीर त्यागी लोहियांना म्हणाले, " आप सारी पार्टियोंमे फूट डालना चाहते है ? " लोहियांनी उत्तर दिले, " जी हां ! मैं सभी पार्टियोंमे फूट डालना चहाता हूँ । मेरा धंधा और है ही क्या ? त्यागीजी भी इधर चले आये तो बडा अच्छा होगा । " सर्व राजकीय पक्षांत फूट पडून राष्ट्रीयता, क्रांतिकारकता, समता व लोकशाही यांवर आधारलेला एक बलाढ्य पर्यायी पक्ष बनावा हे तर लोहियांचे स्वप्न होते. म्हणूनच ते म्हणत, " सुधरो या टूटो. " कोणत्याही मार्गाने शक्तिशाली एक पक्ष बनलाच असता.

या दृष्टीने १९६२ ते १९६७ या पाच वर्षांत स्वतःच्या पक्षाची कक्षा ओलांडून देशातील क्रांतिकारी विरोधी शक्तींकडे लोहियांचे नेतृत्व जात होते. एका मोठ्या प्रवाहात साऱ्या विरोधी शक्ती आल्या तर यथाकाळ त्यातील हीण आपोआप गळून पडेल, खळाळून वाहणाऱ्या त्या प्रवाहात काटेकुटे व पालापाचोळा वाहून जाईल, हेही त्यांना स्पष्ट दिसत होते. या पाच वर्षांत लोहियांनी विविध प्रयोग सुचविले आणि करून पाहिले. ते म्हणत, सरकारविरोधी एकजिनसी राजकारणाला दोन पैलू आहेत. एक होकारात्मक आणि दुसरा नकारात्मक. पहिल्या टप्प्यात लोहियांनी नकारात्मक बाजूवर भर दिला. विरोधकांनी परस्परांच्या पायात पाय न अडकविता जागावाटप करून एकच विरोधी उमेदवार उभा करावा आणि मतविभाजन टाळावे ही नकारात्मक बाजू होय. पुढे जाता होकारात्मक बाजू व्यवहारात आणण्यासाठी त्यांनी चार टप्पे सांगितले. १) विरोधकांनी एकच एक पर्यायी पक्ष बनवावा. विरोधी एकतेच्या बाबतीत हितसंबंधियांकडून मुद्दाम काही भ्रम पसरवले जातात. कोणी डाव्यांची एकजूट करावी असे म्हणतात तर कोणी राष्ट्रवादी एकजूट अशी भूमिका घेतात. या दोन्ही आघाड्या अंती सरकारच्याच पथ्यावर पडतात, हे स्पष्ट करून लोहिया म्हणाले, " डावे आणि उजवे यावर हिंदुस्थानात कधी बुद्धिनिष्ठ विचार झालाच नाही. या कल्पना फसव्या आहेत. देशातील तथाकथित डाव्या राजकारणावर कम्युनिस्ट पगडा आहे. पण त्यांनी पोटाच्या प्रश्नांवर एकांगी भर दिला आणि भाषा, जातिप्रथा, राष्ट्रीय सीमा यांसारख्या मनाशी संबंधित प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. साहजिकच हे प्रश्न तथाकथित उजव्यांच्या राजकारणाचे विषय बनले. त्यामुळे देशाचे आणि त्या दोघांचेही नुकसानच झाले. मन आणि पोट दोन्ही एकाच शरीराचे परस्परावलंबी भाग आहेत. दोन्ही प्रश्न एकाच वेळी सोडवण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. म्हणून तथाकथित डावे आणि उजवे हे विभाजन चुकीचे आहे. " २) समाजवादी एकता–समाजवादाच्या नावाने चालणाऱ्या पक्षांनी एकत्र यावे. ३) एक लक्ष्य–संघटनांमार्फत एकता. ४) संयुक्त मोर्चा. सर्व विरोधी पक्षांनी संघर्ष व निवडणुका एकत्र येऊन लढवणे. ५) स्वपक्ष मजबूत बनवणे. हे पाची उपक्रम एकाच वेळी चालू ठेवण्याची आवश्यकता लोहियांनी प्रतिपादन केली. यांतूनच कधी ना कधी एकच विरोधी पक्ष उभा राहील, असा त्यांना विश्वास होता.

जनतेत चैतन्य निर्माण करू शकणाऱ्या सर्व कार्यक्रमांभोवती आणि धोरणांभोवती कॉंग्रेस सरकार फणा उगारलेल्या काळसर्पाप्रमाणे विळखा घालून बसलेला आहे. विरोधी पक्षांमध्ये दोष आहेत. जनसंघ काहीसा जातीयवादी आहे, कम्युनिस्टांची निष्ठा देशाबाहेर आहे, स्वतंत्र पार्टी प्रतिगामी आहे, पण यांपैकी कोणीच कॉंग्रेसप्रमाणे विळखा घालून बसलेला नाही. त्या काळसर्पाला मारून तो विळखा विरोधकांनी तोडला तर प्रगतिशील धोरणे आणि कार्यक्रम मुक्त

होतील आणि राष्ट्रजीवनात ती धोरणे प्रत्यक्षात उतरवता येतील, अशी अपेक्षा लोहियांनी व्यक्त केली. हा विळखा तोडताना विरोधकांचा एक प्रश्न बनो की, व्यापक मोर्चा बनो – एक प्रश्न बनला तर फारच चांगले.– जनतेत विश्वास निर्माण करण्याचे काम ते आपल्या संघर्षांनी व संसदीय कृतीने करू शकतील, असे लोहिया म्हणत.

## बिगरकाँग्रेसी सरकारांचे यशापयश

लोहियांच्या खटपटीने १९६७ च्या निवडणुकीत काही प्रमाणात विरोधकांनी एकत्र येऊन निवडणुका लढवल्या. त्याचे दृश्यफळ म्हणजे नऊ प्रांतांत काँग्रेस गडगडली. आणि संयुक्त विधायक दले राज्य करू लागली. केंद्रात मात्र काँग्रेसच्या हातीच सत्ता राहिली. या गैरकाँग्रेसी सरकारांबद्दल लोहिया म्हणाले, धरून चाला की विचित्र विचारांच्या पक्षांची बनलेली ही सरकारे जास्त काही करू शकणार नाहीत. पण अखेरीला क्रांती तर होईल; वीस वर्षे सत्ता चालविणाऱ्या सडलेल्या सरकारचा तर अंत होईल; या परिवर्तनामुळे कोटयवधी मतदारांमध्ये आम्ही आमच्या मर्जीप्रमाणे कुणालाही राज्यावर बसवू शकतो व काढूही शकतो, आम्ही मालक आहोत, निवडून येणारे आमचे नोकर आहेत, ते अप्रामाणिक ठरते तर त्यांचे मानगूट धरून आम्ही त्यांना फेकू शकतो, असा विश्वास निर्माण होईल. ते महत्त्वाचे आहे. एकदा हा विश्वास जनतेत निर्माण झाला की, निवडून जाणाऱ्यांनाही जनतेचा धाक वाटेल.

संयुक्त विधायक दले बनवताना उदार दृष्टीही ठेवावी, पण कार्यक्रम मात्र क्रांतिकारक, ठोस आणि कालबद्ध असावा, असे लोहियांनी सांगितले. बिगरकाँग्रेसी सरकारांना प्रारंभी अनेक अडचणींशी सामना करावा लागेल, याची जाणीव देऊन लोहिया म्हणाले, "ही सरकारे उखडून टाकण्याचा प्रयत्न होईल. निर्धाराने अशा प्रयत्नांशी झुंज दिली पाहिजे. काँग्रेसच्या वीस वर्षांच्या जनताविरोधी राजवटीमुळे दुष्काळ, वाढत्या किमती, भ्रष्टाचार, अत्याचार, औदासीन्य, चैनविलास, उधळपट्टी, कामचुकारपणा इत्यादींमुळे निर्माण झालेला अभद्र वारसाही बिगरकाँग्रेसी सरकारांच्या मार्गातील धोंड आहे. हा वारसा नष्ट करून समता–समृद्धीच्या युगाचा शुभारंभ करण्यासाठी विरोधी सरकारांनी लवकरात लवकर सामान्य जनतेच्या जीवनाला स्पर्श करणारी अशी क्रांतिकारक कृती केली पाहिजे. उच्चवर्णीय, भांडवलदार, नोकरशाही इत्यादी हितसंबंधी मंडळी पदोपदी अडचण निर्माण करतील. पण अशा वेळी बिगर काँग्रेसी सरकारांनी कच खाता कामा नये. तसे झाल्यास तीही नामशेष होतील."

पंचवीस वर्षांच्या भोगवादी व सत्तालोलुप राजवटीतून उद्भवलेल्या भ्रष्ट सार्वजनिक जीवनापासून विरोधकही मुक्त नाहीत म्हणून त्यांनी सत्तेचे गुलाम न बनता, सत्तेला आपली दासी बनवली पाहिजे, असा इशारा देऊन लोहिया म्हणाले, 'काँग्रेस नामशेष झाल्यावर अपेक्षांची प्रचंड शिखरे व निराशेच्या खोल दऱ्या ओलांडत भारताला वाटचाल करावी लागणार आहे. पहिल्या सहा महिन्यांतच, आपण निरर्थक आणि सारहीन नाही, असे विरोधी सरकारांना क्रांतिकारक कृतीद्वारे सिद्ध करावे लागेल. तसे झाले नाही तर त्याही सरकाराविरुद्ध बंड करा, असे मी जनतेला सांगेन. निःशस्त्रांवर गोळीबार करणाऱ्या माझ्याच पक्षाच्या सरकारविरुद्ध मी बंडाचे निशाण उभे केले होते हे विसरू नका.'

६ मे १९६७ रोजी राष्ट्रपती निवडणूक होणार होती. विरोधकांनी सुब्बारावना राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार घोषित केले. लोहियांनी सुब्बाराव निवडून यावेत यासाठी सर्व शक्ती पणाला लावली. काँग्रेस करीत असलेल्या स्थिर सरकारच्या आणि अराजकतेच्या दाव्यावर कडाडून प्रहार करताना लोहियांनी विचारले,' प्रेतही स्थिर असते, दगड व पर्वतही स्थिर असतात, असली स्थिरता काय कामाची ? उलट जनतेच्या मंथनातूनच अमृत बाहेर पडेल.'

विरोधकांनी आपली सर्व शक्ती संघटितपणे लावली असती तर सुब्बाराव निवडून आले असते. तसे वातावरण तयार झाले होते. काँग्रेस सरकारचे धाबे दणाणले होते. इतके की गृहमंत्री व संसदीय कामकाजमंत्री यांनी राष्ट्रपतींचा पराभव म्हणजे सरकारचा पराभव नव्हे अशी उथळ, सिद्धान्तविहीन आणि निलाजरी घोषणा केली. विरोधकांमध्ये गोंधळ उडवण्याचा त्यामागे हेतू होता.

लोहिया सारखे सांगत होते की, ही निवडणूक तुम्ही जिंकलात तर वर्षानुवर्षांत न होणारे काम एका दिवसात होईल, अशी ऐतिहासिक दुर्मिळ संधी वारंवार येत नसते. सुब्बारावना विजयी बनवलेत तर कुजलेला प्रवाह खळाळून वाहू लागेल. पण करंट्या विरोधकांनी देशाच्या राजकारणाला क्रांतिकारी वळण लावणारी ही संधी गमावली. कित्येक काँग्रेसवाल्यांनी सुब्बारावांना मते दिली. पण विरोधकांची सर्व मते त्यांना मिळाली नाहीत. परिणामी सुब्बाराव पराभूत झाले. लोहियांना या घटनेचे फार दुःख झाले. यानंतर ते 'निराशेतील कर्तव्या'ची भाषा बोलू लागले.

रशिया, अमेरिका, ब्रिटन, चीन आणि फ्रान्स यांना नेहमीच प्रत्येक मागासलेल्या देशाच्या राजकारणात नाक खुपसण्याची सवय आहे. राष्ट्रपती निवडणूकप्रसंगी विशेषेकरून रशिया, व अमेरिका यांनी हस्तक्षेप केला. या देशांना हिंदुस्थानात यथास्थिती हवी असते, त्यांना क्रांती व उलथापालथ नको असते, म्हणून त्यांच्या हस्तकांनी आपल्या मालकाच्या इच्छेप्रमाणे मतदान केले. यावर प्रकाश टाकून लोहिया म्हणाले की, या घाणेरड्या परदेशी शक्तीपासून सावध राहा. लोकसभा व विधानसभा यांच्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर देशात असा विश्वास निर्माण झाला की, क्रांतियुगाला प्रारंभ झाला आहे. पण राष्ट्रपती निवडणुकीने स्थिरता आणि यथास्थिती अजूनही मूळ धरून आहेत, हे स्पष्ट झाले.

बिगरकाँग्रेसी संयुक्त विधायक दलाची सरकारे अनेक दृष्टीने निरर्थक ठरत चालली होती. अर्थात त्याचे महत्त्वाचे कारण केंद्र सरकार होते. लोहिया म्हणाले त्याप्रमाणे पटवारी बदलला होता, पण कलेक्टर कायम होता आणि तो पटवाऱ्यांना सुखाने काही करू देत नव्हता. केंद्र सरकारने पक्षपात, फूटपाडेपणा, लालूच दाखवणे इत्यादी मार्गांनी विरोधी सरकारे मोडण्याचा प्रयत्न चालवला. खुद्द आपले नाणेही खोटे होतेच. तत्त्वच्युती, स्वार्थ, सत्तालालसा, हांजीखोरपणा, भ्रष्टाचार यांनी अल्पमात्रेने का होईना संविद सरकारात शिरकाव करून घेतला होता. त्यामुळे गैरकाँग्रेसवादाचे संविदवादात– संयुक्त विधायक दलात रूपांतर होत होते. या वस्तु-

स्थतीचा फायदा केंद्र सरकारने घेतला. १९६७ च्याच डिसेंबरात हरियानात राष्ट्रपतिशासन लागू झाले तर विरोधकांना त्यांचे विधानसभेतील बहुमत दाखवण्याचा लोकसत्ताक अधिकार डावलून प. बंगालच्या राज्यपालांनी तेथील मंत्रिमंडळ बरखास्त केले. त्या-पाठोपाठ पंजाब सरकारचेही पतन झाले.

'संयुक्त विधायक दलाच्या सरकारांपैकी सर्वांत चांगले सरकार ओरिसाचे ठरले आहे', असे मत व्यक्त करून पत्रकारांना दिलेल्या ३ जून १९६७ च्या मुलाखतीत डॉ. लोहिया म्हणाले, 'त्याचे कारण त्या सरकारने सत्तारूढ होताच जमीनसारा तत्काळ नष्ट केला. पुस्तकी भाषेत ते उजव्यांचे आणि प्रतिगाम्याचे सरकार आहे.'

'महामाया प्रसाद व चरणसिंग हे दोन्ही बिहार व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री गेल्या वीस वर्षांत काँग्रेस-विरोधी भावनेचे अंग नव्हते. त्यांचे भले व्हावे अशीच माझी इच्छा आहे. पण फेब्रुवारी १९६७ मध्ये दिसून आलेली काँग्रेसविरोधी भावना आपाततः आभाळातून पडली असे त्यांनी समजू नये. त्या मागे वीस वर्षांची मेहनत होती. काँग्रेसविरोधी भावनेने लोकांमध्ये काही आकांक्षा जागृत झाल्या आहेत, त्या पूर्ण करणे आवश्यक आहे.'

बिगरकाँग्रेसी मंत्रिमंडळाच्या रूपाने विरोधी पक्षात परस्पर सामंजस्य निर्माण होणे शक्य होते. एकत्र काम करण्याने परस्परांच्या धोरणांची व कार्यक्रमाची वास्तवता भारतीय वस्तुस्थितीच्या संदर्भात पुनश्च तपासून पाहण्याची संधी त्यांना मिळाली होती. ही एक पूर्वी कधी न मिळालेली संधी होती. बुद्धी वस्तुनिष्ठ व मन उदार असते तर विरोधी पक्षांना एकत्र येऊन एकच एक विशाल पक्ष बनविण्या-साठी या संधीचा लाभ घेता आला असता. पण ते झाले नाही. लोहियांच्या अकाली निधनामुळे (ऑक्टोबर १९६७) विरोधी शक्तींना एकाच पक्षात आणण्याच्या प्रयत्नांचा नेता नाहीसा झाला. त्यामुळे १९६७ साली लोहियांनी सुरू केलेली विरोधी शक्तींना एकत्र करण्याची प्रक्रिया खंडित झाली. १९६९ पर्यंत विरोधी पक्ष एकमेकांपासून इतके दूर गेले की, आपल्या समान शत्रूचेही त्यांना विस्मरण झाले. याचा प्रत्यय राष्ट्रपती गिरी यांच्या निवडणुकीच्या वेळी आला. इंदिरा गांधी यांचे उमेदवार गिरी यांच्या विजयाचे श्रेय विरोधकांनाच द्यावे लागेल. इतकेच नव्हे तर, पुढे लोहियांचे काही अनुयायीही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या तथाकथित डाव्यांच्या एकजुटीच्या जाळयात सापडले.

## जयप्रकाशांचा प्रवेश

लोकसभा, विधानसभा निवडणुकांत (१९७१–७२) मिळालेल्या प्रचंड बहुमतामुळे इंदिरा गांधींचे केंद्र सरकार दिवसेंदिवस एकाधि-कारशाहीकडे झुकू लागले. विरोधकांचा अंकुश नाहीसा झाला. भ्रष्टाचार बोकाळला आणि १९७३–७४ साली देशापुढे एक मोठी समस्या निर्माण झाली. या जीवघेण्या परिस्थितीचा स्फोट बिहार गुजरातच्या विद्यार्थ्यांनी केला. भ्रष्टाचार निर्मूलनासाठी बिहार आंदोलनाचा प्रारंभ झाला. हे आंदोलन पूर्णपणे अपक्ष होते. ८० ते ९० टक्के युवजन राजकीय पक्षांपासून दूर होते. चळवळीचे नेतृत्व करणारांमध्ये मात्र जनसंघ, समाजवादी, भालोद व संघटना काँग्रेसचे लोक होते. तथापि जयप्रकाश चळवळीत आल्यानंतर या राजकीय पक्षांचा दबाव कमी झाला आणि संघर्षाला निर्दलीय स्वरूप प्राप्त झाले. १९७३ च्या नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये जयप्रकाशांनी युवकांना उद्देशून एक आवाहन प्रसिद्ध केले. त्यानंतर जयप्रकाशांची अनेक भाषणे विद्यार्थ्यांपुढे झाली. आपल्या भाषणांतून ते ४२ च्या क्रांतीचे स्मरण करून देत होते. निवडणूक पद्धतीत सुधारणा आणि भ्रष्टा-चार निर्मूलन यासाठी हाक देऊन जयप्रकाशांनी जनता व विद्यार्थी यांनी आपले प्रश्न आपणच सोडवावेत असे म्हटले.

५ जून १९७३ रोजी पाटणा येथे प्रचंड जनसमुदायापुढे जय-प्रकाशांचे गांधीमैदानावर भाषण झाले. त्या भाषणात त्यांनी सर्वां-गिण क्रांतीसाठी संघर्ष करण्याचे आवाहन केले. केवळ मंत्रिमंडळाचा राजीनामा किंवा विधानसभा विसर्जन एवढ्या मर्यादेपुरते आंदोलन नसून बेकारी, भ्रष्टाचारनिर्मूलन, शैक्षणिक क्रांती इत्यादी मागण्या देखील संपूर्ण क्रांतीशिवाय पदरात पडणार नाहीत, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर चळवळीच्या कक्षा रुंदावल्या. जनता सरकारे आणि छात्र-युवा संघर्ष-वाहिनी यांचा जन्म झाला. गाव आणि प्रखंड यांची व्यवस्था आपल्या हाती घेण्यास जनतेने सुरुवात केली. हळूहळू नवनिर्माणाची आस जनमानसात निर्माण झाली. विद्यार्थी आणि जनता केवळ जयप्रकाशांमुळे निर्दलीय भावनेने लढत राहिले हे तर खरेच, पण विभिन्न राजकीय पक्ष देखील आपापले पक्षीय हितसंबंध बाजूला ठेवून चळवळीत उतरले. या काळात श्री. ओमप्रकाश दीपक हे लोहियासिद्धान्ताचे कडवे समर्थक जयप्रकाशांचे उजवे हात बनून कार्य करीत होते.

विनोबांविरुद्ध बंड पुकारून संघर्षात उडी घेतल्यानंतर जयप्रकाश जनतेचे, विशेषकरून विद्यार्थ्यांचे लाडके नेते बनले. लोहियांच्या विचारांचा व गैरकाँग्रेसवादाचा धागा व प्रभाव बिहार आंदोलनात दिसल्यानंतर बिहारमधील लोहियावादी तरुणांतील क्रांतीची सुप्त आग भडकून उठली. संघर्षवादी सर्वोदयी व समाजवादी यांच्यात जवळिक निर्माण झाली. जयप्रकाशांच्या निर्दलीय आंदोलनाचा वणवा जसजसा पसरला आणि जयप्रकाशांचा तुफानी दौरा साऱ्या देशात झाला तसा सरकारचा तोल सुटू लागला. दडपशाही आणि खोडसाळ प्रचाराला मर्यादा राहिली नाही. सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय राखीव दल यांना शत्रूविरुद्ध लढण्याऐवजी व सीमेचे रक्षण करण्या-ऐवजी देशबांधवांविरुद्ध लढण्यास व त्यांचे रक्त सांडण्यास सांगण्यात आले. याविरुद्ध जयप्रकाशांनी आवाज उठवला.

देशातील जनतेविरुद्ध सैन्याला लढायला लावू नका, असे म्हणून जयप्रकाशांनी सेनेला त्यांची कर्तव्ये व जबाबदारी यांची जाणीव करून दिली. चुकीचे आदेश न पाळण्याचा सल्ला दिला. तो सल्ला संविधानाला आणि लष्करी व पोलीस कायद्याला धरूनच होता. वस्तुतः बेकायदेशीर हुकुमांचे पालन करू नका असे सांगणे म्हणजे बंडाची चिथावणी नव्हे. पण बिहार आंदोलनाने चिडलेल्या इंदिरा गांधी उठसूठ जयप्रकाश व बिहार-गुजराथ आंदोलन यांविरुद्ध तोंड-सुख घेत राहिल्या.

बिहार आंदोलन व पोलिसांना चिथावणी याबाबतची वस्तुस्थिती समजून घ्यावयास हवी. बिहार आंदोलनातील जनता सरकारांनी क्रांतीच्या पहिल्या तीन महिन्यांत गावपंचायतींची स्थापना, आवश्यक वस्तूंच्या वाटपावर देखरेख, जमीनवितरणाची पाहणी, भूदानातील

जमिनींचे वाटप, हुंडा, खर्चिक लग्ने व वैभवाचे प्रदर्शन करणारे उत्सव यांना विरोध, सफाई आणि कंपोस्ट खताची मोहीम, मतदारयाद्यांची दुरुस्ती हे कार्यक्रम पार पाडण्याचे ठरवले. संघर्ष, जनजागृती, प्रबोधन, रचनात्मक कार्य व संघटना-बांधणी या मार्गाने हे कार्य होणार होते. गावोगाव संपूर्ण क्रांतीचा कार्यक्रम पोचवणे; जनता सरकारांची उभारणी आणि छात्रयुवा-संघर्षवाहिनीची भरती हा पहिल्या महिन्यातील (१ मे १९७५) कार्यक्रम होता. नंतरच्या कार्यक्रमातही दारूबंदी, लाचलुचपत-उच्चाटन, भूमिहीनांचा प्रश्न इत्यादी कार्यक्रम होते. यात सरकार उलथण्याचा कट कुठे होता ?

त्याच चालीवर पोलिसांना बंडाची चिथावणी दिल्याची आवई उठवून इंदिरा गांधींनी जो आक्रोश केला तोदेखील बिनबुडाचाच होता. जयप्रकाश म्हणत होते, त्यात नवीन काहीच नव्हते. युद्धकाळातील बेकायदेशीर कृतीची छाननी करणाऱ्या न्यायमंडळाने दुसऱ्या महायुद्धात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हुकमाची तामिली करणाऱ्या हजारो जपान्यांना आणि जर्मनांना मानवतेच्या विरुद्धचे गुन्हेगार ठरवून त्यांना देहान्ताची सजा दिली. या जपानी-जर्मनांनी देखील वरिष्ठांचे फक्त बेकायदेशीर हुकूम मानले होते. पण न्यायमंडळाने म्हटले की, सैनिक या दृष्टीने आपले कर्तव्य, शौर्य व मानवता यांविरुद्ध तर नाही ना, याचाही विचार त्यांनी करावयास हवा होता. ॲमनेस्टी इंटरनॅशनलनेही असेच मत अगदी अलीकडे व्यक्त केलेले आहे.

इंग्रजांविरुद्धच्या लढाईत आपण 'गढवाली पलटण शस्त्रत्याग, इन्किलाब जिंदाबाद' अशा घोषणा करीत होतो. १९४२ साली म. गांधींनी देखील सैनिकांना व पोलिसांना अन्याय्य हुकूम न मानण्याचा आदेश दिला होता. व्हिएटनाम युद्धात अमेरिकन सैनिकांनी काही निरपराध व्हिएटनामींची हत्या केली तेव्हा मानवतेविरुद्ध गुन्हा म्हणून त्यांनाही सजा झाली होती.

या संदर्भात लोहियांचे म्हणणे तर आणखी विचार करण्याजोगे आहे. ते म्हणतात, 'खरोखरचं राष्ट्रीय सेनेला आपल्याच देशबांधवांवर हल्ला करायला आवडणार नाही. सैन्याला आज्ञा पाळलीच पाहिजे, असे सांगतात. परंतु वरिष्ठ अधिकारी जेव्हा आक्रमण करणाऱ्यांपुढे भेकडपणा दाखवील अथवा आपल्याच देशबांधवांवर हल्ला करायला सांगेल तेव्हा दोन्ही परिस्थितीत आज्ञा न मानणे, हेच सेनेचे कर्तव्य ठरते.'

या सर्वांचा विचार करता, या आवाहनात बंडाची चिथावणी कुठे आहे ? पण इंदिरा गांधींनी हिटलरचे तंत्र बरोबर आत्मसात केले होते. उठता-बसता, जाता-येता वेळोवेळी सारखे असत्य सांगत राहिले की, तेच खरे वाटू लागते. यानंतर तर इंदिरा गांधींची हुकूमशाही प्रतिभा वेगवेगळ्या प्रकारांनी प्रकट होऊ लागली. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी इत्यादी प्रचारसाधने विरोधकांना पूर्ण बंद झाली. जयप्रकाशांचे दूरचित्रवाणीवर व सिनेमातील न्यूज रीलमधून फॅसिस्ट म्हणून चित्र रंगवण्यात आले. सत्य आणि वृत्त यांची पूर्ण फारकत करण्यात आली आणि अखेरीला विरोधकांचे काहीही वृत्त न देण्याचे ब्रिटिशांनाही न जमलेले पाऊल त्यांनी उचलले.

१२ जूनचा गुजराथ निवडणुकीचा निकाल आणि त्यांच्या स्वतःच्या निवडणूक अर्जाचा निकाल इंदिरा गांधींविरुद्ध गेल्यावर त्या फार चवताळल्या. मन शांत ठेवून त्यांनी राजीनामा दिला असता तर जनता त्यांना डोक्यावर घेऊन नाचली असती. प्रचंड बहुमताने त्यांना निवडूनही दिले असते. त्यागाचे आकर्षण जनतेला अजूनही आहे. सद्गुणविच्छेदनाचे कार्य प्रचंड तडफेने राज्यकर्ते करीत असूनही चिरंतन मूल्ये अजूनही तग धरून आहेत. पण इंदिरा गांधींनी आपली सत्तापिपासा भागविण्यासाठी सैतानी लीला सुरू केल्या आणि मग जनता खवळली. मिसाने ही आग विझल्याचे वरवर भासत असले तरी, अग्नीवर फक्त राख साठली आहे. कोळसा झालेला नाही.

लोहियांनी सुरू केलेल्या गैरकाँग्रेसवादाची खंडित झालेली धारा सध्या दुप्पट वेगाने उसळ्या मारू लागली आहे. यापूर्वी इंदिरा गांधी विरोधकांशी मांजराने उंदरांशी खेळावे तसे खेळत असत. गिरींची निवडणूक असे खेळूनच त्या जिंकल्या. हवे तेव्हा गोंजारायचे आणि हवे तेव्हा लाथाडायचे ! पण यावेळच्या लाथा जिव्हारी बसल्या आहेत. थोडचाशा कृपाकटाक्षाने विरघळण्याची वेळ आता गेली आहे. आताचा विरोध स्थायी स्वरूपाचा राहील, आताचा संताप कापरासारखा उडून जाणारा नाही, असे दिसते. जनता पक्षात हा क्रोध संघटित झाला आहे. काँग्रेसविरोधाची परंपरा नसलेल्या अशा काही शक्ती विरोधी भूमिका घेऊन जनता पक्षात आल्या आहेत. या शक्तींनी व व्यक्तींनी निवडणुकीतील भावी विजयामागे २५-३० वर्षांची विरोधकांची तपश्चर्या आहे, हे विसरू नये. अग्निपरीक्षेतून तावूनसुलाखून निघालेल्यांचा अंकुश या नव्या पक्षावर कितपत राहतो, यावर सर्व अवलंबून आहे. निवडणुकीत यश अथवा अपयश काही मिळो, जनता पक्षाला भविष्यकाळात आपली जबाबदारी पार पाडलीच पाहिजे. जनतेला निराशेच्या खोल दरीत ढकलून चालणार नाही. त्याचप्रमाणे जनता पक्षातील संघर्षवादी क्रांतिकारक शक्तींनी आपला जागरूक पहारा ठेवून जनता पक्षाचे निवडणूकबाजीच्या आणि सत्ताबाजीच्या राजकारणात अधःपतन होणार नाही, याची दक्षता बाळगली पाहिजे. प्रवाहाबरोबर वाहत जायचे नाकारून क्रांतिकारक आणि सगुण कार्यक्रम निश्चित काळात प्रत्यक्षात आणण्यासाठी कुठलीही तडजोड न स्वीकारता तत्पर राहिले पाहिजे, तरच भविष्यकाळात काहीशी आशा करणे शक्य होईल. त्या दृष्टीने लोकप्रतिनिधींनी सत्तात्यागासही आनंदाने तयार राहिले पाहिजे.

लोहिया व जयप्रकाश यांनी स्थिरता व जडता नाहीशी करण्यासाठी गैरकाँग्रेसवादावर आधारलेली जनतेची एकता निर्माण केली, ती निव्वळ सत्तेच्या राजकारणासाठी न राबवता लोहिया-जयप्रकाशांना अभिप्रेत असलेल्या आमूलाग्र क्रांतिकारी राजकारणासाठी वापरली जाईल, अशी आशा भारतीय जनता बाळगून आहे, ही गोष्ट जनता पक्षाने लक्षात ठेवली पाहिजे. □

# दीनदयाळजींचा वारसा

ब. ना. जोग

सत्तेला सर्वस्व मानणारे राजकारणी पुष्कळ आहेत. सर्व बऱ्यावाईट गोष्टी सत्तेने करता येतात असे त्यांना वाटते. असे वाटण्यात त्यांचा मोठासा दोष नसतो. गेल्या हजार वर्षांत आपल्या देशात सत्ता या एकाच साधनाने एवढा धुमाकूळ घातला आहे की, सत्ता हेच सर्व सुखदुःखाचे मूलकारण आहे असा कोणाचाही समज व्हावा. मोगलाई, आंग्लाई या वेळची परिस्थिती सोडा, कारण ही राज्ये म्हणजे सरळ सरळ गुलामी आणि उघड उघड सुलतानशाही होती. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही हाच अनुभव येऊ लागला. सत्तेमुळे कृपेचा वर्षाव करता येऊ लागला आणि सत्तेमुळे जुलमाची बरसात करणे सोपे झाले. या सत्ताबाजीचा कळस वीस महिन्यांपूर्वी सरकारने आणीबाणी पुकारून गाठला.

पण वाईटातून चांगले निघावे तसे झाले. आणीबाणी शिथिल झाली, निवडणुका जाहीर झाल्या आणि अवघ्या आठवड्याच्या आतच जनता पक्ष नावाचा एक नवाच पर्यायी पक्ष निर्माण झाला. या पक्षाने निवडणुकांचे आव्हान स्वीकारले. एवढेच नव्हे तर, सरकार पक्षालाच आव्हाने देण्यास सुरुवात केली. आणीबाणीतील स्वातंत्र्याच्या संकोचामुळे आणि बिघडलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे जनतेलाही अशा एखाद्या नव्या पक्षाची निकड भासत होतीच. आतापर्यंत विरोधकांमध्ये वाटल्या गेलेल्या मतांच्या जोरावर काँग्रेस पक्ष बहुमतात येत होता. आता ही स्थिती बदलण्याची शक्यता निर्माण झाली म्हणून अनेक विचारवंतही जनता पक्षाच्या निर्मितीने सुखावले. पण कोठल्याही मतदाराचे ध्येय अमुक एक पक्ष सत्तेवर आणणे एवढेच मर्यादित नसते. त्या पक्षाच्या सत्तेवर येण्यामुळे देशात, समाजात, खुद्द त्या मतदाराच्या जीवनात काही बदल व्हावा अशी त्याची इच्छा असते. त्याचमुळे ही इच्छा त्या पक्षाने पूर्ण केली नाही की मतदार नाराज होतो आणि पाच वर्षांनी, आता कदाचित सहा वर्षांनी, येणाऱ्या पुढल्या निवडणुकीत एक तर मत दुसऱ्या पक्षाला देतो किंवा तो एवढा उदासीन बनतो की, मतदान करतच नाही. जनता पक्षाला येत्या निवडणुकीत सत्ता मिळो वा न मिळो त्याला निवडणुका किंवा सत्ता हेच एकमेव ध्येय डोळ्यासमोर ठेवून चालणार नाही. याच दृष्टीने जनता पक्षाला देशाच्या सर्वांगीण जीवनाचा विचार करावा लागेल. जनसंघाचे दिवंगत अध्यक्ष पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांचा मागोवा घेणे या संदर्भात उचित ठरेल.

दीनदयाळजींच्या सर्व प्रतिपादनात सत्ता ही तुलनेने कमी महत्त्वाचा विषय असे. समाजाला जागृत करणे, समाजात चैतन्य निर्माण करणे, या देशाचा उद्धार मीच केला पाहिजे अशी प्रेरणा व्यक्तीत निर्माण करणे यांवर त्यांचा भर असे. सत्तेवर असलेल्या सरकारलाही ते याच निकषावर बरे-वाईट ठरवत असत. स्वातंत्र्य हा जनतेचा मूलभूत अधिकार आहे, पण तो अधिकार मूठभर सत्ताधाऱ्यांची किंवा थोड्याशा धनिकांची मिरासदारी चालवण्यासाठी राबवला जात आहे याचं त्यांना दुःख होत असे. आम्ही सत्तेवर आलो तर काय करू याचा ऊहापोह प्रत्येक पक्षाच्या जाहीरनाम्यात असतो, पण सत्तेवर नसतानाही आपण काय केले पाहिजे याची आखणी दीनदयाळजी सतत करीत असत. मात्र त्यांना राज्यसत्तेच्या सर्वंकष स्वरूपाची पूर्ण जाणीव होती. विसाव्या शतकातील या विज्ञानयुगात राज्यसत्ता किती सर्वगामी झाली आहे हे ते बारकाईने पाहत. म्हणूनच सत्तेशिवाय समाजकार्य करण्याची प्रेरणा कार्यकर्त्यांना देत असतानाच सत्तेवर आल्यानंतर आपण काय करावे, किंवा विद्यमान सरकारने काय करावे याचे मार्गदर्शनही ते करत असत. काही उदाहरणेच पाहू:

अन्न ही मनुष्याची पहिली गरज. ते पुरेसे निर्माण करण्यास सर्वतोपरी साहाय्य करणे हे सरकारचे पहिले कर्तव्य. पण आपल्या सरकारने याबाबत सोपा मार्ग पत्करला. PL 480 ने अमेरिकेतून प्रचंड प्रमाणावर धान्य आणण्यास सुरुवात केली. अमेरिकेने आपल्याला अन्नान्न दशेतून वाचवले म्हणून अमेरिकेची तोंड भरून स्तुती होऊ लागली. अन्न आणि स्वातंत्र्य एकत्र नांदू शकतात याचा हा पुरावाच होय (Freedom and Food), असा गाजावाजा करण्यात आला. पं. दीनदयाळजींनी या धान्याच बनावाचे मोठे कठोर विश्लेषण केले. अमेरिकेतून भारताने एवढ्या मोठ्या प्रमाणावर धान्याची आयात केल्याबरोबर (१·७० कोटी टन) ऑस्ट्रेलिया आणि कानडा यांनी आपली बाजारपेठ बुडाली अशी ओरड सुरू केली. त्यावर उतारा म्हणून वरील १ कोटी ७० लक्ष टन धान्याशिवाय आणखी काही धान्य आम्ही या देशांतून खरेदी करू असे आश्वासन भारताने दिले ! या अधिक धान्याची मुळीच जरूरी नसताना !! या सर्वांचे एकाच वाक्यात त्यांनी वर्णन केले—'भारतीय शेतकऱ्याला भिकेला लावून अमेरिकन शेतकरी पोसणारे कृत्य !' परदेशातून आम्ही यापुढे अन्नाचा एक कणही आणणार नाही अशी घोषणा पं. नेहरूंनी १९५१ साली केली. त्यानंतरच्या वीस वर्षांत सरकारने १२ कोटी टन धान्याची आयात केली. आता तर कहरच झाला. गेल्याच महिन्यात पन्नास हजार टन सोयाबीन तेल अमेरिकेतून आयात करण्याची घोषणा सरकारने केली आहे ! कालिकतच्या जनसंघ अधिवेशनात १९६८ साली दीनदयाळजींचे झालेले अध्यक्षीय भाषण या दृष्टीने

फार महत्त्वाचे आहे. त्यात त्यांनी अन्न-स्वावलंबनाबरोबरच खत-स्वावलंबनाचा पुरस्कार केला. व्यावहारिक, आर्थिक अनुसंधानच्या राष्ट्रीय परिषदेच्या एका प्रतिवृत्तात म्हटले आहे की, सिंद्री खत-कारखान्यात तयार होत असलेल्या खताच्या दसपट खत देशात फुकट जाते. या वृत्ताचा उल्लेख करून दीनदयाळजी म्हणाले की, 'पण आम्ही आमच्या घरचे टाकून देऊन परदेशी वस्तूंना आमंत्रण देत आहोत.' त्यांच महिन्याच्या अखेरी ते मुंबईत आले असताना शिवाजी-उद्यानावर त्यांचे जाहीर भाषण झाले. ते म्हणाले, 'भिकेची भाकरी नको, भीक मागणारे सरकार नको.' हे त्यांचे मुंबईतील शेवटचे भाषण. दीनदयाळजींना सरकार का नको होते, ते परदेशाकडून भिकेची भाकरी आणते म्हणून, आणि स्वतःच्या देशातील जनतेला भिकारी बनवते म्हणून !

जनता पक्षाने या वैचारिक अधिष्ठानाचा विचार केला पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी भारताचे शोषण केले. न्यायमूर्ती रानडे यांनी प्रथम या शोषणाचा दंभस्फोट केला आणि सार्वजनिक काका, लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, महात्मा गांधी यांनी स्वदेशीचा पुरस्कार आणि परदेशीचा बहिष्कार हा मंत्र जनतेला दिला. पण स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वतः काँग्रेसनेच आपल्या सरकारकरवी या मंत्राला तिलांजली दिली. सरकारच्या अनुमतीने, प्रेरणेने आणि आग्रहाने आपल्या देशात हजारो परदेशी धंदे चालू झाले आहेत आणि स्वदेशी धंद्यांच्या मुळावर येऊन हे परकी धंदे अब्जावधी रुपयांचा फायदा परदेशांत पाठवून आपली सारी अर्थव्यवस्था खिळखिळी करून टाकत आहेत. सकाळी उठल्यापासून दात घासण्याच्या पेस्टपासून रात्री झोपताना मालवण्याच्या दिव्यापर्यंत शेकडो परदेशी बनावटीच्या वस्तू आपल्या समाजजीवनाचे अविभाज्य अंग बनलेल्या आहेत. या परकी भांडवलदारांना येथे उद्योगधंदे काढण्यास द्यावयाच्या परवान्यापासून त्यांच्या मालविक्रीच्या जिल्ह्याजिल्ह्यांच्या मिळवण्याच्या एजन्सीपर्यंत एक प्रचंड यंत्रणा तयार झाली असून, या यंत्रणेची उभारणी काँग्रेस सरकारने केली आहे. या यंत्रणेतून स्थानिक हितसंबंधियांना सोन्याचे तुकडे मिळतात आणि त्यांच्या ठगेगिरीने निवडणुकांचा पसारा मांडला जातो. या सर्व दुष्टचक्रातून सुटण्यासाठी निवडणुकांत विरोधी पक्षांचे उमेदवार निवडून आणणे आवश्यक झाले आहे. जनता पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांचा आणि प्रचारकांचा आवाका एवढा मोठा करणे आवश्यक आहे. निवडणूक का जिंकावयाची ? या प्रश्नाचे उत्तर अशा विविध प्रकाराने दिले पाहिजे. या जाणीवेने भारलेले कार्यकर्ते हीच जनता पक्षाची खरी हिंमत ठरली पाहिजे.

गेली अनेक वर्षे सर्व देश शासनाच्या प्रचाराच्या जाळ्यात अडकला आहे. देशाने प्रचंड प्रगती केली, असे एकदा नव्हे हजारदा सांगण्यात येत आहे. अठरा वर्षांपूर्वी जबलपूरला 'शक्तिमान' या लष्करी ट्रकचे उद्घाटन पं. नेहरू यांच्या हस्ते झाले. केंद्रातले अर्धा डझन मंत्री, डझनभर लष्करी अधिकारी हे त्या समारंभाला उपस्थित होते. सरकारी क्षेत्रात (म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रात !) तयार झालेला पहिला देशी ट्रक असे त्याचे वर्णन करण्यात आले. पं. दिनदयाळजींनी या देशी ट्रकची चिरफाड केली. एंजिन आणि चॅसी परदेशांतून आणवून त्यावर फक्त लाकडी सांगाडा बांधण्याचे काम आपल्या देशात करण्यात आले होते ! स्वदेशात संपूर्ण ट्रक तयार करण्याची सर्व शक्यता आणि साधनसामग्री असताना पं. नेहरूंच्या सरकारने तसे करण्यास नकार दिला होता. थोडक्यात म्हणजे 'भारतीय नागरिक भिकेला लावून परदेशी नागरिकांची भर करण्याचे अर्थकारण' स्वतंत्र देशाच्या काँग्रेस सरकारने चालविले होते. ही गोष्ट जनतेला समजावून सांगितली पाहिजे, असा दीनदयाळजींचा आग्रह होता. जनसंघाच्या कार्यकर्त्यांसमोर आर्थिक विषयावर त्यांचे अभ्यासवर्ग होत असत. एका PL 480 वर त्यांची ओळीने पाच भाषणे झाली होती !

ते पुराण्या अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते नव्हते किंवा जुनी समाजरचनाही त्यांना मंजूर नव्हती. नवीन ज्ञान, नवीन विज्ञान यांचे ते चाहते होते, पण या ज्ञानविज्ञानाचे मनुष्याने दास न बनता त्यांनाच मानवतेचे दास बनवले पाहिजे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. पाश्चात्य अर्थशास्त्र आणि आधुनिक विज्ञान यांची सांगड घातली गेल्यावर 'अधिकाधिक गरजा निर्माण करणारा आणि त्या पूर्ण करण्यासाठी सर्व सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब करणारा' नवाच मनुष्य निर्माण झाला. या मनुष्याच्या हाती राजसत्ता गेल्यावर तिचे स्वरूप किती स्वार्थी होते याचा प्रत्यय सर्वत्र येतो आहे. संपत्तीचे महत्त्व दीनदयाळजींना पूर्णपणे माहीत होते आणि संपत्तीचा वरचष्माही त्यांना अवगत होता. म्हणून ते म्हणत, 'संपत्तीचा अभाव आणि संपत्तीचा प्रभाव या दोन्ही गोष्टी हानिकारक आहेत.' स्वदेशात वस्तूंचे, धान्यांचे, म्हणजेच संपत्तीचे भरकस उत्पादन आणि या संपत्तीचे न्याय्य, वाटप हा त्यांच्या अर्थनीतीचा पाया होता. रशियाची साचेबंद आणि सरकारी अर्थव्यवस्था किंवा पाश्चात्यांची अनिर्बंध आणि मक्तेदारी अर्थव्यवस्था त्यांना मंजूर नव्हती. सरकारच सर्व काही करेल याबर त्यांचा विश्वास नव्हता, उलट जनतेनेच सर्व करावे आणि सरकारने त्या सर्व करण्याला साहाय्य करावे, अशी त्यांची धारणा होती. पंचवीस वर्षांपूर्वी समाजवादी पक्षाने लॅंड आर्मीची कल्पना मांडली होती. विनोबांनी भूदानाची मोहीम उभारली होती, यात हीच धारणा होती. जनतेला केवळ मतदानाचे आवाहन न करता, ग्रामसफाईपासून धान्योत्पादनापर्यंत सर्व क्षेत्रांत तिला काम करण्यास उद्युक्त करणे, हीच आजची निकड आहे. यात स्वातंत्र्य आहे, स्वराज्य आहे, मानवता आहे. विज्ञानयुगात अर्थव्यवस्थेची चाल केंद्रीकरणाकडे आहे, पण ती आपोआप नाही. धनिकांनी आणि सत्ताधाऱ्यांनी हातात हात घालून हे केंद्रीकरण केले आहे. आता जनता आणि सत्ताधारी यांची हातमिळवणी करून अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. मुंबईत तयार झालेली पेन्सिल किंवा साबण खेडेगावात विकला जायचा आणि खेडेगावातला मनुष्य बेघर अवस्थेत राहून मुंबईतल्या पेन्सिलीच्या, नाहीतर साबणाच्या कारखान्यात राबायचा, हा अमानुष

**संपत्तीचा अभाव आणि संपत्तीचा प्रभाव हानिकारक**

कारभार थांबला पाहिजे. जनतेच्या राज्यकारभारात सहभाग करण्याचा चंग बांधून ग्रामपंचायतीपर्यंत संस्था निर्माण करण्यात आल्या. पण अर्थकारणाचे मात्र असे विकेंद्रीकरण करून जनतेला स्वतःच्या आर्थिक उन्नतीत सहभाग असण्यास नकार देण्यात आला. त्यामुळे सामान्य जनता उपाशी, निष्क्रिय आणि उदासीन बनली. राजकीय विकेंद्रीकरणदेखील वरवरचे झाले, खरोखरी झाले नाही. म्हणूनच चक्र इतक्या वेगाने उलट फिरले की, गावचा सरपंचच काय, पण राज्याचा मुख्यमंत्री देखील चुटकीसरशी दिल्लीकडून हाकलला जाऊ लागला. धनसत्ता आणि राजसत्ता यांची हातमिळवणी झाल्यामुळे आपल्या सोन्यासारख्या स्वातंत्र्याचे अगदी पोतेरे झाले. जनता पक्षाला स्वातंत्र्यलढा करावयाचा आहे, तो केवळ आणीबाणीविरुद्ध किंवा एका पक्षाविरुद्ध नव्हे. जनतेत चैतन्याची लहर उसळवून तिला आपल्या स्वतंत्र प्रतिभेने विकासासाठी उद्युक्त करण्याची मोठी जबाबदारी या नवीन पक्षावर आहे. काँग्रेसने तीस वर्षे सत्ता भोगली आणि देशाला विनाशाच्या आणि जनतेला हुकूमशाहीच्या गर्तेत लोटले. निवडणूक ही या विनाशाच्या आणि हुकूमशाहीच्या विरुद्ध सुरू झालेल्या लढ्याची पहिली फेर आहे. अशा वेळी पं. दीनदयाळजींसारख्या प्रखर देशभक्त, डोळस विज्ञाननिष्ठ, यथार्थवादी अर्थशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, राजकारणी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सहृदय महामानवाची आठवण न झाली तरच नवल. काँग्रेस 'नकाराच्या मतावर' (Negative Vote) निवडून येते. कारण ५७ टक्के मतदारांनी काँग्रेस नको असा निवडणुकीत कौल दिला तरी, प्रचलित पद्धतीप्रमाणे काँग्रेसचेच सरकार बनते, म्हणूनच विरोधी पक्षांनी समान कार्यक्रमावर एकत्र यावे, असे त्यांचे म्हणणे होते. त्यांनी स्वतःच्या हयातीत १९६७ साली देशभर अनेक राज्यांत संयुक्त मंत्रिमंडळे बनवून राजकीय स्थित्यंतराला सुरुवात केली होती. ही संमिश्र सरकारे कायम टिकतील असे त्यांना वाटत नसे, कारण सत्तापिपासी आणि राज्यकर्त्यांनी माजविलेला भ्रष्टाचार हाच आपल्या राजकीय जीवनाचा स्थायीभाव झाला आहे असे ते म्हणत. संमिश्र मंत्रिमंडळे ही एक प्रक्रिया आहे, ती चालू राहील आणि त्यातूनच जनतेचा कैवारी असा एक समर्थ पर्यायी पक्ष बनेल, अशी भविष्यवाणी त्यांनी केली होती, तो जनता पक्ष आज साकार झाला आहे. सत्तापिपासा आणि भ्रष्टाचार यातून बाहेर पडून जनतेसाठी स्वराज्य, जनतेसाठी स्वातंत्र्य आणि जनतेसाठी पक्ष या भक्कम आधारावर या पक्षाने उभे राहिले पाहिजे.

संपत्तीचा अभाव आणि संपत्तीचा प्रभाव या दोनही गोष्टी हानिकारक आहेत, असे दीनदयाळजी म्हणत. त्याच धर्तीवर असेही म्हणता येईल की, सत्तेचा अभाव आणि सत्तेचा प्रभाव या दोनही गोष्टी हानिकारक आहेत. जयप्रकाशांनी त्यांच्या स्वगत या चिंतनिकेत म्हटले आहे की, 'जनतेसाठी संपूर्ण क्रांती सतत चालू राहील. जनताभिमुखी सरकार आले म्हणजे या क्रांतिकार्याला सरकारचेही साहाय्य होईल.' सत्तेचा अभाव या क्रांतिकार्याला मारक ठरतो आणि सत्तेचा प्रभाव हा या क्रांतिकार्यालाच दाबून टाकतो. गेल्या वीस महिन्यांचा हा धडा आहे. □

# अर्थविचार । उपाध्याय आणि लोहिया

## राजेंद्र व्होरा

राममनोहर लोहिया हे श्रेष्ठ समाजवादी तत्त्वज्ञ म्हणून ओळखले जातात. समाजवादी चळवळीतील त्यांचे स्थान महत्त्वपूर्ण बनले याचे कारण त्यांचे नेतृत्व व तत्त्वज्ञान. या दोन्हीं क्षेत्रात विशेष कामगिरी बजावणारे व्यक्तिमत्त्व म्हणून लोहियांप्रमाणे जनसंघात दीनदयाळ उपाध्याय यांचे स्थान आहे. जनसंघाच्या विचारसरणीवर उपाध्यायांची विलक्षण छाप पडलेली दिसून येते. या पक्षाची सैद्धान्तिक बाजू समर्थपणे सांभाळणारे विचारवंत असे उपाध्यायांचे वर्णन करता येईल. या लेखात या दोघांच्या आर्थिक विचाराचा मागोवा घेण्याचे ठरविले आहे.

जनसंघाची जी काही प्रतिमा महाराष्ट्रात आहे, त्यामध्ये त्यांच्या आर्थिक विचाराचा फारसा संबंध येत नाही. या पक्षाच्या आर्थिक धोरणाची तशी फारशी चर्चा होत नाही. या पक्षाच्या नेत्यांच्या भाषणांतही आर्थिक विचारसरणीकडे विशेष लक्ष असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अशी एक समजूत होण्याचा संभव असतो की, जनसंघाचे म्हणून असे काही आर्थिक विचार नाहीत. तथापि प्रत्यक्षात जर दीनदयाळ उपाध्याय यांच्या लेखनाचा अभ्यास केला तर असे आढळते की, त्यांनी आर्थिक प्रश्नांवर सखोल विचार केला आहे. समाजवादी पक्षाची जी प्रतिमा आहे, त्यामध्ये एकूण समाजवादी अर्थव्यवस्था, राष्ट्रीयीकरण याच गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. परंतु प्रत्यक्षात मात्र राममनोहर लोहिया यांनी आर्थिक समस्येचा गंभीर विचार करून आपली वेगळी आर्थिक विचारसरणी सांगितलेली आहे. लोहियांनी आर्थिक व्यवस्थेचा विचार करताना प्रथम हे स्पष्ट केले आहे की, साम्यवादी व भांडवलशाही व्यवस्थांपेक्षा वेगळी अर्थव्यवस्था समाजवादी तत्त्वज्ञानास स्वीकारावी लागेल. साम्यवादाकडून उत्पादनाच्या साधनांची सामाजिक मालकी हा सिद्धांत समाजवाद्यांनी घेतला, तर भांडवलशाहीकडून लोकशाहीचे तत्त्वज्ञान घेतले. परंतु समाजवादास खरे तर स्वतःचे तत्त्वज्ञान निर्माण करावयास हवे. भांडवलशाही व साम्यवाद हे एकाच संस्कृतीमधील दोन भाग किंवा प्रकार आहेत. फरक आहे फक्त मालमत्तेबद्दलचा. दोन्ही व्यवस्थांचे आर्थिक ध्येय काही प्रमाणात समानच आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचे उद्दिष्ट दोन्ही व्यवस्थांनीही आपल्या समोर ठेवले आहे. साम्यवादी व्यवस्था फक्त उत्पादन–संबंध बदलते, पण उत्पादनाचे तंत्र साम्यवाद्यांनी भांडवलशाहीकडूनच उचललेले आहे. सतत वाढत जाणारे राहणीमान आणि आधुनिक उत्पादन–तंत्राच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर होणारे उत्पादन याबाबतीत दोन्हीही व्यवस्था समान आहेत. त्यांच्यामुळे जगाच्या २/३ लोक-

संस्थेस ै कमालीची गरिबी सहन करावी लागते आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात शस्त्रास्त्रांची स्पर्धा निर्माण होऊन अशांतता निर्माण होते.

भारतासारख्या देशांनी या दोन्ही व्यवस्थांच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे. साम्यवादी व भांडवलशाही व्यवस्थांचे आर्थिक ध्येय व सर्वसाधारण ध्येय हे विकसनशील देशांच्या दृष्टीने गैरलागू आहे. एक तर प्रचंड प्रमाणावरील उत्पादनासाठी आवश्यक असलेले भांडवल हे देश पुरवू शकत नाहीत आणि स्वातंत्र्य व शांततेचे सर्वसाधारण ध्येय साम्यवादी व भांडवलशाही व्यवस्थेत वाढत जाणाऱ्या राहणीमानाशी जोडता आलेले नाही. म्हणूनच या दोन्ही व्यवस्था व त्यांची ध्येये भारतासारख्या देशात निरुपयोगी आहेत. या देशात सरासरी राहणीमान इतके कनिष्ठ दर्जाचे आहे की सतत वाढते राहणीमान या कल्पनेस काही अर्थच उरत नाही.

भारतासारख्या देशांना नवीनच अर्थव्यवस्थेचा शोध घेतला पाहिजे. उत्पादनाचे नवे तंत्र व त्याप्रमाणे मालकी हक्काची योजना शोधावी लागेल. लोहियांना अल्पप्रमाण यंत्रामध्ये या समस्येचे उत्तर सापडले होते. वीज किंवा तेल यावर चालविलेले लहान यंत्र लहान शहरांत व खेड्यांत जाऊ शकेल. त्याचा उत्पादनासाठी ताबडतोब उपयोग करता येईल. अशा यंत्र व उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावरील भांडवल गुंतवणुकीची जरूरी भासणार नाही. विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाचे सर्व सार या यंत्रात उतरले आहे. यामुळे प्रश्न तातडीने सुटण्यास मदत होईल व गुंतागुंत टाळता येईल. या अल्पप्रमाण यंत्रामुळे विकसनशील समाजाचे फक्त आर्थिक प्रश्नच सुटतील असे नाही, तर सर्वसाधारण ध्येय (स्वातंत्र्य व शांततेची स्थापना) सुद्धा गाठता येईल. जेथे तांत्रिकदृष्ट्या मोठे यंत्र जरूर असेल तेथे ते वापरता येईल. परंतु भर असेल तो छोट्या यंत्रांवर.

नवीन व्यवस्थेत खाजगी मालमत्ता जाणारच. परंतु ज्या ठिकाणी एका व्यक्तीने दुसऱ्यास नोकरीवर ठेवण्याचा प्रश्न उद्भवत नाही, त्यांचा अशा बाबतीत अपवाद करावा लागेल. जेव्हा सर्व मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण होईल तेव्हा राज्य-संस्था मोठ्या प्रमाणावरील उत्पादनास सुरुवात करेल. परंतु सरकारी व्यवस्थापन फार कार्यक्षम असणार नाही. त्यामुळे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. सरकारी नियंत्रणामुळे उत्पादकाच्या स्वातंत्र्यावरही मर्यादा येतील. काही मालमत्ता खेड्याच्या मालकीची करावी लागेल, त्याचप्रमाणे विभागाच्या, प्रांताच्या मालकीची करावी लागेल. ज्याप्रमाणे केंद्रशासनाकडे मालकी जाईल त्याप्रमाणे ती सहकारी संस्थेकडेही जाईल. समाजवादाचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. विभागीय व स्थानिक पातळीवर हे विकेंद्रीकरण करावे लागते. योग्य तत्त्व व स्थानिक परिस्थितीप्रमाणे सत्तेचा वापर यांतून हे विकेंद्रीकरण होईल. अशा स्वायत्त दिशेने समाजवादाची प्रगती करावी असे लोहियांचे सांगणे होते. त्यांची 'चार खंबा राज्य' ही संकल्पना या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. या पद्धतीत खेडे, जिल्हा, प्रांत व केंद्र यांना ठराविक कार्ये असतील आणि वरीलप्रमाणे अर्थव्यवस्था प्रगत झाली तर आर्थिक प्रश्न सुटेल व स्वातंत्र्यही टिकेल असा लोहियांचा विश्वास आहे. शेतीमध्ये 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व त्यांनी सांगितले आहे. त्याकरिता मोठ्या जमीनधारकांकडून जादा जमीन काढून घेऊन ती भूमिहीन व छोटे शेतकरी यांच्यात वाटावी लागेल. सहकारी शेतीस प्रोत्साहन दिले जावे; लहान पाटबंधारे योजना सुरू कराव्या; कामगारांना राज्य महामंडळाच्या व्यवस्थापनामध्ये पुरेसे व परिणामकारक प्रतिनिधित्व द्यावे.

## आर्थिक लोकशाही

दीनदयाळ उपाध्याय यांनी 'भारतीय अर्थनीती' या पुस्तकामध्ये आपले आर्थिक विचार प्रकट केलेले आहेत. याशिवाय 'राष्ट्रचिंतन', 'राष्ट्रजीवनकी समस्यां ए' इत्यादी पुस्तकांतूनही त्यांचे अर्थव्यवस्थाविषयक लेखन प्रसिद्ध झालेले आहे. या लेखनातून त्यांनी आर्थिक लोकशाहीचे ध्येय स्वीकारलेले आहे आणि भांडवलशाही व साम्यवादी व्यवस्थांचा धिक्कार केला आहे. या व्यवस्थांऐवजी भारतीय संस्कृतीने आदर्श मानलेले आर्थिक जीवन त्यांनी योग्य मानले आहे. त्यांच्या मते भांडवलशाहीतील अनिर्बंध स्पर्धा भारतीय जीवनाशी न जुळणारी आहे. त्याचप्रमाणे साम्यवादी रचनेतील वर्गसंघर्ष आपल्याला न मानवणारा आहे. 'आर्थिक मानव' ही पाश्चिमात्य कल्पना उपाध्यायांना मान्य नाही. साम्यवादी व भांडवलशाही व्यवस्थांमध्ये अधिकाधिक उत्पादन व उपभोग यावर भर दिलेला आहे व त्यातून दुःख निर्माण झालेले आहे, असे त्यांना वाटते. उत्पादनाच्या साधनांवरील मालकीचा प्रश्न सोडला तर, या दोन्ही व्यवस्थांत फारसा फरक नाही. काही मूठभर लोकांचा फायदा या व्यवस्थांमध्ये होतो. सामान्य लोकांना आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य नावापुरतेच मिळते.

म्हणून उपाध्यायांनी सुचविले आहे की, या दोन्ही प्रकारांऐवजी भारतीय प्रकृतीशी मिळतीजुळती अर्थव्यवस्था आपणास स्वीकारली पाहिजे. लोकशाहीवर आधारित, विकेंद्रीकरणावर भर देणारी अर्थव्यवस्था निर्माण केली तर आपले प्रश्न सुटतील, असे त्यांना वाटते. मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे व्यक्तीची रचनात्मक क्षमता नष्ट करतात. या व्यवस्थेत मनुष्यच यंत्राचा एक भाग बनतो. विकेंद्रीकरणावर आधारित उद्योगव्यवस्थेत व्यक्तीची रचनात्मक शक्ती प्रकट होते. विकेंद्रीकरण म्हणजे यंत्राचा त्याग, असा अर्थ या ठिकाणी त्यांना अभिप्रेत नाही. विकेंद्रीकरणासाठी यंत्र लहान करावे लागेल. मोठ्या यंत्रांचा त्याग करावा लागेल. काही उद्योगात मोठ्या यंत्रांचा वापर करावा लागेल, परंतु अशा उद्योगांमध्ये उपाध्याय यांच्या मते व्यक्तीची मालकी असू नये. त्याऐवजी राज्यसंस्थेची मालकी असावी. विकेंद्रीकरणामुळे संपत्तीच्या केंद्रीकरणास आळा बसेल. खेडी अधिकाधिक स्वावलंबी होतील. व्यक्तीला प्रेरणा मिळाल्याने उत्पादन व गुणवत्ता वाढेल. ज्याप्रमाणे राजकीय क्षेत्रात ग्रामपंचायत लोकशाही विकेंद्रीकरण साधते तसेच कुटिरोद्योग व कृषी-उत्पादन केंद्र यांच्या विकेंद्रित उत्पादनव्यवस्थेमुळे खरीखुरी आर्थिक लोकशाही प्रस्थापित होते. स्वयंसेवी क्षेत्राची निर्मिती झाली पाहिजे आणि व्यक्ती व कुटुंब हे आर्थिक विकेंद्रीकरणाचे घटक बनले पाहिजेत. व्यक्तिगत प्रयत्नांनी आणि कौटुंबिक भावनेच्या आधारावर संपत्ती निर्माण झाली तर विषमता व शोषण नष्ट होईल.

उपाध्याय यांच्या मते अविकसित अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राची जरूरी भासते. कारण खाजगी भांडवल काही क्षेत्रांत गुंतवले

जात नाही. अशा परिस्थितीत राजकीय आणि सामाजिक ध्येयांच्या पूर्तीसाठी राज्यसंस्थेला या उद्योगात उतरावे लागते. आधारभूत उद्योग आणि सार्वजनिक सेवा या क्षेत्रांत राज्यसंस्थेला पुढाकार घ्यावा लागतो. तसेच खाजगी क्षेत्रापुढे आदर्श ठेवण्यासाठी व त्याला पूरक म्हणून राज्यसंस्थेला काही उद्योग सुरू करावे लागतात. अन्न-धान्यांचा व्यापार, बँका, विमा, दळणवळण, विदेशी व्यापार इत्यादी क्षेत्रांत राज्यसंस्थेने हस्तक्षेप करावा, असे उपाध्यायांचे मत होते.

मजुरांना त्यांच्या मते व्यवस्थापनात सहभाग मिळावा व नफ्यात भागीदारी मिळावी. त्याचप्रमाणे संचालक मंडळावर प्रतिनिधित्वही मिळावयास हवे. प्रत्येकास काम करण्याचा हक्क घटनेने द्यावा. बेकारी नष्ट करण्याचा तो एक भाग आहे, असे उपाध्यायांना वाटते. शेतीमध्ये अतिरिक्त जमीन काढून घेऊन, ती भूमिहीनांमध्ये वाटावी लागेल. मात्र जमीनदारांना पुनर्वसन अनुदान शासनाने द्यावे, असा उपाय त्यांनी सुचविला आहे.

राममनोहर लोहिया आणि दीनदयाळ उपाध्याय यांच्या आर्थिक विचारांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, त्यांच्यामध्ये बरेच साम्य आहे. दोघेही भांडवलशाही व साम्यवादाचे विरोधक होते. केंद्रीकरणावर आधारित पाश्चिमात्य अर्थव्यवस्था दोघांनाही मान्य नव्हती. मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे त्यांना दोषपूर्ण वाटले. खरीखुरी लोकशाही स्थापन होण्यासाठी विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा स्वीकार त्यांनी केलेला आहे. भांडवलशाहीतील असमानता व संपत्तीचे केंद्रीकरण त्यांना पटत नव्हते. तसेच साम्यवादातील हुकूमशाही त्यांच्या तत्त्वाविरुद्ध जात होती. लहान प्रमाणावरील उद्योगधंदे, खेड्यांमध्ये विखुरलेले उद्योगधंदे, लहान यंत्र यांसारख्या कल्पनांनी ते दोघे भारावून गेलेले दिसतात. विकेंद्रित अर्थव्यवस्थेमध्ये त्यांना भारतीय समस्येचे अंतिम उत्तर मिळाले आहे असे वाटते. लोहिया आणि उपाध्याय यांच्या आर्थिक विचारात एवढे साम्य आढळण्याचे कारण कोणते असावे? खरे तर आजवर एकमेकांच्या विरोधात उभे ठाकलेले हे दोन राजकीय पक्ष. त्यांच्या जनमानसातील प्रतिमा कालपरवापर्यंत तशाच होत्या. लोहिया समाजवादी म्हणजे त्यांचे सर्व विचार जनसंघाच्या उपाध्यायांच्या विरोधीच असणार, असा एकदा ग्रह करून घेतला म्हणजे मग या साम्याकडे दुर्लक्ष होणे साहजिकच आहे. परंतु हे साम्य कितपत खरे आहे आणि साम्य असण्याचे महत्त्वाचे कारण कोणते, याचा विचार केला पाहिजे.

### भारतीय संदर्भ हा दुवा

असा विचार केल्यावर असे लक्षात येते की, दोघेही पूर्णपणे भारतीय संदर्भात विचार करीत आहेत. भारतीय समाजाचे प्रश्न भारतीय पद्धतीने सोडवावयाचे आहेत, याबद्दल त्यांच्या मनात शंका नाही. पाश्चिमात्यांचे अनुकरण करून भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रश्न कदापि सुटणार नाहीत, याबद्दल दोघांनाही खात्री वाटते. लोकशाही मूल्य-व्यवस्था दोघांनीही स्वीकारलेली आहे. त्यामुळे त्या मूल्यांच्या प्रतिष्ठापनेस योग्य अशी अर्थव्यवस्था असावी असे दोघांनाही वाटणे साहजिक होते. आणि त्यातूनच त्यांनी विकेन्द्रित अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेला दिसतो. मोठ्या प्रमाणावरील उद्योगांमुळे कोणत्या समस्या निर्माण होतात, स्वातंत्र्याचे कसे अपहरण होते, याचे दर्शन त्या दोघांना झाले होते. म्हणूनच छोटे उद्योग, अल्पप्रमाण यंत्र यांचा पुरस्कार त्यांच्याकडून झालेला आहे.

भारतीय संदर्भात जो कोणी विचार करतो त्यास महात्मा गांधींच्या विचारापासून फार दूर जाता येत नाही, हेही या दोघांच्या विचारातील साधर्म्यामुळे सिद्ध होते असे वाटते. लोहियांनी गांधींचे ऋण मानले आहे. त्यांना विसाव्या शतकातील महान तत्त्वज्ञ मानले आहे. गांधींच्या विचारातील उणीवा दाखवून देऊन लोहियांनी गांधींचा त्यांच्या विचारावर झालेला परिणाम मान्य केलेला आहे. दीनदयाळ उपाध्याय यांचे अर्थनीती हे पुस्तक वाचताना किंवा इतरत्र लिहिलेले अर्थशास्त्रविषयक लेखन अभ्यासताना असे ध्यानात येते की, उपाध्यायांना महात्मा गांधींच्या आर्थिक विचाराचा बराचसा महत्त्वाचा भाग पूर्णपणे मान्य होता. कारण गांधींच्या विचारात व उपाध्यायांच्या लेखनात कमालीचे साम्य आढळते. उपभोगाचा अतिरेक, उत्पादनाचा अतिरेक, यंत्राने निर्माण केलेली हुकूमशाही, यंत्राने निर्माण झालेली बेकारी, पाश्चिमात्य संस्कृतीमधील दोष व त्यामधले मानवाचे दुय्यम स्थान, कुटिरोद्योगावरील भर, ग्रामपंचायत, इत्यादी मुद्द्यांवर उपाध्याय व म. गांधी यांच्या विचारात सारखेपणा आढळतो. याचे कारण उपाध्याय व गांधी भारतीय संदर्भात विचार करीत होते. लोहिया व उपाध्याय यांच्या आर्थिक विचारातील जे साम्य आहे ते गांधींच्या विचारांचा त्यांच्यावर जो परिणाम झालेला आहे त्यामुळे आहे असे स्पष्टीकरण देणे अयोग्य होणार नाही. □


पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# परंपरा आणि परिवर्तन

एक हिंदुत्ववादी

भारतीय राजकारणात अनुशासनपर्वानंतर नवे राजकीय रचनापर्व सुरू होत आहे, हे एका अर्थानें सूचक आहे. ही युगप्रवर्तक घटना आहे. या घटनेने राजकीय जीवनात अनुशासन येईल. संसदीय लोकशाहीला आवश्यक असलेली वैचारिक प्रवाहांची निश्चित बैठक मिळेल. जनता पक्षाची स्थापना हा गेल्या तीस वर्षातील राजकीय प्रक्रियांचा स्वागतार्ह शेवटचा टप्पा आहे.

या प्रक्रियेत भारतीय जनसंघ समाविष्ट झाल्याबद्दल सत्तारूढ काँग्रेसचे नेते त्या पक्षाची कडबोळे म्हणून चेष्टा करीत आहेत. त्यांच्या वैयक्तिक मांद्याचे ते लक्षण असले तरी, त्यात ऐतिहासिक मानसिक अढीही आहे. पूर्वग्रह आहेत. पूर्वग्रह ही सुद्धा एक मानसिक स्थिती असते. ती मनाची निरगाठ असते. ती सुटण्यास वेळ लागतो. वस्तुतः भारतीय जनसंघ या प्रक्रियेत सामील झाला यात वर वर विसंवाद दिसत असला तरी, मुळाशी गेल्यानंतर तसे वाटणार नाही. गेल्या तीस वर्षांतील विविध राजकीय पक्षांचे विचार तपासले तर, त्यात फक्त हिंदुत्ववादी व मार्क्सवादी हे दोनच वैचारिक संप्रदाय आहेत. काँग्रेसमध्ये गांधीवादी फक्त नावालाच आहेत. गांधींच्या छायाचित्राखेरीज गांधीजींचे काँग्रेसमध्ये काहीही स्थान उरलेले नव्हते. नेहरूंनी आपल्या राजकारणात किंवा अर्थकारणात गांधीवादाचा स्वीकार केला नव्हता. केवळ गांधीजींची प्रतिमा राजकीय प्रभावासाठी वापरण्याखेरीज गांधीजींचा काँग्रेसला काहीच उपयोग नव्हता. सत्तेच्या राजकारणातील काँग्रेसची परंपरागत मते मिळविण्यासाठीच काँग्रेसने गांधीजींचा उपयोग केला. तेव्हा गेल्या तीस वर्षांत काँग्रेस म्हणजे लोकशाहीच्या यंत्रणेचा उपयोग करून दर पाच वर्षांनी सत्ता बळकावणारा राजकीय कार्यकर्त्यांचा प्रचंड गट झाला होता. म्हणून काँग्रेस हीच वस्तुतः अशा जाती, भाषा, अल्पसंख्य या विविध सामाजिक शक्तींच्या आधारावर उभ्या असलेल्या सत्तागटांची आघाडी होती. आजही ती तशीच आहे. म्हणून जनता पक्षाला खिचडी म्हणताना आपल्या पक्षाची चिकित्सा करण्याचे कष्ट जर या नेत्यांनी निवडणुकीची धुंदी उतरल्यावर घेतले तर, त्यांना जनता पक्ष हा भारतात राजकीय युगांतर घडविणारा पक्ष ठरणार आहे, हे लक्षात येईल.

वस्तुस्थिती अशी होती की, यात सामील झालेले देशातील बहुतेक विरोधी पक्ष, (कम्युनिस्ट व हिंदुत्ववादी या खेरीज) काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या गटांनी किंवा व्यक्तींनी स्थापन केलेले पक्ष होते. यात राजकीय अपरिहार्यता असली तरी, त्याचे राजकीयदृष्ट्या वैचारिक समर्थन करणे अशक्य होते. पण काँग्रेसच फुटल्यानंतर जी राजकीय प्रक्रिया सुरू झाली, त्यात सत्ताकारणी विरुद्ध इतर सर्व पक्ष असा संघर्ष सुरू झाला होता. सामान्य माणसाला आकर्षित करण्यासाठी 'गरिबी हटाव' किंवा समाजवाद यासारखी ब्रीदे काँग्रेसने निवडणुकीत घेतली तरी, त्या पक्षाच्या निष्ठा त्यांच्या आधारावर कधीच जोपासल्या गेल्या नाहीत. त्यामुळे ध्येयवादी, समाजपरिवर्तनवादी पक्ष म्हणून काँग्रेस कधीच झाला नाही. राजकीय संधिसाधूंचा कुंभमेळा हेच त्याचे स्वरूप राहिले. आजही आहे. सत्ता टिकविण्यासाठी जे काही लोकहिताचे सोंग आणता येईल तेवढे त्यांनी आणले. आता तर एकतंत्री राजवटीत त्याचे रूपांतर झाले आहे. सारांश, त्याला वैचारिक बैठक नाही. केवळ वैचारिक दिशाभूल करण्यासाठी काही घोषवाक्ये काँग्रेसने घेतली आहेत.

आता जे विरोधी पक्ष एकत्र आले आहेत त्यात म. गांधींच्या काँग्रेसमधून बाहेर पडलेले तीन पक्ष आहेत. तेव्हा त्या दृष्टीने त्यांची राजकीय परंपरा समान आहे. पण भारतीय जनसंघ हाच वेगळा वैचारिक परंपरा असलेला पक्ष आहे. त्याला जातीय म्हणून हिणवण्यात आले आहे. आजही राजकीय अस्पृश्य समजून त्यांचा तुच्छतेने उल्लेख करण्यात येतो. अशा लोकांच्याबरोबर जयप्रकाश कसे सहकार्य करतात, याचे आश्चर्य व्यक्त करण्यात येते. किंवा गेल्या दीड वर्षात जनसंघाला या तीनही पक्षांपासून वेगळे ठेवण्यासाठी नाना प्रकारच्या राजकीय कल्पना व डावपेच राजकर्त्यांनी करून पाहिले. जनसंघाची संघटित शक्ती व त्याचे निष्ठावान कार्यकर्ते नव्या राजकीय पक्षाला मिळू नयेत हाच त्यामागचा राजकीय हेतू होता. पण त्यात वैचारिक अढीही होती. ती खुद्द या तिन्ही पक्षांच्या पुढाऱ्यातही होती. पण काळाने या सर्वांना एकत्र आणले आणि त्यांच्यातून हे नवे राजकीय धातुमिश्रण झाले आहे.

पण जनसंघ खरोखरीच जातीय होता का? जातीयता आणि राष्ट्रीयता यांचा शास्त्रीय अभ्यास किती राजकीय नेत्यांनी केला आहे? आपण पाश्चात्यांच्या अनेक राजकीय संकल्पना घेतल्या, त्यामुळे आपण आपल्या देशाकडेही त्यांच्याच दृष्टिकोनातून पाहातो. तीच परिभाषा वापरतो. साधे उदाहरण, 'मध्ययुगीन' या शब्दाचे. हे मध्ययुग कोणाच्या इतिहासातले? भारताचे की युरोपचे? पण आजही हा शब्द भारतीय राजकीय परिभाषेत बसू शकत नाही. तसेच भारताच्या राष्ट्रीयत्वाचे आहे. राष्ट्र या शब्दाने जी आधुनिक संकल्पना डोळ्यासमोर आज येते ती निःसंशय पाश्चात्य आहे. मग ब्रिटिश येण्यापूर्वीच्या हिंदूंच्या समाजजीवनाचे वर्णन कसे करावयाचे? ब्रिटिश आल्यानंतर त्यांनी भारत हे राष्ट्र आहे काय, असा प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

त्याला प्रत्युत्तर म्हणून टिळक, चिपळूणकर, अरविंद, विवेकानंद यांच्या काळात भारताच्या वेदान्ती परंपरेचा उल्लेख केला जाई... आणि वेदान्त हे भारतीयत्वाचे गमक मानून त्याचा उल्लेख होई. म्हणजे तो आध्यात्मिक राष्ट्रवाद पाश्चात्य राष्ट्रवादाला उत्तर म्हणून पुढे आला. वेदान्ती व्यक्तित्व हे भारताचे वैशिष्ट्य आहे व आमच्या राष्ट्रीय अस्तित्वाचे ते व्यवच्छेदक लक्षण आहे असे टिळकांनी मानले होते. पण वेदान्तापलीकडे जाणारे–वैदिक धर्मापलीकडे जाणारे– व्यापक हिंदुत्व हे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी प्रथम मांडले. या हिंदु अहंतेचे सावरकर हे पहिले सूक्तकार आहेत, हे निःसंशय आहे. सावकरांचे हिंदुत्व वेदप्रामाण्य मानीत नाही. म्हणून सामाजिकदृष्ट्या ते अधिक व्यापक होते. त्यातूनच त्यांची हिंदु राष्ट्र ही कल्पना आली व तिच्या आधारानेच त्यांनी हिंदु संघटनेची चळवळ केली. रा. स्व. संघानेही हीच व्याख्या ग्राह्य मानली व हिंदू संघटनेचा प्रयत्न सुरू केला. पण त्या काळी हिंदू–मुस्लीम प्रश्न उग्र झाल्याने या सर्व आंदोलनाला प्रतिक्रियावादी स्वरूप आले. सावरकरांच्या पुरोगामी हिंदुत्वाकडे दुर्लक्ष झाले आणि त्यांच्या आक्रमक किंवा अहंमन्यवादी स्वरूपाला प्राधान्य आले. 'जातीय' हा शब्द शिवीसारखा वापरला गेला. आजही तो तसाच वापरला जातो. पण या गदारोळात भारताच्या राष्ट्रीयत्वाची निर्मिती अशा व्यापक राष्ट्रीय हिंदू समाजाला वगळून करता येईल काय, या प्रश्नाचे कोणीच उत्तर दिले नाही. शेवटी राष्ट्र जसे एखाद्या सीमा वा भूप्रदेशावर उभे असते तसे राष्ट्र कोणत्या तरी समाजाची अहंता यावर उभे असते, हे लक्षात ठेवले पाहिजे. भारतात राष्ट्रनिर्मिती करावयाची असेल तर हिंदुत्वाला वगळून होऊ शकेल काय ?

पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हिंदुत्वाची व्याख्या केली नाही तरी, हिंदू स्वयंसेवक संघ न म्हणता राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हटले, यातच भारताच्या राष्ट्रीयत्वात हिंदुत्व समाविष्ट आहे असे गृहीत धरले आणि संघटना सुरू केली. पुढे संघाच्या स्वयंसेवकांनी जेव्हा प्रथम पंजाबमध्ये राजकीय पक्ष काढण्याचे ठरविले त्यावेळी 'भारतीय' शब्द वापरला. तेव्हा त्यांच्या कार्यकर्त्यांत वादही झाला. हिंदू शब्दाचा काही जणांनी आग्रह धरला. पण स्वतः कै. गोळवलकर गुरुजींनी भारतीय व हिंदू हे समानार्थी शब्द मानायला हरकत नाही असे सांगितले आणि भारतीय जनसंघ हे नाव ठेवले गेले. भारतीयत्वात हिंदुत्व समाविष्ट आहे, हीच त्या मागची कल्पना आहे. त्यात आंतर्विरोध नाही, हे स्पष्ट आहे, खरे म्हणजे भारतीय हे हिंदुत्वाचे उत्क्रांत रूप मानले पाहिजे. संकल्पनांची व्याप्ती अशी वाढणे असंभवनीय नाही.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सुद्धा १९०७–८ च्या कवितेत हिंदू अहंतेला अश्वत्थ वृक्ष कल्पिले. हा विराट वृक्ष या देशात हजारो वर्षे उभा आहे. या वृक्षाची पाळेमुळे या देशाच्या भूमीत खोलवर गेलेली आहेत. म्हणून हिंदुत्वाची अहंता म्हणजे भारताची अहंता असे समीकरण झाले आहे. हा भारतीय राष्ट्रवाद भूमिजन्य नाही, हिंदुत्व मात्र या भूमीशी निगडित झाले आहे. सावरकर म्हणत त्याप्रमाणे सिंधूविना हिंदू ही कल्पना असंभाव्य आहे. तसेच हिंदुत्वाविना भारतीयत्व असंभाव्य आहे. हे नाते इतिहासाने जोडले आहे. त्या दृष्टीने ते अतूट आहे. सावरकरांनी एकदा म्हटले होते, अगस्तीच्या अंजलीत जसा सागर तसा 'हिंदू' या शब्दात गेल्या पाच हजार वर्षांचा भारताचा सामाजिक इतिहास सामावलेला आहे. म्हणून हिंदू अहंता हा संकुचित जातीय अहंकार नाही, तो राष्ट्रीयत्वाशी–भारतीयत्वाशी–विरोध नसलेला व्यापक अहंकार आहे.

राष्ट्रीयत्वाला सामाजिक अहंता लागते. व्यक्तीच्या अस्तित्वाच 'मी' हा मूलाधार असतो तसा राष्ट्राच्या व्यक्तित्वाचा 'आम्ही' हा मूलाधार असतो. या 'आम्ही'तूनच इतिहासाची परंपरा निर्माण होते. ती परंपरा राष्ट्राच्या सातत्याला आवश्यक असते. वैयक्तिक जीवनांत आत्मविस्मृती जितकी घातक असते तितकीच राष्ट्रीय जीवनात परंपरेची विस्मृती–म्हणजेच 'आम्ही कोण'ची विस्मृती–घातक ठरते. पण परंपरेइतकेच परिवर्तनही महत्त्वाचे असते. लहानपणी मुलाचे नाव ठेवतात तेच शेवटपर्यंत असते. त्या नावाभोवती–त्या घराण्याभोवती–त्या व्यक्तीचे जीवन गुंफले जाते. तो त्याच्या जीवनाचा भाग असतो. त्या जीवनात सतत परिवर्तन होते. पण व्यक्ती तीच राहते. तसेच राष्ट्राची परंपरा हे त्याचे व्यक्तित्व असते; (National Personality) ती बदलत नाही. बदलते ती रचना. तेव्हा परंपरा आणि परिवर्तन या विरोधी गोष्टी नाहीत. तसेच परंपरा व आधुनिकीकरण या विरोधी कल्पना नाहीत. भारतीय राष्ट्रपरंपरेवर आधारलेले असले तरी ते आधुनिक झाले पाहिजे. सावरकरांच्या शब्दांत अद्यतन झाले पाहिजे. हे अद्यतन स्वरूप त्याची परंपरा ठेवून त्याला देता येईल. म्हणून भारतीय जनसंघ भारतीय राजकारणाच्या आधुनिक प्रक्रियेत सामील झाला, हे समयोचित झाले.

जनसंघामध्ये राष्ट्रीय अहंता व स्वाभिमान यांचे बाळकडू घेतलेले कार्यकर्ते आहेत, या जनता पक्षाचे ते आधारबळ ठरेल. जनता पक्षाचे ते वैभव ठरेल. ते कार्यकर्ते 'परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रम्' या प्रार्थनेची दीक्षा घेतलेले कार्यकर्ते आहेत. फक्त वैभवाचा मार्ग व कार्यक्रम निश्चित झाला त्या दिशेने त्यांना जावयाचे आहे. □


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# चिती आणि विराट

नारायण

भारताच्या राजकीय क्षितिजावर 'जनता पक्ष' हा नवा तारा जेव्हा चमकू लागला आहे, त्यावेळी अनेकांच्या अनेकविध अपेक्षा व्यक्त होणे अती स्वाभाविक असेच आहे. सुमारे एक वर्षापूर्वी यमुनातीरीच्या तिहाड नामक बंदिशालेत बीजरूपाने या ताऱ्याचे लुकलुकणे सुरू होऊन १९७७ च्य जानेवारीच्या मध्यावर हा तारा उदयाला आलेला आहे. बंदिवासाशी याचे जे साहचर्य आहे ते ध्यानी घेऊन अनेकांना हा नवा पक्ष म्हणजे कृष्णावतार वाटू लागलेला आहे. कंसाला वाढत्या वयाच्या कृष्णाचा जसा वचक वाटू लागला होता, त्रसाच वचक काँग्रेस पक्षाला या नव्या 'जनता पक्षा'चा वाटू लागला असल्याने, या नव्या पक्षात जे जे सामील झाले आहेत, त्यांचे दायित्व अनेक पट वाढलेले आहे.

'जनता पक्ष' ही नवी शक्ती आहे. तिचा सद्य:स्थितीतील प्रादुर्भाव ही एक 'ऐतिहासिक अपरिहार्यता' आहे, असे पण अनेक निष्पक्ष विचारवंतांना वाटू लागलेले आहे लोकसभेची आगामी (सहावी) निवडणूक हे निमित्त झाले असले तरी नित्याच्या अखंड प्रवाही राष्ट्रीय जीवन-धारेला प्रबल व प्रभावी बनविण्यासाठी या नव्या शक्तीला सिद्ध व्हावे लागणार आहे. राजकीय जीवनप्रवाहातून 'निवडणूक' जर वगळली तर काय शिल्लक राहील, राहते, याचे समाधानकारक उत्तर सध्यापुरते तरी सत्तारूढ (काँग्रेस) पक्षाजवळ नाही. कारण, गेल्या सहा वर्षांत (१९७१ ते १९७७) सत्ताकारण म्हणजेच राजकारण असे समीकरण रूढ करण्यात आलेले असून, 'प्रचलित राजकारण' म्हणजे एका निवडणुकीपासून दुसऱ्या निवडणुकीपर्यंतची (वा पोटनिवडणुसाठीची) धडपड, लटपट वा खटपट एवढाच अर्थबोध होऊ लागलेला आहे. नव्या 'जनता' पक्षाला यामुळेच आगामी निवडणुकीच्या घुमश्चक्रीतून उसंत मिळताच मौलिक व मूलभूत चिंतन करून, विचारमंथन करून जनजागरणाचे (जनजागृतीचे) महान् ऐतिहासिक कार्य हाती घ्यावे लागणार आहे. जनता पक्षाचे बहुतेक सर्व प्रमुख धुरीण या दिशेने विचार करीत आहेत, असा सुखद योग अनुभवाला येत आहे. कारण, त्यामुळेच निवडणूक प्रचारात जय वा पराजय याला प्राधान्य लाभलेले नसून, 'भविष्यात भारताला कोणत्या दिशेने (कोणत्या वाटेवर) जावयाचे आहे याचा निर्णय करा,' अशा आवाहनावरच अधिक भर दिला जात आहे. लोकनायक जयप्रकाशजींपासून सामान्य गल्लीतील पुढाऱ्यांपर्यंत सर्वचजण एक स्वराने सांगत आहेत की, राष्ट्रीय जीवनधारेचा प्रवाह विशुद्ध व निर्मळ करून निकोप लोकशाहीचा पाया भारतात घालण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे.

निव्वळ निवडणुकीचे राजकारण हे काही राष्ट्रीय जीवनाचे सारसर्वस्व होऊ शकत नाही, होऊ शकणार नाही, असा विशुद्ध विचार अनेकांच्या, अगदी पंतप्रधानांच्याही, मनात डोकावू लागला आहे. त्या आशयाचे अभिप्रायही आवश्यकतेनुसार प्रकट होऊ लागलेले आहेत.

नेमक्या अशा अवस्थेत 'जनता पक्ष' घटकांना पं. दीनदयाळजी, डॉ. राम मनोहर लोहिया, लोकनायक जयप्रकाशजी आदी थोर विचारवंत नेत्यांनी गेल्या सुमारे २५ वर्षांत जे मौलिक चिंतन सर्वांसमोर विचारार्थ मुक्तपणे मांडलेले आहे, त्याचे उत्कटतेने स्मरण होत आहे. डॉ. लोहिया अनेक प्रसंगी सत्तारूढ पक्षाला फटकारताना, अती परखड शब्दांत सद्य:स्थितीचे समालोचन करताना म्हणत असत की, 'अंग्रेज तो चला गया। किन्तु, अंग्रेजियत पिछे रह गई है।' पं. दीनदयाळजी याच आशयाचा आपला अभिप्राय सौम्य व सुबोध शब्दांत मांडीत असत की, '१९४७ में हम स्वतंत्र हुए, अंग्रेज भारत छोडकर चले गये. हमने अनुभव किया कि राष्ट्र–निर्माण के हमारे प्रयत्नों मे जो सबसे बडी बाधा समझी जाती थी वह टूट गयी. परकीय सत्ता जो हमे अपनी इच्छानुसार अपने जीवन–निर्माण से रोके थी, नहीं रही.' इतकी चांगली अवस्था लाभली; सुवर्णसंधी निर्माण झाली, तरी 'अंग्रेजियत' (परकीयांची पडछाया) भारतात मागे रेंगाळत का राहिली? राष्ट्रीय जीवनधारेचा प्रवाह स्वाभिमानी समाजाला साजेल, शोभेल, आणि समर्थ बनवील अशा स्वतंत्र प्रतिभेने, प्रेरणेने का गतिमान झाला नाही? असे अनेक अनुषंगिक यक्षप्रश्न नव्या संदर्भात अनेक विचारवंतांना अधूनमधून सतावू लागले. राष्ट्रजीवनाचा जो पैलू प्रकर्षाने प्रसंगविशेषी विकलांग झाल्याचा अनुभव येई त्या पैलूपुरता प्रासंगिक वा तात्कालिक उपाय सर्वांसमोर मांडला जाऊ लागला. संपूर्ण समाजजीवनाचा समग्र व सम्यक विचार दृष्टीआड होऊ लागून वरवरची उपाययोजना, नव्या नव्या व फसव्या घोषणांचे द्वारा होऊ लागली. आणीबाणीच्या गेल्या सुमारे वीस महिन्यांत सत्तारूढ पक्षातील काही प्रमुख व्यक्तींनाही 'राजकीय सोय' म्हणून काही 'स्व'देशी विचारांचे माहात्म्य आठवू लागलेले आहे. 'अन्य देशांत जी लोकशाहीची कल्पना वा रूढ संकेत आहेत, ते आपण का मानावेत? भारतीय परिस्थितीनुसार त्यात परिवर्तन आवश्यक नाही का?', 'येथे जे कायदे (कानून) अस्तित्वात आहेत ते परकीय न्यायप्रणालीवर वा सिद्धान्तांवर आधारित आहेत. त्यात परिवर्तन करणे आवश्यक नाही का? हे जोखड झुगारून द्यावयाचे असेल तर, भारताला आपल्या निव्वळ न्यायदान पद्धतीतच नव्हे तर (लिगल एज्युकेशन) न्याय (कायदे) शिक्षणशास्त्राचीच पुनर्रचना करावी लागेल.' आदी विचार मौक्तिके आणीबाणीच्या अवस्थेतील अडचणींमुळे प्रकट झालेली आहेत.

'स्व'तंत्र प्रतिभेचा व प्रेरणेचा अभाव काही अंशी नकळत एका विशिष्ट प्रकारच्या न्यूनगंडाला निर्माण करून जातो. या न्यून-

गंडाचा गैरलाभ घेण्यासाठी टपलेली आणि 'स्वतःला श्रेष्ठ' समजणारी काही परराष्ट्रे प्रसंगी भारताला आंतरराष्ट्रीय संबंधात, क्षेत्रात, हिणविण्यासही मागेपुढे पाहत नाहीत. या संदर्भातील एक ताजे व ठळक पण विशेष प्रकाशित न झालेले उदाहरण म्हणजे काही वर्षांपूर्वी कम्युनिस्ट चीनच्या सत्ताधाऱ्यांनी भारताच्या त्यावेळच्या पेकिंगस्थित कार्यवाहक राजदूतासोबत अनौपचारिकरीत्या धाडलेला निरोप! या अनौपचारिक व मानभावी निरोपाचा आशय असा होता की, भारत–चीन सीमा–विवादाचे निराकरण करण्यासाठी कम्युनिस्ट चीन सदैव सिद्ध आहे. 'परंतु, भारताने याविषयी बोलणी करताना, वाटाघाटी करताना, जुन्या इंग्रज राज्यकर्त्यांच्या करारमदारांचा आधार वा वारसा घेऊन बोलू नये! भारताने आपली स्वतंत्र प्रतिभा व प्रज्ञा प्रकट करून बोलणी करावीत म्हणजे भारताला सर्व प्रकारे सोयीस्कर असे सीमा, निर्धारण चीन घडवून आणील!' या निरोपापूर्वीच माओद्वारा 'मोनालिसा' छाप स्मित दाखवून कार्यवाहक राजदूत श्री. बी. सी. मिश्रा यांचे स्वागत केले गेल्याचा उदोउदो आपल्या देशात झालेला होता. (एकेकाळी भारतीय राजकारणातील 'चाणक्य' व 'राजगुरू' म्हणून ज्यांची गणना होत असे, त्या पं. द्वारकाप्रसाद मिश्रा यांचे हे कार्यवाहक राजदूत सुपुत्र असल्याने त्यांचेवर स्मिताचा वा मानभावी निरोपाचा परिणाम झाला नाही, हे वेगळे.) असे कोणीतरी हिणविले, चिडविले, डिवचले म्हणजे आपले राष्ट्र-जीवन काही क्षण ढवळून निघते! त्यानंतर मात्र पुन्हा सर्वत्र कसे 'सारे शांत शांत' असे होऊन जाते! राष्ट्र-जीवनातील ही नेमकी उणीव दूर करण्यासाठीच पं. दीनदयाळजींनी भारताचा 'विराट' जागृत करण्याचे कठीण कार्य सर्वांसमोर सोपे करून विचारार्थ मांडून ठेवलेले आहे.

पं. दीनदयाळजींनी यासाठी सर्वप्रथम काही विचारप्रवर्तक प्रश्न उपस्थित करून ठेवले आहेत. ते म्हणत असत की, 'हमारा लक्ष्य क्या है? हमे कहा पहुंचना है? अपनी प्रतिभा और प्रकृति के बल पर प्राप्त होनेवाली हमारी उपलब्धि का स्वरूप क्या है? जिस स्थान पर जाना है उसे अनुरूप हमें साधनों का विचार करना पडेगा जो यात्रा में आवश्यक है. परंतु जो कही जानेवाला नहीं, जिसका लक्ष्य तय नहीं, यदि वह यात्रा की आवश्यक वस्तुएं जुटाने का प्रयास करेगा तो उसका प्रयास व्यर्थ है. इसी तरह हमारे राष्ट्रीय जीवन की यात्रा है. यह यात्रा कहांसे प्रारंभ हुई? कहां पर समाप्त होगी? जिसका विचार करने पर हम कुछ बाते निश्चित कर पाते है.' हे सारे प्रश्न आणि त्याचे विवेचन इतके सोपे आहे की, कोणीही समंजस सामान्य नागरिकसुद्धा आपल्या मनाशी काही निश्चित खूणगाठ बांधू शकेल. निव्वळ गूढगुंजनात्मक वा घटपटादी चर्चा करीत बसण्याची वा स्वप्नरंजनात रममाण होण्याची हौस पं. दीनदयाळजींच्या स्वभावात नसल्याने ते विशद करीत असत की, 'काल और परिस्थिति के अनुसार बाहरी ढांचे मे चाहे जो परिवर्तन होते रहे किंतु राष्ट्र की मूल प्रकृति नही बदलती. जिन सिद्धांतों को चरितार्थ करनेके लिए राष्ट्र का आविर्भाव हुआ है उनका पालन होते रहने तक 'चिती' विद्यमान रहती है.' समाजजीवनातील हे अस्मितायुक्त चैतन्यच जनतेला जागृत ठेवून 'समर्थ, स्वावलंबी, कार्यक्षम, विजयी आणि नित्य नवोन्मेषकारी शक्तीने युक्त' असे बनवीत असते.

या अस्मितायुक्त चैतन्याचे (चितीचे) अधिक विश्लेषण करताना पं. दीनदयाळजी सांगत असत की, 'यह 'चिती' जनसमूह के प्रत्येक व्यक्ति में मातृभूमि के प्रती परमसुख की भावना रूपसे रहती है. वह सर्वोत्कृष्ट सुख जिसके समक्ष अन्य सब बातें फिकी लगें, इस 'चिती' द्वारा स्थापित होता है. इसकी झलक व्यक्ती के सब प्रकार के कार्यो में दिखाई पडती है. उसके समस्त व्यापार, निःशेष चेष्टायें अखिल कर्म इसी 'चिति' के प्रकाश से चैतन्य रहता है. जब तक 'चिति' जागृत और निरामय रहती है तब तक राष्ट्र का अभ्युदय होता रहता है. इसी चेतना के आधार पर राष्ट्र संगठित होता है. 'चिति' से जागृत और एकीभूत हुई समष्टि की प्राकृतिक क्षात्र शक्ति अर्थात अनिष्टोंसे रक्षा करनेवाली शक्ति 'विराट' कही जाती है.' जनताजनार्दनाच्या ठायी ही जी सुप्त शक्ती असते, ती निव्वळ राजकीय हालचालींनी वा राजकीय घुमश्चक्रीने निर्माण होऊन जागृत राहू शकणार नाही. त्यासाठी व्यक्तिजीवनाची मूळ बैठक पं. दीनदयाळजी विशद करून सांगत असत. कारण आधुनिक परिभाषेत 'माणूस हा एक राजकीय प्राणी आहे.' (Man, is a political being) असेच गृहीत धरून अनेक प्रसंगी काही ठोकताळे मांडले जात असतात. त्याऐवजी पं. दीनदयाळजी सांगत असत की, यापेक्षा अधिक व्यापक स्वरूपात 'माणूस' वावरत असतो. 'माणूस हा एक बरे–वाईट समजणारा (सद्सद्विवेक बुद्धियुक्त) प्राणी आहे. (Man is a rational being) या आशयाची व्याख्या, परिभाषा, त्यांना अधिक संमत होत असे. कारण, निव्वळ राजकारण वा निव्वळ 'निवडणूक' कारण काही या प्राण्याला 'माणूस' बनवू शकत नाही व शकणारही नाही, असा त्यांचा दृढ विश्वास होता, आणि अशी माणसे वा माणसांचा समूहच 'जनता' वा 'जन' या नावाने ओळखला जातो. या संदर्भात पण एक अति सूक्ष्म व मार्मिक विचार ते मांडीत असत. 'जिस प्रकार व्यक्ती पैदा होता है, बनाया नही जाता, उसी प्रकार 'जन' की भी एक स्वतंत्र, स्वयंभू सत्ता है.'

या 'जन' वा 'जनता' जनार्दनाचे ठायी जी नैसर्गिक अशी प्राणशक्ती आहे, संरक्षक अशी क्षात्रशक्ती आहे, तिला जागृत करण्याचे काम करावयाचे आवाहन करताना पं. दीनदयाळजी म्हणत असत की, 'आपल्या प्राचीन संस्कृतीविषयी अभिमान बाळगून, पण त्याच वेळी वर्तमानकाळाचा नीट अभ्यास करून व भविष्यकाळाविषयी समुचित महत्त्वाकांक्षा ठेवून या कार्याचा शुभारंभ आपण करावा.' अर्थात हे कार्य करताना जी सावधगिरी बाळगणे आवश्यक तिचे भान करून देताना ते म्हणत की, 'हे कार्य करीत असताना आपण भारतास कुठल्या तरी जुन्या जमान्याची प्रतिकृती बनवू नये. विश्वाचे ज्ञान व आजपर्यंतची आपली परंपरा यांच्या आधारावर आपण असा भारत निर्माण करू की, जो आपल्या पूर्वजांच्या भारताहूनही अधिक गौरवशाली असेल.'

पं. दीनदयाळजींच्या विचारांचा मागोवा घेऊन सूत्ररूपाने त्यांचे विचार मांडण्याचा हा यत्न करीत असताना लक्षात येते की, त्यांनी सुचविलेला मार्ग व त्या मार्गावरील सांभाळावयाची पथ्ये ही सहजसाध्य कोटीतली नसून कष्टसाध्य कोटीतली आहेत. सामान्यतः सर्वांची प्रवृत्ती, काही अपवाद वगळता, सहजसाध्य गोष्टी करण्याकडेच असते. पण ज्यांनी महत्कार्याचे कंकण बांधलेले असते, त्यांच्या मनाला मात्र 'कार्य कष्टसाध्य' म्हणून पाठ फिरविण्याचा विचारसुद्धा शिवत नाही. उलट पक्षी एक नवे आव्हान (चॅलेंज) म्हणून ही मंडळी त्याचे स्वागतच करीत असतात. आणि अशीच मंडळी 'इतिहास' निर्माण करीत असतात. नवोदित राजकीय पक्षातही निव्वळ विरोधाकरता विरोध या भूमिकेला अद्याप तरी थारा लाभलेला नसल्याने आजपर्यंत निराश झालेल्या निःपक्ष निरीक्षकांनाही 'जनता' पक्षाबद्दल आशा वाटू लागलेली आहे. काही निश्चित, भरीव व विधायक स्वरूपाचे कार्य या नव्या पक्षाचे कार्यकर्ते हाती घेतील आणि 'जिवंत' राष्ट्रीय समाज काय काय करू शकतो, याचे मूर्तिमंत स्वरूप जगासमोर प्रस्तुत करू शकतील, अशा अपेक्षाही व्यक्त होऊ लागलेल्या आहेत.

०० 

# लोकशाहीसाठी नागरिकाने काय करावे ?

**मत**

- ☐ 'मला काय त्याचे' ही वृत्ती सोडून द्यावी.. राजकारणातील घडामोडीं-विषयी आपले काही कर्तव्य आहे, याची जाणीव बाळगावी.
- ☐ अशा घडामोडींविषयी सगळी माहिती करून घ्यावी, सर्व बाजू समजावून घ्याव्यात.
- ☐ आपले मत विचारपूर्वक बनवावे. सर्व समाजाचे हित साधणे व सर्वांना व्यापक न्याय मिळणे या कसोट्या मानाव्यात.
- ☐ आपले मत निर्भयपणे मांडावे. कुणाचीही भीती किंवा भीड मानू नये.

**मन**

- ☐ 'मला कुणाचे गुलाम होणे आवडणार नाही. म्हणून मी कुणाचा धनी होणार नाही.' आब्राहम लिंकनचे हे वचन आचरणात आणावे.
- ☐ 'दुसऱ्याने आपल्याला हीन लेखू नये असे वाटत असेल तर, जात-धर्म-लिंग भेद्रास्तव आपणही कोणाला हीन लेखू नये.' हे गांधीवचन अंगी बाणवावे.

**कृती**

- ☐ आपले काम चोख करावे.
- ☐ आपल्या न्याय्य हक्कांसाठी सत्याग्रही मार्गानें झगडावे. लढा स्वार्थासाठी नसून, हक्कासाठी आहे, याची जाणीव ठेवावी. कुठल्या का मार्गाने होईना, आपला फायदा झाला म्हणजे झाले, ही वृत्ती टाकून द्यावी. हक्क मिळव-ताना आपली मान ताठ राहिली पाहिजे, म्हणून आपले ध्येयप्राप्तीचे मार्गही स्वच्छ आणि सर्वहितकर असले पाहिजेत.
- ☐ न्यायासाठी दुसरा लढायला तयार होत नाही, म्हणून स्वतः स्वस्थ बसू नये. ज्याला कळते त्याची जबाबदारी जास्त असते. न्याय, समता व स्वातंत्र्य यासाठी गुरुदेव टागोरांनी सांगितल्याप्रमाणे प्रथम स्वतः लढायला तयार व्हावे. दुसऱ्याला प्रेमळपणाने समजावून देऊन क्रांतिकार्यात सामील करून घ्यावे.
- ☐ अन्याय, जुलूम, दडपशाही, लाचारी यांचा प्रतिकार करता आला नाही, तर निदान त्यात भागीदारी करू नये. बहिष्कार टाकावा.
- ☐ आपल्या विचाराचा एकेक माणूस जोडावा.
- ☐ लोकशाहीच्या लढ्यासाठी जे आपल्यापेक्षा जास्त वेळ देतात त्यांना सर्व प्रकारच्या साधनसामग्रीनिशी साह्य करावे.
- ☐ लोकशाहीच्या लढ्यात सहभागी होण्यासाठी तरुण मुलामुलींना उत्तेजन द्यावे.

# मनं आणि मतं – तरुण मंडळींची !!

सतीश कामत

असं म्हटलं जातं की, कोणत्याही देशाची खरी शक्ती अजमावण्यासाठी त्या देशातल्या तरुण मनाची नाडी तपासून पाहावी. ही तरुण मनं जितकी संवेदनाक्षम तितकं त्या देशाचं भवितव्य अधिक उज्ज्वल ! कारण कोणत्याही देशाचा गाडा ओढण्यासाठी अशा संवेदनाक्षम मनाच्या तरुणांची गरज असते.

याच दृष्टिकोनातून गेल्या दीड-दोन वर्षांतील राजकीय परिस्थितीच्या संदर्भात काही तरुण विद्यार्थी मित्रांच्या विचारांचा मी कानोसा घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यामध्ये सध्या पुणे विद्यापीठात एम. ए. करीत असलेले श्रीधर दीक्षित आणि सुहास पळशीकर आहेत, इंजिनीअरिंगचा विकास खानवेलकर आहे, बी. जे. मेडिकलची विनीता बाळ आणि एस. पी. कॉलेजची माया टोणपी आहे. तसंच मॉडर्न कॉलेजचा संजय गोखले आणि शाहू कॉलेजचा छबन जगताप ही मंडळीही मला या विषयावरील चर्चेत रस घेणारी आढळली. औरंगाबाद विभाग निवडणूक प्रचार समितीचा युवक काँग्रेसचा संयोजक प्रदीप देशमुख आणि आंतरमहाविद्यालयीन मागासवर्गीय संघटनेचा कार्यवाह विनयकुमार माळवे या लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांबरोबरही बातचीत झाली.

'आणीबाणी जाहीर झाल्यानंतर तुमच्या प्रथम प्रतिक्रिया काय होत्या ?' यावर बऱ्याच विद्यार्थिमित्रांच्या विचारात साम्य आढळलं. श्रीधर दीक्षितला ती स्वसंरक्षणासाठी निर्माण केलेली हुकूमशाही वाटली, तर स्वतःच्या बाबतीत आणीबाणी निर्माण झाल्यामुळे (अलाहाबाद हायकोर्ट निकाल) इंदिराजींनी देशातही आणीबाणी जाहीर केली, असं विकास खानवेलकरला वाटतं. विनीता बाळ आणि माया टोणपी या दोघींनाही आणीबाणी जाहीर झाल्यापासून जवळ जवळ एक वर्षभर विशेष काहीच वाटलं नाही. याचं कारण विनीता, 'आणीबाणी घरापर्यंत कधीच येऊन पोचली नाही' असं देते, तर आपल्याबरोबरच्या काही मैत्रिणी सत्याग्रह करून तुरुंगात जाईपर्यंत आणीबाणीविषयी मायाने फारशी दखल घेतलीच नाही. प्रदीप देशमुखला मात्र अशा परिस्थितीत, अशा प्रकारची उपाययोजना करता येते याची कल्पनाच नव्हती. पण या उपाययोजनेचं मात्र त्याने जोरदार समर्थन केलं. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी विद्यार्थ्यांना चिथावल्यामुळे, 'शाळा-कॉलेज सोडा, मोर्चे काढा' असे बंडखोर आदेश दिल्यामुळे देशात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती आणि त्या परिस्थितीत अशा तऱ्हेची काही तरी कठोर उपाययोजना आवश्यकच होती, असं त्याला वाटतं. तसंच स्वतःचं आसन स्थिर करण्यासाठी इंदिराजींनी आणीबाणी पुकारली, या विरोधकांच्या टीकेलाही तो असं उत्तर देतो की, जर देशाची प्रगती घडवून आणायची असेल तर, शासन स्थिर असणं आवश्यकच आहे. त्यामुळे इंदिराजींनी त्या दृष्टिकोनातूनही जरी आणीबाणी पुकारली असली तरी, त्यात त्याला काहीच गैर वाटत नाही. सुहास पळशीकरला मात्र ही आणीबाणी प्रगतीच्या दृष्टीनेही अपयशीच वाटते. कारण त्याने केलेल्या हिशेबानुसार आणीबाणी जारी झाली त्या आर्थिक वर्षात टाळेबंदी किंवा ले-ऑफमुळे कामाचे जितके दिवस वाया गेले त्यांची संख्या त्याच्या आधीच्या वर्षातील अशा दिवसांपेक्षा निश्चित जास्त होती. त्यामुळे उत्पादनही नाही आणि कामगारही उपाशी अशी परिस्थिती झाली.

अशा तऱ्हेने बऱ्याच जणांची मतं आणीबाणी जारी करण्याला किंवा तिच्या उपयुक्ततेविषयी विरोधीच दिसल्याने त्याच संदर्भात आणखी एक प्रश्न पुढे आला. 'तुमचा हा विरोध दर्शविण्यासाठी तुम्ही स्वतः काही प्रत्यक्ष कृती केली ?' श्रीधर दीक्षितने त्यासाठी सत्याग्रह करणाऱ्या एका कॉलेज विद्यार्थ्यांच्या तुकडीचं नेतृत्व केलं होतं आणि त्यामुळे तो दीड महिना तुरुंगातही गेला होता. अर्थात या कृतीने काही फायदा झाल्याचं त्याला वाटत नाही. किंबहुना, शासनाचं कडवं धोरण आणि समाजामधील कमालीची उदासीनता यामुळे या सत्याग्रहामागचं 'जनजागृती' हे उद्दिष्टच फसलं. प्रत्यक्ष काहीच कृती न करणाऱ्यांपैकी छबन जगताप किंवा संजय गोखलेसारखी मंडळी 'विद्यार्थ्यांनी असं काही करू नये' अशा विचाराने आणि 'मिसा'च्या भीतीने गेली नाहीत; तर विकास खानवेलकर आणि सुहास पळशीकरचा सत्याग्रहासारख्या मार्गांवरचा विश्वासच या काळात उडालेला आहे. त्या दोघांनाही आता क्रांतीशिवाय दुसरा कोणताच मार्ग दिसत नाही. एस. पी. च्या माया टोणपीच्या बाबतीत मात्र परिस्थिती जरा निराळी होती. बरोबरच्या मैत्रिणींनी सत्याग्रह केल्यावर आपणही तसं करावं, असं तिलाही वाटू लागलं होतं. पण त्याला तिला घरातूनच कडवा विरोध झाला.

या आणीबाणीचा गेल्या दीड-दोन वर्षातला अनुभव काय ? या प्रश्नावर मात्र मनोरंजक उत्तरे आली. श्रीधर दीक्षितच्या मते आता या देशात लोकशाही राहिलेलीच नाही. इथे आता पक्षापेक्षाही व्यक्तीचीच हुकूमशाही सुरू झालेली आहे आणि तिचं स्वरूपही राणीसरकार, राजपुत्र व इतर सरंजामदार असं झालेलं आहे. त्यामुळे विचार करायची शक्तीच नसती तर अधिक बरं झालं असतं, असं त्याला वाटतं. छबन जगताप हा

विद्यार्थी उसाचं गुन्हाळ चालवून शिकतो. तेव्हा 'या आणीबाणीतील शिस्तीचा काही उपयोग ह्यासाठी झाला का, याला त्याचं उत्तर निराशाजनक आहे. अजूनही त्याचा हाच अनुभव आहे की, नातेवाइकांना कर्ज सहज मंजूर होत होतं. पण ह्याला मात्र गुन्हाळ चालवण्यासाठी कर्ज मिळवण्यासाठी. बरीच धडपड करावी लागली. तसंच ट्रक ड्रायव्हिंगचा परवाना मिळवण्यासाठी तो गेला असताना आणीबाणी असूनही लाचलुचपत आणि वशिलेबाजीत काहीच फरक न पडल्याचा छबनचा अनुभव आहे! 'आणीबाणीतल्या दिवाळीतही रवा आणि डालडा गायब झालंच की!' ही विकास खानविलकरचीं कॉमेंटही त्या दृष्टीने महत्त्वाची आहे. अशा तऱ्हेचं नापसंतीचं वातावरण बऱ्याच कॉलेजतरुणांमध्ये कमी अधिक फरकाने दिसलं.

यानंतर गप्पांचा ओघ निवडणूक घेण्याचा निर्णय, जनता पक्ष, काँग्रेसची भूमिका यांच्याकडे वळला. बऱ्याच मंडळींना इंदिराजींचा निवडणुका घेण्याचा हा अनपेक्षित निर्णय धूर्त आणि विरोधकांना गोंधळात टाकणारा वाटला. सुहास पळशीकरची या निर्णयाबद्दल तक्रार नाही, पण निर्णयानंतरचं त्यांचं किंवा काँग्रेस पक्षाचं वर्तन त्याला 'फरी अँड फेअर' वाटत नाही. या लोकांनी सर्व नीती सोडूनच दिली आहे असं त्याला वाटतं. विनय माळवे मात्र या निवडणुकांविषयी बराच उदासीन वाटला. कारण ह्याचा असा अनुभव आहे की, सत्तेच्या राजकारणात साधन म्हणून त्याच्या दलित समाजाचा वापर आजपर्यंत होत आलेला आहे आणि त्यामुळेच सत्तेवर कुणीही आलं तरी ही परिस्थिती बदलेल असं त्याला वाटत नाही. कारण विरोधी पक्षाचेही कार्यकर्ते त्याच्या जुन्नर तालुक्यातल्या खेड्यांमध्ये कधीच फिरकलेले नाहीत. दलितांमधील अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचं सामाजिक आणि आर्थिक शोषण चालूच राहिलं आहे आणि त्यामुळेच 'सत्तेवर कुणीही आलं तरी आम्ही साशंकच आहोत.' असं त्याने सांगितलं. या निवडणूक निर्णयाबद्दल प्रदीप देशमुखाचं मात्र निराळं मत आहे. 'निवडणुका कधीही घ्या; आम्ही तयार आहोत.' असं म्हणणाऱ्या विरोधी पक्षाला आता त्याबद्दल काहीही तक्रार करण्याचा नैतिक अधिकार राहातच नाही असं त्याला वाटलं.

जनता पक्षाबद्दल बोलताना श्रीधर दीक्षितचं असं मत दिसलं की, अशा तऱ्हेने विरोधी पक्षांनी एकत्र येऊन, एकजुटीने सामना करणं ही आज 'आवश्यकता'च निर्माण झाली होती, अर्थात जैर हा पक्ष सत्तेवर झाला तर नक्की काय करील याचा भरवसा जरी देता येत नसला तरी सध्याचा सत्तारूढ पक्षापेक्षा तो निश्चितच चांगल्या तऱ्हेने देशाची काळजी वाहील, असं त्याला वाटतं. विकास खानविलकर आणि संजय गोखले या दोघांचंही या नव्या पक्षाच्या स्थिरतेबद्दल असं मत दिसलं की, किमान स्वतःचं अस्तित्व टिकवण्यासाठी तरी त्यांना एकत्र राहून, एकजुटीनेच काम करावं लागेल. प्रदीप देशमुखला मात्र या जनता पक्षाकडे समर्थ नेतृत्व नसल्यामुळे, ते आज जरी एकत्र आले असले तरी, उद्या त्यांच्यात नक्कीच फाटाफूट होईल असं वाटतं. याचं मुख्य कारण तो असं देतो की, यातील प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये एकमेकांविषयीचे जुने अविश्वास आहेत. ज्यांची तत्त्वं एकमेकांपासून अगदी भिन्न आहेत, की ज्यामुळे इतके निरनिराळे पक्ष निर्माण झाले, ती मंडळी अशी एकत्रपणे किती दिवस राहू शकणार? असा सवाल तो करतो. जनता पक्ष आणि काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यांवरही चर्चा झाली. पण त्यांवर बहुतेकांचं मत असंच दिसलं की, यापैकी कोणत्याही पक्षाच्या जाहीरनाम्यावर आता विसंबून राहण्यात अर्थ नाही. कारण अशा प्रकारची 'कल्याणकारी' आश्वासनं कोणत्याही लहान पातळ्यांवरील निवडणुकांमध्येही दिली जातात. पण त्याचबरोबर काँग्रेस पक्षाला गेली जवळ जवळ तीस वर्षे संधी देऊनही ते विशेष काहीच करू शकलेले नाहीत. मग आता जनता पक्षाला किमान संधी तरी द्यायला काहीच हरकत नाही, असाच सूर बहुतांशी आढळला. अर्थात एका मुद्द्यावर मात्र सर्वांचंच एकमत होतं की, सत्तेवर कोणताही पक्ष येवो, या देशातून लोकशाही नष्ट होता कामा नये.

संजय गांधींच्या राजकारणातील प्रवेशावरही फारच मनोरंजक चर्चा झाली. सुहास पळशीकर म्हणतो, "इंदिराजी आपला वारसाहक्क इतक्या उघडपणे निर्माण करतील असं वाटलं नव्हतं.' विनीता बाळला त्याविषयी विचारल्यावर ती म्हणाली— 'त्याच्यावर काय बोलायचं? तो इंदिरा गांधींच्या दोन मुलांपैकी एक आहे, एवढंच मला माहीत आहे.' संजय गांधींने देशालाच काय पण युवकांनादेखील काही नेतृत्व दिलं आहे असं कुणालाच वाटत नाही. संजय गोखलेला तर त्याच्या अंगी नेतृत्वाचे काही गुण खरंच आहेत का, याचीच शंका वाटते.

निरनिराळ्या क्षेत्रांतल्या या तरुण विद्यार्थी-मित्रांशी चर्चा करताना एक गोष्ट विशेषत्वाने जाणवली ती म्हणजे सध्या जे काही घडतंय किंवा गेल्या दीड-दोन वर्षात जे काही घडलं त्याबद्दल एक प्रकारची अस्वस्थता, काही प्रमाणात असंतोष या तरुणांमध्ये बहुतेकांच्या विचारात आणि उच्चारात होता. किमान राजकीय घडामोडींबद्दल जाणीव आणि जागरूकता तरी नक्कीच अनुभवाला आली. या मित्रांशी बोलत असतानाच आणखीही दोघं-चौघंजण चर्चेत सामील व्हायचे आणि चर्चेची रंगत अधिकच वाढायची. तसंच यामुळे 'काही प्रातिनिधिक मतं' असं या चर्चेचं स्वरूप न राहता बऱ्याच मोठ्या तरुण विद्यार्थी वर्गाच्या विचारांचं प्रतिबिंब यामध्ये पडू शकलं. प्रत्येकाचं क्षेत्र निराळं, त्यामुळे प्रत्येकाच्या अनुभवाची जात निराळी, पण शेवटी एकाच विचारधारेत मिसळून जाणारी. हे जे काही चाललंय ते काही योग्य दिशेने चाललेलं नाही, यामध्ये बदल घडून आलाच पाहिजे. अर्थात त्या दृष्टीने स्वतः पुढे सरसावण्याची तयारी मात्र कमी दिसली. याचं मुख्य कारण प्रत्येकजण स्वतःवरील कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या हिशेबात गर्क होता. कधी कधी एखाद्या मूल्यापायी वेडं होऊन स्वतःला झोकून देण्यातही काही गंमत असते, हे फारच थोड्या तरुणांना पटल्यासारखं वाटलं. पण तरीसुद्धा राजकीय जागरूकता (Political awareness) हा प्रकार अपेक्षेपेक्षा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आढळून आला. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांनाही सद्यःस्थितीची जाणीव त्यामानाने बरीच दिसली. पण या सर्व तुलनेत विद्यार्थिनी फारच उदासीन वाटल्या. काही विद्यार्थिनींच्या मते 'राजकारण हा आपला प्रांतच नव्हे,' तर काही जणींना घरातूनच

विचार आणि कृतीच्या बाबतीत बरेच बंधनं असल्याचं जाणवलं. एका मैत्रिणीची तर अशी तक्रार होती की, ती जेव्हा मतदारांच्या यादीत नाव नोंदवायला निघाली तेव्हा 'तुझ्या एका मताने एवढं अगदी काय होणार आहे?' असा थोडासा टिंगलीचा आणि निराश करणारा सूर तिच्या घरातल्याच मंडळींनी आणि मैत्रिणींनी लावला. यामुळे एकीकडे समानतेच्या गप्पा मारल्या जात असतानाही स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अजून प्रतिगामीच आहे, याची जाणीव झाल्याशिवाय राहिली नाही.

पण या सर्व तरुण मंडळींच्या बोलण्यामधून एक फार महत्त्वाचा गुण मला प्रकर्षाने जाणवला तो म्हणजे, सध्या राजकारणात जी लाचारी चाललेली आहे त्याची मनस्वी चीड या सर्वांना आहे आणि 'आम्हाला दोन वेळा भाकरी मिळाली म्हणजे झालं. तिकडे सत्तेवर काही का घडेना,' अशी वृत्ती एकाच्याही बोलण्यात दिसली नाही. जिथली तरुण मनं इतकी जागी आणि जिवंत आहेत, त्या देशात आज नाही तरी उद्या मानवी मूल्यांना महत्त्व निश्चितच प्राप्त होईल, असा आशावाद करायला काहीच हरकत नाही. □

# चिता तुमची, लाकडं आमची

पुरंदरे चंद्रशेखर

जगातल्या सगळ्यात मोठ्या लोकशाहीचे पोवाडे गाण्याचे दिवस संपले आहेत. कोणत्याही पक्षाच्या षंढ राज्यकर्त्यांकडून स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्याखेरीज काहीही होत नाही हे लोकांना पुरतेपणी कळलं आहे. भारतीय लोकशाही नावाचा एक मोठा विनोद गेली तीस वर्षं जनतेच्या जीवावर आणि जनतेच्या नावानं, उद्दामपणे चालला आहे. यात प्रमुख आकर्षण निवडणुकीच्या वगाचं. पण हे आकर्षण फक्त सत्तालोलुप उमेदवारांना आहे, सामान्य मतदाराचा त्याबाबतीत पूर्ण भ्रमनिरास झालेला आहे, हे 'जनता आमच्याच पाठीशी आहे,' अशी गर्जना दर पाच वर्षांनी करणाऱ्या उमेदवारांना सांगण्याची वेळ आलेली आहे.

भुईतून उगवणाऱ्या कावळ्याच्या छत्र्यांप्रमाणे उमेदवार अचानक उगवतात, चेहऱ्यावर नम्रतेचं आणि अजीजीचं रोगण थापून मताची भीक मागतात आणि महिन्याभरापूर्वी आपण काही आश्वासनं दिली होती, हेही विसरतात.

पहिली झोपडपट्टी—रामवाडी. आगाखान पॅलेसवरून पुढं गेल्यावर जकातनाक्याजवळ हे रामराज्य सुरू होतं. इथे पन्नास-एक झोपड्या आहेत. त्या सगळ्या रस्तारुंदीत जाण्याची वेळ आलेली आहे, त्यामुळे लोक त्या चिंतेत आहेत.

दिनांक १९-२-१९७७, सकाळी ८ वाजेपर्यंत कोणत्याही पक्षाचा कोणताही कार्यकर्ता इथे आलेला नाही. निवडणूक महिन्यावर आल्यावरची ही परिस्थिती, तर नंतर तो येईल कशाला!

इथले प्रमुख कार्यकर्ते उत्तम शिंदे. इथे जे काही केलं गेलं, ते झोपडी संघाकडून आणि पन्नालाल सुराणा, कल्याणकर, भाई वैद्य (हे चार वेळा येऊन गेले.) यांच्या सहकार्याने. इथून निवडून गेलेल्याने काहीही केलेलं नाही.

लोकशाही शिल्लक ठेवण्यासाठी विरोधी पक्ष असलाच पाहिजे. क्रांतिकारकांनी देश हुकूमशाहीसाठी स्वतंत्र केला नाही. आणीबाणीनंतर विरोधी आवाजच दडपला गेला. लोकांना ही अकारण शिक्षा आहे. मतभेद हाच लोकशाहीचा आत्मा आहे. २० कलमी कार्यक्रम वाचायला चांगला आहे. पण त्यातलंच अकरावं कलम घरांच्या सामाजिकीकरणाचं असूनही आमची दाद ना फिर्याद. मिलिटरीला १९४३ ला दिलेली मोकळी जागा आज 'तशीच' (म्हणजे झोपड्या पाडून) हवी, अशी, महानगरपालिकेची मागणी. हा कोणता २० कलमी? कामगारांचा बोनस गेला, कारखान्यात नवीन भरत्या बंद झाल्या आणि तरी आमचे खालपासूनचे प्रतिनिधी आवाज उठवत नसतील तर निवडणुकात काय अर्थ? तरीही बदल व्हायचा असेल तर याच मार्गाने झाला पाहिजे, अशी ठाम भूमिका शिंदे यांनी स्पष्ट केली.

बाकी रामवाडीत हीच मते. लहू नारायण मगर म्हणून २०–२२ वर्षांच्या तरुणानें जळजळीत शब्दात या सगळ्यांचा उद्धार केला. आणीबाणीनंतर पोलिसांची दंडुकेशाही वाढली. माणूस मोकळा दिसला की उचलायचा, जीपमध्ये कोंबायचा आणि १२२ कलमाखाली आत टाकायचा. मायबाप सरकारच्या कृपेने त्याला चौकशीही लागत नाही, अपीलही करता येत नाही. या प्रकारात लहू मगर आज बेकार आहे. एकदा शिक्का बसला की, नोकरीवरही कोणी घेत नाही. मंत्र्याकडे दाद मागायला गेलं, आणि साहेब घरी असण्याचा मणिकांचनयोग असलाच तर, पी. ए. पाच–दहा रुपये मागतो. यालाच जिथं दोन वेळच्या जेवणाची भ्रांत, तिथे तो पी. ए. ला कुठून मलिदा चारणार? त्यामुळे निवडणुकात अर्थ नाही. तरीही मतदान करणारच?

एकूण संपूर्ण रामवाडीची प्रतिक्रिया इथल्या नीला रामस्वामीच्या शब्दात प्रकट करता येईल. 'कौन है हमारा उम्मीदवार? मुंह भी देखा नहीं अब तक। घर बंदोबस्त हो जाए तो वोट देंगे। नहीं तो एकएक के

दिखा दो– गोलीसे उडा दूंगी।'

दुसरी झोपडपट्टी–गणेशनगर. गणेशनगर ही झोपडपट्टी रूढ अर्थाने झोपडपट्टी नाही. ती एक टूमदार वसाहत आहे. रामवाडीत बहुसंख्य मजूर आहेत. तर इथे चतुर्थ श्रेणीचे कामगार लोकांनी स्वतःच रस्ते बांधून घेतले, झोपड्या बांधून घेतल्या, वॉर्डस् पाडलेले आहेत. प्रतिनिधी निष्क्रिय.

इथे दोनच दिवस आधी धारियांची पदयात्रा आणि प्रचारसभा झालेली होती, त्यामुळे वातावरण जनता पक्षाला अनुकूल. तरीही सगळे उमेदवार सारखेच हे मत. धारिया आज गप्पा मारताहेत, पण त्यांनी उमेदवार असताना दिलेल्या आश्वासनातली किती पूर्ण केली?

फक्त सौ. बने आणि चौधरी या दोन व्यक्ती सोडल्यास आणीबाणीत २० कलमी नंतर काहीही फरक पडलेला नाही असं सांगण्यात आलं.

२५ माणसांमागं एक संडास आवश्यक असताना इथं५००माणसांमागं एक अस्तित्वात आहे. पण अशा गोष्टी आणि तक्रारी सत्तेसाठी झगडण्यासाठीच जन्माला आलेल्यांना सांगून काय उपयोग? हे उमेदवार कामापुरते येणार, तेव्हा त्यांनी दिलेली आश्वासनं सीरिअसली घेण्याचंही कारण नाही, असंच सगळ्यांचं मत पडलं. तरीही ज्या काही जगण्याच्या किमान गरजा आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी हे लोक कायद्यानं बांधील पाहिजेत. इथल्याच सौ. मोरेंची प्रतिक्रिया फार मार्मिक आहे. 'हे लोक आमच्याच खांद्यावरून आमच्या डोक्यावर चढलेत, आणि आमच्या खांद्यावरून डोक्यावर चढलेत हे विसरले आहेत.'

तिसरी झोपडपट्टी–काशीवाडी. ही अस्सल झोपडपट्टी सव्वा दोन हजार झोपड्यांचीच. इथं बारा गावची बारा माणसं. दर दोन झोपड्यांमागं एकजण 'आमची हजार मतं' अशा भाषेत बोलतो आणि हा विभाग जनता पक्षाचा, हा विभाग कॉंग्रेसचा असं छातीठोकपणे जाहीर करतो.

हरी परदेशी हा इथला एक मूर्तिकार. त्याचा मित्र मुकेश परदेशी. दोघेही कट्टर कॉंग्रेसचे. दोघेही पढवल्यासारखे बोलले, त्यात अनुभवल्यापेक्षा ऐकण्याचा भाग जास्त.

धारियांनी इथं संडास बांधू म्हणून सांगितलं होतं. आणखीही लाईट, पाणी वगैरेची आश्वासनं दिली होती. त्यातील काहीही पूर्ण नाही. इथे काम केलं ते वसंतराव चव्हाणांनी. त्यांनी नळ घेऊन दिले, एक भिंत मोठी– झोपडपट्टीच्या बाजूने बांधून दिली, जमिनीवर मुरूम टाकून चिखलाचे प्रमाण कमी केले.

आणीबाणीमुळे जगणे शक्य झाले. एक वेळी २० पैसे खिशात असणारा माणूस ३ रु. चा तांदूळ कसा खरेदी करू शकत होता? तो तांदूळ आज १-४५ ने मिळू शकतो. ही आणीबाणीची कृपा. तीच आणीबाणी सैल केल्यामुळे गोडेतेल भडकलं.

मध्यंतरी काशीवाडीत चोरांच्या फार अफवा उठत होत्या. 'आला रे आला' म्हणून आवई उठायची. लोक धावरून चूपचाप. पोलिसांना बोलवलं पण उपयोग झाला नाही. "तिथल्याच लोकांचा हात असावा" अशी एक शंका आहे. पण ही प्रकार आणीबाणीनंतर अजीबात बंद झाला. यांनी संजय गांधी आमचा नेता असल्याचं सांगितलं. आधीच्या दोन ठिकाणी रामवाडीत आणि गणेशनगरमध्ये पक्ष बघून मत देणार असं कोणीही सांगितलं नव्हतं. 'माणूस बघून मत' होतं. इथे मात्र 'माणूस गद्दारी करेल [ "जगजीवनरामनं केली तशी" ], पण पक्ष गद्दारी करणार नाही. पहिल्यापासून कॉंग्रेसलाच मत दिलं. आताही कॉंग्रेसलाच देणार,' असं त्यांनी ठासून सांगितलं.

काशीवाडीतला आणखी एक मासला नवबौद्धांचा. हे लोक बौद्धिष्ट म्हणवून घेतात. अडसूळ म्हणून त्यांचा अध्यक्ष. आणि १८–२० वर्षांचा त्याचा मुलगा उपाध्यक्ष. मी लोकांना या संदर्भात मत विचारत असताना आणि लोक पेटून बोलत असताना हे दोघे अवसानघात करण्यात प्रयत्नशील होते. यांची कमिटी ही मतं ठरवते. 'ह्यांना काही सांगू नका. प्रभाकर कुंटयांना जमलं नाही ते हे काय करणार?' असं दोघं ओरडत होते. आणि लोक तावातावानं त्यातून बोलत होते. एकानं प्रतिनिधींच्या कृतघ्नतेला उत्तर म्हणून आमचे हजार-दीड हजार लोक मतदानच करणार नाहीत म्हणून सांगितलं. एक पाकीटमार आणि जुगार खेळणाराही इसम तिथे होता. त्यानं आणीबाणीनंतर गुन्हेगारांच्या लिस्टवर पूर्वी नाव आहे म्हणून मध्यंतरी पोलिसांनी विनाकारण आत टाकल्याचं लहू मगरप्रमाणेच सांगितलं. गुन्हेगाराला माणूस म्हणून जगू देण्याची प्रवृत्तीच नाही, वगैरे वगैरे.

येथल्या आमदारांबद्दल एकाचंही मत चांगलं नाही. त्यांनी आमच्यासाठी काहीही केलेलं नाही. साधं मयत झालं तर ओळखपत्रही द्यायला हा माणूस नाराज असतो. यांचा धाकटा भाऊ कॉर्पोरेटरपदाविषयी उत्सुक. बंधुद्वयांबद्दल लोकांच्या मनात अपार राग आहे. 'साहेब इथे नसतातच, गेलंच तर धुडकावून लावतात.' वगैरे नेहेमीच्या तक्रारींबरोबरच हरी परदेशीने त्याला 'मिसाखाली आत टाकतो' अशी धमकी दिली गेल्याचंही सांगितलं. बाकी नोकऱ्या लावणे, सोयी करणे वगैरे प्रकारांची लोक त्यांच्याकडून अपेक्षाच करत नाहीत. इथल्याच झैबुन्निसा शेख हबीबनं 'एक घर मिळालं, पुष्कळ झालं, आणखी मागण्याच नाहीत', असं सांगितलं.

कसबा पेठेतल्या वीरकर यांची मुलाखत चांगलीच लक्षणीय आहे. कारण सगळीच मतं निराळी आहेत : यावेळी मतदान करणार नाही, कारण निवडणुकीत काहीही अर्थ नाही, काहीही बदल होणार नाही. जनता पक्ष आणि कॉंग्रेस यातच निवड असली तर, कॉंग्रेसच सत्तेवर येऊ दे, कारण त्यांची पोटं तरी भरली आहेत. जनता पक्ष आला तर नव्या दमानं सगळेच पिळतील. कॉंग्रेसवाले निदान स्वार्थ साधून झालाय तर, जनाच्या नाही तर मनाच्या लाजेनं तरी लोकांकडे वळतील. आणि कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी एकदम स्वर्ग थोडाच पृथ्वीवर येणार? साधा जवळचा नातेवाईक अडीअडचणीला उपयोगी पडत नाही, तर हा कोण कुठचा उमेदवार? त्यानं काय करावं? आणि का करावं?

जातपात वगैरे काही आवाहनं खरी नाहीत. आज जाती दोनच. एक शिक्षणाची आणि दुसरी पैशाची. पहिली आपली, दुसरी त्यांची. ज्यानं त्यानं आपल्या जातीत खूष असावं.

आणि समजा आम्ही आज 'लोकशाहीच्या रक्षणासाठी' एखाद्या पक्षाला दिलंच निवडून, तर खुर्ची बुद्धिभेद करणार

नाही कशावरून? तेव्हा जिथं उद्याचीच गॅरंटी नाही (त्यांच्या शब्दात–आमचा जोशी किंवा अभ्यंकर झाला मध्येच, तर–?) तिथं लोकशाही न् समाजवाद, हा पक्ष न् तो पक्ष हा गोंधळ हवाच कशाला?

१९७४ सालापासून यांच्या विभागातल्या तीन बाथरूम्सपैकी एकीचा संडास करावा अशी विनंती ते करत आहेत. त्यासाठी कित्येक खेटे घातलेले आहेत. पण कॉर्पोरेटर्सचं मानधन दोनशेवरून चारशेवर (खरं पाचशेच, पण शिवसेनेनं पुण्यात्म्याचा अवतार आणला म्हणून चारशे) एका दिवसात होऊ शकतं आणि ३००० रुपये मंजूर होऊ शकत नाहीत. हेच कॉर्पोरेटर उद्या आमदार–खासदार–मंत्री होणार. आता ज्याला दोन वर्षांत साधा संडास बांधून देता येत नाही, तो पाच वर्षांत ५५ कोटींचं राहणीमान काय सुधारणार? तेव्हा यावज्जीवं सुखं जीवेत् या न्यायानं राहावं, मिळालीच सुटी तर मतदानाचा दिवस मजेत घालवावा, तिकडे उमेदवारांना सावकाश एकमेकांचे गळे घोटू द्यात.

छाया टॉकीजसमोर चिंचवाडी–राजेवाडी म्हणून भाग आहे. इथं मातंग समाजाची वस्ती बरीच. त्यांच्यातलेच आर. व्ही. पाटोळे हे तळमळीचे कार्यकर्ते. आसपासच्या भागात 'मास्तर' म्हणून प्रसिद्ध. ८४७–४८–४९–५० हे क्रमांक यांच्याकडे येतात. ८४७ विभागात मुसलमानांची वस्ती बरीच आहे. निवडणूक प्रतिनिधींच्या संदर्भात बोलताना त्यांनी हिंदू–मुस्लीम दंगलीची हकीकत सांगितली. १६–१७ मे १९६३ ला ही दंगल पेटली. तलवारींनी मारामाऱ्या होण्यापर्यंत प्रकरण गेलं. वातावरण अत्यंत तंग, तेव्हा यांनी आणि शेख इब्राहिम या ८४७ मधल्या दोस्तानं–फक्त दोघांनी–संपूर्ण भाग शांत ठेवला. ३ दिवस दोघांनी रात्री चौकात उभे राहून एकही गैरप्रकार घडू दिला नाही. या दरम्यान एकही कॉर्पोरेटर, एकही आमदार फिरकला नाही. कोणत्याही पक्षाचा पुढारी आला नाही. वातावरण निवळल्यावर एस. एम. जोशी आणि पोलीस अधिकारी पारसनीस, कदमबांडे, परब वगैरे हजेरी लावून गेले. त्यामुळे यांचा या लोकांवर विश्वास नाही.

लोकांकडे [विशेषतः त्यांच्या जमातीतल्या] कोणत्याच पक्षाच्या उमेदवाराचं लक्ष नाही. त्यामुळे लोकांना त्यात रस असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या बाहेरच्यांना खऱ्या अडचणी कळणंही कठीण आहे. कारण ते ५–६ वर्षांनी एकदा येणार. आतापर्यंत त्यांनी मागणी अशी केलेली नाही. पण ज्या केल्या त्या, अन्न, वस्त्र, निवारा या संदर्भातच असूनही जातीमुळे फेटाळल्या गेल्या. या गरजा जर कोणी पूर्ण करणार नसेल तर, मत मागण्याचा त्याला अधिकार नाही. 'आमचं इथलं एक काम करून दाखवा, मग इथे पाऊल टाका.' असं त्यांचं रोखठोक आव्हान आहे... निवडणुकांनी काहीही बदल होणार नाही, लोकांनीच स्वतःसाठी स्वतः प्रयत्न केले पाहिजेत.

आणीबाणीमुळे कर्जमाफी झाली, दादागिरी कमी झाली, भाववाढ कमी झाली, आमच्यासारख्यांना कायम आणीबाणी राहावी असं वाटतं.'

'जगजीवनरामांचा राजीनामा हा आपल्या आवाक्याबाहेरचा विषय. तेही आमचे, सत्ताधारीही आपले, तेव्हा त्याची चर्चा आपण करू नये.'

तरीही जनशिक्षणाच्या भूमिकेतून वॉर्डीतील यच्चयावत मतदारांना घेऊन ते मतदानाला जाणार. आमच्या अडचणी खासदारांपर्यंतच्या नाहीतच. कॉर्पोरेटरच मनात आणलं तर सोडवू शकेल.'

तर अशा या जुजबी पाहणीतही सगळ्यांचं एकमत झालं तो प्रश्न म्हणजे Right of Recall चा प्रश्न. कायद्यानं दर दोन–तीन महिन्यांनी आपल्या प्रतिनिधीला मतदार संघात यायला भाग पाडलं पाहिजे आणि केलेल्या कामाचा [काही केलं असल्यास] अहवाल द्यायला लावला पाहिजे. जर तो बेजबाबदार असला, तर त्याची निवडणूक वर्षानं रद्द करण्याचा अधिकार असलाच पाहिजे.

काशीवाडीतील दोन अपवाद सोडता बाकीच्यांनी माणूस पाहून मत देत असल्याचं सांगितलं.

याद्यांमध्ये नाव असण्याविषयी बरेचजण साशंक होते.

दोन–चार जणांचे अपवाद सोडता बहुतेक लोक सभांना जात नाहीत. ते दोन–चारही एखाद्याच सभेला गेलेले आहेत. काशीवाडीतील गुलाम अहमदखान या टेलरने 'एक दिन खाग हो गया तो पूरा दिन बरबाद। रातको खानेकोभी नहीं मिलेगा' म्हणून, आणि झोपडीतलं सामान' सभेहून परत येईपर्यंत राहायच्या अशाश्वततेमुळे सभेला जाणं अशक्य असल्याचं सांगितलं.

यांना ट्रकमधून पैसे देऊनही कोणी नेत नाही, ते स्वतःहून तर जात नाहीतच. महिन्यावर निवडणूक आली तरी कोणी फिरकला नाही. वर्तमानपत्रंही वाचत नाहीत. यांना पक्षापक्षातला गोंधळ कळत नाही, मग यांनी मत काय विचार करून द्यायचे? किंवा आजपर्यंत कसे देत आले? तर 'जो हमदर्दीसे पेश आएगा उसीको वोट देंगे.' जो जेवढी मोठी आश्वासने देईल, मुलांना नोकऱ्यांची आमिषे दाखवेल, जागेची हमी देईल, त्याला हे मत देणार. म्हणजे प्रत्यक्ष निर्णय घेण्याचा प्रकार अर्ध्या तासाचा आणि आम्ही याला जागृत लोकशाही म्हणतो. इंदिरा गांधी आणि मोरारजी देसाई सदसद्विवेकबुद्धीच्या गप्पा मारतात आणि आणखी ५ वर्षे आपली खुर्ची आणि लोकशाहीची शवपेटी मजबूत करतात आणि पटकन यांना विसरतात. राजाच असा म्हटल्यावर वझीर अन् प्याद्यांनी का हालचाल करावी?

जागृतीचं लक्षण एकच. धारियांनी पक्ष बदलल्याचं सगळ्यांना माहीत आहे. बाकी काहीही नाही.

मग हे लोक मतदान का करतात? तर दुर्दम्य आशावाद. अजून माणसाच्या चांगुलपणावर यांचा विश्वास आहे. निवडलेल्या प्रतिनिधीला कधी तरी आपल्याकडे पाहावंसं वाटेल, या नाही पुढच्या, त्या नाही, त्याच्या पुढच्या निवडणुकीत तरी तो आपला आवाज उठवेल, महिन्यापूर्वीच मारलेल्या गप्पा आठवून काही तरी करेल. आपलं आयुष्य खुज्या झोपडीच्या उंच अंधारात आणि सांडपाण्याच्या दलदलीत गेलंच, मुलं तरी प्रकाश पाहतील आणि त्यासाठी हे प्रतिनिधी मदत करतील, किमान आहे त्या झोपड्या तरी जमीनदोस्त करणार नाहीत, या वांझ अपेक्षांनी ते लोक वरकरणी शांत आहेत आणि yet another chance त्यांनी दिलेला आहे. पण आतली अस्वस्थता दुर्लक्षिण्यासारखी नाही. त्याला पुरेसं पोषक वातावरण मिळालं तर भडकायला वेळ

लागणार नाही. कारण भुकेला नीतिनियम माहीत नसतात.

आपण राजे आहोत, याची त्यांना जाणीव झालेली नाही आणि निवडलेल्या प्रतिनिधींची मगरूरी आपल्या जीवावर आहे, याची त्यांना कल्पना आलेली नाही. पण आर्थिक दृष्ट्या इतकी वर्षं मागेच का, याचा त्यांना हळूहळू उमज पडतो आहे.

तेव्हा ज्यांच्या जीवावर या सर्कशी चालल्या आहेत, ते शांत आहेत तोपर्यंत मोहन माणिकचंद धारिया आणि वसंत विठोबा थोरात यांनी आश्वासनांची खैरात करावी. कोणत्या झोपडपट्टीत कोणती आश्वासनं द्यायची, हेही त्यांचे बगलबच्चे सांगतीलच. पण आतापर्यंत जनतेच्या सहनशीलतेचं रबर पुरेसं ताणलं गेलेलं आहे. लोकांना तुमच्या लोकशाही विरुद्ध हुकूमशाही आणि लोकशाही विरुद्ध अराजक आणि घराण्याची सत्ता या मोहक घोषणांशी काडीइतकं कर्तव्य नाही. त्यांनी स्वतः बांधलेल्या झोपड्या तिथं आहेत, ह्यागुढा तुम्हाला ठेवता येत नसतील, तर आज तुमच्यावर ते थुंकतच आहेत; उद्या वेगळ्या भाषेत सांगतील.

आजचे तुमचे मतदारसंघ उद्या तुमच्या कबरी बनणार नाहीत, याची काळजी घेण्याची वेळ आलेली आहे. □

---

# कामगार मनाचा कानोसा

छाया दातार

सालोमन: एक गिरणीकामगार. तीस पावसाळे गिरणधंद्यात काढलेले.

'नमस्ते सालोमन!'

'नमस्ते. आज काय काम काढलं!'

'आता आणीबाणी शिथिल झाली. निवडणुका आल्यात. म्हटलं, तुमचं काय म्हणणं आहे ते ऐकावे.'

'निवडणुका आल्या काय न् गेल्या काय! आपल्या कामगारांचे प्रश्न सुटणार आहेत का बोला! आणीबाणी नव्हती तेव्हा पण सुटले नाहीत आणि आणीबाणी आली तेव्हा पण सुटले नाहीत.'

'म्हणजे आणीबाणी आल्याचे तुम्हाला काही विशेष वाईट वाटलं नाही, असंच म्हणायचं.'

'असं कसं, आणीबाणी वाईटच की हो. आतापर्यंत काही प्रश्न निघाला तर बोंब तरी मारता येत असे. सर्व कामगारांना समजावून देता येत असे. आणीबाणीमध्ये सगळा गुपचूप मामला. कामगार दबलेला. आणीबाणीचा फायदा मालक लोकांनी चांगलाच घेतला. आता आमच्याचकडे बघा की हो. चायना मिलमध्ये काम करतो मी. गिरणधंद्यामध्ये काँग्रेस पक्षाच्या संघाची युनियन आहे. पक्की मालकधार्जिणी. गली दोन वर्षे गिरणधंद्यामध्ये अरिष्ट आलंय् असे निमित्त सांगून मालक बदलीवाल्यांना काढताहेत; कित्येकांना चार्जशीट मिळतोय्. आणि संघाचे लोक मालकांना संमती देताहेत. कित्येक मंडळी देशोधडीला लागताहेत. पूर्वी आम्ही चांगलीच दमदाटी केली असती. संघाच्या माणसाला घेराओ घातला असताना. मॅनेजमेंटकडे विचारणा केली असती. कमिटी होती आमची. चांगली एकजूट होती. पण ही आणीबाणी आली आणि जो तो घरात बसू लागला. जरा तोंड उघडलं की तुरुंग, अशीच भीती होती.'

'मग आता सवय होऊन गेली असेल कामगाराला, गप्प बसण्याची, मार खाण्याची?'

'त्याचे कसे असते, माणूस एक वेळ खातो, दोन वेळ खातो. पण अगदी भितीलाच टेकलं की उठतोच की. एकेकट्याला चार्जशीट दिलं की, त्याचा परिणाम फार होत नाही. पण सर्वांवर मिळून एकच हल्ला केला की, त्याचा चांगलाच परिणाम होतो.'

'असा कोणता हल्ला कामगारांना जोरात जाणवला?'

'बोनसचा वटहुकूम अगदी वर्मावरच बसला की हो; ६९ साली बोनसची चळवळ जोरात चालविली आम्ही. त्याचा परिणाम झाला आणि ७१ साली बारा महिने काम आणि तेरा महिने पगार असा कायदा जाहीर झाला.'

'अहो, पण आपल्या देशावर आर्थिक संकट आले असताना बोनस कापला त्यात काय चूक?' मी डिवचत विचारले. सालोमन उसळून उठले, 'आमची चेष्टा करता काय? देशाचे आर्थिक संकट म्हणजे भांडवलदारांना! त्यांना नफा होत नाही याचंच नं! हे बघा, तुमच्या संकटाला आम्ही कसं काय जबाबदार? आम्ही काम करायला तयार आहोत. उत्पादन काढायला तयार आहोत. २ कोटी माणसं बेकार आहेत. माझी स्वतःची तीन जवान मुले बेकार फिरताहेत. द्या त्यांना काम आणि काढा प्रॉडक्शन. पण जास्तीत जास्त नफाही हवा आणि अरिष्टही नको, हे दोन्ही कसे जमायचे हो! आणि पुन्हा गंमत बघा, एवढा बोनस कापला आणि सी. डी. एस्. कापला तरी भाववाढ काही थांबली नाही. तेव्हा आता आम्ही म्हटलं की, आणीबाणी आली ती आम्हाला नागवी करायला आली तर खोटं होईल का! बोनसमधून दरवर्षी माझ्या घरातला सगळा कपडा येतो. यंदा चिटारंभी घेतले नाही मी.'

'सालोमन, अहो तिकडे एवढे पुढारी तुरुंगात गेले होते, त्यांचे स्वातंत्र्य काढून घेतलय्. काँग्रेस पक्षावर टीका करण्याचे, आर्थिक धोरणावर टीका करण्याचे स्वातंत्र्य काढून घेतले त्याचे वाईट वाटत नाही का?

तुम्ही केवळ तुमच्याच पोटाची काळजी करताय् ?'

'त्याचं काय आहे, आमच्या प्रश्नांबद्दल कोणीच बोलत नाही. आमच्या पोटाला चिमटा बसला. धाकट्या भावाची नोकरी सुटली. त्याच्या पोराला आणि बायकोला घेऊन तो येथेच आला. आधीच चार घास मिळायचे, आता दोनच मिळायला लागले. हे तुमच्या पेपरवाल्यांना कधी दिसलंय् ? पुढाऱ्यांना पकडलं म्हणून कांगावा केला पण या पुढाऱ्यांपैकी आमची बाजू घेणारे आणि आमचे प्रश्न मांडणारे किती थोडे ? सरसकट सगळ्यांना पकडलं म्हणून आम्हाला काही दुःख झाले नाही. हां ! काही चांगल्या माणसांना पकडलं. वाईट वाटलं. त्यांच्यानंतर आमचीच पाळी हे लक्षात आलं. त्याचा प्रत्ययही नंतर आलाच की !'

'१९७५ साली मालकाने बोनस देणार नाही म्हणून जाहीर केले. चांगला मजबूत नफा होता. करार होता बोनसचा १६% चा. आम्ही कमिटी सभासद बसलो आणि आपला विरोध दाखवायचं ठरवलं. आणीबाणी जाहीर झाली तेव्हा लक्षात नव्हतं आलं, कोणासाठी, कशासाठी ? स्मगलरांना पकडलं तेव्हा बरं वाटलं, चोरांना पकडलं. पण त्यानंतर मात्र बोनस बटहुकूम, सी. डी. एस्. महाराष्ट्र सरकार कर असे सगळेच कर लादले गेले आणि इंगा लक्षात यायला लागला. कामगार संतापू लागले, मालकांना संरक्षण देण्याचाच प्रयत्न होता. काळे बिल्ले लावायचे ठरविले चार दिवस. पहिल्या दिवशी सगळ्यांनी लावले. अधिकाऱ्यांनी एकट्या-दुकट्याला गाठून दम दिल्यावर हळूच काढले. मला पोलीस कमिशनरच्या ऑफिसात घेऊन गेले. तंबी दिली. तुरुंगात पकडून चालू–मग बायकापोरे रडली तरी चालेल. मी बधलो नाही. १९७६ च्या दिवाळीलाही हाच प्रकार. सतत माझ्यावर लक्ष होते.'

'तुम्हाला काय वाटलं, मोरारजीभाई, जयप्रकाश, अटलबिहारी यांना का पकडलं असावं ? ते लोकशाहीच्या बाजूने होते म्हणून ?'

'जयप्रकाशांचे मला काही कळत नाही. पण मोरारजीभाई आणि अटलबिहारी हे पक्के भांडवलदारांच्या बाजूचे. त्यांना स्वतःकडे सत्ता हवी असणार, खुर्चीवर बसायचे असणार ! म्हणून संधिसाधूपणे आम्हा कष्टकरी लोकांच्या असंतोषाचा फायदा घेत होते आणि इंदिराबाईंवर टीका चालू होती. इंदिराबाई भांडवलदारांचे हित बघतात. त्यासाठी त्या कायदे करतात, धोरणे आखतात. मात्र बाई धूर्त आहे. गरिबी हटाओ म्हणत पुढे जाते. मोरारजीभाई मूर्ख आहे. तो १९७१ चा बोनस कायदा चुकीचा आहे म्हणून खरं खरं सांगतो. भांडवलदारांच्या हितासाठी १०५ माणसे मारायला मागेपुढे बघत नाही. याला काय लोकशाहीवादी म्हणायचे ! जनतेच्या बाजूचे यातले किती आहेत ? तुम्हाला मोर्चा काढायचे स्वातंत्र्य आहे आणि मला गोळ्या मारायचे स्वातंत्र्य असे म्हणणारा हा मुरारजी.'

'इंदिराबाई जास्त चांगली की काय ? आणि तिची आणीबाणी ?'

'ज्या बाईने भांडवलदारांचे रक्षण केले तिला कशी चांगली म्हणू ? ती, तिचा पक्ष, सगळेच हरामखोर आहेत. आपला वाली कोणीच नाही.'

'पण ती बाई हुकूमशाही आहे, असं नाही वाटत ?'

'अरे लेकांनो, तुम्ही बसा आपापसात लाथाळ्या मारत, मग कोणीही सोकावेल. शेवटी बाईला आपले आर्थिक धोरण पुढे न्यायचं, या. येऊ नका. तिला भांडवली व्यवस्था टिकविण्याचे काम दिलंय्. ती राबविते सत्ता. आता संजय गांधींच्या बाबतीत बाईचे पाऊल जरा चुकलंच. असे घोड्यावर बसवून, कोणाला पुढारी करता येते का ? बाईचा विश्वास नसणार सहकाऱ्यांवर. भांडत बसणारी मंडळी ही. आपली धोरणे पुढे राबवितात की नाही ? मग तिने लेकाला काढला पुढे. पण बाईंना महागात पडणार आहे.'

'बाईंना पायबंद घालावा असे नाही वाटत ?'

'बाईंना पायबंद घालावा आणि बुवालाही घालावा. अहो, मला सांगा, हे भांडवली अरिष्ट. यातून बाहेर कसं पडायचे ? ह्याचा काय बेत आहे तुमच्याकडे ? समजा, तुम्हीही त्या चक्री वादळात सापडलात की, पुन्हा तुमच्यातूनही कोणी हुकूमशहा तयार होणार नाही कशावरून ? लोकशाही मिरवता, खरी लोकशाही कधी राबेल ? लोक सुशिक्षित आहेत, रोजगार आहे. खाऊनपिऊन सुखी आहेत. तेव्हा लोकशाहीला अर्थ आहे. हा जनता पक्ष राज्यावर आला आणि भांडवली अरिष्ट कायम आहे. तो काय सांगेल, बाबांनो, खजिना रिकामा आहे, कारण भांडवलदारांचे खजिने भरलेले आहेत. येथे, परदेशांत. तुम्ही बोनस मागू नका. भांडवलदारांना नफा होणार नाही. तो कारखाना बंद करेल. मग आम्हाला कर मिळणार नाहीत. किमान वेतन जाहीर केलंय्. जनता पक्ष म्हणेल, हे किमान वेतन परवडणार नाही. छोटे कारखाने बंद पडतील. छोटे कारखानदार आमचे मित्र आहेत. म्हणजे अरिष्ट चालूच आणि लोकशाहीच्या गप्पा. लोकशाहीची पुंगी, वाजली तर वाजली नाही तर मोडून खाल्ली, असे म्हणणारी ही भांडवलदारांची जात.'

'मग तुम्हाला स्वातंत्र्य पाहिजे की नाही ? गेटमीटिंग्ज घ्यायच्या, संप करायचे, संघटना बांधायची.'

'आम्हाला स्वातंत्र्य हवंय् ना ! पण ते स्वातंत्र्य जनता पक्ष आणेल, असा भरवसा नाही.'

'मग काय करायचं म्हणता ?'

'बघू आता. आमच्या दोन्ही पक्षांनी दिवाळं काढलं. एक कांग्रेसच्या मागे. एक जनता पक्षाच्या मागे. तेव्हा आता आपणच काही तरी सुरू केले पाहिजे. निवडणुका काही खऱ्या नाहीत.'

'मग निवडणुकांना जाणार की नाही ?'

'जाऊ नं ! सगळीकडूनच कामगारवर्गाची मुस्कटदाबी असते. एक पण पेपर नाही आमच्या बाजूचा. तेव्हा लोकसभेत आमचे प्रश्न जे मांडतील त्यांना मत देऊ.'

'कांग्रेसला ?'

'काय बोलता ! ज्यांनी छळलं गेले १९ महिने त्यांना कसं मत देता येईल ? त्यांचे स्वरूप एकदा कळले की. असा छळ सहन करणार नाही, हे तर दाखवायलाच हवं. दोन्ही पक्षांना. कांग्रेसचा पराभव करायलाच हवा. पण निवडणुका हे काय एकच माध्यम आहे हो राजकारणाचे. आमचे खरे राजकारण रस्त्यातच. लोकसभेत कोण कोणाशी संगनमत करेल काही कळत नाही. तेथल्या चर्चा तर आमच्यापर्यंत पोचतात कशाला ! आमचे म्हणणे येथेच मांडू की.'

□

दुसरी एक कंपनी. १९७६ साली जेथे ३७ दिवस संप चालला होता. गंमत म्हणजे ज्या युनियनच्या पुढारी मंडळींनी कामगारांची बाजू घेऊन, हक्कांचे संरक्षण करायचे त्याच पुढाऱ्यांनी मॅनेजमेंटची बाजू एवढी उचलून धरली की, शेवटी मॅनेजमेंट नरम येऊन सुद्धा, युनियनमुळे कामगारांना बोनस द्यायला धजली नाही. आर. जे. मेहेतांची कामगारसभा. जुलै–ऑगस्टमध्येच आर. जे. मेहेतांना तुरुंगात टाकल्यामुळे त्यांच्या अनुयायांनी सरकारच्या बोनस-कायद्यापुढे लोटांगण घालायचे ठरविले. १ कोटी १५ लाख रुपये नक्त नफा असतानाही मॅनेजमेंटने सरकारी कायद्याकडे बोट दाखविले. बोनस द्यायची गरज नाही. आणि कामगार सभेने भाषण करून कामगारांना जाहीर केले– No profit. No bonus. No strike. त्याबरोबर संतापाची लाट चढली. ३५०० कामगारांनी फार मोठा निर्धार दाखविला. युनियनने वाऱ्यावर सोडले. कोणाच्या तोंडाकडे मार्गदर्शनासाठी पाहायचे! भारत संरक्षण कायदा लागू झाला. २० कामगार–कार्यकर्त्यांची तुरुंगात पाठवणी. रोज कंपनीच्या दारासमोर ३००० लोकांचा जमाव बसलेला. पोलिसांची गस्त सुरू. युनियनने मोटारी भरभरून दुसरे कामगार-भरती करून पाठविले. संप मोडून काढायचा निर्धार केला आणि तरीही कामगार शरण आले नाहीत. पोलिसांचा ससेमिरा सुरू झाल्यावर तर वर डोंगरात जाऊन राहण्याची पाळी आली. महिनाभर वणवण फिरत कामगारांनी संप चालविला. वढावकर म्हणून हिंद मजदूर सभेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना मार्गदर्शन केले. पण ते सोशॅलिस्ट पार्टीचे असल्यामुळे सरकारने या प्रसंगी काहीही लक्ष घालण्याचे नाकारले. तसेच एरवी इतर कारखान्यांची जी सहानुभूती मिळणे शक्य होते, तीही आणीबाणीच्या भीतीमुळे मिळाली नाही. फंड उभा राहू शकला नाही. एकाकी लढयाचे स्वरूप आले. सर्वांच्याच कुटुंबियांना या संपाची झळ लागली. एरवीही संप होतात. पण आणीबाणीमुळे मालकांना जो आडोसा मिळाला आणि त्यामुळे तोंडरपणा दाखविता आला तो नेहमीच्या वातावरणात घडले नसते.

किमान वेतनाच्या अंमलबजावणीवर तर या आणीबाणीमुळे खूपच परिणाम झाला. इंडस्ट्रिअल इस्टेटमध्ये छोटे छोटे अनेक कारखाने असतात. येथे एका कारखान्यात २०–२५ लोक काम करत असतात. संख्येमुळे त्यांची संघटित करण्याची ताकद कमी असते. आणीबाणीपूर्व काळामध्ये या असंघटित कामगारांना इस्टेटवाइज संघटित करण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. प्लॅस्टिक, काच, इंजिनीअरिंग अशा अनेक धंद्यांमध्ये किमान वेतन सरकारने लागू केले होते. आणीबाणीमुळे संघटनास्वातंत्र्य थांबले, गेटमीटिंग्ज येणे थांबले आणि या छोट्या कामगारांशी संपर्क तुटला. उल्हासनगरच्या ४० सिल्क युनिट्समध्ये ८०० कामगारांनी संप केला आणि ८० कामगारांना नोकरीला मुकावे लागले. एरवी मोर्चा काढून, कामगारांचा झुंजारपणा वाढविता आला असता. टिकाव धरता आला असता. ८० कामगारांवर कुऱ्हाड कोसळल्यावर बाकीचे घाबरले. कामगार चळवळीवर फारच परिणाम झाला. कामगार-कोर्टात जा आणि खटले लढवा. पण एरवी ताकदीच्या जोरावर जो सौदा करता यायचा ते आणीबाणीमुळे बंद झाले.

याच काळात इंटकच्या काँग्रेसप्रणीत युनियनकडे कारखाने जाण्याचे प्रमाण वाढले. मारामाऱ्या झाल्या नाहीत, किंवा इंटकने मुद्दाम फोडल्या असे नाही. पण वातावरणातील दबावामुळे, कामगारांनाच आशा वाटायची की सरकारी पक्षाच्या युनियनकडून सवलती मिळू शकतील. इतर युनियन पुढाऱ्यांना पकडून तुरुंगात टाकण्याचे सत्र चालू होते. शिवाय गेट मीटिंग्ज् घेता येत नसल्यामुळे मोठ्या कामगारसमुदायाशी प्रत्यक्ष बोलणे, त्यांना पटवून देणे वगैरे शक्य होत नसे, असे अनेक कामगार कार्यकर्त्यांनी सांगितले.

"प्रत्यक्ष शारीरिक हल्ले किंवा धमक्या असे किती ठिकाणी घडले?"

"बहुतेक नाहीच. दडपणे होती ती एकूण वातावरणाचीच जास्त होती."

"अनेक ठिकाणी संप झाले तेव्हा फक्त आर्थिक मागण्याच पुढे आल्या की आणीबाणी उठवा, संघटना–स्वातंत्र्य द्या, वृत्तपत्र-स्वातंत्र्य द्या अशा प्रकारच्या राजकीय मागण्या पुढे येत होत्या?"

"१९७५ साली तरी कामगार फारच दबून होते. एकतर काहींना बोनस आधीच मिळाला होता. शिवाय बोनस रद्द करणारा वटहुकूम ७५ सालच्या ताळेबंदावरील बोनसपासून सुरू होत होता. त्यामुळे ७६ साली बोनस प्रश्नांवर वातावरण चांगलेच तापले. गिरणधंद्यात १४, १५, १६ ऑक्टोबरला उत्स्फूर्त संप झाले. तेथे त्याला थोडेफार चळवळीचे स्वरूप आले. पण इतर ठिकाणी एकेका कारखान्यात संप झाल्यामुळे एकजुटीचा अभाव होता. आणीबाणीबद्दल संताप खूप होता. आणीबाणीमुळे बंधने आहेत हे जाणवत होते. पण कामगारांना अमूर्त मागण्या या पुढाऱ्यांकडून याव्या लागतात. त्यांच्यासाठी आणीबाणी म्हणजे बोनस जाणे आणि संप न करता येणे. दुर्गाबाईंसाठी आणीबाणी म्हणजे सरकारवर प्रत्यक्ष टीका न करता येणे, सभांमधून, लेखांमधून. दुर्गाबाई एकट्या उठून आपला संताप व्यक्त करू शकतात तसा एकेकटा कामगार करू शकत नाही. त्यांची ताकद समुदायांमध्ये असते. ऑक्टोबरनंतर कामगारांमधील असंतोष वाढीला लागला होता. निवडणुका जाहीर झाल्या नसत्या तर त्या असंतोषातून आंदोलन उभे राहण्याची शक्यता होती. राजकीय मागण्या घेऊनही कामगार पुढे आले असते."

"आणीबाणी जाहीर झाल्यावर कामगार-पुढाऱ्यांनी कामगारांना का जागे केले नाही? प्रतिकार का केला नाही?"

"मुख्य गोष्ट म्हणजे पुढारी कामगारांना आदेश देतात किंवा हुकूम सोडतात, म्हणून कामगार ऐकतात. ही कल्पना साफ चुकीची. पुढारी कामगारांच्या मनातील असंतोषाला शब्दरूप करू शकतात. वळण लावू शकतात. त्यामुळे आणीबाणी हा नक्की काय प्रकार आहे, कोणाविरुद्ध आहे याचे आकलन पुढाऱ्यांना झाले तरी कामगारांना होणे शक्य

## असंतोष धुमसताना आढळतोय

नव्हते. तेवढी राजकीय जाणीव आज वाढलेली नाही. अर्थात त्याला पुढारीही काहीसे जबाबदार आहेत. पण कामगार हा अनुभवातून शिकतो. अजूनही अगदी सामान्य माणूस सरकारला मायबाप मानतो, आणि मालक वाईट पण सरकार आपले संरक्षक अशी भावना मनात असते."

टेक्स्टाईल इंडस्ट्रीला या आणीबाणीचा चांगलाच फायदा मिळाला. सरकारला कापड धंद्याबाबत अजूनही एकसूत्री धोरण आखले नाही. मालकांचे नफ्यावर लक्ष असल्यामुळे परदेशी निर्यात, त्यासाठी टेरिकॉट, टेरिलीन-सारखे महागड्या कापडाचे उत्पादन, त्यालाही स्वयंचलित यंत्रे. आणि हजारो कामगार बेकार होताहेत. गेल्या दोन वर्षांत ३५ गिरण्या बंद पडण्याच्या मार्गावर आल्या. आगासवाडी गिरणी सहा महिने बंद असून युनियन, मालक व सरकार चूप बसून आहेत. यासंबंधी इतरांना काहीही हालचाल करता आली नाही. कारण कामगार भीतीने घाबरलेले. बदलीकामगारांची अवस्था तर फार वाईट झाली आहे. कित्येक गिरण्यांच्या बाहेर कामगार भिंतीला पाठी लावून बसून राहिलेले दिसतात. बदली असल्यामुळे रोज हजेरी लावावी लागते, तर पास कायम राहातो. येण्याजाण्याचा खर्च. पण काम कधी ३ दिवस, कधी ४ दिवस महिन्यातून मिळते. कित्येक गिरण्यांमध्ये बदली कामगारांचे प्रमाण खूप आहे. त्यांना ग्रॅच्युइटी, नुकसान-भरपाई काहीच द्यावे लागत नाही. छुपी बेकारी प्रचंड आहे. आणि दोन वर्षांत वाढलीय.

जुनी यंत्रे काढून टाकण्याचे काम जोरात चालू आहे. यंत्र काढून टाकले तर त्यावर काम करणाऱ्या कामगारांना नुकसानभरपाई द्यावी लागते. दुसऱ्या यंत्रावर त्याची इच्छा असेल तरच पाठविता येते. कारण त्या यंत्रावर त्याला काम करणे झेपेल असे नाही. तसेच यंत्र काढून टाकणार याची आधी नोटीस लावावी लागते. एलफिस्टन मिल-मधील घाडीगावकर या कामगाराची ही चित्तरकथा नोटीस लावली नाही हे सांगायला तो मॅनेजमेंटकडे गेला. तर उद्धटपणाचा आरोप ठेवून त्याला कमी केला, आणि नुकसानभरपाई वाचवायचा प्रयत्न केला. आता प्रकरण कोर्टात. बसा ३–४ वर्षे काम-गार कोर्टात खेपा टाकीत. बॉम्बे डाईंगच्या गिरणीमध्ये कामाचे स्टॅंडर्डायझेन केले नाही. यामुळे कामगारांकडून सोल्झर खात्यात खूप काम करवून घेतात. आणी-बाणीमुळे हा प्रश्न अनायसे दबला गेला. प्रत्येक कारखान्यात अशा प्रकारचे अनेक अन्याय घडल्याचे लक्षात येते. शिस्तीच्या नावाखाली, आणीबाणीच्या छत्रीखाली काम-गारांना दबावात ठेवून मालक वर्गाने बऱ्याच सवलती मिळविल्या.

म्हणूनच मुंबईच्या कामगारांच्या मनाचा कानोसा घेतला तर, असंतोष धुमसताना आढळतोय. सगळ्यात मोठा घाव त्यांच्यावर वर्ग म्हणून बसला. तुरुंगात मध्यमवर्गातील अनेक व्यक्ती गेल्या. त्यांच्या कुटुंबियांचे हाल झाले, आणीबाणीमुळे मनाची कोंडी झाली. गुदमरल्यासारखे झाले. तरी पण मध्यमवर्गीयांचे नित्य व्यवहार चालूच होते. अगदी सामान्य कामगार–विशेषतः उत्तर हिंदुस्तानी भय्ये 'मॉं अभी दूध पिलाएगी' या आशेने इंदिराबाईंकडे डोळे लावून होते. पण बाकीच्या कामगारांना आणीबाणीचा मालक-धार्जिणेपणा लक्षात येऊ लागला होता. आज जर त्यांना विचारले, मत कोणाला देणार ? तर कॉंग्रेसला नक्की नाही, असा सूर असतो. गिरणगावात राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या विरोधी खूप वातावरण आहे. पण विरोधा-मध्ये कोण आहे ? रोझा देशपांडे. डांग्यांची कन्या. डांग्यांची पुण्याई अजून काही काळ चालेल. तरी सुद्धा कॉंग्रेसच्या कच्छपी लाग-लेल्या कम्युनिस्ट पक्षाबद्दल लोक नाराज आहेत. 'आपला माणूस' कुठेच दिसत नाही. जनता पक्षातर्फे रिपब्लिकन पक्षाचे कांबळे उभे आहेत. जनता पक्ष आपलासा वाटत नाही. विनोदाने असाही सूर निघतो, अरे खुर्चीवर बसल्यावर कोणीही खाणारच. कॉंग्रेसच्या लोकांनी २७ वर्षे राज्य करून निदान खिसे भरलेले आहेत. तेव्हा आता फार हाव उरली नसणार. कोणी नवी माणसे आली की त्यांचे खिसे रिकामे. ते मरेपर्यंत त्यांची हाव चालेल. तेव्हा जुनेच बरे. सालोमनसारखी जुनी आणि जाणती मंडळी म्हणतात, 'खरं म्हणजे डाव्या-उजव्या कम्युनिस्टांनी आणि इतरांनी एकत्र येऊन आपली तिसरी शक्ती उभी करायला पाहिजे. आणि कोणी पक्ष राज्यावर आला तरी कामगारांचे हक्क संरक्षण करण्यासाठी ताकद कमवायला पाहिजे हेच खरे. आपल्या पायावर उभे राहणे हेच खरंय्. अर्थात ते स्वप्न आहे. मात्र ज्यांना हे कळतंय त्यांनी तरी सुरुवात केली पाहिजे. पुढे अस्थिरतेचा काळ आहे. आर्थिक व राजकीय दोन्ही. अशा वेळी कामगार, मध्यम वर्ग यांच्यावरचे हल्ले टाळणे कोणत्याही पक्षाला जड जाईल. म्हणूनच कॉंग्रेसचा पराभव तर केलाच पाहिजे. पण जनता पक्षाबद्दल भ्रमात राहता कामा नये आणि दीर्घ लढ्या-साठी संघटित झाले पाहिजे. ही त्रिसूत्री अनेक असंलग्न कामगार संघटनांनी स्वीकारली आहे व आपले स्वतंत्र व्यासपीठ उभारले आहे. केवळ निवडणुकांच्या राजकारणाकडे लक्ष लावून बसणे शक्य नाही, हाच त्यांचा निष्कर्ष. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

। मॅक्झिम गॉर्की ।

। सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ । पुणे ४११ ०३०

# लोकशाहीचे पुनरुत्थान

पन्नालाल सुराणा

ग्रामीण भागात राजकीय जागृती पूर्वीपासूनच कमी आहे. दळणवळणाची साधने अपुरी, साक्षरतेचे प्रमाण कमी, विरोधी पक्षांच्या व शेतकरी–शेतमजुरांच्या संघटना दुबळ्या, त्यामुळे आणीबाणीविरुद्ध ग्रामीण भागात उठाव होईल अशी अपेक्षाच नव्हती. केंद्र सरकारने १९७६ च्या जानेवारीत करविलेल्या एका पाहणीत असे आढळून आले की, देशात आणीबाणी पुकारली गेली व २० कलमी कार्यक्रम जाहीर झाला याची ९५ टक्के लोकांना माहिती नव्हती. तेव्हा त्यांचा आणीबाणीला व इंदिराबाईंना पाठिंबा आहे या म्हणण्यात काही अर्थ नाही. ग्रामीण भागातील धनिकवर्ग समाजातील व सरकारी यंत्रणेतील आपले स्थान टिकविण्यासाठी 'इंदिरा गांधी की जय' म्हणणे स्वाभाविक आहे. पण प्रत्यक्षात २० कलमीच्या कार्यक्रमात अडथळा आणीत आहेत. मध्यम व छोटा शेतकरी आणि शेतमजूर यांचे प्रश्न सुटण्याच्या दिशेने आणीबाणीनंतर भरीव प्रगती होताना दिसत नाही. सरकारची अर्धवट धोरणे, नोकरशहांची बेपर्वाई, काँग्रेस पुढाऱ्यांची व धनिकांची स्वार्थ साधण्यासाठी सत्ता वापरण्याची धडपड यामुळे दिवसेदिवस या वर्गाची स्थिती अधिकच बिघडत जाईल. त्यामुळे त्यांच्यातील असंतोष वाढेल असेच दिसते. लोकशाही मूल्ये, नागरिक हक्क, लोकशाही संस्थांचे पावित्र्य आदी गोष्टींची या वर्गांना जाणीव नसल्यामुळे इंदिराबाईंनी सुरू केलेल्या हुकूमशाही राजवटीचे स्वरूप त्यांच्या लक्षात लवकर येणार नाही. पण त्यांचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक बिकट होऊ लागतील व त्यावेळी अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या वाटा अडवल्या गेल्या आहेत हे त्यांना अनुभवाने जाणवेल.

दीड वर्षाच्या आणीबाणीच्या अनुभवानंतर देशाचे राजकीय चित्र दिसते ते असे–एका बाजूला इंदिराजींनी कडक रौद्र अवतार धारण केला असून सर्व सत्ता आपल्या हातात घेतली आहे.. आपला मुलगा संजय याच्याशिवाय त्यांना विश्वासू सहकारी कोणीही राहिला नाही. त्यांच्या जुन्या सहक. त्यांच्या मनात भीती व दहशत निर्माण झाली आहे. त्यांच्याभोवती हांजी हांजी व तोंडपुजेपणा करणाऱ्यांचा गोतावळा जमला आहे. क्रांतिकारी कार्यक्रम तर सोडाच, पण कल्याणकारी कार्यक्रम अमलात आणायलासुद्धा त्यांच्याजवळ विश्वासार्ह यंत्रणा नाही. नोकरशाही व काँग्रेस पक्ष या दोन्हीत भ्रष्टाचार बोकळला असून, 'वरच्यास माथा खालच्यास लाथा' ही वृत्ती वाढली आहे. या परिस्थितीचा फायदा घेऊन धनिकवर्ग, श्रमजीवी व दलितांचे अधिकाधिक शोषण करू लागला आहे.

इंदिरा राजवटीचे स्वरूप हुकूमशाहीचे आहे असे मानणारा लोकशाहीनिष्ठांचा छोटासा वर्ग हुकूमशाहीच्या विरोधात दंड थोपटून उभा आहे. विविध राजकीय पक्ष, सर्वोदयी कार्यकर्ते, कामगार कार्यकर्ते, वकील, प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार इ. बुद्धिजीवी यांचा त्यात समावेश होतो. लोकशाही मूल्ये व संस्था आणि नागरिक हक्क यांच्या जपणुकीसाठी प्राणाचे मोल द्यायलाही त्यांची तयारी आहे. पण त्यांच्या हाताशी कुठलीही हुकमी संघटना नाही. नोकरशाहीवर त्यांचे नियंत्रण नाही. त्यांच्या राजकीय संघटना शहरात केंद्रित झाल्या आहेत व साधनसामग्रीने दरिद्री आहेत.

देशातील बहुसंख्य सर्वसामान्य जनता कोणाच्याच बाजूने उभी नाही. इंदिराबाईंविषयी त्यांच्या मनात धाक असेल, पण प्रेम मुळीच नाही. बाईंनी सुरू केलेली राजवट आपल्या हिताची आहे असे त्यांना वाटत नाही. पण बाईंच्या प्रचंड सत्तेपुढे आपला काय इलाज चालणार, अशी अगतिकतेची भावना त्यांच्या मनात आहे.

सर्वसामान्य जनतेची अशी स्थिती असण्याला अनेक कारणे आहेत. आपल्या देशात वर्षानुवर्षे समाजजीवनाचा गावगाडा स्वयंपूर्ण खेड्यांच्या चाकोरीत चालत आला आहे. सगळ्यांच्या गरजा जेमतेम भागवणारी व त्यासाठी प्रत्येकाला चाकोरीतूनच चालायला लावणारी असे या व्यवस्थेचे स्वरूप आहे. त्यामुळे आपले खेडे हेच बहुतेकांचे जग असते. खेड्याबाहेर काय चालले आहे याची बहुतेकांना गंधवार्ता नसते. केंद्रीय सत्तेत झालेल्या उलथापालथीबाबत सर्वसामान्य माणूस उदासीन राहत आला आहे. धार्मिक अंधश्रद्धेने त्याला दैववाद शिकवला. नशिबात असेल तसे होईल, ही शिकवण लहानपणापासून मनावर बिंबवली गेल्याने असेल, 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' अशी त्याची वृत्ती झाली. जातिव्यवस्थेमुळे आपआपसातील फाटाफूट कायम राहिली. एकमेकांच्या विषयी अविश्वास वाटत राहिला.

गेल्या दोन शतकांत सुरू झालेल्या औद्योगीकरण, आधुनिक शिक्षण व शहरीकरण यांमुळे जुन्या पारंपरिक वृत्तींवर थोडे आघात झाले. एकराष्ट्रीयत्वाच्या जाणिवा शहरात वाढल्या. ग्रामीण भागात थोड्याफार पोहोचल्या. राजकारण हे आपल्या कक्षेपलीकडचे नाही, आपल्या सामूहिक प्रयत्नांनी राजकारणाला इष्ट ते वळण देता येते, याची अल्पशी जाणीव निर्माण झाली. शहरात ती जाणवण्याइतपत तीव्र होती, तर ग्रामीण भागात कुठे कुठे तिचा आढळ होत होता. लोकशाही मूल्ये व संस्था आणि नागरिक हक्क यांची जाणीव फारच थोड्यांना झाली होती. म. गांधींसारख्या युगकर्त्याला सुद्धा 'निर्भय बना' यासारखा प्राथमिक धडा येथील जनतेला

शिकवावा लागला, तेव्हा वर्गीय जाणीवा सर्वत्र निर्माण होणे तर खूपच लांबची गोष्ट होती. स्वातंत्र्य-आंदोलनात भावनिक आवाहनामुळे सामान्य माणूस ओढला गेला. कुठे कुठे त्याने आश्चर्यकारक पराक्रम करून दाखविला. त्या काळातही विभूतिपूजेचा उपयोग झालाच. दूरदृष्टी असलेले, जनतानिष्ठ त्यागी नेते पुजायला मिळाले, हा सुयोग होता. पण त्यामुळें सुद्धा विभूतींवर अवलंबून राहणे आणि अवतारी पुरुषाची वाट पाहणे या कुबड्यांची गरज कायमच राहिली.

## भोगयुग

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्तेवर आलेल्यांचे डोळे दिपून गेले. त्यागाचे युग संपले, आता भोगाचे युग सुरू झाले असे त्यांनी मानले. सत्तेचा वापर जनतेचे प्रश्न सोडवण्याऐवजी स्वतःचा फायदा साधण्यासाठी आणि प्रतिष्ठा दाखविण्यासाठी होऊ लागला. राष्ट्रीय चळवळीतून चालत आलेल्या उदारमतवादी विचारांचा व शुद्ध चारित्र्याच्या कल्पनांचा धाक झपाट्याने ओसरत चालला. राज्यघटनेने जरी व्यक्तिनिरपेक्ष संस्थांची चौकट उभी केली, तरी सत्ताधारी मंडळी व्यक्तिनिष्ठ राजकारणच खेळू लागली. सत्तेच्या वरिष्ठ स्थानावर असलेल्यांची मेहेरबानी संपादन करायची व त्याचाच दिमाख दाखवून सामान्य जनांना भुलवायचे किंवा धाकात ठेवायचे हा त्यांचा स्वभाव बनला. पंडित जवाहरलाल नेहरू विचाराने उदारमतवादी होते, पण व्यक्तिनिरपेक्ष संघटनेने बळ वाढावे याचे भान त्यांनाही राहिले नाही. अफाट लोकप्रियता, नव्याने हातात आलेली प्रचंड सत्ता आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात सुरू झालेल्या शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मांडलेल्या तटस्थतावादाचे होऊ लागलेले कौतुक यामुळे नेहरूंनी व्यक्तिपूजेचे स्तोम माजू दिले. संसदीय संस्था व न्यायालये यांची कदर करावी, वृत्तपत्रे, साहित्यिक व विचारवंतांच्या संघटना यांचा आदर करावा असे त्यांना वाटत असे. पण नव्यानेच सुरू झालेल्या निवडणुकांच्या राजकारणात आपल्या वैयक्तिक प्रभावाने इतरांना भारावून टाकण्याची सवय त्यांना जडली. खुषमस्कऱ्यांची वाण नव्हतीच. त्यामुळे कॉंग्रेस पक्षाच्या संघटनेला, पर्यायाने देशाच्या राजकारणाला व्यक्तिनिरपेक्ष वळण लागण्याऐवजी व्यक्तिपूजेचेच महत्त्व वाढले.

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी पाश्चात्य देशात कम्युनिस्ट-विरोधाची लाट उसळली होती. भारतीय प्रजासत्ताकाची जडण-घडण पाश्चात्य लोकशाहीच्या धर्तीवरच झालेली होती. राज्यघटनेने निर्माण केलेल्या लोकशाही संस्था टिकविण्यासाठी, कम्युनिझमपासून त्यांचा बचाव करण्यासाठी, खाजगी मालमत्ता व व्यक्तिवादी कल्पना यांचा पुरस्कार होऊ लागला. वृत्तपत्रे व न्यायालये यांनीही याच कल्पना उचलून धरल्या. लोकशाही संस्था या देशातील बहुसंख्य श्रमजीवी व दलित जनतेला न्याय देऊ शकल्या नाही तर त्या संस्थांचा डोलारा म्हणजे वाळूत रचलेल्या किल्ल्यासारखा ठरेल याचे भान त्यांना राहिले नाही. प्रतिष्ठितांच्या हितरक्षणासाठी लोकशाही संस्था वापरल्या जात आहेत असा अनुभव येत राहिल्याने सर्वसामान्य लोकांत या संस्थांविषयी आत्मीयता निर्माण झाली नाही. आणि लोकशाहीवाल्यांनी जनतेत लोकशाही मूल्ये रुजवण्यासाठी प्रबोधनाचे व लोकशिक्षणाचे कार्य फारसे केले नाही.

देशातील विरोधी पक्ष हेही संसदीय संस्थांची चौकट मजबूत पायावर उभी आहे असे गृहीत धरून वागत राहिले. काही विरोधी पक्ष स्थितिशीलतेचे पुरस्कर्ते होते. सत्ताधाऱ्यांच्या हातून होणाऱ्या चुका तेवढ्या दाखवून द्यावच्या आणि जनतेचा पाठिंबा आपल्याला सहजासहजी मिळावा, म्हणून त्यांच्या परंपरागत अंध श्रद्धांना कुरवाळीत राहायाचे असे धोरण त्यांनी अवलंबिले. श्रमजीवी व दलित वर्गांना न्याय मिळावा व त्याचे समाजाच्या सामाजिक व आर्थिक व्यवस्थेत मूलगामी परिवर्तन घडून यावे, या ध्येयनिष्ठ विचारसरणीनुसार काम करणारे पक्षही संसदीय संस्थांचे राजकारण गृहीत धरून चालू लागले. त्यांपैकी साम्यवादी पक्षांनी संसदीय लोकशाही ही भांडवलशाहीची बटीक आहे, आणि नागरिकहक्क ही भांडवलदार वर्गाने पुरविण्याची चैन आहे अशी सांप्रदायिक भूमिका घेतली आणि श्रमजीवी वर्गात वर्ग-जागृती पुरेशी झालेली नसताना व संघटनेची पुरेशी ताकद वाढलेली नसताना सशस्त्र उठावाचा प्रयत्न केला. त्यात अपयश आल्यानंतर १९५३ साली त्यांनी संसदीय मार्गावर विश्वास प्रकट केला. त्यांच्यातील काहीजण सत्तास्पर्धेच्या व शिखर राजकारणात गुरफटून गेले, तर काहीजण संसदीय संस्थांची हेटाळणी करून सशस्त्र मार्गाचा प्रच्छन्नपणे पुरस्कार करीत राहिले. १९५७ साली केरळमध्ये आणि १९६७ साली केरळ व पश्चिम बंगालमध्ये संसदीय मार्गाने जाऊन साम्यवादी पक्षांना एकट्याने किंवा इतर पक्षांच्या सहकार्याने मंत्रिमंडळे बनविण्याची संधी मिळाली. तिचा फायदा घेऊन श्रमजीवी जनतेच्या हिताच्या दृष्टीने एकदोन ठळक गोष्टी ठोसपणे अंमलात आणण्याच्याऐवजी, सत्तेचा गैरवापर करून सहकारी पक्षांची ताकद खच्ची करायची व आपली पकड घट्ट जमवायची असा पवित्रा त्यांनी घेतला. त्यामुळे संसदीय लोकशाहीवरील त्यांचा विश्वास हा बेगडी व ढोंगीपणाचा आहे असे सर्वसामान्य जनतेला वाटले आणि हे विश्वासघातकी लोक आहेत असा इतर विरोधी पक्षांचा त्यांच्याबद्दल ग्रह झाला. त्यातच त्यांच्याकडून फुटून निघालेल्या काही जणांनी नक्षलवादी मार्गाचा अंगीकार केला. त्यामुळे ते जनतेची सहानुभूती गमावून बसले. कॉंग्रेसने त्यांच्यावर दडपशाहीचा वरवंटा फिरविला त्यावेळी ते एकाकी पडले. त्यांच्यातील उजवे कम्युनिस्ट तर बाजू बदलून कॉंग्रेसशी सहकार्य करू लागले.

परिवर्तनवाद्यांपैकी लोकशाही समाजवादी मार्गाने जाऊ इच्छिणारे पक्ष लोकशाही स्वरूपाची राज्यघटना देशाने स्वीकारली व निवडणुका, संसद वगैरे लोकशाहीचे उपचार सुरू झाले. यावरून लोकशाही बद्धमूल झाली असे मानू लागले. साम्यवादविरोध हेही त्यांच्या धोरणाचे प्रमुख सूत्र बराच काळ राहिल्याने साम्यवाद्यांच्या टीकेपासून संसदीय संस्थांचा बचाव करण्याच्या भरात प्रस्थापित, सामाजिक, आर्थिक व्यवस्थेचाही बचाव त्यांच्यापैकी काहीजण करू लागले: लोकशाही संस्थांचा वापर न्यायप्रस्थापनेसाठी करता यावा म्हणून प्रत्यक्ष समाजात जनशक्ती संघटित केली पाहिजे, न्याय, समता व नागरिक हक्क यांविषयी श्रमजीवी जनतेच्या मनात जाणीवपूर्वक निष्ठा निर्माण केल्या पाहिजेत, याचा त्यांना विसर पडला. साम्यवाद्यांची सांप्रदायिकता नाकारल्यानंतर परिवर्तनाचा आपला मार्ग कोणता हे स्पष्टपणे व निर्धाराने न ठरविल्यामुळे

त्यांच्यात फाटाफूट झाली. काहीजण भूदान चळवळीकडे व पर्यायाने सर्वोदयांच्या मार्गाकडे वळले. काहीजण विकसनशील देशांतील आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी सत्ताधाऱ्यांबरोबर सहकार्य करीत करीत काँग्रेसमध्ये शिरले. काहीजण चांगले विचार मांडण्याचे नेमस्त राजकारण करू लागले, तर काही उग्र प्रकृतीचे समाजवादी संसदीय संस्थांत आदळआपट करणे यालाच क्रांतीचा खरा मार्ग मानू लागले. फाटाफुटीमुळे त्यांचा शक्तिपात झाला व जनतेचाही त्यांच्यावरील विश्वास उडू लागला.

१९६३ नंतर आपल्या चुका सुधारून शक्तिसंचयाचे राजकारण डॉ. राम मनोहर लोहियांच्या नेतृत्वाखाली सुरू झाले. काँग्रेसचा सत्तेचा एकाधिकार असाच चालत राहिला तर सर्वसामान्य जनतेला आपले राजकारणात काही चालत नाही असे वाटू लागेल व त्यांची अगतिकता पराकोटीला पोहोचेल. तसे झाले तर, तो लोकशाहीच्या दृष्टीने मोठा धोकाच ठरेल. म्हणून मतदानाच्या मार्गाने काँग्रेसचा पराभव करण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र यावे असा विचार डॉ. लोहियांनी देशासमोर मांडला. देशभर दुष्काळ व महागाई यामुळे असंतोष पसरला होताच. केंद्र सरकारच्या अनेक भ्रष्टाचाराची लक्तरे वेशीवर टांगली गेली होती. या सगळ्यांचा परिणाम होऊन १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांत काँग्रेसला जबरदस्त हादरा बसला. ८।९ राज्यांत त्या पक्षाला सरळ पराभव पत्करावा लागला. लोकसभेतील त्या पक्षाचे बहुमतही काठावर आले.

## विरोधी पक्षांची प्रतिष्ठा का घसरली ?

काँग्रेसपेक्षा आपला कारभार अधिक जनतानिष्ठ होऊ शकेल असे दाखवून देण्याची संधी विरोधी पक्षांना प्राप्त झाली होती. म्हणून डॉक्टर लोहियांनी अशी सूचना केली की, बिगरकाँग्रेस पक्षांच्या संमिश्र मंत्रिमंडळाने अधिकारग्रहणापासून ६ महिन्यांच्या आत जनहिताची दोन तीन तरी ठळक कामे करून दाखवावीत. जर आपापसातील मतभेदामुळे तसे करून दाखविता आले नाही तर कोणा एका पक्षाला सरकार चालवू द्यावे. बाकीच्यांनी सत्तेबाहेर राहून काँग्रेसला अधिकारावर येऊ न देता जनहिताची ठोस कामे करवून घ्यावीत. जर जनहिताचा कार्यक्रम अंमलात आणताना केंद्र सरकारकडूनच अडथळे येऊ लागले, तर केंद्र सरकारविरुद्ध जनआंदोलन उभे करावे. या धडपडीत सत्तेवरून बाजूला व्हावे लागले तरी त्याची फिकीर करू नये. दुर्दैवाने लोहियांचा फार लौकर मृत्यू ओढवला गेला. बिगरकाँग्रेसी पक्षांना सत्ता राबविण्याचा अनुभव जेमतेमच होता. हातातून सत्ता गेल्यामुळे पिसाळलेले काँग्रेसवाले सत्ता परत मिळविण्यासाठी वाटेल त्या मार्गाचा अवलंब करू लागले. केंद्रसत्ताही त्यांच्या मदतीला होतीच. आपली सत्ता टिकवावी कशी, हाच प्रश्न संमिश्र मंत्रिमंडळांनी सगळ्यात महत्त्वाचा मानला. सत्ता टिकविण्यासाठी आयाराम-गयारामचे राजकारण करून संधिसाधूपणाला उत्तेजन दिले. १९६७ ते ६९ दरम्यानच्या बिहार, उत्तर प्रदेश, प.बंगाल, केरळ आदी राज्यांतील संमिश्र मंत्रिमंडळांनी भ्रष्टाचार बराच कमी केला. दुष्काळ–निवारणासारखी काही कामे दमदारपणे केली. पण सत्ता टिकविण्यासाठी तत्त्वशून्य तडजोडी करणे व पक्ष–बदलू लोकांचे स्वागत करणे या मार्गांचा अवलंब केल्यामुळे जनतेतील त्यांची प्रतिष्ठा घसरली. ह्या मार्गांचा वापर करण्यात काँग्रेस पक्ष अधिक वाकबगार होता. त्यामुळे दोन–तीन वर्षांच्या कालावधीत बहुतेक संमिश्र मंत्रिमंडळे कोसळली. बिगरकाँग्रेसी पक्षांच्या हाती सत्ता आल्यानंतर जनतेचे प्रश्न सुटण्याच्या दिशेने प्रगती होण्याऐवजी राजकीय अस्थिरता वाढली असे चित्र दिसू लागले. त्यातच १९६९ च्या नोव्हेंबरला इंदिराबाईंनी पुरोगामीपणाचा आव आणून काँग्रेस पक्षात फाटाफूट घडविली व तोपर्यंतच्या सर्व अपयशांचे खापर काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांवर फोडले. त्यामुळे देशाच्या राजकारणाचे ध्रुवीकरण होऊ लागले आहे, या कल्पनेने हुरळून जाऊन विरोधी पक्षातील काही लोक इंदिराबाईंना पाठिंबा देऊ लागले. सत्ता राबविण्यात अपयश आल्याने काही विरोधी पक्ष वैफल्यग्रस्त होऊन काँग्रेस पक्ष जे जे करील त्या त्या प्रत्येक गोष्टीला विरोध करू लागला. सरकारविरुद्ध होणाऱ्या चळवळींचे गुणावगुण न पाहता त्यांना पाठिंबा देऊ लागले. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष एवढीच फक्त झुंज आहे, असा त्यांचा समज झाल्यासारखे दिसू लागले.

जनता हा या सर्व राजकारणातला महत्त्वाचा निर्णायक घटक आहे, याचा त्यांनाही विसर पडला. लोकशाही संस्थांचे पावित्र्य, जनशक्तीची जोपासना यांची उपेक्षा झाली. समाजवादी पक्षही या सर्व अपप्रवृत्तींचा बळी ठरला.

या सर्व पार्श्वभूमीवर १९७१ च्या लोकसभा निवडणुका झाल्या. राजकारणातील अस्थिरतेला कंटाळलेल्या जनतेने 'गरिबी हटाव' च्या घोषणेकडे आशावादीपणाने पाहून इंदिराबाईंना भरघोस यश मिळवून दिले.

१९७१ च्या अखेरीस झालेल्या बांगला देश युद्धातील विजयामुळे इंदिराजींच्या लोकप्रियतेची कमान आणखी वर चढली. १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या काँग्रेस पक्षाला भरघोस यश मिळाले. त्यामुळे काँग्रेस पक्षात त्यांचे स्थान अनन्यसाधारण झाले, व्यक्तिपूजा बळावली.

१९७१ व १९७२ च्या पराभवाने विरोधी पक्ष चांगलेच हादरले. काही काळ विमनस्कतेत गेला. पण १९७३ पासून दुष्काळ, महागाई, बेकारी, भ्रष्टाचार हे प्रश्न उग्र होऊ लागले. लोक चळवळीत मोठ्या प्रमाणावर भाग घेऊ लागले. तशातच जयप्रकाशांसारख्या सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहिलेल्या नेत्याने आंदोलनात उडी घेतल्याने लोकांना फार मोठा आधार मिळाला. त्यांचे मनोबल वाढले. लोक ज्या प्रश्नांमुळे चळवळीत भाग घेऊ लागले, ते प्रश्न सोडविण्याऐवजी, 'निवडणुकीत मला इतके भरघोस यश मिळाल्यानंतर माझ्याविरुद्ध इतकी प्रचंड जनआंदोलने होऊच कशी शकतात?' असा आडमुठा प्रश्न इंदिराबाई विचारू लागल्या. १९७१ व १९७२ साली पराभूत झालेले विरोधी पक्ष आकसाने या चळवळी चालवीत आहेत, असा हेत्वारोप त्या करू लागल्या. वास्तविक लोकांतील असंतोषाला जनआंदोलनाच्या मार्गांनी संघटित करणे, यात गैर काही नव्हते. विरोधी पक्षांनी जे. पी. च्या नेतृत्वाखाली एकजुटीने या आंदोलनात सहभागी होणे लोकशाही राजकारणाशी पूर्णतः सुसंगत होते. त्यांची चूक आंदोलने चालविणे ही नव्हती, तर आंदो-

ल्नातून मजबूत पायावर जनशक्ती संघटित करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले नाही ही होती. बाईंचा मात्र तोल गेला आणि २९ जूनचे महाभारत घडले.

## जनलढ्याची नवी मांडणी

वरील घटनाक्रमावरून असे दिसून येते की, विरोधी पक्षांनी ही लोकशाही संस्थांची चौकट आपोआप अव्याहतपणे चालू राहील असे मानले. कोणा लहरी महंमदाने त्या चौकटीवर आघात केला तर ते सहन केले जाणार नाही, जनता त्याचा जाब विचारील, इतपत जनतेच्या मनात लोकशाही संस्था आणि मूल्ये यांच्याविषयी निष्ठा निर्माण झाल्या नव्हत्या. त्या निर्माण करण्यासाठी विरोधी पक्षांनी जाणीवपूर्वक चिकाटीने प्रयत्न केले, असेही झाले नाही. उदारमतवादी शिक्षणाची परंपरा लाभलेल्या उच्च मध्यमवर्गाने लोकशाहीचे फायदे तेवढे उपभोगायला मिळावेत असे मानले. लोकशाही बद्धमूल होण्यासाठी इतरेजनांत प्रबोधनाचे काम करण्याची आपली जबाबदारी आहे, असे मात्र त्यांनी मानले नाही. राजकीय पक्षापासून आपण अलिप्त आहोत, असे सांगण्यात त्यांच्यापैकी अनेकांना भूषण वाटे. स्वातंत्र्योत्तर काळात सुरू झालेल्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नात तंत्रज्ञ, नोकरशहा, स्वतंत्र व्यावसायिक, उद्योगधंद्यातील व्यवस्थापकवर्ग इत्यादी विभागांना महत्त्वपूर्ण स्थान मिळत गेले व भरपूर सुखसोयी उपभोगायला मिळू लागल्या. या सुखासीनतेपायी तो सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्टाचारात भागीदार बनला. त्यामुळे लोकशाही मूल्यांवर आघात झाला, तेव्हा त्यांच्या मनात पाल चुकचुकली. पण हुकूमशाहीविरुद्ध दंड थोपटून उभे राहण्याची हिंमत ते हरवून बसले होते.

स्वातंत्र्यानंतर देशात लोकशाही राजकारणाचा सांगाडा उभा राहिला आणि एका व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षेपायी २५ जून ७५ रोजी तो कोलमडून पडला. मात्र याचा अर्थ असा नाही की, १९ व्या शतकापासून लोकशाही संघटित होण्याची जी प्रक्रिया सुरू झाली होती ती कायमची बंद पडली. लोकशाही संस्थांची सवय जनतेच्या अंगवळणी काही प्रमाणात तरी पडली आहे. लोकशाही मूल्यांवर जीवापाड प्रेम करणारे अनेक स्त्री-पुरुष देशात विखुरलेले आहेत. इंदिराबाईंच्या उलटसुलट वक्तव्यांमुळे जनता संभ्रमात पडली होती. दळणवळणाची साधने खंडित झाल्याने काय चालले आहे, हे लोकांना कळत नव्हते. पण हळूहळू जनता सावरत आहे. इंदिरा राजवटीचे खरे स्वरूप व त्यामुळे लोकशाही राजकारणावर झालेले दूरगामी परिणाम तिच्या ध्यानात येऊ लागले आहेत.

अशा वेळी हुकूमशाही राजवट नाहीशी करून लोकशाही राजकारणाचा प्रवाह मुक्तपणे सुरू व्हावा, यासाठी जे प्रयत्न करू इच्छितात त्यांनी आपल्या सर्वच कल्पना स्पष्ट करून धोरणांची व कार्यक्रमांची काळजीपूर्वक आखणी केली पाहिजे.

इंदिराबाईंच्या राजवटीच्या स्वरूपाविषयी त्यांचे निदान अचूक असले पाहिजे. ही हुकूमशाही राजवट आहे, याविषयी शंका नाही. पण ती कम्युनिस्ट स्वरूपाची नाही, किंबहुना त्या दिशेने झुकणारी सुद्धा नाही. इंदिराबाई रशियाशी मैत्री ठेवतात आणि रशिया त्यांच्या राजवटीला पाठिंबा देतो, एवढ्यावरून इंदिराबाईंना कम्युनिझमच्या दिशेने जावे लागेल, असे मानायला जागा नाही. रशिया व भारत दोघांनाही आंतरराष्ट्रीय राजकारणात एकमेकांच्या पाठिंब्याची गरज आहे आणि आपल्या आंतरराष्ट्रीय राजकारणासाठी एखाद्या देशाशी मैत्री जोडताना त्या देशातील सत्ताधाऱ्यांना साम्यवादाच्या दिशेने वाटचाल करण्याची अट रशिया घालू शकत नाही. इजिप्तमध्ये अध्यक्ष सादत यांनी कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली होती. तरीही रशियाने त्यांच्याबरोबर दोस्ती चालू ठेवली होती.

इंदिराबाईंच्या हुकूमशाहीला कुठल्याही विचारसरणीचा आधार नाही. आपली सत्ता स्थिर राहावी म्हणून प्रस्थापित, सामाजिक व आर्थिक हितसंबंधांचा त्या अनुनय करीत आहेत. जनतेच्या धार्मिक अंधश्रद्धांना त्या खतपाणी घालीत आहेत. त्या विनाकारण फार दडपशाही करणार नाहीत, कारण जनतेचा राग विनाकारण ओढवून घेण्यात अर्थ नसतो. मात्र त्यांच्या सत्तेला कोणी आव्हान देऊ लागले किंवा धनिक वर्गाकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध श्रमजीवी व दलितवर्ग उठाव करू लागले तर तो चिरडून टाकण्यासाठी इंदिराबाई कुठल्याही थरापर्यंत जाऊ शकतील.

ही हुकूमशाही राजवट नष्ट करून लोकशाही राजकारण अनिर्बंधपणे सुरू करायचे काय? हेही हुकूमशाहीविरुद्ध लढा चालविणाऱ्यांना स्पष्टपणे मांडावे लागेल. २५ जून ७५ पूर्वीची स्थिती अस्तित्वात येणे, एवढेच त्यांना अभिप्रेत असून चालणार नाही. कारण लोकशाहीचा नुसता उपचार चालू होण्यात सर्वसामान्य जनतेला रस नाही. इंदिराबाईंनी केलेल्या घटनादुरुस्त्या रद्द व्हाव्या एवढे म्हणण्याने, त्यापूर्वी घटना आम्हाला आदर्श वाटत होती, असे सूचित होते. त्या घटनेमुळे प्रस्थापित संबंधांनाच अधिक संरक्षण मिळत होते. म्हणून २५ जूनपूर्वीची घटना व लोकशाहीचा औपचारिक कारभार पुनरुज्जीवित व्हावा असे म्हणण्याऐवजी सामाजिक व आर्थिक परिवर्तनाला उपयुक्त व साक्षभूत ठरेल, अशा प्रकारच्या घटनेचा व लोकशाही संस्थेचा आराखडा सूत्ररूपाने बनविला पाहिजे.

सामाजिक व आर्थिक परिवर्तन सुबकशी घटना बनवून होत नसते. त्यासाठी श्रमजीवी व दलित जनतेची शक्ती संघटित व्हायला हवी. हुकूमशाहीविरोधी लढा व सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचा लढा हा एकच आहे असे मानून, श्रमजीवींचे विविध थर संघटित करावे लागतील. अशा प्रकारच्या संघटना बांधणीचे काम करण्यासाठी नागरिक-स्वातंत्र्य व राजकीय हक्क यांचा वापर करावा लागतो. सध्याची हुकूमशाहीची राजवट ते हक्क वापरू देणार नाही. म्हणून मतस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य यांवरील बंधने उठवा, अशी नुसती मागणी करून भागणार नाही. या हक्कांची भीक मागायची नसते. पडेल ती किंमत देऊन ते हक्क वापरायचे असतात, अशी स्पष्ट कल्पना नागरिकांना दिली पाहिजे. वर्तमानपत्रांवरील बंधने दूर होणार नाहीत हे लक्षात घेऊन, सरकारला कळणार नाही अशा रीतीने वृत्तपत्रे चालवावी लागतील. संघटना बांधणीच्या कामातील कार्यकर्ता हा महत्त्वाचा घटक असतो, त्यांना वैचारिक व संघटनात्मक शिक्षण देण्याची व्यवस्था करणे, त्यांच्या चरितार्थाची व्यवस्था लावणे, इत्यादी गोष्टींची काळजीपूर्वक आखणी व अंमलबजावणी करावी लागेल.

कामगार, मध्यमवर्गीय, मध्यम व छोटे शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व युवक, यांच्या वर्गीय संघटना मजबूत बांधाव्या लागतील. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आणि आपल्या योग्य मागण्यांसाठी लढणे हे या संघटनांचे उद्दिष्ट असतेच. पण त्याचबरोबर सर्व

समाजात मोकळेपणाचे वातावरण असावे, प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क उपभोगता यावे यासाठीहीं जनतेच्या व्यापक लढ्यात आपण सहभागी झाले पाहिजे, याची जाणीव वर्गीय संघटनांमार्फत श्रमजीवी व दलित जनतेत वाढवली पाहिजे.

अशा सर्व मार्गांनी हुकूमशाहीविरोधी चळवळ संघटित करील असताना हुकूमशाही राजवट सत्तेवरून खाली कशी खेचायची, याचीही कल्पना जनतेला स्पष्टपणे दिली पाहिजे. जनमताचे दडपण मान्य करून इंदिराबाईंनी मोकळ्या वातावरणात, योग्य रीतीने निवडणुका घेतल्या, तर त्या इंदिराबाईंच्या पक्षाचा पराभव होईल, यादृष्टीने चळवळीच्या नेत्यांनी व विरोध पक्षांनी आखणी करायला हवी. महात्मा गांधींनी दाखवून दिलेल्या शांततामय प्रतिकाराच्या मार्गाने राज्यसत्ता हुकूमशहांच्या हातातून हिसकावून घेण्याची व्यूहरचना केली पाहिजे. जयप्रकाशजींनी तुरुंगात असताना लिहिलेल्या रोजनिशीत म्हटले आहे, ' चळवळीचे दडपण आणि आघात याखेरीज राष्ट्रीय जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात कोणताही क्रांतिकारक बदल घडवून आणणे केव्हाही शक्य होईल असं मला वाटत नाही. खरं म्हणजे ही चळवळ चालू असतानाच बरेचसे बदल सरळ घडवून आणले जातील. बाकीचे ह्या चळवळीच्या प्रतिसादातून केल्या जाणाऱ्या, लोकशाहीला धरून असणाऱ्या कायद्यांतून घडविले जातील. लोकांच्या कृतीतून जे प्रत्यक्ष बदल घडतील त्यांना नंतर कायदेशीर मान्यता द्यावी लागेल. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष (म्हणजे कायद्यांनी घडवलेले) हे चळवळीचे दडपण किंवा आघात याचा परिणाम असेल. जनता आंदोलनाच्या दडपणातून निर्माण होणारे हृदयपरिवर्तन, असहकार, सविनय प्रतिकार आणि सविनय कायदेभंग यांसारखी ही दडपण किंवा आघात असतील, औद्योगिक क्षेत्रात संप, प्रत्यक्ष कारखाने ताब्यात घेणे, व्यवस्थापन व उद्योगधंदे चालवणे असे त्याचे स्वरूप असेल. ' (पान ७८.)

याच पद्धतीने सरकारी यंत्रणेशी असहकार, बहिष्कार, सार्वत्रिक संप यांच्याद्वारा अखेरीस प्रत्यक्ष सत्ता-केंद्रे ताब्यात घ्यावी लागतील. अशा महान क्रांतिकारक चळवळीतूनच हुकूमशाहीचा पाडाव होईल आणि चैतन्यशाली लोकशाही राजकारणाचा प्रवाह भारतात खळाळून वाहू लागेल.

ज्या साम्राज्यावरचा सूर्य कधी मावळत नव्हता त्या ब्रिटिश सत्तेला आव्हान देणारे जयप्रकाशजी स्वतंत्र भारतात लोकशाहीवर कसलेही गंडांतर कोसळले तरी त्यातून येथील समाज तावूनसुलाखून बाहेर पडेल, असा दुर्दम्य आशावाद बाळगून आहेत. २१ जुलै १९७५ रोजी चंदीगढ कारागृहातून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींना लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात—

' ज्या लोकांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीशी लढा दिला आणि तिला दाती तृण धरायला लावले ते हुकूमशाहीतली विटंबना आणि मानहानी कधीही कायमची म्हणून स्वीकारणार नाहीत. कितीही खोलवर दडपलं तरी माणसाचं सत्त्व कधीही हार खाणार नाही. स्वतःच्या हुकूमशाहीचं बस्तान बसवताना तुम्ही ते सत्व खोलवर गाडलं आहे, पण त्या थडग्यातूनही त्याचे पुनरुत्थान झाल्याशिवाय राहणार नाही. '

जणू प्रत्येक लोकशाहीनिष्ठाच्या मनातील दुर्दम्य आशावादच जे. पीं. च्या मुखावाटे प्रकट झाला आहे. □

# ' जनता ' जाहीरनामा

अशोक शहाणे

दोन महिन्यांपूर्वीचं वातावरण अन् आत्ताचं वातावरण. किती बदलून गेलं सगळं ! जेलमधली मंडळी कधी परत येतील ह्याचीच काळजी होती, तर निवडणुकांचा विचार करतोच कोण ? त्या तर आधीच दोन वर्षे लांबणीवर पडल्या होत्या, अन् कधी काळी होतील का नाही ह्याचीच शाश्वती नव्हती. पण निवडणुका जाहीर झाल्या. जेलातली मंडळी सुटायच्या आधीच निवडणुकांची बातमी आली. मग मंडळी एकेक परतायला लागली. अगदी सगळीच नाही. पण ज्यांना राजकीय कैदी असं म्हणत होते ती परतली. अजून कैक आत आहेतच. पण ती राजकीय पक्षातली नाहीत. बंदी घातलेल्या संघटनांची आहेत. म्हणून आतच.

आधी निवडणुकांची बातमी, मग राजबंद्यांची सुटका अन् मग सेन्सॉर स्थगित केल्याची घोषणा. क्रम सगळाच उलटा. पण तसा तर गेल्या दीड वर्षभर सगळ्या गोष्टी उलटयाच चालल्या होत्या. तेव्हा लोकांना कशाचीही सवयच होऊन गेली होती. त्यामुळे कुणालाच ह्याचं काहीच वाटलं नाही. निवडणुका होणार म्हटल्याबरोबर सगळी पुढारी-मंडळी दिल्लीकडं धावत सुटली.

राजकीय पक्षांना निवडणुकीपुरती थोडीशी मोकळीक मिळाली. त्यांना सभा घेता येतील, त्यांच्या बातम्या वर्तमानपत्रांत येतील, मतं आम्हालाच द्या म्हणून त्यांना लोकांना सांगता येईल. आणखी हवंय काय ?

पण आणीबाणी उठलेली नाही. ती फक्त ढिली झालीय्. राजकीय पक्षांना सनदशीर हालचाली करता याव्यात इतकी. पण लोकांचे जे काही हक्क आणीबाणीनं हिराकून घेतले होते, त्यांतला एकसुद्धा लोकांना परत मिळालेला नाही. सभा काही लोक भरवत नाहीत, वर्तमानपत्रांत काही लोकांच्या बातम्या येत नाहीत—सभा भरवतात राजकीय पक्ष, वर्तमानपत्रांत येतात त्यांच्याच बातम्या. लोकांना मत देण्याचा हक्क आहे. तो त्यांनी बजवावा. म्हणजे देशात अजून लोकशाहीच नांदतेय् हे आपोआप सिद्ध होईल; असा सत्तावाल्यांचा युक्तिवाद असेल तर, तात्पुरता का होईना विरोधी मंडळींनी तो मानलेला दिसतोय्.

आता मोकळेपणानं बोलता येतंय हेच काय कमी आहे, असंच बहुतेक ज्याचं त्याचं म्हणणं. पण एवढ्यात विरोधी पक्षांनी निवडणुकीचं आव्हान स्वीकारलं. आधी वर्षभर न् नंतर दोन दिवस उशीरा का होईना एक पक्ष स्थापन केला. विधी म्हणाले निवडणुका झाल्यावर उरकून टाकता येईल. त्यांनी नाव घेतलं आपलं. लोकांचं. जनतेचं. एक सरकारी पक्ष न् दुसरा जनता पक्ष—असं निवडणुकीचं

चित्र मंडळींनी रातोरात उभं केलं.

एवढ्यात दरम्यान जगजीवनराम काँग्रेसमधनं सरळसरळ बाहेर पडले अन् विरोधी मंडळींचा विश्वास दुणावला. तशी अजून आणीबाणी आहेच, सरकारची सत्ता पण आहे तशीच आहे, उगीच किंचित ढील दिलीय् तात्पुरती–तरी पण मनात आणलं तर, ह्या सत्ताधाऱ्यांसमोर आपण उभे ठाकू शकू, असं एकंदरीत वाटायला लागलंय लोकांना.

सगळ्या अंगांनी आधीची मुस्कटदाबी अन् आत्ताचा हा मोकळेपणा. निवडणुकांकडं बघताना ह्या दोन्ही गोष्टी ज्याच्या–त्याच्या मनात आपोआप उभ्या राहणारच, हे उघड आहे. अन् मग मुस्कटदाबी करणाऱ्या लोकांकडं पाठ फिरवायची म्हटलं तर, ज्याच्याकडं बघावं असा कुणी आहे का, याचाही विचार प्रत्येकाच्या मनात होणारच.

तर असा विचार करणाऱ्या मंडळींसमोर जनता पक्ष आपला नवाकोरा जाहीरनामा घेऊन उभा आहे.

आणीबाणीत जे नागरिकांचे हक्क काढून घेतले गेलेयत, लोकांना न्यायालयाचे दरवाजे बंद करून टाकण्यात आलेयत, घटनादुरुस्ती करून पार्लमेंटचे म्हणजे पर्यायानं सरकारचे अधिकार वाढवून ठेवलेयत–हे सगळेच्या सगळे अधिकार जनता पक्ष सत्तेवर आला तर परत करून टाकणाराय्. आणीबाणी रद्द होईल, सेन्सॉरशिप मुळापासनं जाईल, हेबियस कॉर्पस पुन्हा सुरू होईल, रिट अर्ज पुन्हा सुरू होतील, कायद्यासमोर परत एकदा सगळे सारखे समजले जातील, वगैरे वगैरे.

म्हणजे ह्या पक्षानं जर का सरकार बनवलं, तर ते आपल्या हातानं स्वतःचे अधिकार कमी करून ते लोकांत वाटून टाकेल. आपल्या हातानं स्वतःचे हात बांधून घेईल. म्हणजे मग कुणाचंही सरकार आलं तरी ते परत बेबंद होऊच शकणार नाही, अशी तरतूद जनता पक्ष करून टाकेल.

पण हे झालं गेल्या सरकारच्या उघड चुका दाखवून देणं. लोकांचे सरकारनं हिनावून घेतलेले अधिकार लोकांना परत करणं. पण हे अधिकार तर आणीबाणीच्या आधी अठ्ठावीस वर्षं लोकांना होतेच की. अन् तरीही गेल्या अठ्ठावीस वर्षांत लोक निव्वळ पोटासाठी जास्तीजास्ती हैराण होत जातच होते की. अगदी सरकारनं दिलेले आकडे खरे मानायचे तरी निव्वळ एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमधे नोंदलेल्या बेकारांचा आकडा कोटीचं घर ओलांडून ह्या काळातच गेला ना? अन् परवाच कुलदीप नय्यरनीं स्वच्छ सांगून टाकलं की, देशातले ६८ टक्के लोक गरिबीच्या रेषेखाली पडतात म्हणून. गरिबीच्या रेषेखाली म्हणजे धड दोनवेळा पोटाची भ्रांत असलेले. शंभरातले अडुसष्ट लोक. किंवा दहातले सातजण. किंवा पाचातले तीनचारजण.

हे सगळं गेली कैक वर्षं सतत होतच राहयलं, म्हणूनच तर काहीतरी निमित्त मिळून गुजराथ न् बिहारमधे विद्यार्थ्यांच्या चळवळी सुरू झाल्या ना? हे सगळं होतच राहयलं म्हणूनच तर ह्या चळवळींना लोकांचा एवढा व्यापक पाठिंबा मिळाला ना? अन् लोकांचा जबरदस्त पाठिंबा मिळतोय् हे बघूनच बिहारच्या चळवळीत विरोधी राजकीय पक्ष घुसले ना? (एरवी गुजरातमधे पोरांनी राजकारण्यांना खड्यासारखं दूर ठेवलं होतं.) अन् अशी प्रचंड ताकद चळवळीतनं उभी राहून सरकार घाबरून गेलं न् मधे आणखी सटरफटर गोष्टी घडून गेल्यावर बिहारपुरत्या मर्यादित असलेल्या चळवळीपोटीच सरकारनं सबंध देशावर आणीबाणीचं कडीकुलूप लावून टाकलं ना?

तेव्हा नुसते लोकांचे हक्क लोकांना परत देऊन परत एकदा परिस्थिती आँताइतकी बिघडणार नाही, अशी काही हमीच नाही. तर ह्या बेकारीच्या न् गरिबीच्या मूळ दुखण्यावर जनता पक्षाजवळ काय तोडगा आहे?

तर ह्या बाबतीत जनता पक्ष गांधीवादी मार्ग चोखाळणाराय्. अन् विकेंद्रीकरण हा त्यांनी परवलीचा शब्द बनवलाय्, म्हंजे विकेंद्रीकरण निव्वळ सत्तेचंच नाही तर उत्पादनाचं सुद्धा. केंद्र सरकारचे न् लोकसभेचे अधिकार कमी करून जसं राजकीय विकेंद्रीकरण, वस्तूंची पैदाससुद्धा काही मोजक्या शहरांत एकवटण्याऐवजी गावोगाव विखरून जायला हवी असं त्यांचं म्हणणं आहे.

असा औद्योगिक–आर्थिक कार्यक्रम आखून जनता पक्षाचं सरकार दहा वर्षांत देशातल्या गरिबीचं उच्चाटन करण्याचं आश्वासन देतंय्. म्हंजे किमान गरिबीच्या रेषेच्या खालच्या शंभरातल्या अडुसष्ट लोकांना ते खेचून गरिबीच्या रेषेच्यावर आणेल. शेकडा अडुसष्ट लोक म्हंजे सध्याच्या लोकसंख्येप्रमाणं चारेक कोटींच्याही वर. इतकी लोकं अवघ्या दहा वर्षांत गरिबीच्या रेषेच्या वर आणायची तर, दरवर्षी चारेक कोट लोक गरिबीतनं सुटणार. अन् वर्षाला चारेक कोट तर रोज किती? रोज लाखापेक्षाही जास्ती.

थोडक्यात हा हिशेब काही प्रत्यक्षात उतरण्याजोगा दिसत नाही. जाहीरनामा तयार करताना भरमसाट आश्वासनं देऊन मोकळं व्हायची आतापर्यंतची प्रथाच तर जनता पक्षानं ह्या आणीबाणीच्या काळातदेखील पाळलेली नाही ना? वास्तविक निवडणुकीत लोक मतं देऊन माणसांना पाठवतात ते कारभार करायला–म्हंजे काही करून दाखवायला. पण जनता पक्षाचं हे दहा वर्षांचं बोलणं भलतंच अंगाबाहेर जाणारं आहे.

शिवाय ह्यांनी आत्ताच दहा वर्षांच्या गोष्टी कराव्यात हे तर आणखीच अजब आहे. सरकार बनवायला म्हणा की विरोधी पक्ष बनवायला म्हणा, लोक ह्यांना निवडून देणार ते कसंबसं सहा वर्षांकरता. ते सुद्धा आत्ता लोकसभेची मुदत वर्षभरानं वाढवून घेतलीय् म्हणून. एरवी फक्त पाचच वर्षं. अशी वस्तुस्थिती असताना जनता पक्षाच्या मंडळींनी जनतेकडं दहा वर्षांची मागणी बिनदिक्कत करावी म्हंजे खरोखरीच मोठी अजब गोष्ट आहे.

दिल्लीला सलग तीस वर्षं एकाच पक्षाचं सरकार असून देखील इथल्या गरिबीला काही ढिम्मदेखील झालं नाही, उलट ती फोफावलीच, तेव्हा दहा वर्षं ही त्या मानानं कमीच वाटतील कुणाला. पण खरी गंमत वेगळीच आहे. निवडून दिलेल्या ह्या मंडळींना पाचसहा वर्षं पुढचं तरी दिसतं का नाही, ह्याचीच शंका आहे. मागं ह्यांच्यातल्या समाजवादी मंडळींपैकी कै. नाथ पै नी लोकसभेत एक बिल मांडलं होतं न् घटनेतली कोणतीही तरतूद बदलायचा अधिकार लोकसभेला आहे, असं एक जबरदस्त कलम त्यात होतं. नाथ पै जिवंत असताना लोकसभेत जी चर्चा झाली, त्यात कोणतीही तरतूद म्हंजे अगदी घटनेचं प्रास्ताविकसुद्धा असा खुलासासुद्धा त्यांनी केला

होता. 'लोकसभा सार्वभौम आहे' ही गोड घोषणासुद्धा नाथ पैंचीच. अन् बिल मांडलं त्यावेळीसुद्धा भांडण न्यायालयाशीच होतं. लोकसभा सार्वभौम का? तर लोक सार्वभौम म्हणून. अन् त्या लोकांचेच प्रतिनिधी लोकसभेत, म्हणून मग लोकसभा पण सार्वभौम असा सगळा सोयीचा मामला होता.

नाथ पै गेले म्हणा दरम्यान. अन् आता त्यांच्या पक्षाची– म्हंजेच आत्ताच्या जनता पक्षाची– मंडळी सुटून आल्यावर म्हणतायत की, न्यायालयांचे अधिकार कमी करणं वगैरे काही नाथ पैंच्या बिलात नव्हतं. समजा नसेलसुद्धा. पण तरी लोकांचे प्रतिनिधी म्हंजेच लोक ही तर समजूत होतीच ना?

अन् त्यातनं झालं काय, तर गुजरात न् बिहार दोन्ही चळवळी लोकांच्या प्रतिनिधींविरुद्ध लोकांनी केलेल्या चळवळी निघाल्या. म्हणूनच तर हे सगळं प्रकरण इंदिराबाईंच्या लेखी 'घटनात्मक सरकार पाडणं' वगैरे रूप घेतं ना?

नाथ पै जिवंत होते तेव्हा–नशीब–लोहिया पण जिवंत होते. त्यांनी न् शिवाय मधू लिमयांनी पण नाथ पैंना धोक्याचा इशारा देऊन मागं खेचायचा काही कमी प्रयत्न नव्हता केला. पण नाथ पैंनी काही ऐकलं नाही. ऐकलं नाही मधू दंडवत्यांनी पण.

सरतेशेवटी नाथ पै मरून गेल्यावर त्यांच्या जागी निवडून आलेल्या मधू दंडवत्यांनाच हे बिल मांडायचा मान काँग्रेस सरकारनं दिला. अर्थातच बिल पास झालं. नाथ पैंचं भव्य स्मारकच झालं ते. अन् मग ह्या सगळ्याच प्रतिनिधींनी 'सार्वभौम लोकसभे'चं गाडं असं काही दामटत नेलं की, निव्वळ दोन–तीन वर्षांतच ते पार आणीबाणीच्या खड्ड्यातच जाऊन पडलं.

थोडक्यात म्हंजे सदिच्छाच बाळगून असलेल्या ह्या सद्गृहस्थांना दोन–तीन वर्षांपर्यंतचं सुद्धा आधी बघता आलं नाही. अन् त्यांना प्रतिनिधी म्हणून आपण निवडून देणार आहोत सहा वर्षांकरता. म्हंजे हा हिशेब काही धड नाही. अर्थात परत असं काही होणारच नाही, इतकी तरतूद आता आम्ही करून ठेवू, असं म्हणतायत आता जनता पक्षवाले. गेल्या एकोणीस महिन्यांच्या अनुभवानं ते काही शहाणपण शिकले असतील तर बरंच. आपण तर शहाणं व्हायलाच हवं. कारण त्यांच्या नुस्त्या पक्षाचंच नाव जनता आहे, आपण तर साक्षात जनता आहोत. दुधानं आपलं तोंड पोळलंय्. ताकदेखील फुंकूनच घ्यायला हवं. प्रतिनिधींना त्यांची पायरी दाखवून द्यायला हवी.

हा झाला दहा–दोनतीन–पाचसहा वर्षांचा घोळ.

आता ह्यांनी गांधींचं नाव घेऊन, त्यांचा मार्ग आपण चोखाळणार अन् सगळी सत्ता न् अर्थकारणाचं विकेंद्रीकरण करणार म्हणून केंद्र सरकार बनवण्याकरता होणाऱ्या निवडणुकीत उतरावं, हा एक किंचित विनोदच आहे. विकेंद्रीकरणाचा वसा घेऊन, ही मंडळी केंद्र सरकार बनवणार आहेत.

किंचित हसून झाल्यावर कदाचित ते असं मनापास्नंसुद्धा म्हणत असतील, असं म्हणायला मात्र जागा आहे. कारण महाराष्ट्रात तरी जनता पक्षाचे आघाडीवरचे पुढारी निवडणुकीच्या रिंगणाबाहेरच राह्यलेयत. एसेम, नानासाहेब, ही बिनीची मंडळी नंबर दोनच्या फळीला आतमधे पाठवून, स्वतः जनतेबरोबरच राहणारायत. त्यांचा थोडाफार तरी अंकुश आत गेलेल्या प्रतिनिधींवर राहील, असं मानायला हरकत नाही. अन् मुख्य म्हंजे हा पायंडा भलताच चांगला पाडला ह्यांनी. जसे गांधी सरकारात गेलेच नाहीत, जसे जयप्रकाशजी पंतप्रधान झालेच नाहीत, तसेच हेही बाहेरच राहणारायत लोकांबरोबर. उत्तम.

फक्त एवढ्यावरच काही मागण्याजोगं नाही. सरकारात अजी बातच न जातासुद्धा गांधींनी मोठाली कामं हाती घेऊन पार पाडली होती. अर्थात त्या वेळी सरकार परकं असल्यामुळं सरकारात आल्यावर मगच आपण असं असं करू, असं म्हणून चालणारच नव्हतं. पण परक्या सरकारच्या अंमलातसुद्धा लोकांच्या सहकार्यानं बेकारी–गरिबीकरता आपण काही करू शकतो, एवढं तरी त्यांनी नक्कीच दाखवून दिलं.

तेव्हा जनता पक्षवाले कुणी न विचारतासुद्धा आपण गांधींच्या मार्गानं जाणार आहोत असं म्हणतायत, तर त्यांनी ही सत्तेवर यायची अट काही ठेवू नये. ती काही गांधींना न्याय देणारी नाही. विरोधी बाकांवर बसूनसुद्धा त्यांनी आपला औद्योगिक–आर्थिक कार्यक्रम स्वतंत्रपणानं प्रत्यक्षात आणण्याचा विडा उचलावा. ह्या कार्यक्रमाची पण एक कसोटी होऊन जाईल अन् सरकारला विरोध करण्यापेक्षा विरोधी पक्षांनी दुसरं काही करायचंच नसतं, हा तीस वर्षांचा करंटेपणा थोडाफार तरी धुऊन निघेल. निव्वळ नाकर्तेपणाच त्यांच्या जमेच्या बाजूला राहणार नाही. अन् ही जी ज्येष्ठ मंडळी बाहेर राह्यलायत, त्याचं काही चीज होईल. ह्या कार्यक्रमानं काही होतंय् असं लोकांना वाटलं तर पुढच्या खेपेला ते ह्याहीपेक्षा जास्ती संख्येनं जनता पक्षामागं उभे राहतील.

नाही तरी जनता पक्षाचा जाहीरनामा सर्वांगपरिपूर्ण, अगदी त्रिकालाबाधित सत्यासारखा असला, तरी देशातले पासष्ट टक्के लोक निरक्षरच आहेत. नागरी स्वातंत्र्य वगैरे गोष्टी ह्या निरक्षर मंडळींसमोर त्यांना पटेल असं काही रोखठोक रूप घेऊन येत नाहीत, तोपर्यंत त्या पोकळच राहणार. स्वातंत्र्याला असं रोखठोक रूप जाहीरनाम्यात तरी जनता पक्षाला देता आलेलं नाही, ही मन खिन्न करून टाकणारी गोष्ट आहे. ज्या जनतेचं नाव पक्षाला घेतलंय्, त्या जनतेनं हा पक्ष आपला म्हणावा–तिला ह्या आपलेपणाची ओळख तत्काळ पटावी–इतकं करायला आताच कदाचित फुरसत नव्हती. पण जाहीरनाम्यातल्या पुस्तकीपणाला सरकार न बनवतासुद्धा रूप देता येणं शक्य आहे, म्हणूनच आशेला वाव आहे.

सरकारला आत्मा नसतो असं एक गांधींनी म्हणून ठेवलंय्. हे काही फक्त ब्रिटिश सरकारपुरतंच नव्हतं. हे तर कुठल्याही सरकारला लागू पडेल असंच आहे. अन् ते नुकतंच सगळ्यांना उमगून पण चुकलंय्. त्याची पुनरावृत्ती परत नको. परत माणुसकीला काळिमा नको. एवढीच आपली तरी प्रार्थना आहे.

लोकशाहीचं गाडं एकदा सुरळीत मार्गावर यावं ही सगळ्यांचीच इच्छा आहे. तिची विजययात्रा नीट निघावी अशी सगळ्यांनाच आस आहे. ह्या विजयाच्या मिरवणुकीत–पालखीत–कोण बसतील, थोडचा-

## एसेम-गोरे-जयप्रकाश बाहेर राहणारायत लोकांबरोबर. उत्तम!

वरनं कोण मिरवतील; हत्तीवरनं मंगलकलश कोण आणतील–है ठरायचं तसं ठरेल. पण ह्या सगळ्या हत्तीघोडयांच्याही मागनं जी करोडो माणसं पायीपायीच या यात्रेत सामील होतील, त्यांच्याबरोबरच जयप्रकाश असतील ही गोष्ट निर्विवाद.

अन् असं जयप्रकाश उघड सांगतायत्सुद्धा. की ह्या निवडणुका आटोपल्यावर आपण निवडून गेलेल्या प्रतिनिधींच्यावर वचक ठेवायला म्हणून एक बिगर–राजकीय संघटना बांधायचं म्हणतोय्. म्हंजे राजकारणी मंडळींच्या हालचालींवर नजर ठेवण्याइतकं जागृत लोकांनी राहणं आवश्यक आहेच. सहा वर्षांनी एकदा झोपेतनं उठून मत टाकल्यानंच काही लोकशाही आकार घेत नाही. मग भले का अगदी लायक माणसांनाच आपण निवडून दिलेलं असो. स्वतःच्या हक्कांची जागती जपणूक जनतेनं आपली आपणच करायला हवी.

हे खरंच आहे म्हणा. कारण सदुसष्ट सालच्या निवडणुकीनंतरच्या संविद सरकारांचा अनुभव महाराष्ट्राला नसला तरी, इतर बऱ्याच प्रांतांना आहे ना. सत्तेवर असतानाचं आजच्या विरोधी पक्षांचं वागणं कांग्रेसपेक्षा फार वेगळं काही वाटलं नाही लोकांना त्यावेळी. अन् थोडयाथोडक्या नाही, चांगल्या आठ राज्यांत संविद सरकारं होती. शिवाय एकूणसत्तरमधे कांग्रेस दुभंगल्यावर दिल्लीला इंदिराबाईंचं सरकार बहुमत गमावून उजव्या कम्युनिस्टांच्या न् द्रमुकच्या पाठिंब्यावरच कसंबसं टिकून होतं. दिल्लीचं कांग्रेस सरकार तेव्हा इतकं लेचंपेचं होतं की, प्रतिबंधक स्थानबद्धतेचा कायदा त्याला नव्यानं मुदतवाढ देता येईल अशीसुद्धा परिस्थिती नव्हती.

अन् इतकं असून एकाहत्तर साली काय झालं ते सगळ्यांनी पाह्यलंच. संविद सरकारांबद्दल लोकांनी आपलं मत नोंदवलं न् कांग्रेसला दोन–तृतीयांश बहुमत मिळवून दिलं. अन् मग ह्याचेच परिणाम गेले महिने आपण सगळे भोगत आलो.

तेव्हा कांग्रेसला मत का नको, ह्याची कारणं सगळ्यांच्यासमोर लख्खच आहेत. अन् गेले एकोणीस महिने सरकारनं ज्यांना डांबून ठेवलं होतं, त्यांचं पारडं आपोआप–अन् थोडंफार उगाचच–जड झालेलं आहे. उगाचच अशाकरता की माफी मागून सुटका करून घेण्याची नामुष्की बहुतेक कुणाच्याच वाटयाला आलेली नाही ही गोष्ट सोडली तर, एरवी ह्याही मंडळींच्याबद्दल लोकांचा पूर्वीचा अनुभव काही मोठा गोड नाही. ही निवडणूक झाल्यावर ह्यांच्यातलंही कुणीच टोपी फिरवणार नाही, अशी कवचकुंडलं काही जनता पक्षाजवळ नाहीतच.

अन् एक पक्ष करण्याची बोलणी पण पहिले दोन दिवस तरी वांझोटीच ठरली होती न् जयप्रकाशजींना तेवढयाकरता पाटण्याहून उठून दिल्लीला जावं लागलं, तेव्हा कुठं जनता पक्षाची घोषणा झाली–ह्या सगळ्या गोष्टी ताज्याच आहेत.

पण तरी दुसऱ्या बाजूचं तर अख्खंच चित्र काळकुट्टं असल्यामुळे जनतेच्या–म्हंजे आपल्या नावानं स्वतःला संबोधणाऱ्या ह्या पक्षालाच मत देण्यावाचून गत्यंतर नाही, अशी मोठी चमत्कारिक परिस्थिती आहे. मध्यंतरीच्या कडक आणीबाणीतनं कांग्रेस तर काही शिकलेली दिसत नाहीच, निदान ही मंडळी काही शिकलीयत् का काय ते दाखवायची संधी ह्या खेपेला त्यांना आपण देऊ लागतो.

□

# चक्रमूचक्री–चौथी गिरकी

## दीर्घस्मृती विश्वनाथ

जनता पक्षाचा अवतार झाल्यापासून कांग्रेसवाल्यात चांगलाच गोंधळ उडालेला दिसतो.

त्यांच्यातले कच्चे आणि शंकेखोर विचारतात, 'धारिया आणि म्हाळगी एकत्र कसे ?'

हुच्चे आणि बेमुर्वतखोर म्हणतात, 'हा दरोडेखोरांचा कट आहे.'

लुच्चे आणि टवाळखोर हिणवतात, 'ही एक मिसळ आहे.'

सच्चे आणि समजदार सांगतात, 'ह्या पक्षाचा उदय ही स्वागतार्ह घटना आहे.'

कांग्रेस हा एक शिस्तबद्ध आणि एकचालकानुवर्ती पक्ष आहे. असे असून त्यात ही मतभिन्नता आढळावी हे आश्चर्य नाही का ?

यात फारसे आश्चर्य नाही. वस्तुस्थिती पाहायची ठरवली तर एकच गोष्ट सगळ्यांना दिसली असती. पण कल्पनेचे खेळ करायचे म्हटल्यावर प्रत्येकाला भलभलती गोष्ट दिसणार यात नवल नाही. माणूस म्हटला की सगळ्यांना दोन हातांची, दोन पायांचीच आकृती दिसते, पण राक्षसाची कल्पना केली की, दोनापासून विसापर्यंत कितीही हात सांगता येतात.

पण आपले राजकीय निरीक्षक आणि पत्र–पंडितही चक्रावलेले दिसतात.

शिकाऊ आणि पढीक, पक्षाच्या जाहीरनाम्यातल्या विसंगती शोधताहेत.

आगाऊ आणि लाडिक, पक्ष डावा आहे की उजवा या चिंतेत आहेत.

विकाऊ आणि धंदेवाईक, पक्षाची वर्गनिष्ठा अजमावत आहेत.

कोणालाही नक्की उत्तर सापडल्याचे दिसत नाही.

जुन्या कोष्टकात नवीन गणित बसविण्याचा प्रयत्न केला की, अशी भ्रांती व्हायचीच.

तेव्हा जनता पक्षाविषयी नक्की कोणत्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत ? त्या पक्षाच्या बाबतीत कोणते प्रश्न विचारले पाहिजेत ?

पहिले म्हणजे जनता पक्षाला निवडणुकीत भरघोस जागा मिळोत न मिळोत, तो पक्ष उपेक्षणीय निश्चित राहिलेला नाही. नाही तर तो कांग्रेसवाल्यांच्या शिव्याशापांचा आणि राजकारण–पंडितांच्या विश्लेषणाचा विषय झाला नसता. त्याच्याविषयी फार मोठ्या अपेक्षा लोकांच्या मनात निर्माण झालेल्या आहेत. तेव्हा प्रश्न विचारला पाहिजे तो असा की जनता पक्षाच्या सभांना गर्दी करणारी माणसे, त्या पक्षाच्या नेत्याचे स्वागत करणारी माणसे, त्यांच्या फंडाला सभेच्या जागी रुपया–दोन रुपयांची मदत करणारी माणसे कोणत्या अपेक्षा मनात बाळगून असतात ?

सभेला गर्दी करणारी माणसे काय केवळ उत्साहाच्या ऊर्मी अनुभवण्यासाठी जातात ?

का ती केवळ आणीबाणीतल्या बेबंदशाहीच्या हकीकती ऐकायला जातात ?

तो भाग थोडासा असणारच. पण त्याहीपेक्षा सभेला होणाऱ्या गर्दीला निराळा प्रतीकात्मक अर्थ असल्यामुळे लोक गर्दी करत असतात. आणीबाणीत संजयच्या आणि माताजींच्या सभेला गर्दी होतच होती किंवा जमविली जात होती. त्यापेक्षा जनता पक्षाच्या सभांना होणाऱ्या गर्दीला निराळा अर्थ आहे.

तो अर्थ काय आहे ?

तो अर्थ असा आहे की, सामान्यांची गर्दी ही उपेक्षणीय चीज नाही. त्यांच्या हजेरीला एक वजन आहे. सामान्यांच्या मतांना आणि जीवनाला एक प्रतिष्ठा आहे. लोकांची जनता पक्षाकडून अपेक्षा हीच आहे की, तो सामान्यांच्या मतांना आणि जीवनाला प्रतिष्ठा मिळवून देईल.

आजचे राज्यकर्ते आणि इतर पक्ष सामान्यांच्या मतांची आणि जीवनाची प्रतिष्ठा मानत नाहीत का ?

अजीबात नाही. त्यांना माणसांची निवडणुकीतील मते हवी असतात, पण सद्य:स्थितीसंबंधीच्या प्रतिक्रिया हा जो मताचा अर्थ आहे त्या अर्थानें मते नको असतात. जनता–पक्षाबाहेरचे पक्ष म्हणजे फक्त साम्यवादी पक्ष आणि कॉंग्रेस पक्ष. त्यापैकी साम्यवादी पक्ष साम्यवादी मतांखेरीज इतर सर्व मतांना हितसंबंधाचा पाठपुरावा करणारी मते म्हणून उपेक्षणीय मानतात. कॉंग्रेस पक्षाची स्वतंत्र मताविषयी काय भूमिका आहे, हे आणीबाणीतल्या वृत्तपत्रीय–निर्बंधावरून स्पष्ट झालेच आहे.

पण साम्यवादी पक्ष आणि कॉंग्रेस पक्ष सामान्यांच्या जीवनाची प्रतिष्ठा तरी मानतात की नाही ! जीवनाला जर प्रतिष्ठा मिळायची नसेल तर, माणसाच्या गरजा भागाव्या लागतात. मता–मतांच्या कल्लोळात बेशिस्त माजते आणि त्या बजबजपुरीमुळे मूलभूत गरजा भागविण्याइतके उत्पन्न होत नाही. म्हणजेच जीवनाची प्रतिष्ठाही वाढत नाही; खेरीज मतांची प्रतिष्ठा राहते की नाही याचाही संशयच ! तेव्हा जीवनाची प्रतिष्ठा उंचाविण्यासाठी स्वतंत्र मतांची उपेक्षा केली तर चुकले कोठे ?

माणसाच्या मतांची प्रतिष्ठा त्यांच्या जीवनाच्या प्रतिष्ठेपासून निराळी करता येत नाही. कारण माणसांची मतं आणि त्यांचे जीवन यांचा संबंध फार खोलवरचा आहे.

तो कसा काय ?

आपण जनावराचे आयुष्य आणि माणसाचे आयुष्य यांची तुलना करू. जनावराचे आयुष्य म्हणजे त्याच्या भौतिक अस्तित्वाच्या क्षणांचा एक अस्ताव्यस्त ढिगारा असतो. जनावराचे ह्या क्षणाचे अस्तित्व आणि पुढच्या क्षणाचे अस्तित्वही जाणीवेने जोडलेली नसतात. माणसाचे तसे नाही. माणसाच्या आयुष्याच्या चालू क्षणावर गेल्या क्षणाची छाया आणि येत्या क्षणाची तिरीप असते. म्हणूनच माणसाचे आयुष्य हे जगलेल्या क्षणांचा ढिगारा न राहता त्या क्षणांची एक साखळी बनते. म्हणून माणसाच्या आयुष्याला 'आयुष्य' हा केवळ कालवाचक शब्द न वापरता 'जीवन' असा शब्द आपण वापरतो.

माणसाचं 'जीवन' आणि जनावरांचं आयुष्य यांच्यात हा फरक का पडतो ?

कारण जनावर फक्त त्या क्षणाच्या परिस्थितीविषयी जाणीव बाळगू शकतं. जनावराची जाण मर्यादित असते. माणूस त्या क्षणाला गोचर असलेल्या परिस्थितीसंबंधीच नव्हे तर गेल्या आणि येत्या क्षणी असलेल्या परिस्थितीची जाणीवही ठेवू शकतो. कारण भाषेच्या साहाय्याने तो मागच्या–पुढच्या क्षणी असणारी परिस्थिती स्वत:पुरती प्रत्यक्षात आणू शकतो. अशा रीतीने माणसाची जाणीवही वाढलेली असते आणि त्याला भाषाही येत असते, म्हणून हा फरक पडतो. आणि या फरकामुळेच त्याला मतेही असतात.

ती कशी ?

अखेर मते म्हणजे काय ? परिस्थितीची आपल्याला असलेली जाणीव जेव्हा आपण भाषेत व्यक्त करतो तेव्हा त्याला मत असे म्हणतात. जर जाणीव आणि भाषा ही माणसाच्या जीवनाशी इतकी निगडित असतील, तर त्याची मतं ही त्याच्या जीवनाचं एक अतूट अंग मानावं लागेल. म्हणूनच माणसाच्या जीवनाला प्रतिष्ठा देऊ पण त्याच्या मतांची उपेक्षा करू असं म्हणणारे लोक आपमतलबी किंवा अज्ञानी म्हणावे लागतील.

पण मत हे केवळ परिस्थितीची जाणीवच व्यक्त करतं असं नव्हे, तर ती परिस्थिती बदलण्याची सूचनाही त्यात असते. प्रत्येक माणसाच्या परिस्थिती बदलण्याच्या सूचनांची बूज आपण ठेवू लागलो तर अनवस्था प्रसंग येईल. कारण मनुष्याचे मत त्याच्या कोत्या ज्ञानावर आणि तुटपुंज्या अनुभवांवर आणि हितसंबंधांच्या ओढीनें दूषित झालेले असते.

मनुष्याच्या मतांची बूज राखणे याचा अर्थ ती जशीच्या तशी स्वीकारणे हा नव्हे. प्रत्येक माणसाला मत व्यक्त करू द्यावं. त्याच्या मताची इतरांनी चर्चा करावी. म्हणजे गैरमाहितगारीचे आणि तोकड्या अनुभवाचे दोष नाहीसे होतील. आपले हितसंबंध आणि दुसऱ्यांचे हितसंबंध यात कोठे झगडा येतो ते कळेल. मग प्रत्येकजण आपले मत अधिकाधिक लोकांना उचलून धरावेसे वाटेल अशा रीतीने मांडू लागले. म्हणजेच हितसंबंधांना मुरड घातली जाईल. या सर्व चर्चेतून सर्वांच्या हितसंबंधांचा समन्वय घालणारे मत तयार होईल. चर्चेतून हितसंबंधांचा समन्वय घालता येतो, या विश्वासावर तर संघटना चालतात.

पण ही चर्चा वर्षानुवर्षे चालेल. मग निर्णय व्हायचा कसा आणि कारभार चालायचा कसा ?

चर्चा चालतच राहणार, परंतु त्यामुळे निर्णय थांबेल असे मात्र नव्हे. इंग्लंडमध्ये खुला व्यापार विरुद्ध संरक्षित व्यापार हा वाद दीडशे वर्षे तरी चालला असेल. गंमत म्हणजे प्रत्येक पक्षात दोन्ही बाजूचे लोक होते. दर वेळी परिस्थितीच्या दबावाने काही ना काही तोड काढली जाई. त्यावेळच्या बहुतेक हितसंबंधांचा कसाबसा समतोल होई. दुष्काळ पडला, परिस्थिती बदलली की समतोल ढासळे आणि पुन: निर्णय बदले. युरोपच्या सामाईक बाजारपेठेत सामील व्हायचे की नाही, याविषयी तरी इंग्लंडमध्ये किती वर्षे वाद चालला ? प्रथम हुजूर पक्ष सामील होण्याच्या विरुद्ध होता आणि मजूर पक्ष बाजूने होता. अखेर जेव्हा इंग्लंड बाजारपेठेत सामील

झाले तेव्हा नेमकी विरुद्ध स्थिती होती.

पण चर्चा–निर्णय-पुन: चर्चा–निर्णयात बदल हे रहाटगाडगे लोकशाहीत चालतच असते. त्यात जनता पक्ष नव्याने काय करणार? आज आणीबाणीमुळे काँग्रेस पक्ष चर्चेच्या विरुद्ध आहे, असा भास निर्माण झाला आहे. आणीबाणीपूर्वी काँग्रेस पक्षात चर्चा–मतबदल या गोष्टी होत होत्याच की नाही? म्हणजे आणीबाणी उठल्यानंतर जनता पक्षाचे वैशिष्ट्य ते कोठले उरणार?

काँग्रेस पक्ष हा काही कालखंडांचा अपवाद वगळता एकचालकानुवर्तीच राहत आला आहे. आपण हे ध्यानात घेतले पाहिजे की, १९२० पर्यंत काँग्रेसला नाव घेण्यासारखी संघटनाच नव्हती. त्यामुळेच टिळकांना होमरूल लीग काढावी लागली आणि गोखले, लजपतराय यांनी सेवक समाज काढले. काँग्रेसला खरी संघटना असहकाराच्या चळवळीत लाभली. त्यानंतर देशबंधू दासांच्या मृत्यूपर्यंत काँग्रेसमध्ये चर्चेने निर्णय होत असत. पण दासबाबूंच्या निधनानंतर महात्मा गांधींचे एकमुखी नेतृत्व सुरू झाल्यावर काँग्रेसमधली चर्चा आणि काँग्रसचे निर्णय यांचा एकमेकांशी तितकासा संबंध उरला नाही. गांधींनंतर नेहरूंच्या राजवटीतही तीच स्थिती होती.

म्हणजे गांधी–नेहरूंच्या काळात काँग्रेस पक्षातली मंडळी आजच्या काँग्रेसवाल्यांसारखीच जी–हुकूम म्हणणारी होती असेच ना?

तसे म्हणता येणार नाही. गांधी आणि नेहरू हे विवेकी नेते होते. त्यामुळे खुली चर्चा काँग्रेसमध्ये अवश्य चाले. पण अनेक प्रश्नांवर काय निर्णय घ्यायचे हे नेत्यांनी पूर्वीच ठरविले असे. कधी कधी असे होई की, विवेकाची टोचणी आणि परिस्थितीचा दट्टया याच्या सापटीत सापडल्याने नेत्यांना निर्णय घेता येत नसे. त्यामुळेही चर्चा होई. काका गाडगीळांनी 'लाल किल्ल्याच्या छायेत' या पुस्तकात स्पष्ट म्हटले आहे की, काही बाबीत नेहरू–पटेल आपसात निर्णय घेत आणि त्याची फक्त माहिती मंत्रिमंडळाला देत.

गांधी–नेहरू–पटेल हे सर्व नेते सत्त्वशील आणि विवेकी असताना असे का होत होते?

कारण काँग्रेसमधील चर्चेतून निर्णयाची निष्पत्ती होत नसे. स्वातंत्र्यलढ्यात काँग्रेसच्या कारभाराची शैलीच अशी झाली होती की, नेत्यांनी निर्णय घ्यायचे आणि अनुयायांनी त्यानुसार वर्तन करायचे. चर्चेतून निर्णय लागत नसेल आणि निर्णयाची जबाबदारी नेत्यावरच पडणार असेल, तर साहजिकच चर्चेचा तिटकारा नेत्याला वाटू लागतो. गांधी–नेहरूंचे वैशिष्ट्य हेच की, त्यांनी अशाही परिस्थितीत चर्चेला वाव ठेवला.

त्यामुळे महानेत्यांच्या छायेखाली राहणं हा काँग्रेसचा प्रकृतिधर्मच झालेला आहे.

जेव्हा काँग्रेसच्या सिंहासनावर महानेता नव्हता तेव्हा काय झाले?

अशी परिस्थिती जेव्हा जेव्हा आली तेव्हा तेव्हा काँग्रेस एक तर निर्णयच घेऊ शकली नाही किंवा घेतलेले निर्णय तिला पचले नाहीत. नेहरूंच्या मृत्यूनंतर बाईंचे अधिराज्य येईपर्यंत काँग्रेसची काय स्थिती होती? विजयालक्ष्मी पंडितांनी शास्त्रींच्या सरकारचे 'Prisoner of Indecision' असे वर्णन केले होते. पटेल वारल्यानंतर नेहरूंची एकमुखी सत्ता स्थापन होईपर्यंत वर्षभर फक्त गेले असेल–नसेल, पण तेवढ्यात टंडन प्रकरण झाले. म्हणजे काँग्रेसचा अध्यक्ष एका गटाकडून सहकार्य मिळवू शकला नाही. काँग्रेसमध्ये ही वृत्ती कधीच दिसली नाही की, पक्षाचा निर्णय आपल्याला पसंत नसेल तर, पक्षात राहून, मन वळवून तो बदलून घ्यावा. खुद्द सुभाषबाबू काँग्रेसचे अध्यक्ष झाले तेव्हाही हाच प्रकार झाला.

काँग्रेस पक्षाच्या या कमतरतेचे काय परिणाम झाले?

त्यामुळे काँग्रेस पक्षातील चर्चेचे अभिसरण हे मनुष्याच्या शरीरातील रक्ताभिसरणासारखे झाले आहे. शरीरातील नीला अशुद्ध रक्त हृदयाकडे नेतात त्याप्रमाणे निरनिराळ्या प्रदेश समित्यांतली भांडणे मध्यवर्ती काँग्रेसकडे जातात आणि कारभाराविषयीचे निर्णय–शुद्ध रक्त हृदयाकडून अवयवांकडे जाते त्याप्रमाणे–मध्यवर्ती संस्थांकडून स्थानिक समित्यांकडे जातात. असे कधीच होत नाही की, चांगली सूचना स्थानिक नेतृत्वाकडून आली आणि ती काँग्रेस कार्यकारिणीने चर्चेनंतर मान्य केली, किंवा मध्यवर्ती नेत्यांतले मतभेद खालच्या पातळीवरून चर्चा करून दूर करण्यात आले. १९६९ च्या भांडणात याचा पुरा पडताळा आला.

त्यावेळेस काय झाले?

मध्यवर्ती निवडणूक समितीत राष्ट्रपतिपदासाठी उभ्या करावयाच्या उमेदवारासंबंधी मतभेद झाले. अशा वेळी भांडण कार्यकारिणीकडे जावयास हवे होते. तेथेही मतभेद झाल्यास काँग्रेस महासमितीत त्याची तड लावावयास हवी होती. पण यापैकी काहीच झाले नाही आणि पक्ष फुटला. सारांश असा की, काँग्रेसला भांडणांची तड लावण्यासाठी आणि पक्षासाठी निर्णय घेण्यासाठी एक महानेता लागतो. तसा नेता नसेल तर, कमकुवत हृदयाचा माणूस जसा निष्क्रिय होतो तसा हा पक्षही निष्क्रिय बनतो.

पण आजपर्यंत काँग्रेसला असे नेते मिळत गेले आहेत. तेव्हा पक्षाची अशी स्थिती असण्यात धोका कोणता आहे?

धोका असा आहे की, महानेता आढळत नसेल तर, कोठून तरी तो शोधून आणावा लागतो. गांधी, नेहरू हे सुदैवाने विवेकी नेते लाभले. पण एखाद्या अविवेकी आणि महत्त्वाकांक्षी व्यक्तीचे अधिराज्य मानले की काय होते, याचे चटका लावणारे प्रत्यंतर आलेच आहे.

आज जनता पक्षास सामील झालेले पक्ष आणीबाणीपूर्वी अस्तित्वात होतेच की नाही?

ते तरी काँग्रेस पक्षातील दोषांतून मुक्त होतेच ना. मग ते पक्ष मोडून जनता पक्ष स्थापन का करावा लागला?

जनता पक्षात सामील झालेले जनसंघ, समाजवादी, संघटना काँग्रेस, लोकदल हे पक्ष चर्चेने निर्णय घेत असत हे खरे; पण काही विशिष्ट राजकीय प्रणालीला बांधून घेतलेले असल्याने, किंवा विशिष्ट नेत्यावर असलेल्या श्रद्धेने एकत्र आल्यामुळे या पक्षांना चर्चेतून निर्णय घेता येत होते आणि त्यामुळेच ते पक्ष अल्पमतधारी राहिलेले होते. आज स्थिती अशी आहे की, कोणतीही राजकीय किंवा आर्थिक विचारसरणी सर्व प्रश्न सोडवू शकेल असे कोणाला वाटत नाही. तेव्हा एखाद्या विचारसरणीवर निष्ठा ठेवून प्रभावहीन राहण्यापेक्षा मोठ्या पक्षातील एक विशिष्ट गट म्हणून राहणे श्रेयस्कर असे या पक्षांना वाटले असणार.

म्हणजे मोठ्या पक्षात सामील होऊन ही मंडळी परस्परांशी

भांडणार असेच की नाही ? मग कॉंग्रेसवाल्यांनी सध्या चालविलेल्या टीकेत तथ्य आहे म्हणायचे !

एखाद्या पक्षाचे सभासद एकत्र असतात याचा नक्की अर्थ काय आहे ? आपण एकत्र आहोत असे त्यांना वाटत असते आणि आपण एकत्र राहवे असे त्यांना वाटत असते यापेक्षा दुसरा कोणताच अर्थ 'एकत्र असणे' याला देता येत नाही. एका राष्ट्रातल्या नागरिकांत भांडणे चालू असतात, रागवारागव्या होतात, काहीजण परराष्ट्रांचे हस्तकसुद्धा होतात तरी राष्ट्र एक असते. याचा अर्थ काय ? याचा अर्थ इतकाच की, आपण एक आहोत असे नागरिकांना वाटत असते. त्याचप्रमाणे जनता पक्षाचे आहे. त्यात नाना विचारांचे लोक आहेत, निरनिराळ्या आणि परस्परांशी भांडणाऱ्या पक्षांतून आलेले लोक आहेत, तथापि आपण एक आहोत असे त्यांना वाटत आहे. आपल्या मतभेदांची तड आपण चर्चेने लावू शकू आणि एखाद्या बाजूला तात्पुरती पड खावी लागली तरी पक्षात राहून, इतरांचे मन वळवून आपली बाजू वरचढ करता येईल असा विश्वास त्यांना वाटत असेल तर तेवढे पुरेसे आहे. पण याहूनही एक महत्त्वाचे बंधन त्यांना एकत्र ठेवणारे आहे.

ते कोणते ?

सामान्य माणसाच्या या पक्षाविषयी असणाऱ्या अपेक्षा, पृथ्वीवर स्वर्गाचे अवतरण घडवून आणण्याची गुरुकिल्ली आपल्याजवळ आहे असे सांगणाऱ्या एकांगी, आर्थिक किंवा राजकीय विचारप्रणाली आणि सगळ्या दुखण्यांवरचा 'इक्षम्' माझ्याजवळ आहे असे सांगणारे महानेते यांचा उबग आलेला सामान्य माणूस स्वतःच्या मनाने चालू इच्छित आहे. त्या मनाची प्रतिष्ठा ठेवणारे व्यासपीठ म्हणून जनता पक्ष काम करील ही त्याची अपेक्षा आहे. □

# एन्क्रुमा आणि सोकार्नो

ग. प्र. प्रधान

१९५१ साली घानामधील राजसत्ता ब्रिटिशांकडून तेथील जनतेकडे आली.

घाना हे आफ्रिकेतील मुख्यतः कोको निर्यात करणारे राष्ट्र. तेथील राज्यकर्त्यांनी आपल्या समाजाचे आधुनिकीकरण करण्याचा निर्णय घेतला. पहिली विकास योजना ७४ दशलक्ष पौंडांची होती. या योजनेतील महत्त्वाकांक्षी कार्यक्रमात रस्ते, रेल्वे, शाळा आणि काही भागात नवीन औद्योगिक प्रकल्प यांचा समावेश होता. कोकोचे भाव जगातील बाजारपेठेत खाली आले तरी, अर्थव्यवस्थेत जी गुंतवणूक घानाने केली, तिच्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न सतत वरच्या पातळीवर जात होते. हा विकास कार्यक्रम लोकशाही मार्गाने पुढे नेण्याचा निर्णय घेण्यात आला आणि घानाची अंतर्गत परिस्थिती याला अतिशय अनुकूल होती. तेथील दरडोई उत्पन्न चांगलेच वरच्या दर्जाचे, दरडोई दरवर्षी १६९ पौंड इतके होते. लोकांत शिक्षणाचा प्रसार झालेला होता. पश्चिम आफ्रिकेतील सर्वोत्कृष्ट शिक्षणव्यवस्था तेथे होती. राष्ट्राबद्दलची निष्ठा लोकांच्या मनात होती. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून वरपर्यंत जे राजकीय हक्क ब्रिटिश राजवटीत मिळाले होते त्यामुळे शासनयंत्रणा चालविण्याचा अनुभव असलेला वर्ग तेथे होता. घानातील उच्च स्तरातील नोकरशाही (सिव्हिल सर्व्हिस) अतिशय कार्यक्षम होती. अर्थात याच वेळी भिन्न भिन्न टोळ्यांमध्ये पूर्वापार चालत आलेले गैरसमज व वैरही होते. घानामधे लोकसंख्येचे तीन भिन्न घटक होते : उत्तर विभागातील मागासलेला मुसलमान समाज, अशांटी भागातील शेती करणारा समाज, दक्षिण भागातील पाश्चात्य जीवनपद्धती स्वीकारलेले लोक. घानाचा लोकप्रिय नेता एन्क्रुमा याने टोळी प्रमुखांच्या हातातील सत्ता काढून घेतली व घानातील भिन्न घटकांना एका शासनयंत्रणेखाली राहण्यातच फायदा आहे असे पटवून दिले. लोकशाही पद्धती स्वीकारून सुरुवातीच्या काळात एन्क्रुमाने असामान्य कर्तृत्व दाखविले. या बुद्धिमान नेत्याजवळ नवे प्रयोग करण्याचे सामर्थ्य आढळून आले. शेती सुधारणा करताना घानातील शासनाने प्रथम कोकोवर पडणाऱ्या रोगाचे निर्मूलन केले, कारण कोको हाच निर्यातीचा मुख्य पदार्थ होता. भूमिहीन शेतमजुरांपैकी ज्यांना पुरेसे काम मिळत नसे त्यांची भूसेना (वर्कर्स ब्रिगेड) उभारली. शेतीत वेगवेगळी पिके काढण्यास लोकांना प्रवृत्त केले. १९५० ते १९६० या कालखंडात या सुधारणांमुळे रबराचे उत्पन्न २५० टक्क्यांनी, कॉफीचे ३०० टक्क्यांनी, नारळाचे ५०० टक्क्यांनी व तंबाखूचे ३०० टक्क्यांनी वाढले. केळी प्रचंड प्रमाणावर निर्यात होऊ लागली. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण दुपटीने वाढले व प्रौढांतील निरक्षरता ५० टक्क्यांनी कमी झाली. कॅनिंग, सिमेंट, टिंबर प्रोसेसिंग, यांसारखे छोटे धंदे सुरू करण्यात आले आणि मुख्यतः 'व्होल्टा' हा प्रचंड प्रकल्प सुरू करण्यात आला. १९५० ते १९६० या कालखंडात दरडोई उत्पन्न वर्षाला पाच डॉलर्स या प्रमाणात वाढले होते. परंतु यानंतर एन्क्रुमाने भरमसाट खर्चाच्या योजना हाती घेतल्या. नवे धोरण अवास्तव आहे हे दाखवून देणाऱ्या अर्थमंत्र्याला दूर केले आणि दरवर्षी ११९ दशलक्ष पौंड विकासकार्यात गुंतविण्यास सुरुवात केली. उत्पादन या वेगाने

वाढणे शक्य नसल्यामुळे १९६१ साली ३६ दशलक्ष पौंड तूट होती. ही तूट वाढायला लागल्यावर शेतकऱ्याकडून पैसा उभा करण्याचे एन्‌क्रुमाने ठरविले आणि शेतीमालाच्या किमती कमी केल्या. शेतकऱ्यांनी हे स्वखुषीने केले असे त्याने जाहीर केले. परंतु शेतकऱ्यांच्या सहकारी सोसायटीने हे म्हणणे खोडून काढले. एन्‌क्रुमाने सर्व विरोध मोडून, निपटून काढण्याचे ठरवून अशांटी भागाने कॉन्फेडरेशनची केलेली मागणी त्याने धुडकावून लावली. याच वेळी देशभर राज्ययंत्रणा भ्रष्टाचाराने व लाचलुचपतीने किडली होती.

एन्‌क्रुमा एका बाजूला त्याची धोरणे डावी आहेत असा प्रचार करीत होता आणि झपाट्याने विकास होण्यासाठी सत्तेचे केंद्रीकरण आवश्यक आहे असे सांगत होता. सुरुवातीस एन्‌क्रुमाने आधुनिक लोकशाहीचा पुरस्कार केला होता. परंतु नंतर मात्र आर्थिक विकासाच्या आड येणाऱ्या 'प्रतिगाम्यांचा' निःपात करण्यासाठी तो सर्वसत्ताधीश बनला. त्याच्या हस्तकांनी १९६२ साली त्याला आयुष्यभर अध्यक्ष ठेवण्याची मोहीम सुरू केली. पार्लमेंटमध्ये असे करण्यास अनुकूल मत होते. एन्‌क्रुमाने हा बहुमान नाकारला. मात्र सतत हा अधिकार स्वतःकडेच ठेवण्याचा त्याने निर्णय घेतला. १९६२ मध्ये त्याला मारण्याचा प्रयत्न झाला. तेव्हा एन्‌क्रुमाने प्रचंड दहशत निर्माण केली. पूर्वी उजवा मानला जाणारा परराष्ट्रमंत्री अको अडेजी व कडव्या डाव्या मताचा अडामिफो या दोघांनाही त्याने तुरुंगात टाकले. सर्व सहकारी संस्था, ट्रेड युनियन्स व अन्य व्हालंटरी ऑर्गनायझेशन्स एन्‌क्रुमाने त्याच्या पक्षाच्या, कन्व्हेन्शन पीपल्स पार्टीच्या, आधिपत्याखाली आणल्या व पक्षात तोच सत्ताधीश बनला असल्यामुळे विरोधाचा आवाज दडपला गेला.

एन्‌क्रुमाने नागरी स्वातंत्र्याचे सर्व हक्क नष्ट केले. वृत्तपत्रांत सरकारवर कोणतीही टीका वा चिकित्सक मूल्यमापन येईनासे झाले. वृत्तपत्रे ही शासनाची भाट बनली. एकदा एन्‌क्रुमाच्या मर्जीतील मंत्र्याची वृत्तपत्रांत स्तुती यावयाची आणि तो एन्‌क्रुमाच्या मर्जीतून उतरताच, 'या मंत्र्याला फाशी द्या,' ही मागणीही याच वृत्तपत्रांतून सुरू व्हावयाची. अशा तऱ्हेच्या कोलांट्या उड्या संपादक लीलया मारू लागले. सर्व विरोधी पक्षसदस्यांना तुरुंगात डांबण्यात आले. जवळजवळ पाच हजार लोक कारावासात खितपत पडले. प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याबाबत कोर्टांनी काही शब्दच्छल करताच, 'न्यायदान मंडळाचे स्वातंत्र्य हे जनतेच्या हिताच्या विरोधी जात आहे,' असा त्यावर शिक्का मारून हे स्वातंत्र्य नष्ट करण्यात आले. सर्व न्यायाधीशांच्या नेमणुका अध्यक्ष एन्‌क्रुमा करू लागले. सरन्यायाधीशांनी 'लोकांच्या आकांक्षेनुसार कायद्यात बदल केला पाहिजे,' असा ढोल बडविण्यास सुरुवात केली. मात्र १९६३ साली या सरन्यायाधीशाने एन्‌क्रुमाच्या तीन विरोधकांना निर्दोषी ठरविल्यावर, त्याला बडतर्फ करण्यात आले. घानातील नोकरशाही यंत्रणा ही अतिशय कार्यक्षम होती व पूर्वी ब्रिटिश राजवटीत मिळालेल्या शिकवणुकीनुसार राजकारणापासून पूर्णतया अलिप्त होती. या सर्व यंत्रणेमधील अधिकाऱ्यांना अध्यक्षांबद्दलच्या निष्ठेची शपथ जाहीररीत्या घ्यावी लागली. एन्‌क्रुमाने समाजातील प्रत्येक संस्थेत व स्तरात आपली विचारसरणी लादण्याचा प्रयत्न केला. पण तो अपयशी ठरला. घानाची राजधानी अक्रा येथे अध्यक्षांना पाठिंबा देण्यासाठी मेळावे घेण्यात येऊ लागले. 'यंग पायोनिअर्स' या नावाखाली बारा वर्षांच्या मुलांचा मेळावा भरत असे व तो एका सुरात घोष करीत असे. 'एन्‌क्रुमा नेहमी योग्य तेच करतो.' 'एन्‌क्रुमा अमर आहे.'

थोडक्यात म्हणजे घानामध्ये राजकीय दहशत थैमान घालत होती. मधेच लहर आल्यावर एन्‌क्रुमाने औदार्याचा आव आणीत, १९६२ मध्ये १३० राजबंद्यांची मुक्तता केली आणि त्याचबरोबर हे जाहीर केले की, पूर्वी राजकीय कैद्यांना जास्तीत जास्त ५ वर्षे शिक्षा होत असे ती २५ वर्षांपर्यंत वाढविलेली आहे. अध्यक्षांविरुद्ध टीका करणाऱ्याला ३ वर्षे कैदेची शिक्षा होईल असे जाहीर करण्यात आले. अखेर एन्‌क्रुमा परदेशात असताना त्याला स्वदेशात येण्याची बंदी करण्यात आली आणि एका काळचा घानाचा हा भाग्यविधाता, सर्वाधिकारी देशोधडीस लागला.

घानातील या राजकीय घटनांचा आर्थिक जीवनावर काय परिणाम झाला?

घानामध्ये एककेन्द्रित, अनिर्बंध सत्ता सुरू झाल्यावर अधिकारारूढ पक्षावर व शासनावरील टीकाच बंद झाली. त्यामुळे लाचलुचपत बेसुमार वाढली. अधिकाऱ्यांनी आपली तुंबडी भरून घेतली. लोकांना काहीतरी भव्य दिव्य घडत आहे असे दाखविण्यासाठी वाटेल त्या गोष्टींवर उधळमाधळ सुरू झाली. रस्ते सुधारण्याऐवजी एनक्रुमाने रशियाकडून जेट विमानांचा ताफा खरेदी केला. टेमा बंदर बांधण्याचे काम सुरू असताना लोकांना विशेषतः मजुरांना दिपवून टाकण्यासाठी जर्मन क्रेन्स आणण्यात आले. स्थानिक फ्रेटर हे काम करीत असल्यामुळे हे क्रेन्स पडून राहिले. घानाची आर्थिक परिस्थिती खालावत होती. परंतु जगात दबदबा रहावा व गिनी या राष्ट्राची मैत्री संपादन करावी, यासाठी घानाने २८ दशलक्ष डॉलर्सचे कर्ज गिनीला दिले. या सर्व गोष्टींचा परिणाम घानाची अर्थव्यवस्था कोलमडण्यात झाला नसता तरच नवल. आर्थिक प्रगती साधण्यासाठी आलेल्या हुकुमशाहीमुळेच घानाची अर्थव्यवस्था ढासळून पडली.

## इंडोनेशिआची कहाणी

इंडोनेशिआची कहाणी याहूनही दुर्दैवाची आहे. सोकार्नोने १९५९ सालापासून इंडोनेशिआत नियंत्रित लोकशाहीचा (गायडेड् डेमॉक्रसी) प्रयोग सुरू केला. त्याने जो जाहीरनामा काढला त्यात लोकांना "क्रांतीशी इमान राखा, समाजवाद आणा आणि इंडोनेशिआचे वैशिष्ट्य व स्वत्व टिकवा' असे आवाहन केले. सोकार्नोने सर्व सत्ता हातात घेतली आणि इंडोनेशिआतील वेगवेगळ्या हितसंबंधी गटांना परस्परांविरुद्ध झुंजवीत ठेविले. एका वेळी कम्युनिस्ट हे इंडोनेशिआत प्रबल होत होते व सोकार्नोला वरवर पाठिंबा देऊन पुढे त्याला आपल्या हातचे बाहुले बनविण्याचे स्वप्न ते पाहत होते. परंतु त्यांचा बेत सफल होणे दूरच राहो, उलट हजारो कम्युनिस्टांची इंडोनेशिआत कत्तल करण्यात आली. सेनाधिकाऱ्यांच्या वेगवेगळ्या गटांना सोकार्नोने हाताशी धरले व त्यांचा हवा तसा वापर केला. इंडोनेशिआच्या आर्थिक विकासासाठी जो नियंत्रित लोकशाहीचा प्रयोग सुरू झाला त्या प्रयोगात फक्त सोकार्नो व त्याच्याभोवती जमलेले आपमतलबी व खुशामती लोक व त्यांचे गट, यांनी त्यांच्या

चैनीसाठी अनिर्बंधपणे राज्यसत्ता वापरली. सोकार्नोच्या राजवटीत प्रचंड उधळपट्टी व भ्रष्टाचार हे इंडोनेशिआच्या अर्थव्यवस्थेचे ठळक विशेष होते. समाजवादाच्या नावाखाली आर्थिक आपत्तीतून मार्ग काढण्यासाठी ज्या योजना सोकार्नोंनी आखल्या, त्या तात्त्विक दृष्टचा आदर्श होत्या. १९६० साली जी अष्टवार्षिक योजना करण्यात आली, त्या योजनेत अन्न व कपडा या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावयाचे आणि निर्यात व्यापार सुरू करावयाचा या गोष्टींना अग्रहक्क देण्यात आला. पण तेथील राजकीय बजबजपुरीमुळे या योजनेवर कोणाचाच विश्वास नव्हता. जावा बेटावर लोकसंख्या फार दाट असल्यामुळे काही लोकांना अगदी विरळ वस्ती असलेल्या इंडोनेशिआतील बेटावर पाठविण्याचे सोकार्नोंनी ठरविले, पण दर माणशी यासाठी येणारा खर्च २५० डॉलर इतका होता व सरकारला हा पैसा उभा न करता आल्यामुळे अन्य सर्व योजनांप्रमाणे ही योजनाही फसली. सोकार्नोंनी जाहीर केले होते की, १९६९ पर्यंत प्रत्येक गावात शाळा, सहकारी सोसायटी, हॉस्पिटल, लायब्ररी व मशीद बांधण्यात येईल. परंतु हे काम ज्या मंत्रालयावर सोपविण्यात आले त्यात समाजविकास कार्याबाबत अनुभवी असलेल्या विद्यार्थ्यांचा भरणा होता. त्यामुळे ही सर्व योजना अपुरी राहिली व अनेक ठिकाणी निष्फळ ठरली. कारखान्यातून जो भ्रष्टाचार व्यवस्थापकांनी चालविला होता त्यामुळे कमालीची अकार्यक्षमता निर्माण होऊन कारखान्यातून जे उत्पादन होऊ शकले असते त्याच्या निम्म्याइतके उत्पादन झाले. निर्यात व्यापार अतिशय मोठ्या प्रमाणात घटला. १९४० साली इंडोनेशिआचा जगातील साखर-उत्पादक राष्ट्रांत तिसरा क्रमांक होता. १९६३ साली ते उत्पादन ६६ टक्क्यांनी घटले व साखर आयात करण्याकरता इंडोनेशिआला परत परकीय चलन वापरावे लागले. सर्वच बाबतीत ही पीछेहाट झाली. १९४० पेक्षा रबराचे उत्पन्न ४० टक्क्यांनी, कॉफीचे ५० टक्क्यांनी, तंबाखूचे ६० टक्क्यांनी कमी झाले. इंडोनेशिआतील नियंत्रित लोकशाहीचा प्रयोग म्हणजे पीछे फलांगच ( ग्रेट लीप बॅक्वर्ड ) ठरले.

या दोन देशांच्या व्यतिरिक्त ब्रह्मदेश व पाकिस्तान यांमधील घटनांचा ओझरता उल्लेख करता येईल. ब्रह्मदेशात १९६० पासून लोकशाही संपुष्टात आली. आज जनरल ने विन हेच सर्वाधिकारी आहेत. परंतु सर्व लष्करी व राजकीय सत्ता त्यांच्या ताब्यात असूनही ब्रह्मदेशाची अर्थव्यवस्था सुधारणे तर दूरच, पण तेथील एकूण जीवनाचीही घडी पार विसकटून गेली आहे. कारेनसारख्या काही भागात ब्रह्मदेश सरकारचे राज्यच चालत नाही. अनेक ठिकाणी 'बळी तो कान पिळी' हाच न्याय चालू आहे. हुकुमशाही किती अकार्यक्षम व दुबळी असू शकते हे जगाला ब्रह्मदेशात दिसले. ब्रह्मदेशचे पंतप्रधान हे बुद्धिमान व सत्प्रवृत्त गृहस्थ आहेत. पण त्यांचे सौम्य व्यक्तिमत्त्व किंवा त्यांच्या हातातील एकवटलेली सत्ता या दोहोंचाही ब्रह्मदेशाच्या आर्थिक विकासाला मुळीच उपयोग होऊ शकलेला नाही.

जनरल आयुबखान ज्यावेळी पाकिस्तानचे सर्वाधिकारी होते, त्यावेळी संपूर्ण पाकिस्तानच्या विकासाऐवजी त्यांनी पाकिस्तानच्या पश्चिम भागाच्या विकासावरच लक्ष केन्द्रित केले आणि बांगला देशाचे ( त्यावेळच्या पूर्व पाकिस्तानचे ) अतोनात आर्थिक शोषण केले. पश्चिम पाकिस्तानची वसाहत ( कॉलनी ) अशी वागणूक बांगला देशाला सतत देण्यात आली. पश्चिम पाकिस्तान व विशेषत: पंजाब यांच्या आर्थिक स्थितीत जी तात्पुरती सुधारणा दिसली तिचे मूळ या शोषणात होते. अखेर याचा परिणाम म्हणजे बांगला देशातील जनतेला हा जुलूम असह्य होऊन बांगला देश भारताच्या मदतीने पाकिस्तानातून फुटून स्वतंत्र झाला. आयुबखान यांचा लोकशाहीवर कधीही विश्वास नव्हता. पश्चिम पंजाबमधील जमीनदार, मूठभर उद्योगपती आणि लष्करातील काही अधिकारी या तीन सत्तागटांच्या आधारे आयुबखानाची राजवट बेबंदपणे चालू होती. लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी त्यांनी मूलभूत लोकशाहीचा ( बेसिक डेमॉक्रसी ) बुरखा पांघरला होता. या त्यांच्या लोकशाहीच्या नाटकात संसदेचे सदस्य अप्रत्यक्षपणे निवडून येत. ग्रामीण भागात जमीनदार व सधन शेतकरी यांना हाताशी धरून आयुबखान यांनी पंचायत समित्यांतील निवडणुकांत आपल्याला हवे असलेले लोक निवडून आणले व तेच मतदार असल्यामुळे हा कळसूत्री बाहुल्यांचा खेळ सर्व पातळ्यांवर त्यांना खेळता आला. परंतु अखेर हा डोलारा कोसळला आणि हुकूमशाही असली की, आर्थिक विकास साधता येतो, या भ्रमाचा आणखी एक फोपळा फुटला.

## हुकुमशाही राजवटीतील उणीवा

चीनमध्ये माओने आपल्या हातातील सर्वंकष सत्तेचा उपयोग योजकतेने करून चीनचा आर्थिक विकास साधला हे खरे आहे. परंतु इंडोनेशिआ, घाना, ब्रह्मदेश व पाकिस्तान येथील हुकूमशाही राजवटीत त्या देशांची आर्थिक पीछेहाटच झाली. यावरून हे लक्षात येईल की, विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासासाठी हुकूमशाही आवश्यकच आहे असे म्हणणे ऐतिहासिक सत्यास धरून नाही. अशा हुकूमशाही राजवटीत ज्या उणीवा दिसल्या त्या पुढीलप्रमाणे :—

( १ ) देशातील सर्व साधनसंपत्ती व सर्व शक्ती—यात लष्करा-


**मतदान करण्यापूर्वी ही पुस्तके वाचा**

- स्वगत : जयप्रकाशजींची जेलमधील दैनंदिनी।
- लोकशाही : अन्वय आणि अर्थ।
- जयप्रकाश व्हिंडिकेटेड।
- तानाशाहीकी दिशामें बढाये कदम।
- बातचीत : सात नेत्यांच्या मुलाखती।
- आपत्कालकी उलटी गंगा।
- लोकशाहीचे स्वरूप।
- जयप्रकाशजीने कहा ही था।
- डेमॉक्रसी ॲन्ड कॉन्स्टिटयूशन अमेंडमेंट बिल।
- डेमॉक्रसी ॲन्ड द रिप्रेझेंटेटिव्ह सिस्टिम इन इंडिया।
- स्वातंत्र्याचा आद्यतन संदर्भ।
- गुजरात हायकोर्ट ऑन प्रिसेन्सॉरशिप।
- महाराष्ट्र हायकोर्ट जजमेंट इन साधना केस।

**प्रमुख विक्रेते : साधना प्रकाशन, पुणे ३०.**

चाही अंतर्भाव होतो, तसेच-आर्थिक सत्तेचाही अंतर्भाव होतो-शासनाच्या एकतंत्री हुकमतीखाली आल्यास शासन अनेकदा त्याचा दुरुपयोग करते. गैरहिशेबीपणाने उधळपट्टी करते आणि त्यामुळे आर्थिक आघाडीवर पीछेहाट होते.

(२) सर्व तऱ्हेचे केन्द्रीकरण झाल्यावर राज्यकर्त्यांभोवती खुशमस्कऱ्यांचा व 'जी हुजूर' मनोवृत्तीचा वर्ग तयार होतो आणि राज्यकर्ते देशातील वास्तवस्थितीपासून दूर जातात. इंडोनेशिआतील उत्पादन घटत असताना सोकार्नोला त्याचे सल्लागार 'उत्पादन वाढते आहे' असे सांगत होते.


(३) सतत रेडिओवर, टी. व्ही. वर आणि वृत्तपत्रांतून एकतर्फी, शासनकर्त्यांच्या बाजूचाच प्रचार ऐकावा लागल्यामुळे लोकांचा या सर्व गोष्टींवरील विश्वास उडतो. आणि देशात खोटेपणाचे व अश्रद्धेचे वातावरण निर्माण होते.

(४) सर्व विरोध दडपला जात असल्यामुळे ऐक्य निर्माण झाल्याचा आभास होतो, परंतु प्रत्यक्षात राजकीय व आर्थिक जीवनाला तडे जातात.

(५) लबाडी भूमिगत होऊन वावरते. घानामध्ये जेव्हा शेतकऱ्यांवर असह्य असे निर्बंध लादण्यात आले तेव्हा अनेक शेतकरी कोकोची चोरटी निर्यात करू लागले.

(६) हुकूमशाही राजवटीमुळे एक मोठा दूरगामी तोटा होतो तो हा की, राष्ट्रातील जनतेमध्ये उपक्रमशीलता व प्रयोगशीलता कमी होत जाते. घानातील अनेक बुद्धिमान तरुण देश सोडून गेले. शिवाय एकदा आलेली हुकूमशाही स्थिरावू लागली की, परत लोकशाही प्रस्थापित होणे कठीण असते. आणि परिस्थिती बिकट व आणीबाणीची आहे या नावाखाली हुकूमशाही उजळ माथ्याने वावरू लागते. या संदर्भात सारांशरूपाने असे म्हणता येईल की, आणीबाणीचे असे ऐसपैस कारण देऊन विरोध दडपून टाकल्याने राष्ट्राची प्रगती खुंटते, हा अनेक विकसनशील राष्ट्रांचा अनुभव आहे. कोणत्याही राष्ट्राचा विकास व्हावयाचा असेल तर, लोकांत ऐक्य असले पाहिजे हे निर्विवाद सत्य आहे. हुकूमशाही राजवट, लोकशाही राजवटीपेक्षा ऐक्याचा देखावा अधिक परिणामकारकपणे उभा करू शकते, परंतु तशी वास्तविक परिस्थिती, खरीखुरी जनतेची एकात्मता मात्र हुकूमशाहीत निर्माण होऊ शकत नाही. □


['भाकरी आणि स्वातंत्र्य' या 'विश्वकर्मा साहित्यालय' पुणे द्वारा प्रकाशित होणाऱ्या आगामी पुस्तकातील काही भाग.]

लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : वीस रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**



# दिल्ली निवडणूक पुरवणी

## संकलन : रत्नाकर महाजन

निवडणुकांच्या प्रचार मोहिमेस आता खरी सुरुवात झाली आहे. नुक्कड सभा, सकाळच्या फेऱ्या, घरोघर जाऊन प्रचार अशा वेगवेगळ्या मार्गांनी दोन्ही बाजूंचे प्रचार सुरू झाले आहेत. जनता पक्षाची प्रचार मोहीम अधिक जबाबदारीने चाललेली दिसते. काँग्रेसच्या प्रचाराचा भर 'इथून पुढे काय करू' पेक्षा 'आतापर्यंत काय केले' यावर अधिक आहे. त्यामुळे अजून तरी यावेळी आश्वासनांची खैरात नाही. एकूण पवित्राही बचावात्मक आहे. मधूनमधून श्रीमतीजी राणा भीमदेवी थाट आणतात, पण त्यात त्यांनीच प्रचाराची विशिष्ट पातळी राखण्याच्या आवाहनास हरताळ फासलेला असतो.

प्रचाराचा एक मार्ग भित्तीपत्रकांचा. काँग्रेसची भित्तीपत्रके अधिक. त्यांची पातळीही अतिशय हीन. दर आठवड्यास एक तरी नवे पोस्टर काँग्रेसच्या पिल्लू संघटनेच्या वतीने लागते. पोस्टरचे काही मासले. १) जगजीवन राम यांच्या राजीनाम्यास उद्देशून– 'हे राम, बुढापेमें यह तुम्हे क्या हुआ, क्यों हुआ, कब हुआ ?' २) थूककर चाट गये – अटलबिहारी वाजपेयी. 'मैं चुनाव नही लडूंगा' – अटलबिहारी. मगर हाय गद्दी ! ... ३) सिकंदर बख्त हे जनता पक्षाचे चांदणी चौक मतदारसंघातले मुस्लिम उमेदवार. त्यांचा आंतर्धर्मीय विवाह झालेला. त्यांचा उल्लेख 'राज – सिकंदर कांड का हीरो' असा करण्यात आला आहे. (राज हे त्यांच्या पत्नीचे नाव.) या उलट जनता पक्षाच्या भित्तीपत्रकात लोकशाही की हुकूमशाही, किंवा अशाच प्रकारचा अन्य मजकूर असतो. अजून तरी त्यांच्या भित्तीपत्रकात इंदिराजींचा नावाने उल्लेख आलेला नाही. भित्तीपत्रके वाचणाऱ्यांची प्रतिक्रियाही मजेशीर असते. काँग्रेसची पोस्टर्स वाचल्यावर चेहऱ्यावर उपहास – टिंगलीचा भाव उमटतो. तर जनता पक्षाचे पोस्टर वाचताना आपुलकी, कुतूहल, कौतुक यांचे मिश्रण असते.

१. हा रामकिसन : रस्ते साफ करण्याचे काम करतो. वय ३७. दोन मुले.

'काय हो, निवडणुका होणारयत् म्हणे लवकरच ?'

'होय साहेब. होणार आहेत ना. सबंध देशातच होणार. पण यावेळी बाईला धडा मिळणार. दिल्लीत एक जरी सीट लागली तरी फार झाले.'

'का बरं, एवढं काय केलंय त्यांनी ?'

'अहो, काय करायचं बाकी ठेवलंय ? आम्ही इथं जवळच अर्जुननगरच्या झोपडपट्टीत राहत होतो. बायको पण कामाला जात होती. बरा चालला होता संसार. पण इमर्जन्सीत एक दिवस अचानक आले आणि आमच्या झोपड्या तोडून टाकल्या. दुसरे घरही लवकर मिळाले नाही. मिळाले ते माझ्या कामाच्या ठिकाणापासून दहा मैलांवर. आता मला सांगा, घरापासून इथं कामावर यायला बस-भाड्याला तरी पैसे कुठंयत ? यायचे-जायचे मिळून १ रु. २० पैसे लागतात. बरं, जिथं नेऊन टाकलं तिथं नाही पाणी, संडास. फक्त वशिल्यांच्या लोकांना चांगल्या, जवळच्या जागा मिळाल्या. नसबंदीचं आणखी एक लफडं काढलं होतं.

'मग त्यात काय वाईट आहे ?'

'वाईट नाही, पण पाहून, बघून तरी करायचं का नाही ? ज्याचं लग्न झालं नाही, ज्यांना दोनच मुलं आहेत, दोघा नवरा बायकोपैकी एकाचं मन नाही, तरी बळजबरीने नसबंदी केली. आता असली बळजबरी ज्यांच्यावर झाली, ते काय मत देणार होय ह्या बाईला ? नाव नका घेऊ !'

आणखी काय काय केलं ?'

'आता तुम्हाला काही माहीतच नाही म्हणा की. वो हमारे वकील साब थे. बेचारे बहुत अच्छे थे. हम लोगोंकी बडी मदद करते थे. राशन कार्ड लानेमें, लोगोंको कामधंदा दिलानेमें, हमारे सारे

कामोंमें हमेशा मदद करते थे. इमर्जन्सी लागू हुई तो आधी रात नींदोसे उठाकर ले गये उनको जेलखानेमें. क्या मिसा या और कुछ कहते है न, उसमे ले गये उठाकर!'

'अब तो छूटकर आए होंगे?'

'हाँ, अब आए है, लेकिन डेढ साल बिना किसी जुल्म के अंदर रहे उसका क्या? न जाने ऐसे कितने लोगोंको देशभरमें अंदर रखा था!'

'जयप्रकाशांना ओळखता का?'

'होय तर. परवाच्या रामलीला मैदानातल्या त्यांच्या सभेला गेलो होतो ना. काय गर्दी जमली होती साहेब. बेचारा बुड्ढा- बहुत बीमार हो गया है. सुना है उसकोभी अंदर रखा था. लेकिन साब-भासन बडा अच्छा देता है. निवडणूक फंडासाठी तिथे डबे फिरवत होते. आमच्याजवळ काय असणार? दहा पैशाचं नाणं होतं, दिलं तेवढं टाकून झालं! तेवढीच आमची गरिबाची मदत.'

'फिर अब चुनावमें वोट किसको देनेका सोचा है?'

'यह भी कोई पूछनेका सवाल है साब?'

२: हा जोगिंदर सिंग.: २७ वर्षांचा रिक्षा ड्रायव्हर. ५-६ वर्षांपासून रिक्षा चालवतोय. त्याच्या रिक्षात बसल्या बसल्या विषय काढला. मध्ये विठ्ठलभाई पटेल हाऊसला रिक्षा थांबवून बरोबर असलेले एक मित्र उतरले. मी पुढे गेलो. रिक्षावाल्याने हसून विचारले, 'साब कौनसी पार्टीके है?'

'नही भाई, हम किसीभी पार्टीके नहीं है' म्हणून त्यालाच बोलता केला, 'दिल्लीकी क्या हालत है?'

'साहेब, यावेळी दिल्लीत एकही सीट बाईंच्या हाती लागणार नाही. अब तो मामला बिलकुल उलटा होनेवाला है.'

'का बरं?'

'इमर्जन्सीच्या नावाखाली मन मानेल तशी जुलूम-जबरदस्ती झाली आहे. दिल्लीत भीतीमुळे लोक तेव्हा सर्व काही निमूटपणे सहन करीत होते. पण आता त्यांना धडा शिकविल्याशिवाय राहणार नाहीत लोक.'

'अशी काय जबरदस्ती झाली?'

'एकच उदाहरण सांगतो. आता हे रिक्षाचे मीटर आहे ना, त्याचे सील कायम असले की, ते कसे चालते हे बघण्याचे रिक्षावाल्यास किंवा पोलिसास तरी काय कारण! पण मन मानेल तेव्हा वाटेल तो रिक्षा पोलीस थांबवायचे. म्हणायचे, रिक्षाचा मीटर बरोबर नाही. चल ठाण्यावर. त्यांच्याशी वाद घालायला गेले की जेलची भीती दाखवायचे. ठाण्यावर गेले की जेलची भीती दाखवायचे. तिथे गेले की केस. ९००।१००० रुपये दंड. आता आम्ही रिक्षावाले एवढा दंड कुठून भरणार? जरा ताठरपणे वागलेल्या रिक्षावाल्यांना सरळ डी. आय्. आर. खाली तुरुंगात पाठवायचे. इकडे त्याचा रिक्षा ठाण्यावरच उघड्यावर पडलेला. त्याची मोडतोड व्हायची. बाहेर आला की तो रिक्षावाला बिचारा पुन्हा रस्त्यावर! अशी गरिबांची घरं उद्ध्वस्त केलीत साहेब यांनी. अशा संतानी कारभार करणाऱ्यांना कोणी मतं देईल होय?'

'पण अशी जबरदस्ती सगळ्यांवर थोडीच झालीय?'

'तुर्कमान गेट—जामा मस्जिदके इलाकेमें जाइये साब आप. तब पता चल जाएगा क्या हुआ है और कितनोंके साथ हुआ है.'

३: हा महेंद्र प्रताप: ३२ वर्षे वय. दिल्ली नगरपालिकेच्या एका शाळेत प्राथमिक शिक्षक. चाकोरीतले जीवन. कधी सभा-परिषदा नाहीत. राजकारण नाही. आपण आणि आपला संसार.

'काय शाळेत मुले पुन्हा येईनाशी झाली असणार?'

'का बरं?'

'नाही आता इमर्जन्सी ढिली झाली आहे नं.'

'म्हणून काय झालं? इमर्जन्सीत सगळी मुकं शाळा-कॉलेजात वेळेवर जात होती असं कुणी सांगितलं? वह सिलसिला तो अपने तरीकेसे चल रहा था'

'पण तुम्हाला काही झळ लागली नसेल इमर्जन्सीची.'

'नाही कशी? ते नसबंदीचं भूत होतं ना मानगुटीवर. दरमहा शिक्षकाने दोन नसबंदीच्या केसेस आणल्याच पाहिजेत असं बंधन होतं. त्या जर पुऱ्या झाल्या नाहीत तर पगारवाढ थांबण्याची धमकी, नोकरीवरून काढण्याचीही धमकी होती. दर पगाराच्या वेळी हिशोब घ्यायचे. प्रत्येकाचं रेकॉर्ड ठेवलेलं असायचं.'

'मग तुमचा कोटा झाला का पुरा?'

'सांगतो कुणाला न करून? पण तो पुरा करताना आलेले अनुभव आठवले की अंगावर शहारे येतात. आता बरं झालं बुवा. आणीबाणी नाही त्यामुळे ही बळजबरीही नाही. साहेब, कोठल्याही बाबतीत अशी बळजबरी करून कसं बरं चालेल? ज्याच्या त्याच्या कलानं घ्यायला पाहिजे असलेल्या गोष्टीत.'

'तुमचं ऑपरेशन झालं का नाही!'

'नाही. मला आत्ताशी एकच मूल झाल्याने मी वाचलो आहे.'

'काय, निवडणुकांचा काय रंग दिसतोय?'

'हे बघा साहेब, आपल्याला त्यातलं काही कळत नाही. या साऱ्या भानगडीपासून आपण पहिल्यापासून दूर आहोत. पण यावेळी रंग जरा वेगळा दिसतोय एवढं मात्र खरं. यावेळी, भीत भीत काढलेल्या अठरा महिन्यांची याद आली की, मलासुद्धा कुदावंस घाटायला लागलंय यात.'

'का बरं?'

'का बरं काय! दीड वर्ष लोकांच्या छाताडावर नाचणाऱ्यांना

## पराभव हेच प्रायश्चित्त!

संततिनियमनाच्या संदर्भात झालेल्या बळजबरीबद्दल संरक्षणमंत्री बन्सीलाल यांनी माफी मागितली आहे, याकडे कोणी तरी लक्ष वेधले. त्यावर अटलजी म्हणाले,

'ठीक आहे. अशी माफी मागितली हे चांगले केले. पण नुसत्या माफीने भागणार नाही. आपल्याकडे पापक्षालनासाठी प्रायश्चित्त घ्यावे, न घेतल्यास द्यावे असे सांगितले आहे. तेव्हा वर्षभर केलेल्या या पापाचे प्रायश्चित्त म्हणजे बन्सीलालजींचा या निवडणुकीत पराभव करणे! असे केल्यानेच त्यांना खरे प्रायश्चित्त लाभणार आहे.' *

पुन्हा गादीवर यऊ दिलं तर, ते छाताड जाग्यावर ठेवलीत का ? साहेब, आमच्या शाळेच्या शिपायापासून हेडमास्तरपर्यंत; शेजारचा तो बूट-पॉलिशवाला सुद्धा वैतागलाय बघा. असे सगळे वैतागल्यावर हे कुठले ठिकाणावर राहायला. मुझे तो लगता है साब, इस बार दिल्लीसे इंदिरा कांग्रेसको एक भी सीट मिलनेकी कतई गुंजाइश नहीं है, म्हणून यावेळी यांना मजा चखवणारात आपणही असावं असं मला आता वाटायला लागलय. पण काय करणार ? घरमे कमानेवाला मैं अकेला हूँ. बुढ्ढे माँ-बाप है, बीबी और बच्चा भी है. इस घर गिरस्थी मे कम्बख्त टाईम ही कहाँ मिलता है इन बातोंके लिए ? मगर कुछ और हो ना हो, मेरे घरके चार वोट तो काँग्रेस को नहीं मिलेंगे यह बात पक्की ।'

४ : हा नथ्थू सिंग : ४५ वर्षांचे वय. बायको व तीन मुले. हातगाडी ओढतो.

'काय बाबा, काय म्हणतीय निवडणूक !'

'काय म्हणायचीय बाबा. आपल्याला त्यातलं बाकी काही कळत नाही. आपलं तर ठरलंय-जहाँ बाबूजी वहाँ हम । बाबूजी जहाँ होंगे उसी पार्टीको हम वोट देंगे. वो काँग्रेसके खिलाफ है. इस लिए काँग्रेसको वोट नही देंगे इस बार.'

५. हा रमेश : ३२ वर्षांचा एक तरुण, उत्साही वकील. वकिली करतो. पण त्यात फुकट कामच अधिक. आणीबाणीनंतर राजकीय कार्यकर्त्यांच्या अनेक केसेस याने चालविल्या. अर्थातच फुकट. मिलिटंट. कोणत्याही पक्षाचा नाही. पण सामान्यपणे अँटि-एस्टॅब्लिशमेंट. (हे त्याचेच स्वतःविषयीचे वर्णन.) सध्या जनता पक्षासाठी मदत गोळा करतोय्.

'मी जिथे जाईन तिथे लोक अनुकूलच दिसतायत. प्रत्येकजण म्हणतोय्, हाँ साब, हम तो आपही के है. मला तर वाटायला लागलंय् की, ते माझा मामा करतायत की काय कुणास ठाऊक. पण एकूण आजचे वातावरण पाहून मला ६७ सालच्या वातावरणाची आठवण येते. त्या वेळी असेच भूतकालातील घटनांविषयीची प्रतिक्रिया व्यक्त करणारे वातावरण होते. त्या निवडणुकांच्या आधी इथे गोवधबंदीविरोधी आंदोलन झाले होते. मोठा मोर्चा (दोन-अडीच लाख साधूंचा) संसदेवर गेला होता. त्यांच्यावर गोळीबार झाला होता. त्या प्रकारामुळे दिल्लीचे नागरिक भयंकर चिडले होते. बायकांनी आपल्या मुलांच्या शपथा घेऊन, काँग्रेसविरोधी मते देण्याचा निर्धार केला होता. परिणामी दिल्ली नगरपालिकेपासून ते संसदेपर्यंत सर्व ठिकाणी काँग्रेसचा दिल्लीत दारुण पराभव झाला! जिथे जनसंघाचे आठ सदस्य होते तिथे अठ्ठावन झाले. आज तेच वातावरण दिसते आहे. हे वातावरण निवडणुकांच्या निकालात कसे परिवर्तित होते हेच पाहायचे आहे. पण मला ते तसे होईल, असा विश्वास आहे.'

यावेळी जनता पक्षाच्या निवडणूक फंडासाठी किमान एक लाख रुपये जमविण्याचे या बहाद्दराने ठरविले आहे! स्वतः व्यापारी घरातला व त्यातून वकील. एवढे पैसे जमा करणे त्याला अवघड जाऊ नये !

निवडणूक मोहीम जसजशी रंगत चालली आहे, तसतसे दोन्ही बाजूंच्या प्रचारास 'सवाल-जबाबां'चे स्वरूप यायला लागले आहे. इंदिराजी विरोधकांवर काही तरी आरोप करतात, किंवा शेरेबाजी करतात. त्याचे जनता पक्षाच्या पत्रकार परिषदेत खंडन केले जाते. दुसऱ्या दिवशी श्रीमतीजींचा दुसरा काही तरी आरोप तयार !

परवा मालमत्तेच्या हक्कांबाबतच्या जनता पक्षाच्या भूमिकेवरील इंदिराजींच्या शेरेबाजीचा समाचार घेण्यासाठी अशीच एक पत्रकार परिषद जनता पक्षाने बोलावली होती. अटलबिहारी बाजपेयी पत्रकारांसमोर निवेदन करणार होते. दिल्लीतल्या एका इंग्रजी दैनिकाने चुकून त्या दिवशी पत्रकार परिषदेऐवजी अटलबिहारींची जाहीर सभा अशी बातमी दिली. झाले, भराभरा माणसे गोळा झाली. आत पत्रकारांची गर्दी, बाहेर दोनएक हजारभर दिल्लीकर-अटलजींची सभा साकार करण्यासाठी. पत्रकार परिषद तासभर चालली. इकडे 'जनता' अस्वस्थ. एक स्थानिक पुढारी त्यांच्यापुढे भाषण करून, त्यांना गुंतवून ठेवत होता. परिषद संपवून अटलजी बाहेर आले आणि झिंदाबादच्या घोषणांचा स्फोट झाला. जमावासमोर येऊन ते म्हणाले, 'देखिये, कुछ गलती हुई है. वास्तवमें मैं यहाँ अपने पत्रकार बंधुओंसे बातचीत करने आया था. इस समय सभाका कोई उद्देश नही था. मगर आप आये ही हैं तो आपका स्वागत है. इसी प्रकार आप हमपर कृपा रखिये...' गर्दीतून आवाज-आम्ही भाषण ऐकायला आलो आहोत. ते ऐकूनच जाऊ. अजून आजारातून पूर्ण बरे न झालेल्या अटलजींना लोकांचा हा उत्साह-आग्रह पाहून बोलावे लागले. स्टेज, माईक नसलेली सभा. एवढ्या लोकांना माईकशिवाय ऐकू जाणार कसे ? अटलजी म्हणाले, सर्वजण शांत राहाल तर प्रत्येकाला ऐकू येईल. एवढ्यात एकाने आतल्या खोलीतून एक खुर्ची आणली. स्टेज तयार. अटलजी त्यावर उभे राहून बोलू लागले. स्पष्ट, खणखणीत आवाज. शेवटपर्यंत ऐकू जाण्याइतका मोठा. त्यांची स्वतःची अशी एक मिष्किल, खुसखुशीत बोलण्याची

पंजाबचे एक मंत्री गेल्या वर्षी इंग्लंडला गेले होते. तिथल्या शिखांच्या एका धार्मिक समारंभास त्यांना बोलावले होते. ते गेले. प्रार्थनासभेपुढे त्यांनी भाषण केले. भाषणात त्यांनी आणीबाणी-पुराण सुरू केले. एक-दोघे उठून मंत्र्यांना अडचणीत टाकणारे प्रश्न विचारू लागले. मंत्रिमहोदय चिडले. आवाज चढवून गप्प बसा म्हणाले. पण एकजण भलताच खंबीर निघाला. त्यानेही तेवढाच आवाज चढविला. मंत्र्यांचा संताप अनावर झाला. त्यांनी त्याच्या अंगावर धावून जाऊन त्याची कॉलर पकडली. चक्क मारामारी झाली. मंत्र्यांना आपल्या स्थानाचे व अधिकाराचे भान झाल्यावर ते म्हणाले, 'तू पंजाबात ये म्हणजे तुला दाखवतो. तुला तुरुंगातच टाकतो.' 'एवढे सोपे आहे काय तुरुंगात टाकणे.' 'ते प्रत्यक्षच अनुभवा. काही नाही तर तुझ्या घरात अफू आणून टाकीन आणि ती बाळगल्याच्या आणि चोरटा व्यापार करण्याच्या आरोपाखाली पकडीन.'

—केदारनाथ सहानींच्या पत्रकार-परिषदेतून. *

स्टाईल आहे. बोलताना तदनुरूप हावभाव करण्याची सवय. Actions speak louder than the words या म्हणीचा प्रत्यय त्यांचे भाषण ऐकताना येतो, हा एका श्रोत्याचा अभिप्राय. फार बोलणार नाही म्हणत म्हणत ते तब्बल तासभर बोलले. जंतरमंतर रोडवरील जनता पक्षाच्या ऑफिसचे ते आवार माणसांनी नुसते फुलून गेले होते. बहुसंख्य सरकारी वा गैरसरकारी कर्मचारी होते. ऑफिस संपवून आले होते. काही उत्साही पत्रकार तर ही नाटयपूर्ण सभा पाहण्यासाठी (आणि नंतर पेन फोटोग्राफी करण्यासाठी) इमारतीच्या छतावर जाऊन उभे राहिले होते.

खरे तर ही सभा नव्हतीच. वक्ते बोलण्याच्या तयारीने आले नव्हते. श्रोते काही प्रश्न मनात घेऊन आले होते. त्यामुळे दोघांच्यात प्रश्नोत्तरे झाली. पब्लिक सेक्टरबद्दल जनता पक्षाची भूमिका काय इथपासून ते त्यानी झैलसिंगच्या भाषणाबद्दल मत काय इथपर्यंत अनेक प्रश्न लोकांनी विचारले. सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली. जणू काही या सभेतून वक्त्याला इथून पुढच्या सभांचे टॉकिंग पॉईंट्सच मिळाले.

निवडणुकांच्या वातावरणाचा आणि गेल्या दीड वर्षाच्या अनुभवाचा सबंध समाजावर जो परिणाम झाला आहे, त्यापासून पत्रकार अलिप्त कसे राहणार ? एकूण समाजाची आज जी मनस्थिती आहे, तीच पत्रकारांचीही आहे. म्हणून तर जनता पक्ष आणि जगजीवनराम यांच्या पत्रकार परिषदेस त्यांचा अधिक रस असतो. अगदी किरकोळ गोष्ट वा युक्तिवादही तेथे आस्थापूर्वक ऐकला जातो. एखाद्या सभेतल्या श्रोत्यांप्रमाणे या दोन्ही ठिकाणी पत्रकार वक्त्यांना प्रतिसाद देतात. कांग्रेसच्या ब्रीफिंगला जायला मात्र ते फारसे उत्सुक नसतात. कोणी नाही गेले तरी 'समाचार'वाले जाताततच, आणि तेथे जे काही होईल ते उद्याच्या पेपरमध्ये वाचायला मिळेलच, अशांसारख्या वाक्यांमधून ही अनुत्सुकता व्यक्त होत असते.

पण त्यातही काही 'बुद्धिवादी', तटस्थ पत्रकार असतातच. असाच एक 'बुद्धिवादी' परवा एकदा म्हणाला, 'पत्रकार कधी मत देत नसतो, तो फक्त वृत्त देत असतो.'

केदारनाथ सहानी. दिल्लीचे माजी महापौर. आणीबाणी भरात असताना जनसंघाने पाठविलेल्या विदेशी वकीलांपैकी एक. परवाच ते आपले मिशन संपवून मायदेशी परतले. आल्यावर दुसऱ्या दिवशी पत्रकार परिषद. बातचीत सुरू होण्यापूर्वी एकजण म्हणाला, 'Mr. Sahani, today you must give us a good story.' तर अशी त्यांच्याबद्दलची उत्सुकता. आणीबाणीबद्दल विदेशातल्या भारतीयांच्या भावना, तिथे त्यांनी केलेले काम वगैरे अनेक गोष्टी त्यांनी सांगितल्या. विदेशातल्या भारतीयांचा विश्वास बाईंनी गमावल्याचेही त्यांनी सांगितले. हे सारे विदेश-पुराण ऐकून एकाने विचारले, 'सहानीजी, विदेशातल्या भारतीयांबद्दल तुम्हास एवढी आस्था का ? ते भारतीय असले तरी विदेशात स्थायिक झाले आहेत. त्यांच्यापुढे आणीबाणीविषयी सांगण्याने तुमच्या चळवळीस कशी मदत होईल ?' त्यावर सहानीजी म्हणाले, 'विदेशातल्या भारतीयांना इथली वस्तुस्थिती सांगून त्यांच्यापुढे इथले खरे चित्र ठेवणे आणि मानवी हक्कांविषयी जागतिक जनमत जागृत करणे यासाठी माझ्या पक्षाने मला पाठवले होते. मला वाटते, मी हे माझ्या परीने केले आहे.'

'असे किती लोक तुमच्या पक्षाने पाठविले होते ?'

'सहा'

'काही अजून परत यायचे आहेत ना ?'

'होय. पण त्या सगळयांनाच आम्ही परत बोलावणार नाही. त्यांपैकी काही अजून तिथेच राहतील. आपले ठरलेले काम करतील.' □

# पाच मुलाखती

❋ जगजीवनराम ❋ सुरेंद्र मोहन ❋ पी. राममूर्ती ❋ देवदत्त ❋ सुंदरसिंग भंडारी

## प्रत्येक उक्ती वा कृतीस योग्य वेळेची वाट पाहण्याचा या माणसाचा पिंडच असावा

जवळजवळ अर्धशतक कांग्रेसमध्ये आणि सरकारमध्ये राहिलेल्या, सत्तरी ओलांडलेल्या जगजीवनराम यांनी निवडणुका तोंडावर आलेल्या असताना अचानक मंत्रिपदाचा व पक्ष सदस्यत्वाचाही राजीनामा दिला आणि साऱ्या देशाला आश्चर्याचा धक्का दिला. आजघडीला बाबूजी हे देशभरच्या राजकारणाचे एक महत्त्वाचे केंद्र झालेले असल्याने त्यांच्या घरी अहोरात्र माणसांची वर्दळ असते. घराच्या फाटकावर पहारा देत असलेल्या पोलिसाच्या मते तर, ते सत्तेवर असताना सुद्धा त्यांच्याकडे एवढी माणसे येत नसत. तर अशा या पूर्णपणे बीझी असणाऱ्या नेत्याची मुलाखत घेणे हे एक मोठे दिव्य. पण चिकाटी कामी आली. कृष्ण मेनन मार्गावरील ६ नंबरचा भला मोठा प्रशस्त सरकारी बंगला. ( शेजारी आणखी एक तसाच बंगला. बाहेर नाव आहे—श्रीमती ललितनारायण मिश्र. 'हुतात्मा' ललित नारायण मिश्र यांच्या वीरपत्नीस भारतीय जनतेच्या कृतज्ञतेचे, सन्मानाचे प्रतीक म्हणून मायबाप सरकारने हा बंगला राहण्यासाठी कायमचा बहाल केला आहे. ) बाहेर विस्तीर्ण हिरवळ. हिरवळीवर इतस्ततः पडलेल्या खुर्च्या व त्या अपुऱ्या पडतील एवढी माणसे. बाबुजींच्या दिमतीला त्यांचा सरकारी लवाजमा अजून कायम. ( चौकशी अंतीसमजले की, मंत्रिमंडळातून बाहेर पडल्या-

नंतर तीन महिनेपर्यंत हा लवाजमा ठेवता येतो, अशी कायद्यात तरतूद आहे. ) मला त्यांच्या पी. ए. ने ११ ची वेळ दिली आहे. पण गडबड नको म्हणून मी पावणे अकरालाच त्यांच्या घरी पोचलो आहे. बरोबर आणखी एक मित्र आहे. दोघेही बाहेरच्या दिवाणखान्यात बसलो आहोत. आमची पाळी येण्याची वाट पाहात. अकरा वाजत आले, एवढ्यात तामीळनाडूचे कॉंग्रेस फॉर डेमॉक्रसीचे सिक्रेटरी, पंजाब राज्याचे खोब्रागडे रिपब्लिकन पक्षाचे सेक्रेटरी अशी महत्त्वाची राजकीय मंडळी येऊन थडकतात. साहजिकच आमची गाडी 'सायडिंगला' पडते. बाहेर आमच्यासारखेच अनेक अस्वस्थ आत्मे बसलेले आहेत. प्रत्येकजण आतला केव्हा एकदा बाहेर येतो असा भाव चेहऱ्यावर दर्शवीत आहे. तब्बल एक तासानंतर आमची वेळ येते. तो दयावान दरवान आम्हाला आत घेऊन जातो. मी माझी ओळख व येण्याचा उद्देश सांगतो. आपली धष्टपुष्ट गर्दन किंचित संमतिदर्शक झुकवून बाबूजी म्हणतात, 'पूछ लीजिये जो आप चाहते हैं दो मिनटमे. क्यों कि हमारे पास समय बहुतही कम है.' आता दोन मिनिटांत मुलाखत काय होणार कपाळ! मी आपली सरबत्ती सुरू करतो. बाबूजी नेहमीच्या संथ पण नेमक्या पद्धतीने हसतमुखाने उत्तरे देतात. उत्तरात पाल्हाळिकपणा नाही. काम उरकण्याची घाई; पण कटविण्याची भावना नाही.

**प्रश्न :** मंत्रिपदाबरोबरच कॉंग्रेस पक्षाचाही राजीनामा देण्याचा टोकाचा निर्णय घेण्याची वेळ आपणावर का आली?

**उत्तर :** राजीनाम्यानंतरच्या माझ्या पहिल्याच पत्रकार परिषदेत, त्यानंतर सभा-बैठकांतून मी याचे उत्तर अनेक वेळा दिले आहे. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळापासून कॉंग्रेसने पक्षांतर्गत व पक्षाबाहेरही लोकशाही निर्णयप्रक्रियेचे आश्वासन दिले होते. या ऐतिहासिक वचनास, प्रतिबद्धतेस काळिमा फासणारे वर्तन गेल्या दीड वर्षापासून नेतृत्वाचे होत होते. १९६९ पासून मी इंदिराजींच्या बरोबर राहिलो. कारण गांधीजींनी सुरू केलेल्या भारतीय राष्ट्रीय परंपरा पुढे चालविणाऱ्या धोरणांचा त्यांनी पुरस्कार केला होता. त्यानुसार कार्यक्रमही घोषित केला होता. कॉंग्रेसमध्ये संकुचित व्यक्तिगत स्वार्थ आणि व्यक्तिगत पुढारीगिरीस स्थान राहणार नाही, असे त्यांनी जाहीर केले होते, म्हणून मी व माझे सहकारी आत्तापर्यंत त्यांच्याबरोबर होतो. हरिजन, गिरिजन, आदिवासींचा जीवनस्तर उंचविण्याचा वायदा त्यांनी केला होता. सामाजिक विषमता दूर करण्याचे वचनही त्यांनी दिले होते.

पण १९७५ मध्ये आणीबाणी घोषित झाल्यानंतर दुर्दैवाने जनजीवनातील प्रामाणिकपणा, सभ्यता व शिष्टता यांच्यावर आघात करणाऱ्या आणि १९६९ मध्ये जाहीर झालेल्या कार्यक्रमांच्या विरुद्ध कार्यरत असणाऱ्या प्रवृत्ती बळावल्या. कॉंग्रेसअंतर्गत लोकशाहीचा पूर्णतया अस्त झाला आहे. कॉंग्रेस संघटनेच्या सर्व पातळ्यांवरील बेशिस्त केवळ सहन केली गेली. एवढेच नव्हे तर, त्या बेशिस्तीस उत्तेजन दिले गेले. समाजवादी विचारसरणीवर निष्ठा व आपल्या राज्यात पुरेसा प्रभाव असणाऱ्या मुख्यमंत्र्यांना, केवळ त्यांनी काही विशिष्ट बोलघेवड्या पुरोगाम्यांच्या हातातील कठपुतळी बाहुले बनण्याचे नाकारले म्हणून काढून टाकण्यात आले. अशा मुख्यमंत्र्यांच्या मागे राज्यातील कॉंग्रेसचे बहुमत किती आहे याचाही विचार केला गेला नाही. या मुख्यमंत्र्याना हाकलण्यासाठी अशा काही गुप्त हालचाली, प्रलोभने आणि धमक्यांचा वापर केला गेला. असे उदाहरण आजपर्यंतच्या कॉंग्रेसच्या इतिहासात कुठेही मिळत नाही.

अशा प्रकारे एक गट-त्यातही एका व्यक्तीच्या हाती सर्व सत्ता केंद्रित करण्याचा निंद्य प्रयत्न होत आहे. देशाचे सरकार आणि कॉंग्रेस संघटनेत हुकूमशाही प्रवृत्ती अत्यंत धोकादायक पद्धतीने डोके वर काढीत आहेत. अनेक महत्त्वाचे सरकारी निर्णय मंत्रिमंडळास न विचारता घेतले जात आहेत. ( Ministers are instructed, not consulted. ) सहकाऱ्यांशी सल्लामसलत न करता सरकारी निर्णय परस्पर घेण्याच्या या पद्धतीस लोकशाही कोण म्हणेल? सर्व स्तरांवरील कॉंग्रेस कार्यकर्त्यांस हे सारे मान्य आहे असे नाही. पण त्यांना विविध मार्गांनी दडपले, धमकावले जात आहे. त्यांची घुसमट करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यांनी चूप बसावे म्हणून त्यांना भयभीत केले जात आहे.

हा सारा कोंडमारा कोणताही स्वाभिमानी, लोकशाहीवादी कॉंग्रेसजन सहन करू शकणार नाही, म्हणून मला राजीनाम्याचा हा टोकाचा निर्णय घ्यावा लागला.

**प्रश्न :** आपण म्हणता तशी पक्षांतर्गत आणि सरकारमध्ये हुकूमशाहीची लक्षणे केव्हापासून दिसू लागली?

**उत्तर :** तसे पाहता अशी लक्षणे १९६९ नंतर काही दिवसांतच दिसू लागली होती. पण आणीबाणीनंतर हुकूमशाही प्रवृत्ती प्रकर्षाने उफाळून आल्या. आणीबाणी म्हणजे हुकुमशाही हे समीकरण पक्के व्हावे एवढा हुकूमशाही प्रवृत्तीचा कळस झाला होता. त्या सहन करणे केवळ अशक्य होते.

**प्रश्न :** राजीनाम्यासाठी आपण हीच वेळ का निवडलीत? या आधी तो का दिला नाही?

**उत्तर :** एक तर, लोकसभेच्या निवडणुकांची घोषणा झालेली असल्याने आणि कदाचित सबंध देशाने स्वीकृत केलेल्या धोरणात मुळापासून परिवर्तन करून गाडी उलट्या दिशेने नेण्याचे मनोरथ धुळीस मिळविण्यासाठी व राष्ट्रीय जीवनात पसरू पाहणाऱ्या बेकायदेशीरपणास आळा घालण्याची ही शेवटची संधी असेल. यावेळी लोकमताचे संशयातीत व स्वतंत्र प्रकटीकरण झाले पाहिजे. माझ्या राजीनाम्याने या प्रक्रियेस चालना मिळेल असे मला वाटते.

दुसरे, मी जर या आधी राजीनामा दिला असता, तर वृत्तपत्रांवरील निर्बंधांमुळे आणि प्रचार-साधनावरील सरकारी वर्चस्वामुळे, तसेच एकूणच भयाच्या वातावरणामुळे ते कुणालाही समजले नसते. मी तरी आज आहे तसा जनतेमधे राहिलो असतो की नाही कुणास ठाऊक. अयोग्य वेळी योग्य बोलणे वा योग्य कृती करणे हे शूरतेचे लक्षण नाही. राजकारणी माणूस हा आपल्या बोलण्यास वा कृतीस योग्य वेळेची वाट नेहमीच पाहत असतो. तशी मी योग्य वेळी माझ्या दृष्टीने योग्य कृती केली. मला वाटते, इंदिरा गांधीदेखील योग्य वेळीच योग्य ते बोलतात वा करतात!

प्रश्न : आपल्या राजीनाम्याचा येत्या निवडणुकांवर काय परिणाम होईल असे आपणास वाटते ?

उत्तर : निवडणुकांच्या दृश्य परिणामावर याचा काय परिणाम होईल हे आजच सांगणे कठीण आहे. निवडणुकांमध्ये आम्ही किती जागा जिंकू हे आजच कसे सांगणार ? पण निवडणुकांवर काय परिणाम होणार यापेक्षा सामान्य जनांवर आणि जनतेवर याचा काय परिणाम होईल हे मी अधिक महत्त्वाचे मानतो. मला असे वाटते, असा परिणाम झाला आहे. सबंध देशभर एक जनउद्रेक (Popular upsurge) झाला आहे. अनेक ठिकाणचे कार्यकर्ते काँग्रेस सोडून आम्हास येऊन मिळत आहेत. यांपैकी जवळ जवळ सर्वच कार्यकर्ते काँग्रेस संघटनेच्या विविध पातळ्यांवरील महत्त्वाच्या पदांवर आहेत. नेतृत्वाच्या दिशाभूल करणाऱ्या अपप्रचारास भीक न घालता अनेक काँग्रेस-आमदार-खासदार काँग्रेसचा राजीनामा देऊन आम्हाला येऊन मिळत आहेत. अनेक ठिकाणी आमच्या ओळखीचेही नसलेले लोक काँग्रेस फॉर डेमॉक्रसीची शाखा सुरू करून आम्हास कळवीत आहेत. आजपर्यंत मूक असलेला सर्वसामान्य माणूस आता निर्भयपणे बोलू लागला आहे. आता नक्कीच काही तरी नवे व इष्ट घडणार असा विश्वास जनतेस वाटू लागला आहे. सामान्य लोक आणि काँग्रेस-मधले सर्वसामान्य कार्यकर्ते माझ्याबरोबर यावेत अशी माझी अपेक्षा आहे. काँग्रेस नेतृत्वाबद्दल मला मुळीच अपेक्षा नाही. असे सामान्य काँग्रेस कार्यकर्ते माझ्याबरोबर आले आहेत हे तुम्ही पाहतच आहात. आणखी अनेक कार्यकर्ते येऊन आमची शक्ती वाढणार आहे, यात मला मुळीच शंका नाही.

हां, सत्ताधारी काँग्रेस मात्र या घटनेच्या परिणामांची जाणीव झाल्याने भयभीत झाल्याचे दिसत आहे. म्हणून तर आमच्या तत्त्वावर व धोरणांवर न बोलता आमच्याविरुद्ध व्यक्तिगत आरोप व निंदा-नालस्ती करण्यास त्यांनी सुरवात केली आहे. तात्त्विक, राजकीय दृष्ट्या आमच्याविरुद्ध बोलण्यासारखे त्यांच्याजवळ काहीच नसल्याने व्यक्तिगत पातळीवर बोलण्याशिवाय त्यांना गत्यंतरच नाही. मी मात्र कोणाहीविषयी व्यक्तिगत बोलणार नाही. कारण राजकारणात व्यक्तींपेक्षा त्यांची तत्त्वे आणि धोरणे अधिक महत्त्वाची असतात असे मला वाटते.

काँग्रेस व त्यांच्या नेतृत्वावर आणखी एक परिणाम झाल्याचे दिसत आहे. त्यांचा पवित्रा आता बचावात्मक झाला आहे. पूर्वीची आक्रमकता लुप्त झाली आहे. आपल्या पूर्वकृतींचे समर्थन करण्याचाच त्यांचा आटापिटा चालला आहे. त्यांचा हाच पवित्रा कायम राहील असे मला वाटते.

प्रश्न : आणीबाणीनंतर सरकारी कारभारातला संजय गांधींचा हस्तक्षेप वाढला होता हे खरे काय ?

उत्तर : मी संजय गांधींना स्वतंत्रपणे ओळखतच नाही. माझ्या दृष्टीने तो नगण्य आहे. इंदिराजींच्या संमतीशिवाय तो काहीही करू शकत नाही. प्रधानमंत्र्यांच्या संमतीशिवाय कोणताही सरकारबाहेरचा माणूस एखाद्या अधिकाऱ्यास हुकूम देऊच कसा शकेल ? तेव्हा संजय जे काही करतो त्याला इंदिराजींची पूर्ण संमती असते. दोघांत पूर्ण सामंजस्य आहे. इंदिराजींशिवाय संजयला काहीही अस्तित्व नाही.

प्रश्न : आत्ता आपण आणीबाणीला विरोध करीत आहात. पण आणीबाणीनंतरच्या संसदेच्या पहिल्या अधिवेशनात आणीबाणीचा ठराव आपणच मांडला होता. त्याचे समर्थनही केले होते. हे कसे ?

उत्तर : आणीबाणीचे समर्थन मी त्या वेळी केले होते हे खरे. कारण त्यावेळी देशात जी परिस्थिती होती त्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आणीबाणी आवश्यक होती असे माझे मत होते. आजही आहे. देशभर त्यावेळी गोंधळाची परिस्थिती होती. विद्यार्थी विद्या-पीठांत-कॉलेजांत जात नव्हते, कामगार संपांवर जास्त असल्याने उत्पादनात खीळ पडली होती. नित्य मोर्चे, निदर्शने चालल्याने सार्वजनिक जीवन अशांत झाले होते. सरकारी कार्यालयांमध्येही गोंधळ होता. त्यामुळे तेव्हा आणीबाणी योग्य होती म्हणून मी तिला पाठिंबा दिला. तो चूक होता, असे आजही मला वाटत नाही. पण आता, दीड वर्षानंतर सारे सुरळीत झाल्यावर आणीबाणी चालू ठेवण्याचे काय काय कारण आहे ? प्रधानमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात इथून पुढे आणीबाणी चालू ठेवण्याचे कारण नाही असे मी म्हटले आहे. माझे हे पत्र न वाचताच किंवा वाचले तरी त्याचा अर्थ समजून घेण्यास नकार देऊन जे त्याच त्याच प्रकारचा प्रचार कोणी करीत असतील त्याला मी काय करणार ? आणीबाणी चालू ठेवण्यास आता काहीही समर्थन उरलेले नाही, असे मी त्या पत्रात लिहिले आहे.

प्रश्न : महाराष्ट्रात आपल्या काँग्रेस फॉर डेमॉक्रसीची काय स्थिती आहे ?

उत्तर : अन्य राज्यांच्या मानाने आम्ही तेथे दुर्बल आहोत. कारण महाराष्ट्र काँग्रेसमध्ये आणि एकूणच तिथल्या राजकारणात मराठा जातीचे प्राबल्य राहिलेले आहे. आमच्याकडे लोक येणार काँग्रेस-मधून. त्या काँग्रेस संघटनेतलेच तिथल्या मराठा जातीचे वर्चस्व अजून कायम असल्याने आमची संघटना तेथे अजून नाही. नजिकच्या भविष्यात तेथे आमची अधिकृत शाखा सुरू करण्याचा आमचा विचारही नाही. पण ज्या जातीच्या गटाचे आज तिथल्या काँग्रेस-मध्ये प्राबल्य आहे त्या जातीतच अंतर्गत संघर्ष आज ना उद्या होईल. त्यावेळी त्यातला एक गट आमच्याकडे येईल. हा संघर्ष अटळ आहे. फक्त तो केव्हा होतो आणि निर्णायक होतो की नाही हाच प्रश्न आहे.

प्रश्न : काही वर्षांपूर्वी आपले इन्कम टॅक्सचे प्रकरण बरेच चर्चिले गेले होते. आताही त्याची चर्चा पुन्हा होण्याची लक्षणे दिसत आहेत. याविषयी आपण काही सांगू इच्छिता का ?

उत्तर : आज पुन्हा त्या प्रकरणाची चर्चा पुढे आणण्याचा प्रयत्न झाला, त्याचा उद्देश ऐन निवडणुकीच्या काळात माझी बदनामी करणे एवढाच आहे हे स्पष्ट आहे. या प्रकरणाचा निवडणूक प्रचा-रातही वापर केला जाण्याची शक्यता आहे. पण त्याविषयी माझी भूमिका स्वच्छ आहे. खरे तर या प्रकरणाचे स्पष्टीकरण स्वतः प्रधानमंत्र्यांनी त्याचवेळी लोकसभेत दिले होते. मी एवढे दिवस सरकारात होतो. माझी मिळकत सरकारी यंत्रणेस माहीत होती. असे असतही दहा वर्षांच्या काळात त्यांनी एकदाही माझ्यावर नोटीस

काढली नाही, हे कसे? तेव्हा यात प्रशासनाचा गलथानपणाच सिद्ध होतो. माझी त्यात काय चूक होती? मी कर भरण्यास नकार दिलेला नव्हता. करचुकवेपणा करण्याचा माझा मुळीच उद्देश नव्हता. मला वाटते माझे हे स्पष्टीकरणही त्यावेळी स्वीकृत होते. आता पुन्हा कोणी आपल्या भात्यात बाणच शिल्लक नसल्याने हे जुने 'प्रकरण' उकरून काढीत असतील, तर त्याला मी काय करणार? माझा जनतेवर पूर्ण विश्वास आहे. कोठल्याही अपप्रचारास जनता बळी पडणार नाही असा मला पूर्ण विश्वास आहे.

प्रश्न: जनता पक्षाशी आपले संबंध निवडणुकांनंतर कसे राहतील?

उत्तर: आता निवडणुकांच्या आधी आमचे जनता पक्षाशी पूर्णपणे चांगले, सहकार्याचे संबंध आहेत. आजच्याप्रमाणे निवडणुकीनंतरही हा सलोखा कायम राहील. सत्तेवर येवो वा न येवो, जनता पक्षाशी संपूर्ण सहकार्याची आमची भूमिका कायम राहील. ही दुतर्फा वाहतूक राहील. सर्व महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांवर आम्ही परस्परांत विचारविनिमय करून इष्ट ती भूमिका घेऊ, कार्यक्रम ठरवू.

दोन मिनिटांची वीस मिनिटे झाली होती. प्रश्नही काही खास उरले नव्हते. बाहेरच्या खोलीत वाट पाहणाऱ्यांच्या अस्वस्थ चेहऱ्यांचे स्मरण करून बाबूजींचा निरोप घेतला आणि बाहेर आलो. मुलाखत संपविल्यावर जाणवले, He does not want to open all his cards just now. प्रत्येक उक्ती वा कृतीस योग्य वेळेची वाट पाहण्याचा या माणसाचा पिंडच असावा." *

## श्री. सुरेंद्र मोहन

### सरचिटणीस, जनता पक्ष

प्रश्न: या निवडणुकांकडे आपण कोणत्या दृष्टिकोणातून पाहता?

उत्तर: माझे असे मत आहे की, इंदिराजींनी आणीबाणी घोषित केली याचे कारण केवळ स्वतःची, स्वतःच्या पक्षाची किंवा पक्षांतर्गत स्वतःच्या गटाची सत्ता त्यांना वाचवायची होती एवढेच नव्हते. गरिबांच्या शोषणावर आधारित असलेल्या आजच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेलाच ग्रामीण कष्टकऱ्यांच्या व कामगारवर्गाच्या संघटित शक्तीच्या रूपाने जे आव्हान निर्माण झाले होते, त्यापासून ही व्यवस्था वाचविण्यासाठी आणीबाणी पुकारण्यात आली. औद्योगिक मालाचे भाव आणीबाणीनंतरच्या पहिल्या काही दिवसांत कमी झाले, पण नंतर अत्यंत वेगाने ते वाढत गेले. त्या तुलनेने शेतमालाचे बाजारभाव कमी मोठ्या प्रमाणात झाले. पण ते भाव वाढले अगदी बेताने. खेड्यातील गरीब लोक अधिक गरीब झाले. आणीबाणीच्या या अठरा महिन्यांत भांडवलशहांना, उद्योगपतींना जेवढ्या सवलती मिळाल्या, तेवढ्या गेल्या २७ वर्षांत मिळाल्या नाहीत. म्हणून मला असे वाटते की, लोकशाहीचा अंत आणि शोषणमूलक अर्थव्यवस्थेस आलेली बळकटी या दोन घटनांवर येत्या निवडणुकीत जनतेस आपले मत नोंदवायचे आहे. यावेळी कोणत्या बाजूने जनता आपले मत नोंदवते त्यावर इथल्या गरीब जनतेची येणाऱ्या काळात प्रगती होणार की अधोगती, हे अवलंबून आहे.

प्रश्न: या निवडणुकीत महत्त्वाचे प्रश्न कोणते?

उत्तर: कामगार, आदिवासी, दलित व दुर्बल घटकांवर जे अन्याय–अत्याचार होत असतात त्याविरुद्ध आवाज उठविण्याचा व दाद मागण्याचा, त्याविरुद्ध संघटित होऊन न्यायाच्या स्थापनेसाठी लढण्याचा, त्यांचे घटनादत्त अधिकार त्यांना पुन्हा प्राप्त होणार की आजच्याप्रमाणे हिरावून घेतले जाणार; नाहीसे होणार हा या वेळचा महत्त्वाचा प्रश्न आहे.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न, या देशातले सर्व नागरिक समान राहणार की नाही, सत्ता खऱ्या अर्थाने जनतेच्या हाती राहणार की नाही, देशातील गरीब जनता गरीब असण्याबरोबरच गुलामही होणार का? भाषण व विचार स्वातंत्र्य त्यांना मिळणार हा आहे. तिसरा महत्त्वाचा प्रश्न देशात सरकारी यंत्रणेच्या दुरुपयोगाने आणि अन्य भ्रष्ट मार्गांनी एका कुटुंबाचे साम्राज्य प्रस्थापित होऊ दिले जाणार का हा आहे.

आज सर्व प्रतिगामी व जातीवादी शक्ती सत्ताधारी पक्षात एकत्र झाल्या आहेत. दुसऱ्या बाजूस विरोधी पक्षात जे लोक आहेत त्यांचा लोकशाही निष्ठांच्यामुळे धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि गांधीवाद यावर विश्वास दृढ आहे. स्पष्टपणे ग्रामीण नेतृत्व असलेला सबळ कृतिशील विरोधी पक्ष तयार होत आहे. या पक्षाच्या धोरणात शेतीविकासाला निःसंदिग्ध प्राथमिकता असेल, पूर्ण रोजगार हे त्याचे सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट असेल आणि किंमतीविषयीचे त्याचे स्वतःचे असे जनताभिमुख धोरण असेल, अशा या विरोधी पक्षाच्या हाती सत्ता देऊन औद्योगिक व कृषि क्षेत्रातली आजची विषमता (असंतुलन) दूर करण्याची व लोकशाहीची प्रतिष्ठापना करून चौखांबी राज्यकल्पनेच्या आधारे सामान्य जनतेच्या हाती सत्ता सुपूर्द करण्याची ही सर्वोत्तम संधी आहे.

प्रश्न: या निवडणुकांच्या निकालाविषयी आपला अंदाज काय?

उत्तर: आत्ताच निश्चित अंदाज व्यक्त करणे कठिण आहे. सर्वसामान्यपणे असे दिसते की, बेकारीमुळे त्रस्त झालेला तरुणवर्ग, किंमतीविषयक धोरणामुळे त्रस्त झालेली ग्रामीण जनता, निरंतर वाढत्या अन्याय–अत्याचारांची शिकार होत असलेले दलित व आदिवासी आणि इंदिरा गांधींच्या जादूतून मुक्त झालेल्या स्त्रिया हे सर्व वर्ग विरोधी पक्षास पाठिंबा देतील. व्यक्तिगत हुकूमशाहीमुळे सत्ताधारी पक्षात निर्माण झालेल्या घुसमटीचा स्फोट झाला आहे. परिणामी शेतकरी व दलित–आदिवासींचे देशभरचे नेते–कार्यकर्ते कॉंग्रेसचा त्याग करीत आहेत. येत्या निवडणुका ही लोकशाही व हुकुमशाही यांच्यातली पहिली लढाई आहे एवढेच त्यांचे महत्त्व नाही. त्याशिवाय काही बडे उद्योगपती अन्य हितसंबंधीय आणि गरीब जनता यांच्यातील सरळ संघर्ष असेही या निवडणुकांचे स्वरूप

आहे; असे मला वाटते. या संघर्षात लोकशाहीवादी पुरोगामी जनतेचा विजय होणार याबाबत मला तरी काही संशय नाही.

**प्रश्न :** या निवडणुकीत बहुमत मिळवून केंद्रस्थानी सरकार बनवण्यात जनता पक्ष यशस्वी होईल असे आपणास वाटते का ?

**उत्तर :** जनता पक्षाचे सर्व घटक पक्ष आणि प्रजातांत्रिक काँग्रेस हा नवा पक्ष हे सर्व मिळून लोकशाही आंदोलनाच्या प्रक्रियेत सर्व पातळ्यांवर जनसमर्थन प्राप्त असलेला एक नवा पक्ष स्थापन करण्यात यशस्वी होईल. हा पक्ष अन्यायाविरुद्ध संघर्षास बांधलेला असेल. जनता पक्ष या सर्व छोट्या मोठ्या पक्षांना एकत्र करून केंद्रस्थानी सरकार स्थापन करील, आणि प्रथमच केंद्रस्थानी काँग्रेसेतर पक्षांचे सरकार अस्तित्वात येईल याविषयी मला मुळीच शंका नाही.

**प्रश्न :** जनता पक्ष बहुमतात आला नाही तर त्याचा निवडणुकांनंतरचा कार्यक्रम काय असेल ?

**उत्तर :** जर जनता पक्ष बहुमतात आला नाही तर, नागरी हक्क व स्वातंत्र्ये आणि लोकशाही स्वातंत्र्य कायम राखण्यासाठी सर्व उपलब्ध शांतिमय मार्गांनी आंदोलन करणे हेच त्या पक्षाचे प्रमुख काम असेल. ग्रामीण गरीब जनतेचे या अर्थव्यवस्थेत होत असलेले शोषण आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध शोषित जनतेचे लढे संघटित केले जातील.

**प्रश्न :** मूलभूत अधिकारांच्या यादीतून संपत्तीचा अधिकार काढून टाकण्याचे आश्वासन जनता पक्षाने आपल्या निवडणूक-जाहीरनाम्यात दिले आहे. आजच्या राजकीय, सामाजिक वातावरणाशी याचा काय संदर्भ आहे ?

**उत्तर :** ज्या देशात सत्तर टक्के जनता गरिबीरेषेच्या खालचे जीवन जगते तेथे संपत्तीचा अधिकार मूलभूत अधिकार म्हणून ठेवणे सर्वथा अनुचित आहे. डॉ. आंबेडकरांसह घटना समितीच्या अनेक सदस्यांनी हा अधिकार मूलभूत अधिकारांच्या यादीत ठेवण्यास विरोध केला असताना तसा तो ठेवला गेला ही दुर्दैवाची गोष्ट आहे. १९५४ नंतर समाजवाद हे उद्दिष्ट घोषित करूनही काँग्रेसने मूलभूत हक्कांतून हा हक्क काढला नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे. संपत्तिशहांची ताकद वाढविणारा हा हक्क कायम ठेवून सामान्य माणसाच्या नागरी हक्कांवर मात्र सतत नवीन आक्रमणे चालू ठेवली. भारतासारख्या गरीब देशात संपत्तीच्या अधिकारापेक्षा काम करण्याचा अधिकार जास्त मूलभूत आहे. त्यांना काम करण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. कोणाचीही संपत्ती कायद्याने घालून दिलेल्या पद्धतीशिवाय काढून घेऊ नये हे आम्हाला मान्य आहे. पण त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की संपत्ती आणि उत्पन्न यांचे समताधारित मूलभूत पुनर्वितरण केल्याशिवाय हे लक्ष्य पुरे होणार नाही. आगामी दहा वर्षांत कमाल व किमान उत्पन्नाचे प्रमाण १·२० वरून १·१० वर आणणे एवढे उद्दिष्ट ठेवले तरी पुरेसे आहे.

**प्रश्न :** काँग्रेस पक्षच केवळ देशाला स्थिर सरकार देऊ शकेल असा प्रचार केला जात आहे याबद्दल आपले मत काय ?

**उत्तर :** हा प्रचार गेल्या निवडणुकांच्या वेळीही केला जात होता. पण प्रत्यक्षात गेल्या सहा-सात वर्षांचे राजकीय चित्र काय आहे ? केंद्रीय मंत्रिमंडळात पुनः पुन्हा केले जाणारे फेरबदल, राज्यांचे मुख्यमंत्री पुनः पुन्हा बदलले जाणे ही सारी सत्ताधारी पक्षाच्या राजकीय स्थैर्याची लक्षणे आहेत काय ? गेल्या सहा महिन्यांतील सरकारची आर्थिक धोरणातील धरसोड वृत्ती त्याच्या स्थिरतेची लक्षणे आहेत असे कोणीही म्हणणार नाही. रिझर्व्ह बँकेच्या कर्जपुरवठ्याच्या व पतपुरवठ्याच्या धोरणात दोन महिन्यांच्या अंतरात पडलेला परस्परविरोधी बदल ही धरसोड वृत्तीच दर्शविते. उद्योगधंद्यांना द्यायच्या सवलतींबाबतही हीच अनिश्चितता आहे. घटकेत उद्योगांना द्यायच्या सवलती बंद करण्याची सिंहगर्जना, तर घटकेत त्यांना उदारपणे आणखी नव्या सवलती, हे सरकारचे औद्योगिक धोरण आहे. राजकीय दृष्ट्या सत्ताधारी पक्ष, प्रत्येक राज्यात खालपासून वरपर्यंत उभा दुभंगलेला आहे. बाबूजींच्या राजीनाम्याने तर ही फूट आता अधिक तीव्र झाली आहे. याच्या नेमके उलट विरोधी पक्षांचे चित्र आहे. विविध विचारांचे राजकीय पक्ष एकत्र येऊन त्यांनी एकच पर्यायी पक्ष उभा केला आहे. हा पक्ष निवडणुकांनंतरही असाच अभंग राहणार आहे, कारण समाजपरिवर्तनास बांधिलकी मानून आखलेला एक विशिष्ट आर्थिक, राजकीय कार्यक्रम हा या पक्षाचा पाया आहे. सत्ताधारी पक्षाप्रमाणे केवळ खुर्चीसाठी एकत्र आलेल्यांचा हा मेळा नाही.

**प्रश्न :** प्रधानमंत्री हुकुमशहा आहेत असे आपण म्हणता, मग त्यांनी निवडणुका का घेतल्या ?

**उत्तर :** 'मी हुकुमशहा असते तर, निवडणुका कशाला घेतल्या असत्या' हा प्रश्न इंदिराजींनाही विचारला आहे. केवळ निवडणुका घेणे हे काही लोकशाहीवाद्याचे लक्षण नाही. मला तर असे वाटते की, आपली एकाधिकारशाही चालू ठेवण्यास कायद्याचे समर्थन मिळविणे व आपली घराण्याची राजवट चालू ठेवण्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या उद्देशाने त्यांनी निवडणुकांचा निर्णय घेतला आहे. पण निवडणुका घेण्याचा निर्णय घेताना त्यांनी चुकीचा हिशोब केला. त्यांना वाटले होते की एवढ्या थोड्या वेळात विरोधी पक्ष एकत्र येणार नाहीत, आपल्या पक्षांतर्गत दहशतवादाच्या धोरणामुळे काँग्रेस पक्ष एकजीव राहील, भय आणि दहशत यामुळे त्यांच्या दमनकारी धोरणांपुढे मान तुकवून जनता त्यांना मते देईल असे त्यांना वाटले. हा सारा हिशोब चुकल्याने त्या स्वतः आणि त्यांचा पक्ष अत्यंत नर्व्हस आणि डळमळीत झाले आहेत. अत्यंत घाणेरडी निवडणूक मोहीम, आणि अजूनही आणीबाणीपूर्व परिस्थिती निर्माण करण्यास नकार ही त्यांची लक्षणे आहेत. तेव्हा हे सारे पाहता कोण खरे स्थिर सरकार देऊ शकेल याचा निर्णय सुबुद्ध जनतेनेच करायचा आहे.

*

## श्री. पी. राममूर्ती

### (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष)

संसदीय राजकारणाच्या मर्यादा आम्हाला माहीत आहेत. म्हणूनच लोकशक्ती संघटित करण्यासाठी संसदीय राजकारणात मिळणाऱ्या संधीचा लाभ उठविण्याचे आमचे धोरण आहे. कामगार, किसान यांच्या वर्गीय संघटना बांधण्याचे काम हे मूळ काम समजून त्या कामास उठाव आणण्यासाठी संसदीय मार्ग आम्ही अवलंबितो. संसदीय क्षेत्रात असतानाही डाव्या लोकशाहीवादी शक्तींना एकत्र आणण्याचे आमचे धोरण असते. या डाव्या व लोकशाहीवादी शक्तींची ताकद कमी पडली म्हणून तर आणीबाणी आली. या अठरा महिन्यांच्या अनुभवाने डाव्या लोकशाहीवादी शक्तींनी एकत्र येण्याची आवश्यकता पुन्हा एकदा प्रकट झाली आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्वतःची अशी वेगळी तत्त्वविचारसरणी आहे. पण आज देशाच्या सार्वजनिक राजकीय जीवनातला सर्वांत महत्त्वाचा प्रश्न लोकशाही रक्षण हा आहे. गेले अठरा महिने इथल्या लोकशाहीवर जे सावट आले होते ते अजूनही पूर्णपणे गेलेले नाही. अशा परिस्थितीत काँग्रेसेतर पक्षांनी लोकशाही रक्षणाचा प्रश्न हाच आजचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न मानला पाहिजे. निवडणुकांच्या द्वारा जनतेच्या लोकशाही निष्ठा व्यक्त होत असतात. म्हणून या निवडणुकांत भाग घेण्याचे आम्ही ठरविले आहे.

या निवडणुकांद्वारा लोकशाही संकेतांची स्थापना झाली पाहिजे. हे संकेत एकदा प्रस्थापित झाले व त्यांनी टिकाऊ स्वरूप धारण केले की, त्यानंतर सर्वच पक्षांमधून देशाच्या राजकीय व आर्थिक विकास प्रक्रियेच्या परिणामी डाव्या शक्ती बाहेर फेकल्या जातील. त्या वेळी राजकीय व आर्थिक दृष्टिकोणातील साधर्म्यांच्या आधारे डाव्या पुरोगामी शक्तींचे ध्रुवीकरण सुरू होईल आणि या पायावर डाव्या लोकशाही शक्तींचे संघटन सुरू होईल. यासाठी तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आपले स्वतंत्र अस्तित्व कायम राखले आहे. तथापी विपक्षीयांत फूट पाडणे आम्हाला मान्य नाही. म्हणूनच आम्ही देशभर अन्य विपक्षीयांशी निवडणूक समझोता केला आहे. काहीही करून आजचे भीतीचे, लोकशाहीशून्य वातावरण नाहीसे केले पाहिजे.

**प्रश्न :** येत्या निवडणुकांच्या निकालाविषयी आपला अंदाज काय?

**उत्तर :** या निवडणुकांमध्ये 'रिगिंग'चा अवलंब मोठ्या प्रमाणावर झाला नाही (तसा तो आजपर्यंत झाला आहे) तर सबंध देशभर सत्ताधारी पक्षाचा पराभव होणे अटळ आहे. काही झाले तरी आजच्याइतके बहुमत त्यांना मिळणार नाही, ते बरेच कमी होईल. आज आहे इतके बहुमत जर त्यांना मिळाले, तर ते अधिक कठोर होतील, दमन करतील. पण जर अगदीच नाजुक बहुमत मिळाले तर, चित्र वेगळे असेल.

**प्रश्न :** दक्षिणेतले आजचे वातावरण कसे आहे ?

**उत्तर :** आणीबाणीची जी झळ सामान्य माणसांना लागली आहे ती सर्वत्र सारखीच असल्याने इतर भागांप्रमाणेच दक्षिणेतही विपक्षीयांना वातावरण अनुकूल आहे. तामिळनाडूत तर काँग्रेसला प्रखर व कडव्या विरोधास तोंड द्यावे लागेल. करुणानिधींच्या तथाकथित भ्रष्टाचाराविषयी चौकशी झाल्याने त्यांच्याविषयी जनतेचा भ्रमनिरास होऊन ती त्यांच्यामागे राहिली नाही, असा समज पसरविण्याचा प्रयत्न होत आहे. पण प्रत्यक्षात तसे काहीही नाही. करुणानिधींची लोकप्रियता अजिबात कमी झालेली नाही. त्यांना बदनाम करण्यासाठी रचला गेलेला हा डाव निष्फळ ठरला आहे. उलट या चौकशी प्रकरणामुळे त्यांच्याबद्दलची लोकांची सहानुभूती व आपुलकी जास्तच वाढली आहे !

**प्रश्न :** जगजीवनराम यांच्या राजीनाम्याविषयी आपणास काय वाटते ?

**उत्तर :** जगजीवनराम यांनी योग्य पाऊल योग्य वेळी उचलले आहे. हेच त्यांनी या आधी केले असते तर कुणालाही समजले नसते. कोणताही स्वाभिमानी माणूस काँग्रेस व मंत्रिमंडळांतर्गत कारभार ज्या पद्धतीने चालला आहे, ते सहन करणे शक्य नाही. त्यांच्या राजीनाम्याची कारणे काहीही असोत, एक अतिशय योग्य व शहाणपणाची कृती म्हणून त्यांचे स्वागत केले पाहिजे. त्यांच्या राजीनाम्यामुळे जनमनावर प्रचंड प्रभाव पडला आहे. आता काही तरी नवे आणि वेगळे घडेल, असे लोकांना वाटू लागले आहे. अगदी सामान्य माणूस त्यांच्या या कृतीमुळे प्रभावित व निर्भय झाला आहे. याचा परिणाम निवडणुकांवर झाल्याशिवाय कसा राहील ?

**प्रश्न :** गेल्या काही दिवसांत भारतीय राजकारणात आणि राजकीय पक्षात काही स्वागतार्ह बदल झाले आहेत. पण या साऱ्या बदलाच्या प्रक्रियेत वा राजकीय पक्षांच्या एकूणच कार्यात तरुणांची उपस्थिती कुठेच जाणवत नाही. निवडणुकीस उभे राहिलेल्या सर्व पक्षांच्या उमेदवारांत तरुण लोक फारच कमी आहेत. असे का ?

**उत्तर :** तुमचे हे निरीक्षण वस्तुस्थितीस धरून आहे हे मान्य. पण त्याची कारणे शोधली पाहिजेत. दोन कारणे संभवतात. (१) राजकीय पक्षांकडची तरुणांची आवकच कमी झाली असली पाहिजे. (२) ती आवक वाढूनसुद्धा नव्याने पक्षांमध्ये येणाऱ्या तरुणांना संसदीय निवडणुकांबद्दल आस्था नसली पाहिजे. किंवा तिसरे कारण पक्षांची प्रस्थापित नेतृत्वे तरुणांना संधीच देत नसली पाहिजेत.

माझ्या पक्षाबद्दल बोलायचे तर दुसरे कारण अधिक लागू पडते. आमच्या पक्षात येणारे तरुण कार्यकर्ते संसदेत जायला लाजतात. संसदेत जाणे हे अनुभवी लोकांचेच काम आहे, तिथे अननुभवी तरुणांचा काही उपयोग नाही, असे त्यांना वाटते. त्यामुळे आमच्या पक्षाकडे तरुण कार्यकर्त्यांनी निवडणुकांची तिकिटे मिळविण्यासाठी अर्जच केले नाहीत. अशा रीतीने काही जण बिचकतात तर काहींना लोकशक्ती संघटित करण्यासाठी संसदीय मार्गाचा पुरेपूर वापर करण्याच्या कामात रसच नसतो. त्यापेक्षा त्यांना पक्षाच्या संघटनात्मक कामात आणि वर्गीय संघटनांच्या कामात अधिक रस असतो.

खरे तर यावेळी आमच्यापैकी अनेकांना निवडणुकीस उभे राहण्याची इच्छा नव्हती.

काँग्रेसभोवती गोळा झालेले तरुण हे केवळ सत्ता व संपत्ती यांच्या आकर्षणाने गोळा झालेले असतात. त्यांना काही तात्त्विक बैठक वगैरे नसतेच. त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या / न मिळणाऱ्या संधींचा विचार करणे अप्रस्तुत आहे.

स्वातंत्र्यानंतर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत सर्व राजकीय पक्षांमधील तरुणांची भरती थांबली होती. कारण तोपर्यंत देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया चालू असल्याने निरनिराळ्या नोकऱ्यांच्या व उद्योगांच्या संधी उपलब्ध होत्या. त्यामुळे शिक्षण पुरे करून वा अर्धवट सोडूनही नोकऱ्या मिळविण्याकडेच सर्वांचा ओढा होता. तशा नोकऱ्या मिळतही होत्या. पण १९६० नंतर नोकरीच्या क्षेत्रातील वाटा बंद झाल्या. बेकारीची झळ अनेकांना बसू लागली. त्यामुळे राजकीय पक्षाकडे तरुणांचा कल वाढू लागला. पण त्यानंतर जी भर पक्षामध्ये पडली, त्या तरुणांमध्ये जे घडत आहे, त्याविषयीचा राग, संताप एवढीच भावना होती. हे असे का घडते, याचा खोलवर विचार करून मिळालेली समज नव्हती. ती आपोआप येत नाही. त्यासाठी पक्षाच्या नेतृत्वाने तरुण कार्यकर्त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते. असे प्रशिक्षित तरुण पुढे पक्षीय रचनेत चमकू शकतात, असा आमचा अनुभव आहे.

**प्रश्न :** उजवा कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्या एकत्रीकरणाची चर्चा मध्यंतरी चालली होती. सध्या ती मंदावलेली दिसते. निवडणुकांनंतर हे दोन्ही पक्ष एकत्र येण्याची शक्यता आहे काय ?

**उत्तर :** तुम्ही म्हणता तशी चर्चा बराच काळपर्यंत झाली हे खरे आहे. पण जोपर्यंत उजवा कम्युनिस्ट पक्ष आपले काँग्रेस पक्षाविषयीचे धोरण व विश्लेषण बदलीत नाही तोपर्यंत हे दोन्ही पक्ष एकत्र येणे शक्य नाही. निवडणुकांमध्ये कदाचित त्यांना चांगला धडा मिळेल. त्याच्या परिणामी त्यांना पुनर्विचार करावा, असे कदाचित वाटेल. पण तोपर्यंत फार उशीर झालेला असेल. त्या पक्षाचे अक्षरशः तुकडे झालेले असतील.

**प्रश्न :** पक्ष छिन्नविच्छिन्न झाला तरी व्यक्ती असतीलच. त्यातल्या काही व्यक्तींनी मार्क्सवादी पक्षात यायची इच्छा दर्शविल्यास काय धोरण राहील ?

**उत्तर :** ते त्या त्या व्यक्तीवर अवलंबून राहील. प्रत्येकाच्या कामाचे मूल्यांकन केले जाईल. कामातील कसब, एकनिष्ठा व सातत्य या कसोट्यांवर सर्वांना तपासले जाईल आणि त्यानंतर निर्णय घेण्यात येईल. तथापी असा काही घटनाक्रम भविष्यात येईल, असे मला आज तरी वाटत नाही.

## श्री. देवदत्त

### पत्रकार, 'पॉईंट ऑफ व्ह्यू' या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक

**प्रश्न :** देशातील आजचे राजकीय चित्र काय आहे असे आपणास वाटते ?

**उत्तर :** गेल्या २१३ वर्षांत आपण ज्या अनुभवातून गेलो त्यापासून आपण जरा मुक्त झालो आहोत, ही स्वागतार्ह घटना आहे. आजची परिस्थिती कायम राहणार का, ते सांगणे कठीण आहे. अठरा महिन्यांच्या भीती पर्वानंतर लोक आता पुन्हा रस्त्यांवर, बसेसमध्ये, हॉटेलात मोकळेपणाने राजकारणाविषयी बोलू लागले आहेत. पत्रकारही त्यांना हवे ते लिहू लागले आहेत. (की जे ते दीड वर्ष करू शकले नाहीत.) काँग्रेसतर पक्षांच्या सभा-बैठकांना तुडुंब गर्दी होऊ लागली आहे. लोक उत्सुकतेने त्यांची भाषणे ऐकत आहेत. या सर्व गोष्टींवरून लोकांची मनस्थिती समजते. लोकांच्या आजच्या मनस्थितीचे हे बाह्य प्रकटीकरण आहे. या साऱ्या अनुकूल परिस्थितीची परिणती निवडणुकांच्या निकालात कशी व कितपत होते, याविषयी आज तरी प्रत्येकाने आपला अंदाज बांधावा.

तथापी, गेल्या अठरा महिन्यांत जे काही घडले, त्याविषयीची पर्याप्त जाणीव लोकांमध्ये व नेतृत्वातही नाही, असे म्हणणे भाग आहे. नजिकच्या भूतकाळात जनतेला काय काय सहन करावे लागले, त्याचे महत्त्व लोकांच्या मनावर ठसविण्याची इच्छा, (conscious desire) विपक्षीय नेतृत्वात नाही. परिणामी लोकांच्या राजकीय जागृतीची पातळी समजणे कठीण आहे. आज निवडणुकांच्या निमित्ताने ज्या सवलती देण्यात आलेल्या आहेत, त्यांचे महत्त्व नक्की काय आहे, हे लोकांना जोखता येत नाही. निवडणुका घेण्याची व इमर्जन्सी सैल करण्याची घोषणा जेव्हा झाली, तेव्हा मी एका झाडूवाल्याचे काम करणाऱ्या इसमास विचारले, की या घटनेचा त्याला काय लाभ झाला ? त्यावर त्याने उत्तर दिले, बरं झालं, आता पाहिजे तेवढी मुले होण्याचे स्वातंत्र्य मला मिळाले. वरकरणी त्याचे हे उत्तर हास्यास्पद व त्याच्या राजकीय जाणीवेची कीव येण्याजोगे वाटेल. पण तसे ते नाही. त्याच्या दृष्टीने या घटनेचा अर्थ त्याला निवडस्वातंत्र्य मिळाले असा आहे. त्याच्या व्यक्तिगत जीवनात कोणाचाही बळजबरीचा हतस्क्षेप नसावा ही त्याची इच्छा. दिल्लीत आणीबाणीच्या काळात नसबंदीविषयी जी जबरदस्ती झाली तिच्याशीच त्याच्या दृष्टीने आणीबाणीचा संबंध असल्याने त्याची ही त्वरित प्रतिक्रिया झाली. त्याची राजकीय जाण बेताचीच असल्याने त्याची ही प्रतिक्रिया झाली. पण याचा अर्थ जनतेमध्ये सुप्त असंतोष आहे, हे सिद्ध होते. दुर्दैवाने विपक्षीय याचा लाभ पुरेसा घेत नाहीत.

माझा एक व्यक्तिगत अनुभव मी सांगतो. १८ जानेवारीला, ज्या दिवशी आणीबाणी शिथिल करण्याची घोषणा झाली त्या दिवशी मी फार दुःखी, कष्टी झाली होतो. कारण त्या दिवशी आता मला

अभिव्यक्तिस्वातंत्र्य मिळाले, पण ते दुसऱ्या कोणाच्या तरी देण्याने मिळाले आहे हे प्रकर्षाने जाणवले. मी मुक्तपणाने अभिव्यक्त व्हावे की नाही, याचा निर्णय मी नव्हे, तर अन्य कुणी तरी घेत आहे. यानंतर मी फक्त प्रतिक्रियात्मक वर्तन करीन या जाणीवेमुळे, अस्वस्थतेमुळे या संधीचा फायदा घ्यावा की नाही याविषयी मी द्विधा मनस्थितीत होतो. मी जर तो लाभ घ्यायचा ठरविला तर कसा आणि कोणत्या संदर्भात ? दुसऱ्या शब्दात सांगायचे तर मौन आणि अप्रतिबंधित स्वअभिव्यक्ती या दोहोंपैकी एक मला निवडायचे होते. पैकी दुसऱ्यासाठी मी तावडतोब तयार नव्हतो.

या शुद्ध व्यक्तिगत अनुभवाचे सामान्यीकरण करायचे झाले तर असे म्हणता येईल; अशा प्रकारे नळ बंद करणे व सुरू करणे जिथे शक्य नाही अशी राजकीय–सामाजिक व्यवस्था आपल्याला आणायची आहे. या व्यवस्थेत व्यक्तिमात्राचा अभिक्रम सुरक्षित राखला जाईल.

**प्रश्न :** ही सर्व परिस्थिती ध्यानात ठेवून येणाऱ्या निवडणुकांकडे आपण कसे पाहता ?

**उत्तर :** येत्या (वा अन्य कोठल्याही) निवडणुकांचा मी जेव्हा विचार करतो तेव्हा मी स्वतःस असा प्रश्न विचारतो की, या निवडणुका या दिशेने एखादे पाऊल पुढे नेणाऱ्या आहेत का ? या प्रश्नाचे उत्तर आज ठाम होकारार्थी नसले तरी त्यांची मदत या दिशेने जाण्यास झाली पाहिजे, असे मला वाटते. मात्र आज घडीला मला त्यांच्याविषयी फारशी आशा नाही. तरी सुद्धा या निवडणुकांना मी पाठिंबा देतो, कारण आहे यापेक्षा अधिक निरोगी संसदीय प्रणाली स्थापित करण्यासाठी त्यांचा लाभ घेता येईल, असे मला वाटते. बराच काळ हाती सत्ता राहिल्याने सत्तेचा दुरुपयोग करणाऱ्या पक्षाची सत्ता कमी होऊन तिचे थोडेसे जरी विकीरण (Diffusion) झाले तरी या निवडणुका त्या दिशेने जात आहेत असे म्हणता येईल.

सत्ताधारी पक्ष आज ज्या सावधपणाने, संरक्षणात्मक पद्धतीने बोलत आहे, त्यावरून साऱ्या राजकीय घडामोडींमध्ये जनता हा महत्त्वाचा घटक आहे, हे त्यांना समजल्याचे द्योतक आहे.

'विद्यमान व्यवस्था, घटनाक्रम मला बदलता येतो, आम्ही ते बदलू शकतो' असा आत्मविश्वास लोकांमध्ये निर्माण झाला तरी या निवडणुका सार्थकी लागल्या असे मी म्हणेन. पण दुर्दैवाने विपक्षीयांचा प्रचार या पद्धतीने होत नाही. ते फार मोघम बोलत आहेत.

**प्रश्न :** विपक्षीयांनी कशी मांडणी करावी असे आपणास वाटते ?

**उत्तर :** यासाठी प्रथम सत्ताधाऱ्यांच्या आजपर्यंतच्या प्रचाराचे सूत्र व मर्म काय आहे, ते आठवावे लागेल. गेल्या काही दिवसांत, 'उपचारात्मक' लोकशाहीपेक्षा देशाचे ऐक्य महत्त्वाचे आहे, असा प्रचार करण्यात येत आहे. हा एक अत्यंत फसवा प्रचार आहे. या प्रचारास जबाब दिला पाहिजे. लोकशाही आणि एकता या दोहोंमध्ये परस्पर विसंगती अजिबात नाही. लोकशाहीमुळे ऐक्य अधिक बळकट होते, हे जनतेच्या मनावर ठसवावे लागेल. लोकशाही व ऐक्य या दोन्ही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या व आवश्यक आहेत. या दोहोंत फरक करण्याचा प्रयत्न म्हणजे अधिकारवादी प्रवृत्ती बळकट करण्याचा प्रयत्न करणे आहे, हे जनतेस पटवून द्यावे लागेल. लोकशाही समाजव्यवस्थेतच ऐक्य कायम राहते. अगदी नव्या घटनेने सुद्धा हे मान्य केले आहे. लोकशाही नसतानाचे ऐक्य हे केवळ दिखाऊ आणि क्षणभंगुर असते.

दुसरा एक गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला जात आहे, तो म्हणजे लोकशाही आणि समृद्धी या गोष्टी विकसनशील देशात एकत्र जाऊ शकत नाहीत. अशा देशात समृद्धी ही अधिक महत्त्वाची असते. ती समृद्धी मिळविण्यासाठी लोकशाही थोडा काळ बाजूस ठेवावी लागली तरी चालेल. या प्रचारासही पायबंद घालावा लागेल. कोठल्याही विकसनशील देशाची समृद्धी ही लोकशाही समाजव्यवस्थेतच होऊ शकते. जेथे लोकशाही नाही तेथे समृद्धी दिसते "ती मूठभरांची असते, सर्वसामान्यांची नव्हे. सर्वांना विकासाची, समृद्धीची समान संधी ही लोकशाहीतच मिळणे शक्य असते. म्हणून लोकशाही की समृद्धी हा प्रश्न खोटा, दिशाभूल करणारा आहे. आम्हाला दोन्ही हवे आहे, असे त्याचे उत्तर ठणकावून द्यावे लागेल. हे जनतेच्या मनावर बिंबवावे लागेल.

हे सारे जनतेच्या मनावर बिंबविण्यासाठी येत्या निवडणुकांमुळे संधी मिळाली आहे, असे मला वाटते.

**प्रश्न :** या घडीला राष्ट्रीय महत्त्वाचे प्रश्न कोणते आहेत, असे आपणास वाटते ?

**उत्तर :** प्रशासन आणि सत्ताधारी पक्ष हे एकमेकांशी पूर्णपणे समरस झाल्याचे चित्र आज दिसत आहे. हे दोन्ही एकच आहेत, असा भास होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या स्वरूपात व वर्तनात गुणात्मक फरक झाला आहे. राष्ट्रीय उद्दिष्टांशी प्रशासनाने इमान राखले पाहिजे. बांधिलकी मानली पाहिजे. अशी अपेक्षा धरणे रास्त आहे. पण याचा अर्थ ते, सत्ताधारी पक्षाच्या विशिष्ट राजकीय धोरणांशी वा तत्कालीन विचारपद्धतीशीही एकरूप झाले पाहिजेत, असा होत नाही. आज असे घडल्याचे दिसत आहे. सरकारला अनुकूल असे राजकीयीकरण (politicisation) प्रशासनाचे झाले आहे. याचा विरोध केला पाहिजे.

आजचा दुसरा महत्त्वाचा प्रश्न गेल्या काही दिवसांत झालेले जनतेचे बिनराजकीयीकरण (de–politicalisation). राजकारण हा तुमचा प्रांत नव्हे, तुम्ही राजकीय प्रश्नांचा विचार करू नका. असे सामान्य जनांना सांगण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही प्रक्रिया थांबविली पाहिजे. लोकांचे पुनः राजकीय प्रशिक्षण केले पाहिजे. या राजकीय प्रशिक्षणाचा संदर्भ येत्या निवडणुकांशी नसून, दूरवरच्या राजकारणासाठीही हे आवश्यक आहे. सामान्य माणसांच्या जीवनातून राजकारणाची हकालपट्टी करणे, हे हुकुमशाहीस साहाय्यभूत होत असते.

तिसरी महत्त्वाची गोष्ट, राजकारणाची काही महत्त्वाची अंगे आज विसरली गेल्यासारखी दिसत आहेत. उदा., दलित दुर्बल घटकांच्या आर्थिक मागण्या–जाहीरनाम्यात उल्लेख असला तरी प्रत्यक्षात, ग्रामीण व शहरी बेकारीचा प्रश्न, भाववाढीचा सामान्य माणसांच्या जीवनावर होणारा परिणाम यांविषयी गंभीरपणे, ठोसपणे कोणी बोलत असल्याचे दिसत नाही. राजकारणात जनसामा-

त्यांच्या या आर्थिक प्रश्नांवर पुरेसा भर दिल्याशिवाय ते राजकारण ग्रामीण गरीब जनतेपर्यंत जाणार कसे ? हा आर्थिक पैलू राजकीय चर्चांमध्ये पुन्हा कसा आणायचा हा प्रश्न आहे. माझ्या दृष्टीने आजचे महत्त्वाचे राष्ट्रीय प्रश्न थोडक्यात असे आहेत. हे प्रश्न जनतेने जनता पक्षासमोर ठेवले पाहिजेत. जनता पक्षानेही स्वतःस हे प्रश्न विचारून त्याची ठोस उत्तरे दिली पाहिजेत.

आजच्या राजकीय–सामाजिक व्यवस्थेच्या जागी पर्यायी बलवान व्यवस्था उभी करणे, हेही एक महत्त्वाचे काम आहे. गेल्या अठरा महिन्यांच्या अनुभवाने शिकविले आहे की, आजची व्यवस्था 'लोकशाही' पद्धतीने व मार्गानेच सामान्यजनांना त्यांचे लोकशाही अधिकार नाकारू शकते. या अपप्रवृत्तीस पायबंद घालायचा तर राज्यसंस्थेबाहेर समांतर सत्ता-केंद्रे निर्माण करावी लागतील. गेल्या काही वर्षांमध्ये लोकांच्या दैनंदिन जीवनात राज्यसंस्थेचे वाढते आक्रमण होत आहे. हे आक्रमण रोखायचे असेल तर, अशी समांतर सत्ता-केंद्रे उभी करणे अत्यंत आवश्यक आहे. यालाच मी, मूळ पक्षास समांतर असा पर्यायी पक्ष असे म्हणेन.

**प्रश्न :** या निवडणुकीत कोणते महत्त्वाचे प्रश्न तडीस लागायचे आहेत, असे आपणास वाटते ?

**उत्तर :** या निवडणुकीत लोकशाही विरुद्ध हुकूमशाही असा झगडा आहे असे म्हणणे म्हणजे प्रश्न अधिक सोपा व साधा करणे होईल. माझ्या मते प्रश्न यापेक्षा खोलवर व अधिक महत्त्वाचे आहेत. मुक्त समाज आणि बंधनयुक्त समाज यांच्यात निवड करायची आहे. (Open Society and Closing Society) स्पर्धात्मक राजकारण आणि स्पर्धाहीन राजकारण यांपैकी जनतेस काय हवे, याचा निकाल लागायचा आहे.

**प्रश्न :** स्पर्धात्मक राजकारण म्हणजे काय ?

**उत्तर :** महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांवर काही निश्चित नैतिक मूल्यांना आधारभूत मानून खुलेपणाने चर्चा होणे. विचारांची देवाण-घेवाण करण्याची संधी, एकमेकांच्या विचार-कल्पनांची मुक्त देवाण-घेवाण, सर्वसामान्य माणसांना स्वतःच्या गुणकर्तृत्वाच्या जोरावर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील नेतृत्वासाठी स्पर्धा करण्याची पूर्ण संधी, ही सारी स्पर्धात्मक राजकारणाची लक्षणे होत.

स्पर्धाहीन राजकारणात यापैकी काहीही नसते. त्या जागी घराण्यांच्या वारसांचे राजकारण येते. या स्पर्धाहीन राजकारणात आणि सरंजामशाहीत काहीही फरक नाही.

**प्रश्न :** येत्या निवडणुकांसंबंधी आपला अंदाज काय आहे ?

**उत्तर :** आजच काही अंदाज व्यक्त करणे फार घाईचे होईल. तथापी काही अनपेक्षित घटना घडल्या नाहीत, सर्व व्यवस्थित पार पडले तर सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांच्या रूपाने प्रतिबिंबित झालेल्या राजकीय शक्तींमधील ऐतिहासिक असंतुलन कमी होईल असे मला वाटते. अधिक मोठ्या व महत्त्वाच्या प्रश्नांवर विरोधी पक्षांनी आपली प्रचार मोहीम आधारित केली तर त्यांना लोकांचा अधिक विश्वास प्राप्त होईल. जनता पक्षास लोकशाही कार्यपद्धतीस अनुकूल परिस्थिती निर्माण करणारी एक शक्ती म्हणून जनतेपुढे येण्याची एक चांगली संधी आहे. एवढे झाले तरी 'तेही नसे थोडके'. प्रशासनास सुधारण्याच्या दृष्टीने ते साहाय्यभूत होईल.

**प्रश्न :** आज आहे या परिस्थितीत विपक्षीयांनी काय करावे असे असे आपणास वाटते ?

**उत्तर :** संसदीय राजकारणाविषयी मी नेहमीच निरुत्साही राहिलो आहे. मला बिगर–संसदीय राजकारण अधिक महत्त्वाचे व आवश्यक वाटते. संसदीय राजकारणाच्याच चौकटीत काम करणारे आजचे पक्ष त्यांच्या मूळ कार्यपद्धतीत काही मूलभूत फरक करतील, असे मला वाटत नाही. तरी देखील (१) जनतेचे योग्य दिशेने व पद्धतीने राजकीय शिक्षण करणे, व (२) त्यांचे जनतेशी संपर्क पुनर्स्थापित करण्यासाठी मिळालेल्या संधीचा पुरेपूर लाभ घेणे, या दोन कामांत त्यांनी आपली शक्ती लावली पाहिजे, असे मला वाटते.

शहरी व ग्रामीण तरुणांच्या बेकारीसारख्या महत्त्वाच्या मूलभूत समस्यांच्या बाबतीत ठोस अशा सूचना अधिक जोर देऊन त्यांनी केल्या पाहिजेत. संसदीय राजकारणाच्या चौकटीत काही एक नैतिक सहमती (Consensus) निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा. राजकीय व नैतिक जाण नष्ट झाल्याच्या परिणामीच आणीबाणी आली हे विसरता कामा नये.

राजकीय शक्तींच्या विभाजनाच्या प्रश्नावरही काही तोड त्यांना काढावी लागेल.

आजपर्यंत त्यांनी दुर्लक्षिलेले, ग्रामीण जनतेशी संपर्क प्रस्थापित करण्याचे काम त्यांना आता अधिक जोराने करावे लागेल. त्यासाठी प्रत्यक्ष कृतीचा कार्यक्रम त्यांना आखावा लागेल.

**प्रश्न :** निवडणुकांवर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकायला हवा होता असे बरेच सामान्य लोकही म्हणताना ऐकू येते. आपले याविषयी काय मत आहे ?

**उत्तर :** ज्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या निवडणुका होत आहेत तिचा विचार करता या निवडणुकांमध्ये भाग न घेणे हे उचित ठरले असते. पण केवळ निवडणुकांपासून अलिप्त राहण्याने भागणार नाही. त्याचबरोबर विपक्षीयांना अभिप्रेत असलेल्या राजकीय–सामाजिक व्यवस्थेचा स्पष्ट आराखडा डोळ्यांसमोर ठेवून त्यानुसार काही ठोस कार्यक्रम आखला असता, तर तीच कृती सर्वोत्तम ठरली असती. पण ते झाले नाही. शेवटी राजकारण ही शक्याशक्यतेची कला असते. आजच्या वस्तुनिष्ठ परिस्थितीत जे शक्य होते ते विपक्षीयांनी ठरविले आहे. आता, लोकांची राजकीय जाण वाढविण्याची, अधिक खोल करण्याची संधी म्हणून निवडणुकांत सहभागी होण्याच्या त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले पाहिजे.

**प्रश्न :** निवडणुकांनंतरचे देशातील राजकीय चित्र कसे असेल असे आपणास वाटते ?

**उत्तर :** निवडणुकांचे निकाल काय लागतात आणि निवडणुकांनंतरचे शक्तींचे संतुलन काय असेल यावर ते चित्र अवलंबून राहील. कोणत्याही बाजूने अतिरिक्त असंतुलन झाल्यास देशावर त्याचे गंभीर परिणाम होतील. आजचे असंतुलन दुरुस्त करण्यासाठी प्रयत्न झाले तर तेवढेच आज पुरेसे आहे. आजचा झगडा हा 'रेस्टोरेशन'चा झगडा आहे. *

## श्री. सुंदरसिंग भंडारी

**राज्यसभा सदस्य, जनता पक्ष**

**प्रश्न** : आणीबाणीनंतर सुमारे एक वर्षभर आपण दिल्लीच्या तुरुंगात मिसाखाली स्थानबद्ध होता. या कारावासाच्या काळाविषयी आपण काही सांगू शकाल का ?

**उत्तर** : या वेळी जेलमध्ये विभिन्न विचारसरणीचे लोक एकत्र होते. प्रत्येकाचे स्वतःचे असे तत्त्वज्ञान होते, सरकारविषयी स्वतःचे विश्लेषण होते. पण आजच्या सरकारचा सर्वांना आलेला अनुभव एकच होता. तो म्हणजे याच सरकारच्या 'कृपेने' सर्वजण तुरुंगात आले होते. वर्षभरापेक्षा अधिक काळ सर्वजण एकत्र राहिल्याने आपसात अनौपचारिकपणे, जिव्हाळ्याने विचारांची देवाण-घेवाण करता आली. परस्परांविषयी प्रत्येकाच्या डोक्यात काही गैरसमज होते, ते प्रत्यक्ष चर्चा-अनुभवाने दूर करता आले. परस्परांविषयी कर्णोपकर्णी ऐकलेल्या समज गैरसमजांचे निराकरण करता आले. अशा तऱ्हेने जनता पक्षाच्या स्थापनेविषयी एकमत तुरुंगातच बनले होते. जेलवास हा जनता पक्षाच्या स्थापनेसाठी मदतकार झाला. अर्थात आम्ही सगळे तुरुंगात गेलो नसतो तरी तो झालाच असता. कारण ७१ सालच्या निवडणुकांनंतर सर्व विरोधी पक्षांना काँग्रेस-विरोधी शक्ती फार काळपर्यंत विखुरलेली राहिलेली चालणार नाही, याची प्रकर्षाने जाणीव झाली होती. त्यामुळेच सर्वांनी एकत्र येऊन एकच पर्यायी पक्ष स्थापन करण्याविषयीची चर्चा तीन वर्षांपासून चालली आहे. पण ती सारी चर्चा औपचारिकच राहिली होती. इथे जेलमध्ये परस्परांत नजीकच्या सहवासामुळे मानवी संबंध प्रस्थापित झाले. त्यामुळे एकीकरणाच्या प्रक्रियेस आवश्यक अशी जिवंत नाती एकमेकांत निर्माण झाली. या तुरुंगवासातील चर्चा-अनुभवांवरून एक गोष्ट समजली की, एकत्रीकरणात अन्य काही अडचणींपेक्षा मानसिक अडचणीच अधिक होत्या. काही प्रमाणात त्या अजूनही आहेत. पण परिस्थितीच्या रेटयाने तेही अडथळे दूर होतील. अर्थात हे सारे मतभेद पहिल्या दिवसापासूनच नष्ट झाले असे नाही. रा. स्व. संघाचा मुस्लीमविषयक दृष्टिकोन या विषयावर जनसंघीयांना खूप प्रश्न विचारले जात. जनसंघाचे लोक त्यावर संघ हिंदूसाठी असला तरी जनसंघ सर्वांसाठी आहे. जनसंघ मुस्लिम काय, भारतात राहणाऱ्या कोणत्याही जाती-धर्माच्या माणसाच्या बाबतीत सारखाच विचार करतो, असे सांगत असत. जनसंघास भारतीय संस्कृतीचा जरूर अभिमान आहे. पण भारतीय संस्कृती म्हणजे हिंदू संस्कृती असा त्याचा अर्थ नाही. सुरुवातीस हे म्हणणे इतरांना पटत नसे. कारण पूर्वग्रह. पण पुढे परस्परांविषयीचा विश्वास वाढू लागला; तसतसे गैरसमजही गळून पडू लागले.

मला असे वाटते की, अत्यंत प्रयासाने प्राप्त केलेली ही एकता इथून पुढेही कायम टिकविण्याचा निर्धार सर्वांनी केला पाहिजे. कारण इथून पुढच्या राजकारणात सर्व विरोधकांचे एकी हेच बळ राहणार आहे.

**प्रश्न** : प्रधानमंत्र्यांनी निवडणुका जाहीर केल्या. वास्तविक हे संपूर्ण वर्ष निवडणुका न घेता त्यांना सत्तेवर राहता आले असते. तसे करण्याचे सोडून त्यांनी निवडणुकांचा धोका का पत्करला ?

**उत्तर** : माझ्या मते, गेल्या काही दिवसांपासून इंदिराजींची परिस्थितीवरील पकड ढिली झाली होती. घोड्यावर पक्की मांड ठेवून बसणे त्यांना अशक्य झाले होते. वर्षभराच्या दडपशाहीनंतर जनतेत असंतोष पसरलेला होता. गेल्या चार-सहा महिन्यांत तो असंतोष प्रकटही होऊ लागला होता. त्याला आवाज फुटला होता. या व्होकल झालेल्या असंतोषापासूनच विरोधकांशी बोलणी करण्याची मागणी पुढे आली. ती मागणी चहूबाजूंनी होऊ लागली होती. पण बाईंना ती मागणी मान्य करणे गैरसोयीचे होते. कारण वाटाघाटीच्या टेबलाभोवती बसल्यावर अनेक गोष्टी अशा निघाल्या असत्या की, त्यामुळे त्यांची परिस्थिती फार अवघड झाली असती. त्यामुळे वाटाघाटीची मागणी मान्य करणे शक्य नव्हते. बरे, परिस्थितीचे दडपण एवढे वाढले होते की, काही न करता गप्प बसणेही अशक्य होते. अशा परिस्थितीत कमी धोक्याची गोष्ट ( lesser evil ) म्हणून त्यांनी निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला असे मला वाटते. त्यांच्या मते वाटाघाटी आणि निवडणुका यांच्यात निवडणुका त्यांना lesser evil वाटल्या.

**प्रश्न** : निवडणुकीविषयी आपले अंदाज काय आहेत ?

**उत्तर** : या निवडणुका म्हणजे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील विषम लढाई आहे. निवडणुकांसाठी तयारी करण्यास आम्हाला पुरेसा वेळ मिळाला नाही. जनता पक्ष स्थापनेच्या औपचारिक प्रक्रिया घटक पक्षांमध्ये पुऱ्या करायलाही वेळ मिळाला नाही. अर्थात त्यामुळे जनता पक्ष बनण्याचा राहिलेला नाही. पण आज देशात, जे एकूण वातावरण आहे ते आम्हाला अनुकूल आहे. ते तसेच राहिले तर दोघांनाही सारखीच संधी ( Equal chances ) आहे असे मी म्हणेन.

तथापि सत्ताधारी नेतृत्वाच्या आजच्या प्रचाराच्या युक्त्या, तसेच दहशत याचा परिणाम अजिबात होणार नाही, असे नाही. आणीबाणी ढिली केल्यामुळे किंमती पुन्हा वाढल्या, बेशिस्त पुन्हा निर्माण झाली, असा प्रचार केला जात आहे. विरोधी पक्षीय तुरुंगातून बाहेर येऊन त्यांनी हे सारे केले काय ? पण हा सारा अपप्रचार लोकांच्या मनातील भीती कायम ठेवण्यासाठी केला जात आहे. आणीबाणी चालू ठेवण्याची कृती योग्य आहे असे भासविणारी वक्तव्ये एकीकडे केली जात आहेत, तर दुसरीकडे आणीबाणीविषयीच्या प्रत्यक्ष सरळ प्रश्नावर आणीबाणी जास्त दिवस राहणार नाही अशी उत्तरे दिली जात आहेत. सूट दिल्याने बेशिस्त आली असे म्हणून सूट दिली हा जणू काही उपकारच केला आहे साऱ्या देशावर, असे भासविले जात आहे.

पण लोकांना आता या प्रचारातला खोटेपणा कळून चुकला आहे. त्यांच्या सर्व युक्त्या-प्रयुक्त्या विपरीत परिणाम घडवून आणीत आहेत. त्यामुळे येत्या निवडणुकांत बहुमत मिळविण्याची त्यांची संधी आता संपली आहे.

प्रश्न : तुमच्या या विश्लेषणावरून जनता पक्ष सत्तेवर येईल असा तुम्हाला विश्वास असल्याचे दिसते. तसा तो सत्तेवर आला तर जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांवर आधारित कार्यक्रम अमलात आणण्याचे नैतिक कर्तव्य त्यांच्यावर येऊन पडेल. पण जर तो पक्ष सत्तेवर नाही आला तर ?

उत्तर : जर आम्ही सत्तेवर आलो नाही तर अन्य सर्व लोकशाहीवादी शक्तींच्या साहाय्याने लोकशाही हक्कांसाठी, नागरी हक्कांसाठी झगडत राहू. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य, संघटनस्वातंत्र्य, विचार व विरोध स्वातंत्र्य यासाठी संघटित लढे उभे करण्याचे काम करू. आज अर्थव्यवस्थेत विशेषतः किंमतपातळीवर जो परिणाम दिसतो तो कृत्रिम आहे. म्हणजे आज किंमती ज्या काही खाली आलेल्या आहेत, त्या आणीबाणीमुळे निर्माण झालेल्या भीतीमुळे, दडपणामुळे आहेत. आणीबाणीनंतर आर्थिक धोरणात काहीच बदल झालेला नसल्याने जोपर्यंत दहशत तोपर्यंत हे चित्र राहील. म्हणजेच आजची अर्थव्यवस्था 'फोर्स्ड इकॉनॉमी' आहे.

हे दडपण दूर करून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती नेहमीच सर्वसामान्यांच्या आवाक्यातल्या निसर्गतः राहतील, असे लोकशाही जनआंदोलन आम्ही संघटित करण्याचा प्रयत्न करू.

प्रश्न : या निवडणुकांत मुख्य प्रश्न कोणते आहेत असे आपणास वाटते ?

उत्तर : या वेळचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न गेल्या अठरा महिन्यांच्या इतिहासाची पुनरावृत्ती कशी टाळायची हा आहे. जनतेला स्वहितासाठी हा इतिहास टाळायचा आहे. देशातले लोकशाही संस्थांचे कामकाज कोणत्याही अडथळ्यांशिवाय चालले पाहिजे. सर्वसामान्य नागरिकास त्याचा राजकीय, सामाजिक व आर्थिक विकास करण्याचा समान हक्क मिळविण्यासाठी लढावे लागणार आहे. या चारी क्षेत्रांतल्या प्रत्येकाच्या स्वातंत्र्याचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. माझ्या मते हे सारे महत्त्वाचे प्रश्न या निवडणुकांमध्ये तडीस लागणार आहेत.

प्रश्न : जनता पक्षाच्या जाहीरनाम्यात संपत्तीचा अधिकार मूलभूत हक्कांच्या यादीतून काढून टाकायचे आश्वासन दिले आहे. याचे महत्त्व काय ? या आश्वासनाची सामान्य माणसावर काय प्रतिक्रिया होईल ?

उत्तर : भारतीय घटनेतील संपत्तीच्या मूलभूत अधिकाराचा गैरफायदा अनेकजण उठवितात. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाच्या मार्गातील हा एक अडथळा होऊन बसला आहे. उदा. जमीनदारी निर्मूलन कायदा. हा कायदा होऊन इतकी वर्षे झाली तरी अजून त्याची प्रत्यक्षात परिणामकारी अंमलबजावणी झालेली नाही. कारण घटनेतील या मूलभूत अधिकारांची सबब पुढे करून या कायद्याविरुद्ध अनेक अपीले कोर्टामध्ये अजून पडून आहेत. विविध राज्यांत यासंबंधी बड्या जमीनदारांनी केलेल्या अपिलांचे खटले अजून चालू आहेत. त्यामुळे या कायद्याची अंमलबजावणी अशक्य होऊन बसली आहे. ही परिस्थिती मालमत्तेचा अधिकार घटनेच्या मूलभूत हक्कांमध्ये घातल्याने निर्माण झाली. आम्ही तो मूलभूत हक्कांच्या यादीतून काढून टाकणार आहोत. पण सामान्य कायद्याने दिलेला एक हक्क ( common law right ) म्हणून तो राहील. तसा तो ठेवला नसता तर लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असती. कारण मालमत्ता धारण करण्याचा अधिकार हा माणसाच्या जीवनात उत्साह निर्माण करणारा व वाढविणारा आहे. म्हणूनच तो साधा कायदेशीर अधिकार म्हणून अबाधित राहील. आणि तसा अधिकार कायम राहणार असल्याने सामान्य जनता आमच्या या तरतुदीचे स्वागत करील असे मला वाटते.

प्रश्न : जगजीवनराम यांच्या राजीनाम्याचा राजकीय परिणाम काय होईल, असे आपणास वाटते ?

उत्तर : जगजीवनराम यांचा राजीनामा ही गेल्या दहा वर्षांतील भारतीय राजकारणातली सर्वांत मोठी व महत्त्वाची घटना आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे सर्वसामान्य माणसांची भीती गायब झाली आहे. कॉंग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांना आणि देशातील सर्वसामान्य माणसांना एवढे दिवस भीती आणि दहशतीच्या मार्गाने दडपून टाकले होते, हे त्यांनी स्वतःच सांगितले आहे. ही भीती नष्ट करण्यास त्यांच्या राजीनाम्याने मदत झाली आहे. सरकार बदलण्याच्या इच्छेला त्यामुळे नवे बळ प्राप्त झाले आहे. आता लोक खुलेपणाने, निर्भयपणे आपले विचार बोलू लागले आहेत. □

# काही महत्त्वाच्या लढती

भारताच्या पहिल्या घटनेसाठी निवडल्या गेलेल्या घटना परिषदेचे सभासद आणि वयोवृद्ध समाजवादी नेते श्री. ह. वि. कामथ हे जनता पक्षाच्या तिकिटावर मध्य प्रदेशातील हुशंगाबाद या त्यांच्या नेहमीच्या मतदारसंघातून निवडणुकीस उभे आहेत. याच मतदारसंघातून त्यांनी आजपर्यंत ४ सार्वत्रिक निवडणुका लढविल्या आहेत. २ पोटनिवडणुकीत ते अपक्ष म्हणून उभे होते. त्यावेळी कॉंग्रेसच्या उमेदवाराकडून ते १७४ मतांनी पराभूत झाले. त्यावेळी पुन्हा निवडणूक घेतली गेली. तेव्हा त्याच कॉंग्रेस उमेदवाराचा त्यांनी ३०,००० मतांनी पराभव केला.

१९५७ साली ते कॉंग्रेस उमेदवाराकडून पराभूत झाले. त्याही वेळी पुन्हा निवडणूक झाली; पण श्री. कामथ पराभूतच राहिले. १९६२ साली पुन्हा ते ७२,००० मते मिळवून विजयी झाले. पुढच्या ६७ सालच्या निवडणुकीत कॉंग्रेसच्या नीतिराज सिंग यांनी त्यांचा पराभव केला. ते परवापर्यंत केन्द्रीय मंत्रिमंडळात उपमंत्री होते. ७१ साली श्री. कामथांनी निवडणूक लढविली नाही.

सहा वर्षांच्या आरामानंतर श्री. कामथ यावेळी पुन्हा एकदा रिंगणात उतरले आहेत. यावेळी पुन्हा एकदा श्री. नीतिराज सिंग यांच्याशीच लढत द्यायची आहे. खरे तर यावेळी कॉंग्रेसश्रेष्ठींच्या मर्जीतून उतरल्याने नीतिराज सिंगना तिकीट मिळणार नव्हते. पण

अन्य कुणीही उभे राहिले असते तर श्री. कामथांशी टक्कर देणे शक्य नव्हते. त्यामुळे शेवटी नीतिराज सिंगना तिकीट मिळाले आहे.

☐ बिहारमधील सर्वांत अटीतटीची लढाई बेगुसराई मतदारसंघात होणार आहे. या ठिकाणी तीन पक्षांचे तीन मोठे मोहोरे इरेस पडले आहेत. जनता पक्षातर्फे श्यामानंदन मिश्रा, काँग्रेसच्या तारकेश्वरी सिन्हा आणि उजव्या कम्युनिस्टांचे श्री. इंद्रदीप सिन्हा हे इथे आमने–सामने उभे आहेत. मेल्या निवडणुकीत ही जागा श्री. श्यामानंदन मिश्रा यांनी १,३४,००० मते मिळवून जिंकली होती.

श्री. मिश्रा हे विसर्जित लोकसभेत संघटना काँग्रेसचे एक प्रतिष्ठित खासदार होते. आणीबाणीनंतर ते मिसाखाली तुरुंगात होते.

श्रीमती तारकेश्वरी सिन्हा यांचा काँग्रेस–संघटना काँग्रेस असा प्रवास पूर्ण झाला आहे. काँग्रेसमध्ये असताना त्या केन्द्रीय मंत्रिमंडळातही काही दिवस होत्या.

इंद्रदीप सिन्हा हे उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे मोठे कार्यकर्ते आहेत. ते खासदारही होते.

☐ मुजफ्फरपूर मतदारसंघातही तिहेरी लढत होणार आहे. जनता पक्षाचे श्री. जॉर्ज फर्नान्डिस, काँग्रेसचे श्री. नीतीश्वर प्रकार सिंग आणि उजवे कम्युनिस्ट श्री. रामदेव शर्मा हे तिथे येथे उमेदवार. पण याच मतदारसंघाने यापूर्वी दोन वेळा श्री. अशोक मेहता व आचार्य कृपलानी यांच्यासारख्या 'बाहेरच्या' उमेदवारांना निवडून दिले होते. गेल्या निवडणुकीत काँग्रेसचे श्री. नवलकिशोर सिंग यांनी ही जागा जिंकली होती.

श्री. जॉर्ज फर्नान्डिस हे बडोदा डायनामाईट प्रकरणी तुरुंगात आहेत. त्यांच्यावर मिसा आणि कटाचा आरोप दोन्ही आहेत. मिसातून जरी ते सुटले तरी क्रिमिनल प्रोसिजर कोडखाली त्यांना जामीन दिल्याशिवाय बाहेर येता येणार नाही. तुरुंगात राहून निवडून येण्याची किमया त्यांच्या बाबतीत घडते की–त्यांची मुक्तता होऊन ते लोकांसमोर येतात ते पाहायचे.

☐ आरा मतदारसंघात काँग्रेस व जनता पक्षात सरळ लढत आहे. तेथे विसर्जित लोकसभेचे सभापती बळिराम भगत आणि जनता पक्षाचे श्री. चंद्रदेव वर्मा समोरासमोर उभे ठाकले आहेत. ७१ साली ही जागा भगत यांनी जिंकली होती.

श्री. चंद्रदेव वर्मा हे राज्यमंत्रिमंडळात मंत्री होते. (१९६७ साली.) या भागात त्यांचा बराच प्रभाव आहे. असे बोलले जाते.

☐ ससराम हा जगजीवन राम यांचा सुरुवातीपासूनचा मतदारसंघ. येथली लढाईही महत्त्वाची असली तरी बाबूजी तिथे भलतेच प्रबळ ( Too Powerful ) आहेत. त्यामुळे तिथे काही अटीतटीची लढाई होण्याचा संभव नाही.

☐ जवळच बक्सर मतदारसंघात मात्र आणखी एक अटीतटीची लढाई आहे. काँग्रेसचे ए. पी. शर्मा, जनता पक्षाचे रामानंद तिवारी आणि एक उजव्या कम्युनिस्ट पक्षाचा उमेदवार तिथे उभे आहेत. ए. पी. शर्मा हे केन्द्रीय मंत्री आहेत. गेल्या वेळी त्यांनी ही जागा जिंकली होती. रामानंद तिवारी हेही एक प्रबळ उमेदवार आहेत. संविद सरकारात ते बिहारचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री होते. आणीबाणीत तुरुंगात होते.

☐ पटना हे बिहारचे राजधानीचे शहर. तिथे मैदानात एकूण तीन उमेदवार असले तरी, खरी लढत श्री. महामायाप्रसाद सिन्हा (जनता) व श्री रामावतार शास्त्री (उजवे कम्युनिस्ट) यांच्यातच होईल. काँग्रेसचे आर. पी. सिन्हा हे नवखे आहेत. महामायाप्रसाद एकेकाळी बिहारचे लोकप्रिय मुख्यमंत्री राहिले आहेत.

☐ बिहारचे अन्य पाच मुख्यमंत्री या वेळी मैदानात आहेत. अब्दुल गफूर (काँ.) व डी. एन. तिवारी (काँग्रेस फॉर डेमॉक्रसी) हे गोपालगंजमध्ये एकमेकांसमोर उभे आहेत. श्री. केदार पांडे (काँ.) यांच्याशी काँग्रेस फॉर डेमॉक्रसीचे फजलुर रहमान हे बेतिया मतदारसंघात सरळ सामना देत आहेत. कर्पूरी ठाकूर हे समस्तीपूरमधून, दरोगाप्रसाद हे महाराजगंजमधून, तर बी. पी. मंडल हे माधोपुरातून निवडणूक लढवीत आहेत.

☐ बांका मतदार संघात मधू लिमये आणि चंद्रशेखर शर्मा (काँ.) यांच्यांत सरळ लढत आहे. ७१ साली ही जागा काँग्रेसने जिंकली, पण पुढे पोटनिवडणुकीत मधु लिमये जिंकले.

☐ अमेठी (उत्तर प्रदेश) मतदार संघात काँग्रेसचे संजय गांधी आणि जनता पक्षाचे रवींद्र प्रतापसिंग यांच्यात सरळ लढत होणार आहे. रवींद्र प्रतापसिंग हे ३९ वर्षांचे वकील आहेत. १९६७ साली ते उत्तर प्रदेश विधानसभेवर जनसंघाच्या तिकिटावर निवडून गेले होते.

जनता पक्षाने ही जागा अत्यंत प्रतिष्ठेची मानली असून आपले सर्व कौशल्य व प्रयत्न इथे पणास लावण्याचा निर्धार केला आहे.

☐ रायबरेली मतदारसंघात पुन्हा एकदा इंदिरा गांधी विरुद्ध राजनारायण असा सरळ सामना होत आहे. गेल्या वेळचे राजनारायण व यावेळचे राजनारायण यांच्यात फरक आहे. मधल्या काळात यमुनेतून बरेच पाणी वाहून गेले आहे.

या वेळी निवडणुकांचे उमेदवारी अर्ज दोघांनीही एकाच दिवशी भरले. अर्ज भरायच्या आधी काही दिवस राजनारायण तुरुंगातून सुटल्यावर प्रथम तिथे गेले तेव्हा स्टेशनवर त्यांचे प्रचंड स्वागत झाले. त्याच दिवशी त्यांची जाहीर सभा झाली तेव्हा सभास्थानी ते जाताच श्रोत्यांनी त्यांना उभे राहून अभिवादन केले. इंदिराजी उमेदवारी अर्ज भरायला तिथे गेल्या तेव्हा एक विदेशी पत्रकारही तिथे गेला होता. परतल्यावर त्याने सांगितले, रायबरेलीतल्या बाईंच्या सभेला जास्तीत जास्त पाच हजार श्रोते उपस्थित होते. त्यातले दोन हजार शालेय विद्यार्थी होते.

आजघडीला या मतदार संघात दोन्ही बाजूस सारखेच बरेवाईट घटक आहेत. केंद्र सरकारच्या गुप्तचर खात्याचे अनेक अधिकारी आणि उत्तर प्रदेश सरकारच्या गुप्तचर खात्याचेही अनेक अधिकारी आत्तापासूनच रायबरेलीत ठाण मांडून बसले आहेत. हे अनाहूत पाहुणे तिथे कोणत्या कामगिरीवर गेले आहेत कोण जाणे! उत्तर प्रदेश सरकारचे अनेक सेवाभावी मंत्री आपल्या महत्त्वाच्या कामातून बहुमूल्य वेळ काढून रायबरेलीस वारंवार भेटी देत असतात. बिचारे रायबरेलीचे पोलीस मात्र या वारंवारच्या भेटीमुळे पडणाऱ्या 'बंदोबस्ताच्या' ताणामुळे वैतागले आहेत!

☐

मतपेटीचे शस्त्र । लेखांक चवथा

## ज्यांच्या हाती गंगेचे खोरे, त्यांच्या हाती भारत !

# हे गंगेचे खोरे (उत्तर प्रदेश आणि बिहार)

## या निवडणुकीत कुणीकडे ?

वा. दा. रानडे

### उत्तर प्रदेश

लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने उत्तर-प्रदेशाला विशेष महत्त्व आहे. भारतातील हे सर्वांत मोठे राज्य. लोकसभेत त्याला सर्वांत जास्त म्हणजे ८५ जागा आहेत. या मोठ्या संख्येमुळे हा गट सरकारच्या निर्णयांवर, तसेच लोकसभेच्या निर्णयांवर परिणामकारक प्रभाव पाडू शकतो. पंडित नेहरू, लालबहादुर शास्त्री आणि श्रीमती इंदिरा गांधी हे स्वतंत्र भारताचे तिन्ही पंतप्रधान उत्तर प्रदेशने देशाला दिलेले आहेत. उत्तर प्रदेशला भारताच्या राजकारणात एक विशेष स्थान त्यामुळे प्राप्त झालेले आहे.

पंचवीस वर्षांत उत्तर प्रदेशातील राजकीय मतप्रवाहात कोणते महत्त्वाचे बदल झाले ? पहिला जाणवणारा बदल म्हणजे १९५२ पासून १९६७ पर्यंतच्या विधानसभा निवडणुकांत काँग्रेस पक्षाचे बहुमत सतत घटत गेले. जागा आणि मते दोन्ही दृष्टींनी काँग्रेसची घसरगुंडी कशी वाढत गेली, याची कल्पना पुढील आकड्यांवरून येईल.

**उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका काँग्रेसने जिंकलेल्या जागा व मते**

| वर्ष | काँग्रेसने जिंकलेल्या जागा | शेकडा मतदान |
|---|---|---|
| १९५२ | ३९० | ४८ |
| १९५७ | २८६ | ४२·३ |
| १९६२ | २४९ | ३४·९३ |
| १९६७ | १९८ | ३२·११ |

या आकड्यांवरून असे दिसते की, चार निवडणुकांत काँग्रेसच्या जागांमध्ये १९२ ची घट झाली आणि मतांचे प्रमाणही जवळजवळ १६ टक्क्यांनी घटले.

पंडित नेहरू पंतप्रधान असेपर्यंत उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसने निदान बहुमत तरी टिकविले, पण नेहरूंच्या निधनानंतर १९६७ मध्ये झालेल्या पहिल्याच निवडणुकीत काँग्रेसने सत्ता गमावली. त्या पक्षाला व त्याच्या नेत्यांना हा जबर हादरा होता. काँग्रेस राजवटीबद्दल दीर्घकाळ साचत आलेल्या असंतोषाची ती परिणती होती.

काँग्रेसचे वजन घटत गेले याची महत्त्वाची दोन कारणे म्हणजे एक सरकारविरुद्ध वाढता असंतोष व दुसरे पक्षांतर्गत गटबाजी. पंडित गोविंद वल्लभपंतांना १९५५ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळात घेतल्यानंतर डॉ. संपूर्णानंद राज्याचे मुख्यमंत्री झाले. चंद्रभान गुप्ता आणि चरणसिंग यांच्या गटांनी एकत्र येऊन १९६० मध्ये संपूर्णानंद मंत्रिमंडळ पाडले आणि गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली नवे मंत्रिमंडळ स्थापन केले. पण गुप्ता गट आणि चरणसिंग गट यांच्यातील हे सहकार्य संपूर्णानंद मंत्रिमंडळ पाडण्यापुरतेच होते. दोन्ही गट एका सरकारमध्ये राहिले तरी, त्यांच्यात अंतर्गत मतभेद व संघर्ष होतेच. १९६७ च्या निवडणुकांपर्यंत दोन्ही एकत्र राहिले, पण त्या निवडणुकांत काँग्रेसने हुकमी बहुमत गमावले. तेव्हा विरोधी पक्षांना मिळाल्यास आपणास मुख्यमंत्री बनण्याची ही संधी आहे, हा आडाखा चरणसिंग यांनी बांधला. त्यांचा गट काँग्रेसमधून फुटला. विरोधी पक्षांच्या संयुक्त आघाडीने त्यांना मुख्यमंत्रिपद दिले आणि ६ एप्रिल १९६७ ला चरणसिंग मंत्रिमंडळ अधिकारावर आले. पण संयुक्त आघाडीच्या घटक पक्षांतील भांडणे वाढत गेली. पक्षांतराची साथ फैलावली आणि १७ फेब्रुवारी १९६९ ला चरणसिंग मंत्रिमंडळाने राजीनामा दिला. एक आठवड्याने राष्ट्रपतींची राजवट जारी करण्यात आली. एक वर्षाच्या राजवटीनंतर फेब्रुवारी १९६३ मध्ये मुदतपूर्व निवडणुका घेण्यात आल्या.

१९६९ च्या विधानसभा निवडणुकांतही काँग्रेसला निर्णायक बहुमत मिळाले नाही. पण तिच्या जागांची संख्या १९९ वरून २११ पर्यंत वाढली. निर्णायक बहुमताला दोनच जागा कमी होत्या. काँग्रेसच्या मतांचे प्रमाणही ३२·२ टक्क्यांवरून ३३·७ टक्क्यांपर्यंत वाढले, म्हणजे दीड टक्का वाढ झाली. काही अपक्ष सभासदांचा पाठिंबा मिळवून गुप्ता यांनी मंत्रिमंडळ बनविले कमलापती त्रिपाठींच्या गुप्ताविरोधी गटाला मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व देण्यात आले व त्रिपाठींना उपमुख्यमंत्रिपद दिले.

ऑक्टोबर १९६९ मध्ये काँग्रेसमध्ये फूट पडली. त्याचा परिणाम उत्तर प्रदेश काँग्रेसवरही झाला. गुप्ता गट संघटना काँग्रेसला मिळाला. तर त्रिपाठी गटाने पाठिंबा काढून घेतल्याने गुप्ता मंत्रिमंडळाचे बहुमत गेले. मंत्रिमंडळात २९ नवे मंत्री घेऊन सत्ता टिकविण्याचा त्यांचा शेवटचा प्रयत्नही अयशस्वी झाला आणि मंत्रिमंडळ गडगडले, त्यानंतर चरणसिंग यांनी फेब्रुवारी १९७०

मध्ये त्रिपाठी गटाच्या पाठिंब्याने मंत्रिमंडळ बनविले. मंत्रिमंडळात सहभागी न होता काँग्रेसने प्रथम बाहेरून पाठिंबा दिला, पण काही महिन्यांनी मंत्रिमंडळात काँग्रेस सहभागी झाली. चरणसिगांनी व त्यांच्या भारतीय क्रांतिदलाने काँग्रेसमध्ये सामील व्हावे असे दडपण काँग्रेसनेत्यांनी आणले. पण चरणसिंगांनी ते जुमानले नाही. काँग्रेसने पाठिंबा काढून घेतल्यावर चरणसिंग मंत्रिमंडळ सप्टेंबर १९७० मध्ये गडगडले.

यानंतर चरणसिंगांचा भाक्रांद पक्ष पुनः विरोधी पक्षांच्या संयुक्त आघाडीला मिळाला. पण यावेळी आघाडीने त्यांना मुख्यमंत्रिपद न देता संघटना काँग्रेसचे एक नेते खासदार त्रिभुवन नारायण सिंग यांना दिले. विधानसभेवर निवडून येण्यासाठी मणिरामची पोटनिवडणूक त्यांनी लढविली व ते हरले. पराभवानंतर त्यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर केला. त्यांच्या जागी कमलापती त्रिपाठी यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ काँग्रेसचे मंत्रिमंडळ एप्रिल १९७१ मध्ये अधिकारावर आले. दोनच महिन्यांपूर्वी लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकांत काँग्रेसने मोठा विजय मिळवला होता. त्याचा परिणाम संघटना काँग्रेस आणि भाक्रांदला ओहोटी लागून या दोन्ही पक्षांतून काँग्रेसकडे आयारामांची भरती सुरू झाली होती व त्यांना मुक्त प्रवेश दिला जात होता. काँग्रेसचे पक्षबळ वाढत होते. पण केवळ बहुमत असल्याने स्थिरता येत नाही. हा अनुभव इतर राज्यांप्रमाणे उत्तर प्रदेशातही आला. जून १९७३ मध्ये पोलीस-बंडाबाबत परिणामकारक उपाय न योजण्यात त्रिपाठी सरकारची अकार्यक्षमता उघड झाली. पक्षाचे बहुमत असताही मंत्रिमंडळाने राजीनामा दिला आणि उत्तर प्रदेशात राष्ट्रपतींची राजवट आली. मोठ्या प्रमाणावर लाचलुचपतीने उत्तर प्रदेशाचा कारभार भ्रष्ट झाला होताच. अनेक मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे व गैरव्यवहाराचे गंभीर आरोप केले जात होते. त्यात पोलिसांच्या बंडाने राज्याची सुरक्षितताच धोक्यात आली होती. हे सरकार असेच चालू ठेवले तर, लोकांचा असंतोष वाढून १९७४मध्ये मुदतीनुसार घ्यावयाच्या विधानसभा निवडणुका जिंकणे आपणास जड जाईल, याची पंतप्रधान इंदिरा गांधींना कल्पना आली, म्हणूनच उत्तर प्रदेशात कोणताही घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला नसताना पंतप्रधानांनी तेथे राष्ट्रपतींची राजवट जारी केली व पक्षाच्या सोयीसाठी घटनेतील तरतुदींचा गैरवापर केला.

त्रिपाठींच्या जागी नेता कोणाला निवडायचे, हाही काँग्रेसपुढे पेच होता. प्रदेश काँग्रेसवरील आणि विधिमंडळ पक्षावरील त्यांची पकड लक्षात घेता नेतेपदावरून त्यांना दूर सारणे सोपे नव्हते. अखेर त्रिपाठींना केन्द्रीय मंत्रिपद देऊन आणि बहुगुणांना मुख्यमंत्रिपद देऊन हा पेच सोडविण्यात आला आणि निवडणुका जिंकणे सोपे जावे या उद्देशाने निवडणुकांपूर्वी तीन महिने राष्ट्रपतींची राजवट उठवून काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आणण्यात आले.

१९७४ ची उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूक काँग्रेसच्या दृष्टीने प्रतिष्ठेची होती. दोन वर्षांनी व्हावयाच्या लोकसभा निवडणुकीचे भवितव्य लखनौत ठरणार होते. तेव्हा आपले सर्व बळ व डावपेच पणास लावून ही निवडणूक जिंकायचीच, असा चंग काँग्रेस नेत्यांनी बांधला. जवळजवळ दर आठवड्यास पंतप्रधानांचे उत्तर प्रदेशात दौरे होऊ लागले, ठिकठिकाणी उद्घाटने व पायाभरणी समारंभ होत होते. ज्याचे आराखडेही तयार नाहीत अशा योजनांचे पायाभरणी समारंभ पंतप्रधानांनी केल्याची टीका चंद्रभान गुप्ता यांनी केली. काँग्रेसने मुस्लिमांची मते मिळवण्यासाठी अलिगड विद्यापीठ कायद्याच्या नियमात त्यांना अनुकूल दुरुस्त्या केल्या व मुस्लीम वैयक्तिक कायद्यात कोणताही बदल मुस्लिमांच्या संमतीशिवाय न करण्याचे आश्वासन दिले. हरिजनांच्या पाठिंब्यासाठी त्यांना नोकऱ्यांत अधिक सवलती जाहीर केल्या. काँग्रेसला मिळणाऱ्या मतांत निम्मी मते मुस्लिमांची व हरिजनांची असत. त्यांचा पाठिंबा काँग्रेसने अशा रीतीने मिळविला. निरनिराळ्या मतदारसंघांत कोणती जात प्रभावी हे पाहून उमेदवारांची निवड केली आणि निवडणूक खर्च तर फार प्रचंड प्रमाणात केला. एवढे सारे करून काँग्रेसला ४२५ पैकी २१५ म्हणजे अवघ्या दोन जागांचे बहुमत मिळाले. मतांच्या दृष्टीने विचार केला तर, १९६९ च्या तुलनेने काँग्रेसची घसरगुंडीच झाली असून, शेकडा मतांचे प्रमाण ३३·५ वरून ३२·६ पर्यंत खाली आले. म्हणजे मतांच्या दृष्टीने जवळजवळ १९६७ चीच पातळी काँग्रेसने पुनः गाठली.

काँग्रेसला जेमतेम बहुसंख्य जागा मिळाल्या याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे कम्युनिस्टांशी केलेली युती. पण या युतीचा फायदा काँग्रेसपेक्षा कम्युनिस्टांनाच अधिक मिळाला. त्यांच्या जागांची संख्या ४ वरून १६ म्हणजे चौपट वाढली. पूर्वीच्या कोणत्याही निवडणुकांत एवढ्या जागा कम्युनिस्टांनी मिळवलेल्या नाहीत. पण जागांच्या रूपाने दिसणारे त्यांचे हे यश फसवे आहे, त्यांच्या मताच्या प्रमाणात घटच झाली त्यांना मिळालेली २·०५ टक्के मते हे १९५७ पासूनच्या निवडणुकांत सर्वांत कमी प्रमाण आहे.

काँग्रेसच्या यशाचे आणखी एक कारण म्हणजे विरोधी पक्षांची विभागलेली शक्ती. भारतीय क्रांतिदलाने संयुक्त समाजवादी पक्ष आणि मुस्लीम मजलिस यांच्याशी युती करून संयुक्त आघाडी उभारली. तिला १०५ जागा मिळाल्या. त्यात भाक्रांद ८१, मुस्लीम मजलिस २ व संयुक्त समाजवादी २२ अशी विभागणी आहे. १९६९ च्या निवडणुकीत भाक्रांदला ९८, संयुक्त समाजवादी पक्षास ३३ व मुस्लिम मजलिसला २ जागा मिळाल्या होत्या. त्यावेळी आघाडी नव्हती. १९७४ च्या निवडणुकीत आघाडी करूनही जागा वाढल्या नाहीत हे खरे, पण आघाडी नसती तर एवढ्याही जागा मिळाल्या नसत्या. भाक्रांद आघाडीस एवढे कमी यश मिळण्याचे कारण जनसंघ, संघटना काँग्रेस, समाजवादी पक्ष यांनी आघाडीविरुद्ध आपले उमेदवार उभे केले होते. जनसंघाने ६१, संघटना काँग्रेसने १० व समाजवादी पक्षाने ५ जागा जिंकल्या. जनसंघाच्या जागा १२ नी वाढल्या. संघटना काँग्रेस व समाजवादी पक्षाने (संयुक्त समाजवादी व प्रजासमाजवादी यांच्या विलीनीकरणानंतर स्थापन झालेला पक्ष) प्रथमच निवडणुका लढविल्या. सर्व विरोधी पक्षांनी जागांची वाटणी करून आपसात लढती टाळायच्या असा किमान समझोता केला असता तरी, काँग्रेसला निर्णायक बहुमत निश्चित मिळाले नसते. संघटना काँग्रेसला १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात ८·५८ टक्के मते मिळाली होती. तीन वर्षांनंतरच्या विधानसभा निवडणुकीत ८·७ टक्के म्हणजे

जवळजवळ तेवढीच मते मिळाली. याचा अर्थ मतांच्या दृष्टीने संघटना कॉंग्रेसचे बळ वाढले नाही, तसेच घटले नाही. १९६९ च्या विधानसभा निवडणुकीत भाक्रांदला २१·३ टक्के व १९७४ मध्ये २०·९ टक्के मते मिळाली. जनसंघाला १९६९ मध्ये १७·७ टक्के आणि १९७४ मध्ये १७·३२ टक्के मते मिळाली मतांच्या दृष्टीने राज्यपातळीवर या दोन्ही पक्षांचे बळात फारसा फरक पडलेला नाही, असे यावरून दिसून येईल.

विधानसभा निवडणुकांत उत्तर प्रदेशात कॉंग्रेसशिवाय इतर पक्षांच्या बळात काय फरक पडला याचा विचार करता असे दिसते की, जनसंघाचे बळ, जागा व मते दोन्ही दृष्टींनी १९६७ पर्यंत सतत वाढत गेले व त्या वर्षी ९७ जागा जिंकून त्या पक्षाने प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान मिळविले. पण १९६९ च्या निवडणुकांत जनसंघाच्या जागा निम्म्याने घटल्या व मतांच्या प्रमाणात ३·८२ टक्के घट झाली. १९७४ च्या निवडणुकांत जनसंघाने बारा जागा अधिक मिळविल्या, पण १९६७ चे स्थान त्याला पुनः मिळविता आले नाही. सहा विधानसभा निवडणुकांतील जनसंघाच्या जागा व मते पुढीलप्रमाणे :

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका
जनसंघाच्या जागा व मते

| वर्ष | जागा | शेकडा मते |
|---|---|---|
| १९५२ | ४ | ६·३७ |
| १९५७ | १७ | ९·८४ |
| १९६२ | ४९ | १६·७९ |
| १९६७ | ९७ | २१·५३ |
| १९६९ | ४९ | १७·७१ |
| १९७४ | ६१ | १७·३ |

चरणसिंगांच्या भारतीय क्रांतिदलाने १९६९ मध्ये ९८ जागा जिंकून प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान मिळविले. त्याला मते २१·३ टक्के मिळाली. जागा व मते दोन्ही दृष्टींनी १९६७ साली जनसंघाला मिळालेले स्थान १९६९ मध्ये भाक्रांदने मिळविले. कोणाशीही आघाडी, युती किंवा समझोता न करता भाक्रांदने एकट्याच्या बळावर हे यश मिळविले. १९७४ मध्ये या पक्षाने संयुक्त समाजवादी व मुस्लीम मजलिस या दोन पक्षांशी संयुक्त आघाडी केली होती. आघाडीस १०५ जागा मिळाल्या. त्यांत भाक्रांदच्या ८१ होत्या. भाक्रांदचे बळ १७ जागांनी घटले. मतांचे शेकडा प्रमाण मात्र जवळजवळ १९६९ एवढेच राहिले. इतर उजव्या पक्षांपैकी स्वतंत्र पक्षाचे वजन १९६२ पासूनच्या चार निवडणुकांत सतत घटतच गेले. या पक्षास १९६२ मध्ये १५, १९६७ मध्ये १२, १९६९ मध्ये ५ व १९७४ मध्ये अवघी एक जागा मिळाली.

डाव्या पक्षांपैकी कम्युनिस्टांनी कॉंग्रेसशी युती करून जागांच्या दृष्टीने आपले बळ कसे वाढविले, यासंबंधी वर उल्लेख केलाच आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षास १९६७ व १९६९ मध्ये प्रत्येकी एक जागा आणि १९७४ मध्ये २० जागा मिळाल्या. प्रजा-समाजवादी पक्षाचे बळ १९५७ पासूनच्या सर्व विधानसभा निवडणुकीत घटत गेले. त्यांना जागा व मते पुढीलप्रमाणे मिळाली.

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका
प्रजासमाजवादी पक्षाचे बल

| वर्ष | जागा | शेकडा मते |
|---|---|---|
| १९५७ | ४४ | १५·४ |
| १९६२ | ३८ | ८·८ |
| १९६७ | ११ | ४·१ |
| १९६९ | ३ | १·७ |

१९७४ च्या निवडणुकांचे वेळी संयुक्त समाजवादी आणि प्रजासमाजवादी पक्षांचे एकीकरण होऊन समाजवादी पक्ष स्थापन झाला. या एकीकरणामुळे त्या पक्षास ५ जागा व २·८ टक्के मते मिळाली. एकीकरणाचाही फारसा प्रभाव पडला नाही. याचे कारण इतर विरोधी पक्षांशी या पक्षाने निवडणूक समझोता केला नव्हता. उलट संयुक्त समाजवाद्यांनी १९६७ पासूनच असे धोरण स्वीकारल्याने त्यांना डाव्या पक्षांमध्ये सर्वांत अधिक जागा मिळत गेल्या. पण त्यांच्याही जागांचे प्रमाण १९६७ मध्ये ४४, १९६९ मध्ये ३३ व १९७४ मध्ये २२ असे घटत गेले.

विधानसभा निवडणुकांच्या तुलनेने लोकसभा निवडणुकांचा विचार केला तर दिसते की, लोकसभेतही उत्तर प्रदेशात कॉंग्रेसच्या जागांची संख्या १९६७ पर्यंत घटत गेली. १९५२ मध्ये ८१, १९५७ मध्ये ७०, १९६२ मध्ये ६२ आणि १९६७ मध्ये ४७ जागा कॉंग्रेसने मिळविल्या. १९७१ मध्ये मात्र ८५ पैकी ७३ जागा जिंकून १९५७ पेक्षाही मोठे यश कॉंग्रेसने मिळविले. १९६७ मध्ये कॉंग्रेसने विधानसभेत बहुमत गमावले. लोकसभा निवडणुकीतही त्या वर्षी कॉंग्रेसला उत्तर प्रदेशात पूर्वीच्या निवडणुकांच्या तुलनेने सर्वांत कमी जागा मिळाल्या. तरीही जिंकलेल्या जागांचे प्रमाण ५५ टक्के होते. राज्यात कोणालाही मत दिले तरी केंद्रात कॉंग्रेसला बहुमताने निवडून द्यायचे असा मतदारांचा कल असल्याचे आतापर्यंतच्या निवडणुकांवरून दिसते.

यावेळी त्यात काही फरक होईल का? विरोधी पक्ष जनता पक्षाच्या रूपाने एकत्रित आले आहेत. बहुगणांचा गट कॉंग्रेसमधून बाहेर पडून जगजीवनबाबूंच्या लोकशाही-वादी कॉंग्रेस पक्षास मिळाला आहे. इंदिरा गांधींच्या धोरणाबाबत नेहरू घराण्यातच फूट पडली असून, श्रीमती विजयालक्ष्मी पंडित विरोधी पक्षांच्या बाजूने प्रचारास उभ्या ठाकल्या आहेत. या परिस्थितीत १९६७ एवढ्यासुद्धा जागा कॉंग्रेसला मिळविणे कठीण जाईल

## बिहार

लोकसभेत उत्तर प्रदेशच्या खालोखाल बिहारला प्रतिनिधित्व आहे. बिहारला आतापर्यंत ५३ जागा होत्या. यावेळी ५४ आहेत. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेश व बिहार या दोन राज्यांनी मिळून कॉंग्रेसला एकतृतीयांश जागा मिळवून दिल्या. त्यामुळे लोकसभा निवडणुकांत उत्तर प्रदेशच्या खालोखाल बिहारलाही महत्त्व आलेले आहे.

विधानसभा निवडणुकांत उत्तर प्रदेश-प्रमाणे बिहारमध्येही १९६७ च्या निवडणुकीपर्यंत कॉंग्रेसची सतत घसरगुंडी होत गेली. जागा व मते दोन्ही दृष्टींनी कॉंग्रेसचे बळ कसे घटत गेले, याची कल्पना पुढील आकड्यांवरून येईल.

बिहार विधानसभा निवडणुका
कॉंग्रेसच्या जागा व मते

| वर्ष | एकूण जागा | कॉंग्रेस | शेकडा मते |
|---|---|---|---|
| १९५२ | ३३० | २४० | ३८·८४ |
| १९५७ | ३१८ | २१० | ४२·३ |
| १९६२ | ३१८ | १८५ | ४१·६३ |
| १९६७ | ३१८ | १२८ | ३०·८८ |

या चारही निवडणुकांत कॉंग्रेसला ४२ टक्क्यांपेक्षा अधिक मते एकदाही मिळाली नाहीत आणि १९६७ मध्ये तर मतांचे प्रमाण ३०·८८टक्क्यांपर्यंत खाली आल्यानेच कॉंग्रेसने निर्णायक बहुमत गमावले. जागांच्या दृष्टीने कॉंग्रेसचे बळ १९५२ पासून ११२ ने घटले. कॉंग्रेस राजवटीविरुद्ध असंतोष आणि पक्षातील फूट हीच कॉंग्रेसच्या पराभवाची मुख्य कारणे. १९६७च्या निवडणुकांच्या वेळी बंडखोर कॉंग्रेसजनांनी एकत्र येऊन जनक्रांतिदल हा पक्ष काढला. उत्तर प्रदेशात आणि ओरिसात बंडखोर कॉंग्रेसजनांनी जनकॉंग्रेस स्थापन केली होती, त्याच स्वरूपाचा हा पक्ष होता. १९६७ च्या निवडणुकीत त्याने २६ जागा मिळविल्या. हा गट फुटून बाहेर निघाला तरी, राहिलेल्या कॉंग्रेसमध्येही मतभेद, गटबाजी व फूट होतीच. त्यामुळेच कॉंग्रेसचा एवढा मोठा पराभव झाला. हुकमी बहुमतासाठी तिला ४५ जागा कमी मिळाल्या. २१ अपक्ष सभासद निवडून आले होते. त्या सर्वांचा पाठिंबा मिळाला तरीही कॉंग्रेसचे बहुमत होत नव्हते.

१९६७ च्या निवडणुकांनंतर बिहारमध्ये डाव्या–उजव्या पक्षांच्या संयुक्त आघाडीचे सरकार अधिकारावर आले. पण या आघाडीत उत्तर प्रदेशप्रमाणे उजव्यांचा प्रभाव नसून, डाव्या गटांचा प्रभाव होता. संयुक्त समाजवादी, प्रजासमाजवादी आणि दोन्ही कम्युनिस्ट पक्ष मिळून डाव्या गटांना ११४ जागा व २८·६७ टक्के मते मिळाली. कॉंग्रेसपेक्षा फक्त १४ जागा व दोन टक्के मते कमी होती. डाव्या गटांनी एकजुटीने निवडणुका लढविल्या असत्या, तर कॉंग्रेसपेक्षा अधिक जागा व मते मिळविणे त्यांना काही कठीण नव्हते. पण प्रजासमाजवादी पक्षाने कोणाशीही युती केली नाही. दोन कम्युनिस्ट एकमेकांविरुद्ध लढले. डाव्यांची मते यामुळे आपसांत विभागली गेली. एकट्या संयुक्त समाजवादी पक्षाने सर्व कॉंग्रेसविरोधी पक्षांशी समझोता करून आपसांतील लढती टाळण्याचा प्रयत्न केला. या धोरणाचा सर्वांत जास्त फायदा त्या पक्षास मिळाला. त्याने ६८ जागा व १५·४४ टक्के मते मिळविली. संयुक्त आघाडीत सामील न झालेल्या प्रजासमाजवादी पक्षास फक्त १८ जागा व ५·८८ टक्के मते मिळाली. १९५७, १९६२ व १९६७ मध्ये या पक्षास अनुक्रमे ३१, २९, १८ अशा जागा आणि १६·३, १४·३७ व ५·८८ टक्के मिळाली. याचा अर्थ जागा व मते दोन्ही दृष्टींनी पक्षाची घसरगुंडी झाली. १९५२ च्या निवडणुकीत कम्युनिस्टांना एकही जागा मिळाली नव्हती, पण नंतरच्या तीन निवडणुकांत ७, १२, २८ याप्रमाणे त्यांच्या जागा वाढल्या. १९६७च्या २८ जागा दोन्ही कम्युनिस्ट पक्षांच्या मिळून असून त्यात २४ उजव्या कम्युनिस्टांच्या व ४ मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या होत्या. याचा अर्थ बिहारमध्ये उजव्या कम्युनिस्टांच्या मानाने मार्क्सवादी कम्युनिस्टांचे बळ बरेच कमी होते.

उजव्या पक्षांचा विचार करताना सर्वांत ठळकपणे दिसून येणारी गोष्ट म्हणजे स्वतंत्र पक्षाचे घटलेले वजन. १९६२ च्या निवडणुकांत या पक्षाने ५० जागा मिळविल्या होत्या. १९६७ मध्ये फक्त ३ जागा मिळाल्या. याचे कारण स्वतंत्र पक्ष बिहारमध्ये स्वतंत्रपणे रुजलाच नाही. जमीनदारांचा जनता पक्ष तेथे अस्तित्वात होता. त्यातूनच तेथील स्वतंत्र पक्ष जन्मास आला.

उजव्या गटातील दुसरा पक्ष जनसंघ. १९५२ व १९५७ च्या निवडणुकांत त्याला बिहारमध्ये एकही जागा मिळाली नव्हती. १९६२ मध्ये ३ व १९६७ मध्ये २६ जागा त्याने जिंकल्या. याचा अर्थ जनसंघाच्या बळात म्हणण्यासारखी वाढ १९६७ च्या निवडणुकांतच झाली. १९५२ मध्ये १·२, १९५७ मध्ये १·३, १९६२ मध्ये २·६४ आणि १९६७ मध्ये ९·५६ असे त्याच्या शेकडा मतांचे प्रमाण वाढत गेले.

१९६७ च्या निवडणुकींनंतर बिहारमध्ये विरोधी पक्षांच्या संयुक्त आघाडीचे सरकार अधिकारावर आले. पण आपसांतील मतभेदांनी ते फार काळ टिकले नाही. १९६९ मध्ये विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका झाल्या. त्यात कॉंग्रेसचे बळ आणखी घटले. १९६७ मध्ये कॉंग्रेसने १२८ जागा मिळविल्या होत्या. १९६९ मध्ये त्यात आणखी दहाची घट झाली.

१९६९ च्या निवडणुकीत विरोधी पक्षांमध्ये संयुक्त समाजवादी पक्षाचे बळ ६८ वरून ५० पर्यंत घटले. पण सर्वांत मोठा विरोधी पक्ष हे स्थान त्याने टिकविले. प्रजासमाजवादी पक्षाने आपल्या जागा १८ वरून २० पर्यंत वाढविल्या. दोन्ही कम्युनिस्ट पक्षांना मिळून १९६७ इतक्याच २८ जागा मिळाल्या. पण उजव्या कम्युनिस्ट पक्षाला एक जागा अधिक मिळून त्याचे बळ २४ वरून २५ पर्यंत गेले, तर मार्क्सवाद्यांना एक जागा कमी मिळाल्याने त्यांचे बळ ४ वरून ३ पर्यंत खाली आले. सर्व डाव्या गटांना मिळून ९८ म्हणजे १९६७ पेक्षा १६ जागा कमी मिळाल्या.

उजव्या पक्षांमध्ये जनसंघाच्या जागांची संख्या २६ वरून ३४ पर्यंत वाढली. स्वतंत्र पक्षास १९६७ एवढ्याच ३ जागा मिळाल्या.

कोणत्याच पक्षास निर्णायक बहुमत न मिळाल्याने बिहारमधील अस्थिरता कायम राहिली. कॉंग्रेसचे हरिहरसिंग यांचे सरकार साडेचार महिने अधिकारावर होते. पण त्यांचे बहुमत संपुष्टात येताच बिहारमध्ये दुसऱ्यांदा राष्ट्रपतींची राजवट आली. कॉंग्रेस दुभंगल्यानंतर सत्तारूढ कॉंग्रेस आणि संघटना कॉंग्रेस यांपैकी कोणालाही सरकार बनविण्यासाठी इतर पक्षांशी आघाडी करण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. दोन्ही बाजूंनी तेच प्रयत्न सुरू केले. त्यात प्रजासमाजवादी पक्षाच्या सतरा सभासदांचा पाठिंबा मिळाल्याने सत्तारूढ कॉंग्रेसचे बहुमत होऊन दरोगाप्रसाद राय यांचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले. सत्तारूढ कॉंग्रेस, भाक्रांद, शोषितदल, कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी व झारखंड अशा सहा पक्षांचे १५० सभासद व २३ अपक्ष सभासद यांचा पाठिंबा या सरकारला होता.

दरोगाप्रसाद राय यांचे सरकार दहा महिने सत्तेवर होते. ते एवढा काळ टिकले हेच आश्चर्य. हे दहा महिने सत्ता कशी टिकवायची याच्या कारवाया करण्यात, त्यासाठी निरनिराळ्या गटांना खूष करण्यात गेले.

कोणत्याच पक्षामागे निर्णायक बहुमत नसल्याने भाक्रांद, झारखंड, झुल झारखंड व शोषितदल या चार पक्षांना महत्त्व आले. अधिकारपदे व मंत्रिपदे मिळविण्यासाठी त्याचा त्यांनी भरपूर उपयोग करून घेतला. त्यांचे धोरण व राजकारण उघडउघड संधिसाधूपणाचे होते. दुसरीकडे अधिक फायदा होत आहे असे वाटले की, पहिल्या सरकारमधून फुटून ते सरकार पाडावयाचे व दुसऱ्या आघाडीचे सरकारमध्ये सामील व्हावयाचे, हेच राजकारण हे पक्ष खेळत आले. बिहारमध्ये चौथ्या निवडणुकीनंतर चार वर्षांत सहा मंत्रिमंडळे गडगडली ती या पक्षांच्या कारवायांमुळेच. या चार छोट्या पक्षांचे मिळून पक्षबळ २५ होते, पण सत्तेचे पारडे वरखाली करण्यात तेवढे बळ पुरेसे होते. याच्या जोडीला सत्तारूढ कांग्रेस पक्षातच एक असंतुष्ट गट निर्माण झाला होता. दरोगाप्रसाद राय यांना नेतेपदावरून दूर करावे, अशी त्याची मागणी होती. अविश्वास ठरावावरील मतदानात या चार सभासदांनी सरकारविरुद्ध मतदान केले. माजी मंत्री रामलखन यादव हे या गटामागील पडद्यामागचे सूत्रधार होते. १९६७ पूर्वीच्या कांग्रेस मंत्रिमंडळात ते मंत्री होते. गैरकाभाराचे गंभीर आरोप त्यांच्याविरुद्ध करण्यात आले होते व ते खरे असल्याचा निष्कर्ष चौकशी-कमिशनने काढला होता. सी. बी. आय. च्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या घराची अनेक तास झडती घेतली होती. मुख्यमंत्री राय यांच्या सांगण्यानुसारच हे घडले, असे यादव यांना वाटले व म्हणून राय यांना नेतेपदावरून दूर करा, या मागणीचे ते सूत्रधार बनले.

कांग्रेसमधील फुटीनंतर समाजवादी कार्यक्रमाला अडथळा आणणाऱ्या सिंडिकेट गटाचा अडथळा दूर झाला. आता समाजवादी कार्यक्रम धडाक्याने हाती घेतला जाईल, असे आश्वासन सत्तारूढ कांग्रेसचे नेते देत होते. पण प्रत्यक्षात दरोगाप्रसाद राय सरकारचे जे चित्र दिसले, ते पूर्वीच्या हरिहरसिंग मंत्रिमंडळाच्या कारभारापेक्षा मुळीच निराळे नव्हते. जुन्या अविभक्त कांग्रेसमधील गटबाजी व हेवेदावे त्या कांग्रेसमध्येही चालू राहिले. राय सरकारने नवे काही केले नाही. तीस एकरांपर्यंतच्या बागायती व पाच एकरांपर्यंतच्या जिरायती जमिनीवरील धेतसारा रद्द करण्यात राय सरकारने पहिल्या संयुक्त आघाडी सरकारचे आश्वासनच तेवढे पुरे केले. कमाल जमीनधारणा कायदा आणि कुळांना कायम हक्क देणारा कायदा, असे दोन कायदे १९६७ पूर्वीच्या कांग्रेस सरकारने केले होते. पण ते कागदावरच पडून होते. त्याची अंमलबजावणी केल्याचा देखावा राय यांच्या सरकारने केला. तुमच्याकडे किती जमीन आहे ते कळवा अशा नोटिसा जमीनदारांना पाठविण्यात आल्या. उपलब्ध जादा जमिनीची कुळांमध्ये फेरवाटणी करण्यात येईल असे सांगण्यात आले. पण कायद्यातून पळवाट काढण्यासाठी बड्या जमीनदारांनी आपल्या जमिनीची वाटणी कुटुंबियांमध्ये आधीच करून टाकली होती. कुळांना जमिनीवरून सक्तीने काढण्यात येऊ नये यासाठी कुळांनी, कूळ म्हणून आपली नोंद करावी अशी तरतूद करणारा कायदा १९६७ पूर्वीच्या कांग्रेस सरकारने केला होता. ज्यांनी नोंद केली त्या कुळांविरुद्ध जमीनदारांनी कोर्टात साठ हजार दावे केले, त्यांपैकी ज्या दाव्यांचे निकाल लागले त्यांपैकी बहुसंख्य निकाल जमीनदारांच्या बाजूने लागले.

दरोगाप्रसाद राय मंत्रिमंडळ गडगडल्यानंतर सत्तारूढ कांग्रेसने वास्तविक विरोधी पक्षांना सरकार स्थापण्याची संधी द्यायला हवी होती. पण भोला पास्वान शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली पुन: आपले सरकार स्थापण्याचा अयशस्वी प्रयत्न त्यांनी केला. भोला पास्वान शास्त्री यांचा गट पूर्वी कांग्रेसमधून फुटला होता व विरोधी पक्षांनी त्यांना मुख्यमंत्रिपद देऊन मंत्रिमंडळ बनविले होते. ते थोडे दिवस अधिकारावर होते. दरोगाप्रसाद राय मंत्रिमंडळाविरुद्ध असंतोष वाढू लागला तेव्हा या शास्त्रींना पुन: मंत्रिपदाची स्वप्ने दिसू लागली. लोकतांत्रिक कांग्रेस हा आपला पक्ष त्यांनी सत्तारूढ कांग्रेसमध्ये विलीन करून टाकला. अशा संधिसाधू नेत्यास सत्तारूढ कांग्रेसने वास्तविक जवळ करायला नको होते. पण त्यांच्या गटाला कांग्रेसमध्ये घेऊनच केवळ न थांबता त्यांना मुख्यमंत्रिपद दिले. एवढेच नव्हे तर, १९७२ च्या निवडणुकीनंतर काही काळ केंद्रात मंत्रिपद दिले.

शास्त्री मंत्रिमंडळानंतर बिहारमध्ये काही काळ संयुक्त समाजवादी पक्षाचे नेते कर्पूरी ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त आघाडीचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले. दरोगाप्रसाद राय सरकारला प्रथम पाठिंबा देऊन नंतर ते पाडणाऱ्या चार छोट्या पक्षांचा पाठिंबा कर्पूरी ठाकूर सरकारलाही होता. संयुक्त समाजवादी पक्षाचे नेते कर्पूरी ठाकूर तत्त्वनिष्ठ नेते म्हणून विख्यात होते. पण सत्तेच्या राजकारणात गुरफटल्यावर त्यांच्याही तत्त्वनिष्ठेचा लोप झाला. आपले मंत्रिमंडळ टिकविण्यासाठी मंत्र्यांची संख्या वाढविण्यात कांग्रेसच्या हरिहरसिंग मंत्रिमंडळालाही मागे टाकून मंत्र्यांची संख्या त्यांनी वाढवत वाढवत ५२ पर्यंत नेली. तरीही सत्तारूढ संयुक्त आघाडीतील फूट त्यांना टाळता आली नाही. नऊ मंत्री व अनेक आमदार सत्तारूढ आघाडीतून फुटले. एक जून १९७१ ला अविश्वासाच्या ठरावावर चर्चा करण्यासाठी विधानसभेची बैठक भरावयाची होती. हा ठराव निश्चित पास होणार असे दिसून येताच पराभवाची नामुष्की टाळण्यासाठी ठाकूर यांनी विधानसभा बैठकीच्या दोन तास आधी मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर केला. त्यांचे सरकार १६२ दिवस अधिकारावर होते.

त्यानंतर पुन: भोला पास्वान शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी विधायक दलाचे सरकार अधिकारावर आले. १९६७ च्या निवडणुकांपासून अधिकारावर आलेले हे नववे व १९६९ च्या निवडणुकांपासूनचे पाचवे सरकार. सत्तारूढ कांग्रेस, कम्युनिस्ट, भाक्रांद, प्रजासमाजवादी, पुरोगामी गट आणि झारखंड, झुल झारखंड, हिंदुस्तानी शोषित दल व शोषित दलाच्या गटांचा, तसेच काही अपक्ष सभासदांचा त्यास पाठिंबा होता. पास्वान तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. घटक पक्षांत धोरणाबाबत मतभेद झाल्याने २८ डिसेंबर १९७१ ला त्यांनी राजीनामा दिला व बिहारमध्ये राष्ट्रपतींची राजवट जारी करण्यात आली.

१९७२ च्या विधानसभा निवडणुकांत कांग्रेसने आपली घसरगुंडी थोपवून निर्णायक बहुमत मिळविले. तिने १६७ म्हणजे निर्णायक बहुमतास आवश्यक असलेल्या जागांपेक्षा फक्त ८ जागा अधिक मिळविल्या. पण कांग्रेसला हे यश केवळ एकट्याच्या बळावर

मिळालेले नाही. निवडणुकीत. काँग्रेसने कम्युनिस्टांशी युती केली होती. कम्युनिस्टांसाठी ४९ व प्रजासमाजवाद्यांसाठी ११ जागा सोडल्या होत्या. या युतीमुळेच काँग्रेसला निर्णायक बहुमत मिळू शकले. काँग्रेसला इतर पक्षांची मदत घ्यावी लागली. याचा अर्थ बिहारमध्ये इंदिरालाटेचा फारसा प्रभाव नव्हता.

युतीचा फायदा काँग्रेसला मिळाला तसाच कम्युनिस्टांनाही मिळाला. त्यांच्या जागा १० नी वाढून ३५ झाल्या. आतापर्यंतच्या निवडणुकांत सर्वांत जास्त जागा कम्युनिस्टांनी यावेळी मिळविल्या. संयुक्त समाजवादी व प्रजासमाजवादी यांचे एकीकरण होऊन समाजवादी पक्ष यावेळी स्थापन झाला होता. पण एकीकरणाने त्यांचे बळ वाढले नाही. उलट कमीच झाले. १९६७ मध्ये या दोन पक्षांना मिळून ८४ जागा मिळाल्या होत्या. १९६९ मध्ये त्या ७० पर्यंत घटल्या व यावेळी आणखी निम्म्याने घटून ३४ झाल्या. जनसंघास २६ म्हणजे १९६७ एवढ्याच जागा मिळाल्या. १९६९ मध्ये त्यांच्या ८ जागा वाढल्या होत्या. त्या पुनः कमी झाल्या.

बिहारमधील विधानसभा निवडणुकांच्या तुलनेने लोकसभा निवडणुकांच्या निकालात काय फरक दिसतो ते आता पाहावयाचे आहे. १९५२ ते १९६७ पर्यंतच्या चार निवडणुकांत विधानसभेप्रमाणेच लोकसभेतही बिहारमध्ये काँग्रेसचे बळ घटले. १९५२ मध्ये ४५, १९५७ मध्ये ४१, १९६२ मध्ये ३९, १९६७ मध्ये ३४ याप्रमाणे काँग्रेसच्या जागा कमी झाल्या. घसरगुंडी असली तरी, विधानसभा निवडणुकांएवढी ती [मोठी नव्हती. १९६७ मध्ये विधानसभेत काँग्रेसने बहुमत गमावले व तिला फक्त ४० टक्के जागा मिळाल्या. पण त्याच वर्षीच्या लोकसभा निवडणुकांत मात्र तिने ६४ टक्के जागा मिळवल्या. १९७१ च्या लोकसभा निवडणुकांत काँग्रेसने आपले बळ आणखी वाढवून ७३ टक्के जागा जिंकल्या. त्यानंतर एक वर्षाने झालेल्या विधानसभा निवडणुकांतही काँग्रेसने बळ वाढवून ५२ टक्के जागा जिंकल्या. पण लोकसभा निवडणुकांएवढे यश बिहार विधानसभा निवडणुकांत काँग्रेस मिळवू शकली नाही. यावरून इतर काही राज्यांप्रमाणे बिहारमध्येही विधानसभेचे मत कोणालाही दिले तरी लोकसभेत काँग्रेसलाच निवडून आणावयाचे, असा मतदारांचा कल दिसतो.

गेल्या सहा वर्षांत बिहारमधील राजकीय परिस्थितीत कोणते महत्त्वाचे बदल झाले आहेत, येत्या निवडणुकांवर त्याचा परिणाम होऊन निवडणूक-चित्र त्यामुळे कितपत बदलेल याचा आता विचार करावयाचा. पहिली महत्त्वाची घटना म्हणजे १९७२च्या विधानसभा निवडणुकांत काँग्रेसने निर्णायक बहुमत मिळविले तरी अस्थिरता दूर झाली नाही. याचे कारण पक्षातील गटबाजी व गटस्पर्धा चालूच राहिली. गेल्या पाच वर्षांत केदारपांडे, गफूर आणि डॉ. जगन्नाथ मिश्रा असे तीन मुख्यमंत्री नेमले गेले. केदारपांडे यांची निवड पंतप्रधानांच्या पसंतीनें झाली होती. पण मिश्रा गटाला ती मान्य नव्हती. दिवंगत रेल्वेमंत्री ललित नारायण मिश्रा यांची बिहारच्या काँग्रेस पक्षावर जबरदस्त पकड होती. त्यांच्या निधनानंतरही मिश्रागटाची ही पकड कमी झाली नाही. केदारपांडे यांच्या जागी गफूर यांना मुख्यमंत्री निवडण्यात आले. मिश्रा गटाला पांडे नको होते, तसेच गफूरही नको होते. तडजोड म्हणून काही काळापुरते गफूर यांचे नेतृत्व त्यांनी मान्य केले. पण काही महिन्यांतच त्यांच्याविरुद्ध हालचाली सुरू केल्या. गफूरना घालविण्यासाठी केदार पांडे व जगन्नाथ मिश्रा यांचे गट तात्पुरते एकत्र आले. याच काळात जयप्रकाशांच्या नेतृत्वाखाली जनता आंदोलनाचा जोर वाढत होता. त्यांना केवळ मुख्यमंत्रिपदात बदल नको होता, तर सध्याच्या आमदारांवर लोकांचा विश्वास राहिलेला नाही, तेव्हा विधानसभा बरखास्त करून नव्या निवडणुका घ्याव्या अशी त्यांची मागणी होती. ही मागणी मान्य होत नसेल तर, प्रतिसरकार आणि प्रतिविधानसभा स्थापण्याचा कार्यक्रम जनता संघर्ष समितीने जाहीर केला होता. गुजरातेत बहुसंख्य आमदाराना राजीनामे द्यायला लावून विधानसभेचे विसर्जन घडवून आणण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन यशस्वी झाले होते. बिहारमध्ये तसे होऊ द्यावयाचे नाही, असा चंग काँग्रेस नेत्यांनी बांधला होता. गफूर यांना यावेळी नेतेपदावरून दूर केले तर, तो जयप्रकाशांच्या आंदोलनाचा विजय समजला जाईल, असे काँग्रेस नेत्यांना वाटत होते. म्हणून याबाबतचा निर्णय ते लांबणीवर टाकीत होते. पण प्रांतिक नेत्यांच्या दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा होता. आणि त्याच्या निर्णयाच्या अभावी राज्यकारभाराचा सारा गाडाच अडून बसला होता. कारभाराकडे कोणाचे लक्ष नव्हते. मंत्र्यांच्या दिल्लीच्या वाऱ्यातच सारा वेळ जात होता. अखेर गफूरच्या जागी जगन्नाथ मिश्रा यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय केंद्रीय नेत्यांना घ्यावा लागला. या साऱ्या घटनांतून काँग्रेस पक्षाचा विस्कळितपणा व गटबाजीचे दर्शन घडले. काँग्रेस राजवटीविरुद्ध जनतेत असंतोष आहे. आणीबाणीतील निर्बंधांमुळे तो दबून राहिला होता. आता निवडणुकीत तो व्यक्त करण्याची संधी जनतेला मिळालेली आहे.

जगजीवनबाबूंचा राजीनामा आणि त्यांनी स्थापलेला लोकशाहीवादी काँग्रेस पक्ष ही काँग्रेसला हादरा देणारी आणखी एक महत्त्वाची घटना. जगजीवनबाबू बिहारमधील ज्येष्ठ काँग्रेस नेते. केवळ हरिजनांचे नेते म्हणून नव्हे तर, राष्ट्रीय चळवळीतील एक थोर नेते म्हणून बिहारमध्ये त्यांना मान आहे. तेथील जनतेवर त्यांचा प्रभाव आहे. काँग्रेसमधून ते वैयक्तिक स्वार्थासाठी बाहेर पडलेले नाहीत. सरकारच्या व पक्षाच्या कार्यपद्धतीत लोकशाही प्रथा डावलल्या जाऊन हुकूमशाही पद्धतीने निर्णय घेतले जाऊ लागले. त्याच्या निषेधार्थ उशीरा का होईना उभे राहण्याचे धैर्य त्यांनी दाखविले. आदर्श नेत्याच्या कसोटीस जगजीवन राम उतरत नाहीत. दहा वर्षे त्यांनी प्राप्तीकर चुकविला, ही गोष्ट लोक कसे विसरतील ? पण आजचा मुख्य लढा हुकूमशाहीविरुद्ध लोकशाहीचा असून, त्यात त्यांनी लोकशाहीची बाजू घेतली आहे. इतर प्रश्न गौण मानून या एकाच प्रश्नावर आज लक्ष केंद्रित केले पाहिजे. जनता पक्षात विरोधी पक्ष एकत्र आले असून, जगजीवनबाबूंच्या पक्षाशी त्यांनी समझोता केला आहे. ही संघटित विरोधी शक्ती काँग्रेसला मोठे आव्हान आहे. बिहारच्या जनतेवर जयप्रकाश नारायण यांच्या झुंजार, निष्कलंक चारित्र्याचा मोठा प्रभाव आहे. या गोष्टी लक्षात घेता यावेळी बिहारमध्ये लोकसभेच्या बहुसंख्य जागा मिळविणे काँग्रेसला फार कठीण जाईल. □

# राजहंस प्रकाशन - सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजरातंतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १५ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १६ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १७ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १८ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| १९ | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २० | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |
| २१ | लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २० – ०० |

आगामी

| | |
|---|---|
| प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे / श्री. ग. माजगावकर |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे |
| सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आ.) |
| संध्याकाळ | गजानन जागीरदार (दु. आ.) |
| शतपावली | रवींद्र पिंगे (दु. आ.) |
| टॉलस्टॉय - एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आ.) |
| मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

# ता. क. नवी दिल्ली

नसबंदीची सक्ती हा संबंध उत्तर भारतातील आणीबाणीचा एक सिग्निफिकंट गेन. या बळजबरीचे भावी भयानक परिणाम न समजल्याने आणि लोकप्रतिकाराचा अग्नी विझला असल्याने, रान मोकळे सापडल्यासारखे वयोमान, आवश्यकता वगैरे न पाहता नसबंदीचा नंगानाच घातला गेला. पण आता हेच शस्त्र सरकारी पक्षावर उलटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लोकभावनेचे प्रगटीकरण अशाच एका पोस्टरद्वारे दिल्लीत झाले आहे. या पोस्टरमध्ये आवाहन करण्यात आले आहे की, 'आपसे वोट माँगने आये काँग्रेसियोंसे नसबंदीका सर्टिफिकेट माँगिये' खाजगी बोलताना तर नसबंदीच्या एवढ्या जबरदस्तीस कारणीभूत असलेल्या संजय, बन्सीलाल यांनी नसबंदी केली आहे का? असा आव्हानात्मक प्रश्न लोक विचारीत असतात!

तुर्कमान गेट, जामा मस्जिद आणि इतरत्र झोपडपट्ट्यांवरून बुलडोझर फिरवून त्या पाडण्यात आल्या. याची याद देणारे असेच आणखी एक पोस्टर: 'इंदिरा काँग्रेसको सुझाव–अपना चुनाव चिन्ह बुलडोजर रखो.'

¤

जनता पक्षाच्या स्थानिक पातळीवरच्या सभासुद्धा प्रचंड होत असताना काँग्रेसी उमेदवारांना जनतेचा मिळणारा 'प्रतिसाद' पाहण्यासारखा आहे! मोगल हा दिल्लीतला एक भाग. अटलबिहारी व शशीभूषण (दोघेही वाजपेयी) यांच्यात इथे लढत आहे. एके संध्याकाळी या भागात शशीभूषणची सभा होती. ठरल्या वेळी सभा सुरू झाली. सुमारे ३५० लोक सभेस उपस्थित होते. शशीभूषणचे भाषण सुरू झाले. फिरून फिरून तीच तबकडी! पाच मिनिटे ऐकून सहाव्या मिनिटास लोक उठून जाऊ लागले. स्टेजवर धांदल उडाली. शेवटी एकास आयडिया गवसली. माईकवरून घोषित करण्यात आले, 'थांबा, थांबा. सभेनंतर सर्वांना चहापानाची व्यवस्था करण्यात आली आहे.' लोक हजरजबाबी. उत्तर आले, 'आम्ही चहासाठी नव्हे, भाषण ऐकण्यासाठी आलो होतो. ते ऐकले, आता जातो.' आणि पब्लिक चक्क चालू पडले!

आणखी असाच एक दिवस. सेंट्रल मार्केट इथे लहान व मध्यम व्यापाऱ्यांची दुकाने. शशीभूषणच्या नेतृत्वाखाली तिथली व्यापारी संघटना. या भागात एक ते दोन या जेवणाच्या सुटीत सगळे सरकारी नोकर जमतात. त्या वेळी त्यांच्यासमोर भाषण द्यायचा बेत ठरला. व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना हाताशी धरून शशीभूषणनी स्वतःचे स्वागत आयोजित केले होते. आधीच हार तुरे वगैरे पाठविले होते. संघटनेचे पदाधिकारी बिचारे मनात नसतानाही नाइलाजाने, कर्तव्यबुद्धीने स्वागतास हजर होते. सभेत भाषणासाठी लोकांसमोर उभे राहताच, 'शशीभूषण, चले जाव' अशा घोषणा झाल्या. तब्बल दहा मिनिटे घोषणा चालू होत्या. हात चोळत बिचाऱ्या शशीभूषणना परत जावे लागले.

¤

चरणसिंग यांचा लोकसभा मतदारसंघ दिल्लीपासून काही मैलांच्या अंतरावर आहे. एके दिवशी त्यापैकी तीन खेड्यांमध्ये त्यांच्या सभा होत्या. दिल्लीहून सारे निघाले. पटेल हाऊसपासून पत्रकारांनाही नेण्याची सोय केली होती. पहिलीच सभा पंचवीस मैलावरील एका खेड्यात झाली. जिथे सभा झाली ते गाव साधारण बारा हजार वस्तीचे. आजूबाजूच्या सहा सात गावांहून सभेसाठी लोक आले होते. किमान दीड लाखांची ती सभा होती. अस्सल शेतकरी, खेडूत असा तो समुदाय. त्यांच्याच भाषेत, त्यांचीच इमेजरी वापरून चरणसिंगांचे एक तासाचे भाषण 'घोळून' झाले. ठिकठिकाणी टाळ्या, हशा, वगैरे प्रतिसाद मिळत होते. सभेत जनता पक्षाच्या निवडणूक फंडासाठी मदत गोळा करीत स्वयंसेवक फिरत होते. या एका सभेत दोन लाख रुपये गोळा झाले!

'माणूस'साठी अटलजींची मुलाखत हवीच म्हणून खूप धडपड केली. मुळात अटलजींची प्रकृती चांगली नाही. त्यातही त्यांच्या पायाला भिंगरी लागलेली. त्यामुळे त्यांचा वेळ मिळणे कठीण. गृहस्थ घरीच फार कमी असतात. त्यातून उमेदवार. सतत तीन दिवस फोन करून शेवटी एकदाची वेळ मिळते. फिरोजशाह रोड–हे अटलजींचे घर. खासदारांना मिळणारा प्रशस्त बंगला. आवारात एक काळी अँबेसॅडर गाडी. तिचा ड्रायव्हर आवारात येरझारा घालतोय. वेळ ठरलेलीच होती. पण तरी त्याला विचारले. 'अटलजी घरमें हैं?' त्या गावचाच नसल्याप्रमाणे दुसरीकडेच बघत तुसडेपणाने त्याने उत्तर दिले, 'पता नही.' जरा चरकलोच. मनात म्हटले, ही 'प्रसादचिन्हानि पुर:फलानि' तर नव्हेत? मनात मुलाखतीत विचारण्याच्या प्रश्नांची जुळवणी करीत दारावरचे बटण दाबले. आतून एक तरुण आला. त्याला नाव व प्रयोजन सांगितले. 'बैठिये' म्हणून तो आत गेला. बसून पहिल्या फेरीची जुळवणी करीत होतो. गेल्या दीड वर्षांच्या सरकारी प्रचारात देश एक राहिला पाहिजे, शिस्तीमुळे राष्ट्र मोठे बनते, व्यक्तीपेक्षा राष्ट्र मोठे आहे, अशा सूत्रातून राष्ट्रवादाचा एक सूर दिसत होता. तो खरा होता की नकली हा प्रश्न अलाहिदा. पण तो होता. अटलजी व त्यांच्या जनता पक्षाचीही राष्ट्रवादावर निष्ठा. मग या दोहोंच्या राष्ट्रवादातील फरक काय? तो ओळखण्याची खूण काय?

तेवढ्यात शुभ्र धोतर, शुभ्र शर्ट व वर काळे जाकीट अशा वेशात अटलजी आले. पण चेहरा फारच त्रस्त दिसत होता. शारीरिक वेदना चेहऱ्यावर प्रतिबिंबित होत होत्या. 'नमस्ते'ची परस्परांत देवाण घेवाण झाली, आणि अत्यंत नम्र स्वरात अटलजी म्हणाले, 'माफ करना भाई, मैंने आपको आज समय तो दिया था, मगर आज मेरा स्वास्थ्य बहुत खराब है. बहुत तकलीफ हो रही है.

खड़ा होना भी मुश्किल हो रहा है. कृपा करके और किसी समय आइयेगा. वैसे पत्रकारोंको समय देकर उन्हें ज़ा कहना मुझे अच्छा नहीं लगता. लेकिन क्या करूँ ? मजबूर हूँ. एवढे 'कन्फेशन' ऐकल्यावर बोलायचे काय राहिले ? मी गुपचुप बाहेर पडलो, पुन्हा कधी तरी येऊ या बेताने. पण नंतर माझी त्यांची वेळ पुन्हा जमली नाही. बाहेरचा ड्रायव्हर तशाच येरझारा घालीत होता !
¤

## कॉंग्रेस फॉर डेमॉक्रसी

ज्या विद्युत् वेगाने जगजीवनराम यांनी चार ज्येष्ठ कॉंग्रेस नेत्यांना एकत्र करून आपल्या या नव्या संघटनेची स्थापना केली त्याने सर्वजण थक्क झालेले होते. साधारणतः कोठल्याही नव्या पक्ष संघटनेच्या स्थापनेची प्रक्रिया ही एखाद्या प्रसूतीसारखी असल्याने एवढ्या गुपचुप व वेगाने होत नसते. पण एका रात्रीत हा नवा पक्ष निर्माण झाला. तो कसा झाला याची ही रंजक कथा–

बहुगुणा, नंदिनी सत्पथी आणि त्यांचे तात्कालीन सहकॉंग्रेसवासी हे आपआपल्या कारणांखातर सद्यःस्थितीबद्दल नाराज होते. काही तरी केले पाहिजे असे वाटत होते; पण नक्की काय ते सुचत नव्हते. अंधारात चाचपडत असतानाच बाबूजींच्या रूपाने त्यांना तेजस्वी काजवा मिळाला. एक भक्कम गट प्रस्थापित कॉंग्रेस नेतृत्वास व त्याच्या एकतंत्री कारभारास विरोध करणारा तयार झाला. निवडणुका ही दुष्मनास रणधूळ चारण्याची तातडीची संधी हाती लागली होती. पण स्वतःची अशी पक्ष–यंत्रणा नव्हती, मित्रही ठरले नव्हते. त्याच दिवशी दिल्लीत जयप्रकाशजी होते. जनता पक्षाचे महत्त्वाचे दोन राष्ट्रीय नेतेही होते. एका मध्यस्थाच्या साह्याने त्यांच्याशी चर्चा झाली, 'आम्ही असे ठरविले आहे. आणखी बरेच आमच्याबरोबर यायला उत्सुक आहेत. आम्ही सर्व मिळून जनता पक्षात यायला तयार आहोत. येत्या निवडणुकीत आपण आम्हास पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून मान्यता द्याल का? आम्हाला पक्षात घ्याल का ?'

'तुम्ही लोकांनी योग्य वेळी अत्यंत योग्य व धाडसी असा निर्णय घेऊन आमचे हात बळकट केलेत याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. पण तुम्हाला जनता पक्षात प्रवेश देणे शक्य होईल असे मला वाटत नाही. पक्षांतराविषयी आम्ही आजपर्यंत बोलत आलो. राजकीय नैतिकतेस महत्त्व आम्ही देत आलो. ऐन निवडणुकीच्या वेळी पक्षांतरास चालना, उत्तेजन देण्याबद्दल आम्ही कॉंग्रेसवर टीका करीत आलो, आता आम्हीच जर ते केले तर ते कसे. बरे होईल ? तेव्हा कृपया गैरसमज करून घेऊ नका. तुमचा निर्णय असाच पक्का ठेवा आणि तुमच्यासारख्यांची एक वेगळी संघटना स्थापन करा. त्या संघटनेशी सर्व प्रकारचा निवडणूक समझोता जनता पक्ष सहर्ष करील.'

'नाव काय असावे या नव्या संघटनेचे ?'

'ते मी कसे सांगणार ! पण पहा. लोकशाहीविरोधी कॉंग्रेस नेतृत्वास विरोध म्हणून बाहेर पडणारे तुम्ही लोकशाहीवादी कॉंग्रेसजन आहात. हे लक्षात घेऊन नाव ठरवा.'

पुन्हा धावपळ. लांबच लांब चर्चासत्रे. खलबते. टेलिफोन ट्रंक कॉल्सवरील संभाषणे.

–आणि उत्साहाच्या व निर्भय वातावरणात नवीन पक्षाचे नामकरण–कॉंग्रेस फॉर डेमॉक्रसी.

बैठक संपल्याबरोबर खास दूत पटन्यास रवाना. दुसऱ्या दिवशी पक्षस्थापनेची पदाधिकाऱ्यांच्या यादीसह घोषणा !
¤

## अफवा !

राष्ट्रपती भवन. भव्य, विस्तीर्ण मैदानावर पसरलेली भव्य इमारत. ब्रिटिश भारताचा राजा व्हाईसरॉय याच्यासाठी खास बांधलेले हे घर. स्वातंत्र्यानंतर सर्वप्रथम भारतीय नागरिकाचे निवासस्थान. कडेकोट पोलिस बंदोबस्तात असलेल्या या वास्तूकडे एरव्ही फिरण्याचेही धाडस होत नाही. त्याची ती भव्यता, समोरचा उंच स्तंभावरचा तो तारा, ५०/५० फूट उंच त्याची लोखंडी दारे हे सारे पाहूनच उर दडपतो, आणि 'नको बाबा ती भानगड' असे वाटते.

पण ही सारी भीती, दडपण घालवून देऊन धडधडत्या पण निधडया छातीने मी इथे आज आलो आहे. या प्रासादाच्या अंतःपुरात मला जायचे आहे. मला अचानक 'असे' व्हायला कारणही तसेच घडले आहे. जे काही मला समजले आहे त्याची शहानिशा करून घेण्यासाठी म्हणून बेगम अबिदा अहमद यांना मला भेटायचे आहे. पतिनिधनाच्या शोकातून अजून त्या सावरल्या नाहीत. अधिकृत शोकपर्व अजूनही चालू आहे. खास पाहुण्यांव्यतिरिक्त त्या कुणालाही भेटत नाहीयत् हेही मला माहीत आहे. पण तरी मी 'पत्रकार' या तात्पुरत्या मिळालेल्या विशेषाधिकाराचा फायदा घेण्यासाठी म्हणून आलो आहे. कारण मला समजलेली बातमीच तशी सनसनाटी आहे, इतकी की ती खरी असल्याची खात्री करून घेण्यात मी यशस्वी झालो की मी भारतीय जॅक अँडरसनच झाल्याचे मला वाटू लागले आहे. दिल्ली म्हणजे एक प्रचंड असे गॉसिपनगरच आहे. इथे केव्हा काय बातमी पसरेल याचा नेम नसतो. क्षणार्धात दिल्लीची गल्ली व गल्लीची दिल्ली करून सोडणाऱ्या घटना इथे घडल्या आहेत. आणि त्या घटनांची चाहूल अशा विश्वसनीय गॉसिप्समधूनच लागलेली आहे.

तर अशीच एक सनसनाटी बातमी–अफवा मला समजली आहे. ती अशी की, बेगम अबिदा अहमद या लवकरच जगजीवन राम यांच्या 'कॉंग्रेस फॉर डेमॉक्रसी' या संघटनेत अधिकृतपणे सामील होणार आहेत. पहा. चुकला न एक ठोका ? अजून अधिकृत शोकपर्व संपलेले नाही. ते संपताच हे अधिकृत निवासस्थान सोडून त्या आपल्या खाजगी घरात राहायला जाणार आहेत. तिथे गेल्यावर त्या आपला हा निर्णय घोषित करणार आहेत, म्हणे !

तर ही बातमी–अफवा कन्फर्म करण्यासाठी मी या द्वारी पातलो आहे. आत चिठ्ठी पाठविली आहे. पण १०/१ मिनिटांनी बेगमसाहिबांचा नकार घेऊन त्यांचा साहेबी पोषाखातला नोकर आला आणि एवढासा चेहरा घेऊन मी तो भव्य प्रासाद सोडला. थोडीशी निराशा, थोडासा त्रागा, थोडासा राग अशी संमिश्र मनःस्थिती. पण सोलेसही–चला, या निमित्ताने का होईना राष्ट्रपती भवन तर पहायला मिळाले !

२ मार्च, १९७७

–रत्नाकर

# इये मिसाचिये नगरी

## □ असा पुण्यभू 'मंडळी' कोण आहे ?

पुणे तेथे काय उणे ? कुणीही स्वाभिमानी पुणेकर हा प्रश्न विचारतात. परंतु दोन पुणेकर एकदम बोलू लागले की, आमचे डोके अगदी चक्रावून जाते.

आता हेच राजबंद्यांच्या संख्येचे प्रकरण पहा..' आणीबाणी जाहीर झाल्यानंतर किती राजबंदी तुरुंगात टाकले याचा आकडा माहीत नाही !' असे स्पष्ट उद्गार केंद्रिय गृहराज्यमंत्री ओम मेहता यांनी पत्रकार परिषदेत दि. २३-२ ला दिल्ली येथे काढले. कुणाला पकडायचे, किती पकडायचे, तुरुंगातच हाल होऊन किती मेले, मिसा चुकवण्यासाठी कुणी कुणी आत्मदहन केले या सर्वांची बित्तंबातमी गृहखात्याला असते. परंतु गृहखात्याचे मंत्रीच सांगतात 'किती जणांना पकडले याचा आकडा ठाऊक नाही !' आता उद्या जनता पक्षाचा गृहमंत्री आला तरच हा आकडा जाहीर होणार आहे आणि ओम-मेहतांची खात्री आहे की, कुणीतरी इंदिरा कॉंग्रेसवालाच पुन्हा गृहमंत्री होणार असल्याने अजून काही वर्षे हा आकडा कुणाला कळणार नाही !

परंतु त्याच दिवशी नुकताच सुटलेला एक पुणेकर प्रा. ग. प्र. प्रधान यांनी वानवडी; येथे जाहीर सभेत हा आकडा सांगितला. प्रा. प्रधान म्हणाले–

'निवडणूक घेणारी हुकुमशाही मी पाहिली नाही, असे यशवंतराव चव्हाण म्हणतात. परंतु दीड लाख लोकांना विना चौकशी तुरुंगात डांबणारी आणि विरोधी पक्षांच्या सर्व पुढाऱ्यांना तुरुंगात टाकणारी लोकशाही मीही जगात पाहिली नाही. यशवंतरावांनी कुठे पाहिली असल्यास त्या देशाचा पत्ता सांगावा !'

लोकशाहीचे सोडा. यशवंतरावांना कशाला अशा देशांचे पत्ते विचारता ? आम्हीही प्रधानांना तो पत्ता देतो. जगात सर्वात मोठा लोकशाही देश–सोविएट रशिया. तिथे मुळी विरोधी पक्षच नाही! पूर्वी तिथे विरोधी होते. ते सगळे तुरुंगातच मेले ! या देशाचा विद्वान पंतप्रधान ब्रेझनेव्ह यानेच भारतभेटीत हा प्रश्न विचारला होता–'तुमच्या देशात विरोधी पक्षांची जरूर काय ?' इंदिराजींनी उत्तर दिले–पुन्हा ब्रेझनेव्ह येईल किंवा त्याला गोळी घातल्याने दुसरा कुणी येईल तेव्हा इथे विरोधी पक्ष त्याला दिसणार नाही ! प्रा. प्रधान वगैरे तुरुंगातून सुटले यावरून आपली लोकशाही अधिक उदार आहे हे प्रा. प्रधानांना समजायला हवे. पण हा दीड लाख आकडा प्रा. प्रधानांना कसा कळला ? ओम मेहतांना जो आकडा माहीत नाही–म्हणजे प्रत्यक्ष राजाला जो आकडा माहीत नाही तो प्रधानाला कसा काय समजला ? हा आकडा बरोबर नसावा अशी आमच्या मनात यामुळे शंका आलीच.

दोन-तीन दिवस जेमतेम गेले आणि २६-२-७७ ला दुसऱ्या पुणेकराने तोंड उघडले. प्रा. ग. प्र. प्रधान हे आता वयाने म्हातारे झाले आहेत पण हा पुणेकर उशीरा जन्माला आल्याने अजून तरुण आहे ! मोरारजी देसाई ८१ व्या वर्षी हातात काठी घेतात, परंतु हा माणूस अजून तिशीचाही नसल्याने अजून १०–१५ वर्षे तरी काठी-शिवाय चालणार आहे. सुप्रसिद्ध गांधीवादी आचार्य कृपलानी त्यांचे डोळे आणि कान वयाची नव्वद वर्षे उलटल्याने थोडे अधू झाले आहेत पण या माणसाचे सर्व अवयव अजून शाबूत आहेत आणि ही निवडणूक संपेपर्यंत ते शाबूत राहतील असा त्यांचा स्वतःचा विश्वास आहे. हा पुणेकर म्हणजे महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसचा अध्यक्ष उल्हास पवार ! आधीच उल्हास त्यात निवडणूक मास ! तर या पुणेकराने महाराष्ट्राचे पालक मंत्री शंकरराव पाटील यांच्या उपस्थितीत गर्जना केली–

'देशात दीड लाख राजबंदी होते हा प्रचार चूक आहे. संपूर्ण देशात फक्त १५ हजार राजबंदी होते.'

उल्हासराव, हा आकडा तुम्हाला कसा काय समजला ? ओम मेहतांना जो ठाऊक नाही तो आकडा तुम्हाला कुणी सांगितला ? झटक्यात उल्हासरावांनी १ लाख ३५ हजार राजबंदी उणे करून टाकले. पुणे तेथे हे असे 'उणे' झाल्याने आम्हाला काहीच समजेनासे झाले.

आम्ही त्यानंतर जारीने चौकशी केली तेव्हा आम्हाला एक कॉंग्रेसवाले भेटले. तेही तरुण होते ! त्यांचे सर्व अवयव अजून पुरते आकारालाही आलेले नव्हते. संजय पुत्र बेटा यांच्या वयाच्या उद्याच्या एका कॉंग्रेस नेत्याने सांगितले–

'देशात मुळी कुणाला पकडलेच नव्हते !'

ज्याप्रमाणे, अलाहाबाद हायकोर्टाने इंदिराजींच्या खुर्चीला सुरुंग लावल्यामुळे आणीबाणी आली हे 'सत्य' असूनही, आपण हे मानतो की, देशात अनागोंदी झाली म्हणून आणीबाणी आली, त्याचप्रमाणे आणीबाणीच्या काळात लक्षावधींना तुरुंगात डांबले हे जरी कदाचित 'सत्य' असले तरी आपण असे समजायला मुळीच हरकत नाही की, आणीबाणीच्या काळात मुळी कुणाला पकडलेच नव्हते ! अजून जे तुरुंगात आहेत ते सर्व डाकू आणि स्मगलर आहेत !!

श्री. वसंतराव थोरात यांच्या निवडणूक प्रचारात यापुढे उल्हासरावांनी राजबंद्यांचा आकडा वगैरे सांगण्याच्या भानगडीत पडू नये. त्यांना वसंतरावाविषयी सांगण्यासारखे खूप आहे.

श्री. वसंतराव थोरात हे १९४० सालानंतर जन्माला आल्याने अजून पुरते चाळीस वर्षांचेही नाहीत, ही गोष्ट सभेत सांगण्यासारखी आहे. वयाची तिशी गाठली न गाठली तोच त्यांनी जो पराक्रम केला तो त्यांनी सांगावा.

'पुणे शहर कॉंग्रेसमध्ये गटबाजी करून पक्षाची प्रतिमा डागाळणारा शिवाजी ढेरे हा इसम कारणीभूत आहे,' हे परखड सत्य प्रथम वसंतराव थोरात या तरुणाने सांगितले ते १९७३. त्या वेळी वसंतराव थोरात पुढे असेही म्हणाले–

'संधिसाधू आणि स्वार्थी लोकांनी कॉंग्रेस पक्षात बुजबुजाट केला आहे.'

एवढेच बोलून वसंतराव थोरात थांबले नाहीत, तर त्यांनी ना. शरद पवारांना जाहीर दम दिला–

'जनतेच्या अडचणी सोडवा, नाही तर राजीनामा द्या!'

चार वर्षांपूर्वी श्री. वसंतराव थोरात या तरुणाने केलेले तडफदार कार्य श्री. उल्हास पवार यांनी निवडणूक संभांतून सांगितले, तर श्री. थोरात नक्की निवडून येतील. १९६० साली स्वा. सावरकरांच्या भाषणाने स्फूर्ती घेऊन, श्री. वसंतराव थोरात राजकारणात उतरले, ही आठवण श्री. उल्हास पवार यांनी सांगितली, तर या लाडक्या युवक नेत्याला खा. जयंतराव टिळकांबरोबर उरल्यासुरल्या हिंदुमहासभावाल्यांची मतेही मिळतील.

या महत्त्वपूर्ण गोष्टी न सांगता आणीबाणीच्या काळात वस्तुतः कुणीही तुरुंगात नसताना, १५,००० हा आकडा तरी उल्हासरावांनी सभेतून का सांगावा? हा आकडाही काही कमी नाही!

श्री. वसंतराव थोरात हे निःस्पृह आहेत, लवकर जन्माला न आल्याने तरुण आहेत, मंडईचे ते राजे आहेत, उल्हासरावांनी त्यांना जरा सांभाळून घेतले तर, वसंतराव खासदार होणारच नाहीत असे नाही.

वसंताचिया सेवका वक्र पाहे
असा 'पुण्यभू' मंडई कोण आहे?
जयाची लिला वर्णिती लोक तिन्ही
नृपेक्षी तया संजया जे 'इमानी'॥

¤

## □ मग हे कोण होते?

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत पंतप्रधान नेहरूंच्या अनुज्ञेने मुंबईत गोळीबार झाला व १०५ माणसे मारली गेली. त्या वेळी या सर्वांचा उल्लेख 'हुतात्मा' असा झाला. अजून तो तसाच होतो.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे नुकतेच पुण्याला आले. देशाची परिस्थिती पाहता, 'जनता पक्षा'ला अपशकून करणे हे राष्ट्रीय कर्तव्य त्यांनी प्रमुखतः पार पाडले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील गोळीबाराची शिवसैनिकांना त्यांनी आठवण करून दिली. ते म्हणाले–

'मोरारजी देसाई सत्तेवर असताना बेजबाबदार हुकुमशहासारखे वागले. त्यांच्या तोंडी लोकशाहीची भाषा निघणे चांगलेच. मोरारजींसारखी व्यक्ती आणीबाणीमुळे बदलत असेल, तर आणीबाणी निश्चितच चांगली.'

आणीबाणीत मोरारजींना सरकारने तुरुंगात टाकले, हाच आणीबाणीचा फायदा काय! शिवसेनाप्रमुख! हा फायदा तुम्हाला मिळाल्याने, तुमच्या तोंडी अजून लोकशाहीसाठी झगडणाऱ्यांबद्दल चार चांगले शब्द निघत नाहीत हा जनतेचा मोठाच तोटा झाला म्हणायचा!

शिवसेनाप्रमुख! फेब्रुवारी १९६९ मध्ये सीमा प्रश्न उकरून गुजराथी केंद्रमंत्र्यांना मुंबई बंद करण्याची चळवळ शिवसेनेने केली. त्यापायी 'माहीम' स्टेशन उद्ध्वस्त करण्यात आले, उडुप्यांची आणि सिंध्यांची दुकाने लुटण्यात आली, ही गोष्ट आपल्या बहुधा लक्षात असेल. यावेळी मुंबईला ना. वसंतराव नाईकांचे राज्य होते. सुमारे १५ कोटींचे नुकसान झालेल्या या दंगलीत, काँग्रेस सरकारने जो गोळीबार केला, त्यात ५० जण मृत्युमुखी पडले. हे सर्व हुतात्मेच होते ना? यांच्यावर गोळीबार करणाऱ्या त्या वेळच्या काँग्रेसी राजवटीचे प्रमुख मोरारजी नव्हते ना? मग सेनाप्रमुख, बेजबाबदार हुकुमशाहीने वागणाऱ्या काँग्रेसी राजवटीला आज तुमचा पाठिंबा कसा? या ना. नाईकांना ज्या इंदिरा काँग्रेस राजवटीने तिकीट दिले, त्या इंदिरा काँग्रेसला शिवसैनिकांनी मते द्यावीत, असे सांगताना, या ५० मानवी शरीरातले आत्मे तुम्हाला छळत कसे नाहीत? का १९६९ च्या फेब्रुवारीत मेले ते हुतात्मे नव्हते? का त्या वेळची काँग्रेस राजवट ही राक्षसी नव्हती? किमान शंभर माणसे मेली तरच त्यांचे हुतात्मे होतात काय?' का मोरारजी मुख्यमंत्री असताना मरतात ते 'हुतात्मे' आणि ना. वसंतराव नाईकादी मुख्यमंत्री असतात तेव्हा मरतात ते हुतात्मे नव्हेत, हे कायदेशीर ज्ञान तुम्हाला ॲड. नंदू घाटे यांनी दिले?

आणीबाणीचे फायदे एकदा तरी सर्व काँग्रेसवाल्यांना मिळावेत, तुरुंगात येणारा शहाणपणा अखंड सत्ता भोगून माजलेल्या सत्ताधीशांना पण लाभावा, असे बाळासाहेब, तुम्हाला का बरे वाटत नाही?

बाळासाहेब! असे तुम्ही डावे उजवे नका बुवा करू! आणीबाणीत नशिबी येणाऱ्या तुरुंगवासाने लाभणारा शहाणपणा हा काँग्रेसवाल्यांनाही मिळावा यासाठी तरी शिवसैनिकांनी यावेळी जनता पक्षाला भरघोस मते द्यावीत, असे नाही आपल्याला वाटत? कुठलीही मक्तेदारी वाईटच. नेहमी नेहमी आणीबाणीतला तुरुंगवास, विरोधी पक्षांनाच यावा हे बरोबर नाही. जनता पक्ष सत्तेवर आला आणि काँग्रेससारखेच वागायचे ठरवून त्यांनी आणीबाणी आणली, तर काय होईल? काँग्रेसवाले विनाचौकशी तुरुंगात पडतील? त्यांना यासाठी आपण. सेनाप्रमुख! मदत केली पाहिजे. कारण आणीबाणीतल्या तुरुंगवासात अस्सल हुकुमशहा सुधारतात तिथे हे 'कमअस्सल' हुकुमशहा नक्कीच सुधारतील. बाळासाहेब! तुम्ही काँग्रेसवाल्यांशी अशी बेईमानी नका बुवा करू! त्यांनी तुम्हाला काय काय दिले, ते आम्ही विचारीत नाही. पण तुम्ही त्यांना ही 'अमोल संधी' नाकारू नका.

तुमच्या आसमंतामध्ये अजाण
चिमणी बाळे आहेत
रुळलेल्या चाकोरीतले
कैक लेकुरवाळे आहेत
'सालाबादप्रमाणे' ते 'मत'
देऊन धाण करतील
बिचाऱ्यांना 'निवडणूक' सोडून
सर्व दिवस काळे होतील.
हजारो सूर्यपुत्र कोठडीत
बंद आहेत.
अदृश्य कारागृहात
डोळसदेखील अंध आहेत
विरोधकांना काडी लावून
आतषबाजी करणारे
होळीचे होळकर तेवढे
इंदिरास्तुतीत धुंद आहेत.

□

# आणीबाणी आणि कलाकार-नागरिक मुलाखती

पृष्ठ १३ वरून

guided thought जेव्हा कलेच्या क्षेत्रात येतो, तेव्हा कलाकारापाशी राजकारण येऊन ठेपतंच. राजकारण्यांकडून काही हक्क जेव्हा नाकारले जातात तेव्हाही राजकारण कलेला ठेपतंच. आणि हक्कांचं असं आहे की, ते नाकारले गेल्यानंतरच प्रकर्षानं जाणवतात. आमचं स्वातंत्र्य हाही असाच हक्क आहे. आम्ही तो वापरू किंवा न वापरू. पण त्याचं अस्तित्व अबाधित राहीला हवं.

आपल्या स्वातंत्र्याचा आणीबाणीत संकोच होऊनही व्यक्तिशः मी किंवा सामान्यपणे सर्वच कलाकारांनी त्या विरुद्ध पुरेसा आवाज उठवला नाही हे मला मान्य आहे. त्याची रुखरुखही मनात आहे. सौ. शकुंतलाबाई फडणीस व मी राष्ट्रपतींना कलाकारांतर्फे पाठवायच्या आणीबाणीविरोधी आवेदनपत्रावर सह्या केल्या होत्या व इतर काहींच्या सह्या मिळवायचा प्रयत्नही केला. अर्थात मी कुठल्याच पक्षांचा कार्यकर्ता नसल्यानं किंवा राजकाणात क्रियाशील नसल्यानं अधिक काही करणं शक्य होतं असं मला वाटत नाही. एकंदरीत पुरेसा आवाज उठवला गेला नाही याचं एक कारण, दहशत हे असेल, तसं एक महत्त्वाचं कारण हेही असावं की एकाचवेळी इतक्या बाजूंनी इतकी गळचेपी होण्याचा हा अनुभवही आपल्या सर्वांना अगदी अनोळखीच होता.

**भविष्यात पुन्हा असे निर्बंध येण्याची शक्यता ?**

पुन्हा निर्बंध लादले जाण्याची शक्यता बरीच आहे. पण पाहू या. बाईंच्या बाबतीत जे घडणार नाहीसं वाटत आलं ते ते हटकून घडल्याची उदाहरणं आहेत. निवडणुकीचा निर्णयच पहा ना. पण एका दृष्टीनं असं वाटतं की पुन्हा अशी बंधनं लादायला आता उशीर झाला आहे. कारण बंधनाच्या काळात काय घडलं, काय घडतं याचं दीड वर्ष लपवलेलं चित्र आता जनतेसमोर आलेलं आहे.

या निर्बंधांच्या जरुरीचं एक कारण वीस कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी हे सांगितलं जातं. पण हा कार्यक्रम विधायक रचनेचा आहे. त्याला कुणाचाच विरोध व्हायची शक्यता नव्हती. मग त्याची अंमलबजावणी धाकदहशतीनं कशाला ? हजारो राजबंद्यांच्या साक्षीनंकशाला ?

आणिबाणीचा एकच मोठा फायदा माझ्या मते. विरोधकांची एकी. ध्रुवीकरणाच्या प्रक्रियेची सुरुवात.

**म्हणजे तुम्ही जनता पक्षाचं स्वागत करताहात ?**

होय. सध्या तरी त्याला दुसरा पर्यायच नाही. या एकीचं श्रेय मात्र मी जयप्रकाशांना देईन. सगळ्या परिस्थितीचा संपूर्ण perspective देशात फक्त त्यांनाच होता. जनता पक्षाचं भविष्य थांबूनच पाह्यला हवं. वाट पाह्यला हवी. ¤

## श्री: प्रभाकर पाध्ये

आणीबाणी ही तात्पुरतीच असते अशी आपली पूर्वापारची समजूत. त्या शब्दातूनही तेच सूचित होतं. पण बाईंनी आपली समजूत चुकीची ठरवली आणि दीर्घकालीन आणीबाणी लादली. अर्थात यात, त्यांनी सत्तावाद्यांच्या धर्माला सोडून असं फारसं काही केलं असं मला वाटत नाही. हे अस्सल राज्यकर्त्यांचं एकमेव मूल्य असतं. तेच त्यांचे साध्य असतं. त्यांनी लोकांची सेवा करायची ठरवली तरी ती त्यासाठीच असते आणि गळचा घालायच्या म्हटल्या तरी त्यासाठीच असतात. इतर सर्व मूल्य अशा राज्यकर्त्यांच्या दृष्टीनं साधनात्मक असतात. राज्यकर्त्यांना लोकशाही मार्गावर राखण्यासाठी मोठी लोकसत्ताक परंपरा लागते; आणि लोकांमध्ये प्रज्वलित लोकसत्तावादी जागृती असावी लागते. ही आजची मुख्य गरज आहे.

आपल्या देशातली राज्यव्यवस्था लोकशाही स्वरूपाची असली तरी लोकशाहीसाठी आपली राष्ट्रीय तयारीच झालेली नाही. आपल्या जनतेनं आणीबाणी चटकन मान्य केली याचंही कारण तेच. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळालं ते योग्य वेळेच्या कित्येक वर्षं आधी. त्यामुळे स्वातंत्र्य – लोकशाहीसाठी राष्ट्राची सिद्धता झाली नाही. स्वातंत्र्यानंतर त्यागाची परंपरा तुटली. स्वावलंबनाची जनतेनंच टाळाटाळ सुरू केली आणि सरकारवर जबाबदारी टाकून मोकळं व्हायची पद्धत वाढली.

अर्थात, माझ्या म्हणण्याचा अर्थ आणीबाणीला माझा पाठिंबा आहे असा होत नाही. माझा आणीबाणीला विरोध अशासाठी आहे की ती राष्ट्रीय आणीबाणी नसून पक्षीय आणीबाणी होती. ती राष्ट्रीय आणीबाणी असती तर तिचं स्वरूप आहे यापेक्षा खूप वेगळं झालं असतं. या काळात स्मगलिंग थोडंबहुत बंद झालं, किंमतवाढीला काहीसा आळा बसला हे मला मान्य आहे. पण त्यासाठी आणीबाणीची गरज नव्हती. वीस कलमी कार्यक्रमाला माझा विरोध नाही. संप–बंद–मोर्चे यांचा झालेला अतिरेक आणीबाणीशिवाय कमी करता आला नसता असं मात्र मला वाटतं. पण तरीही या आणीबाणीचं वैयक्तिक आणि पक्षीय स्वार्थाचं गलिच्छ स्वरूप लपत नाही. आणीबाणी पुकारायची होती तर प्रथम राष्ट्रीय सरकार स्थापन व्हायला हवं होतं. आणीबाणी ही फार गंभीर गोष्ट आहे. फक्त राष्ट्रच आणीबाणी पुकारू शकतं. शिवाय आणीबाणीत वृत्तपत्रांवरील नियंत्रण मला मान्य नाही. वृत्तपत्र–स्वातंत्र्य ही लोकसत्ताक आणीबाणीची अटच आहे.

आणीबाणीला असलेला माझा विरोध, पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातर्फे आणीबाणी पुकारल्यानंतर लवकरच झालेल्या 'सत्याग्रह व लोकशाही' या विषयावरील परिसंवादात बोलताना, मी स्पष्टपणे प्रकट केला होता. इतरत्रही जरूर तिथे ही भूमिका विचारवंतांचं कर्तव्य म्हणून मी परिणामांची तयारी ठेवूनही मांडली. सरकारशी सहकार्य करायचं टाळलं. माझ्यासंबंधी खास कार्यक्रम करायची टी. व्ही. ची योजनाही मी अमान्य केली. मी कृतिशील राजकारणी नाही. त्यामुळे यापेक्षा अधिक काही करू शकलो नाही. तुरुंगात जायची तर माझी प्रवृत्ती नाहीच. तो माझा धर्मही नाही. पत्रकार, समीक्षक, साहित्यिक या नात्यांनी मी माझी

कर्तव्यं नीट पाळतो असं मला वाटतं. १९५३ साली मी 'नवशक्ती 'चं संपादकत्व सोडले; एका मोठ्या पगाराचे आणि सत्तेचं स्थान सोडलं, तेव्हा विचारस्वातंत्र्याचाच प्रश्न होता. धंदेवाईक लिखाण मी केलेलं नाही. एवढा माझा धर्म मी नेहमी पाळला आहे.

मुळात, कलाकार–साहित्यिकांनी आणीबाणीला विरोध केलाच नाही, अशी जी हवा निर्माण झाली आहे, ती चुकीच्या अपेक्षांवर आधारलेली आहे. राजकीय संघर्ष, उग्र प्रतिकार हे कलाकारांच्या प्रकृतीत बसतच नाही. तुरुंगवास पत्करणाऱ्या दुर्गाबाई एखाद्याच. त्यांच्या त्या निर्भय कृतिशीलतेबद्दल आणि मला स्वतःला त्या गांधीवादाच्या प्रतिनिधी वाटतात म्हणून मी त्यांचं मनःपूर्वक अभिनंदन करतो. पण म्हणून सगळ्या कलाकारांनी सत्याग्रह करून तुरुंग भरायला हवे होते असं मी म्हणणार नाही. एक आणखी बारकावा असा की दुर्गाबाई तुरुंगात गेल्या त्या ज्वलंत कृतिशील स्वातंत्र्यवादी नागरिक म्हणून. लेखक म्हणून नव्हे. नागरिकत्वाच्या कर्तव्यांची ही निकड (urge) इतर कुणा-लेखकाला जाणवली असती तर तोही तुरुंगात गेला असता. काही गेलेच. दुर्गाबाईपाठोपाठ तुरुंगात कलाकारांची रीघ लागली नाही, म्हणून 'त्या एकमेव 'पुरुष लेखिका' आहेत,' अशी टीका करणं हे, तुरुंगात जाणं हीच कलाकाराच्या योग्यतेची व कर्तृत्वाची कसोटी ठरवण्यासारखं आहे. काही साहित्यिकांनी सरकारी बक्षिसं नाकारली, सरकारी मानसन्मान, समारंभ, आकाशवाणी, टी. व्ही, यावर बहिष्कार घातला. हा पैसा–प्रसिद्धीचा त्याग कलाकारांच्या प्रकृतीला धरूनच होता. कलाकार काय करू शकतात, हे लक्षात घेतलं पाहिजे. त्यांच्याकडून समाजाला नेतृत्व मिळावं ही अपेक्षा गैरवाजवी आहे. लेखकाकडून आणि कलेकडून चुकीच्या कर्तव्य पूर्तीची अपेक्षा केल्यामुळे आणि तशी नियंत्रणे घातल्यामुळे एकेकाळी जागतिक आघाडीवर असलेलं सोविएत रशियामधलं वाङ्मय गेल्या पन्नास वर्षांत कसं खुरटलं ते आपण पहातोच आहोत. केवळ बुद्धिजीवी किंवा कलाकार यांनीच स्वतःच्या जोरावर क्रांती घडवल्याचं उदाहरण जगाच्या इतिहासात आहे का? फ्रेंच राज्यक्रांतीची फक्त बौद्धिक तयारी रूसो–व्हॉल्टेअर वगैरेंनी केली. तेव्हा प्रत्यक्ष कृती ही साहित्यिक–कलाकारांची स्वाभाविक प्रकृती नव्हे. त्यांच्या कलेचं मूल्यमापन कलेच्या निकषांनीच करायला हवं. कलाकाराच्या स्वाभाविक प्रकृतीशी सुसंगत नसलेल्या अपेक्षा त्यांच्याकडून करणं म्हणजे त्याला कलाबाह्य मूल्यं लागू करणं आहे. असा मूल्यसंकर अन्यायाचा आहे आणि या मूल्यसंकराला कम्युनिस्ट, गांधीवादी आणि राष्ट्रवादी जनसंघीय मंडळी जबाबदार आहेत असं माझं मत आहे. शिवाय साहित्यिक–कलाकार हा काही वेगळा आणि एकसंघ वर्ग नव्हे, तेव्हा त्यांच्याकडून एकच एक, uniform अपेक्षा करणं चुकीचं आहे. तुरुंगात जाणाऱ्या त्यागी कलाकाराचा गौरव करायलाच हवा–पण तो नागरिक म्हणून. कलाकार म्हणून नव्हे.

साहित्यिक–कलाकारांकडून केली जाणारी ही अवाजवी अपेक्षा आपल्याकडे रुजलेल्या ब्राह्मणगिरीतून जन्माला आली आहे. कलाकारांना आज समाजात क्रमांक एकच्या ब्राह्मणांचा दर्जा मिळत आहे. त्यामुळे चातुर्वर्ण्यातल्या ब्राह्मणांप्रमाणे त्यांना खास अधिकार, मानमरातब, जादा प्रतिष्ठा, सामान्यापेक्षा वरचं स्थान, वेगळी वागणूक, विशेष प्रसिद्धी वगैरे मिळतात. साहजिकच समाजाच्या त्यांच्याकडून प्रतिसाद म्हणून अपेक्षाही वाढतात. मला हा सगळाच प्रकार अमान्य आहे. साहित्यिकाला साहित्य परिषदेत वा साहित्य संमेलनात मानाचं स्थान मिळावं हे ठीक, पण समाजात त्याला प्राप्त झालेलं हे ब्राह्मण्य बंद व्हायला हवं. सामान्य नागरिकापेक्षा समाजात त्याला 'कलाकार' म्हणून खास काहीं मिळू नये आणि त्याच्याकडून खास काही मागितलंही जाऊ नये. दुसरा मुद्दा असा की, आणीबाणीत निष्क्रीय राहिल्याचा ठपका फक्त कलाकारांवरच का? कलाकारांनी त्याग केला नाही आणि उलट काही मागण्या मात्र केल्या असं काही घडलंय का? रेडिओ–टी. व्ही. ला सहकार्य देणारे काही कलाकार होते, याचा मलाही खेद वाटतो. पण त्यांना इतर कुठल्याही नागरिकाप्रमाणे स्वतःचं मत बाळगण्याचा हक्क नाही का? तेव्हा सरसकट सर्व कलाकारांना तुरुंगात न गेल्याबद्दल ठोकणे अन्यायाचं ठरेल.

आणीबाणीची झळ विरोधी पक्षांना प्रखरतेने जाणवल्यामुळे जनता पक्षाची निर्मिती झाली आहे. दीर्घकाळ हवी असणारी ध्रुवीकरणाची प्रक्रिया म्हणून तिचं स्वागत करता येईल. हे विरोधी पक्ष वैचारिक दृष्ट्या एकत्र येणं अशक्य आहे, असं मला वाटत नाही. आज काँग्रेस १००% समाजवादी नाही आणि जनसंघ किंवा कम्युनिस्ट (अनुक्रमे) १००% भांडवलवादी किंवा साम्यवादी नाहीत. काँग्रेस हीसुद्धा एक खिचडीच आहे. शिवाय राजकारणात लढा असतो तो प्रत्यक्ष आयुष्याशी, अनेक तडजोडींनी सिद्ध झालेल्या व्यावहारिक–जीवनाशी. इथे तत्त्वज्ञान–तर्कशास्त्राचा उपयोग फक्त घोषणेसाठी होतो. सत्यासाठी नव्हे. वास्तवाशी तडजोड राजकारणात अपरिहार्य असते आणि विरोधी पक्षांचं तत्त्वज्ञान तडजोड न होण्याइतकं परस्परविसंगत नाही. तेव्हा आता अवकाश आहे तो फक्त एकमेकांची मनं साफ होण्यापुरता.

मात्र लोकशाहीच्या आरोग्यासाठी दोन पक्षांबरोबरच तिसरा एक पूरक पक्ष पाहिजे आणि तो आचार्य जावडेकरांनी सांगितलेल्या यतिधर्मानं वागणारा असला पाहिजे, असं मला आवर्जून वाटतं. सत्ताप्राप्तीऐवजी या पक्षानं लोकसेवेचं समाजकारण करावं आणि राज्यकर्त्यांवर अंकुश ठेवावा. मी राजकारण करीन पण सत्ता स्वीकारणार नाही, मी लोकसंघटना करीन पण लोकांना भडकवणार नाही, मी संघर्ष करीन पण हिंसा करणार नाही, लोकजागृती हे माझं उद्दिष्ट आणि राज्यकर्ता कोणत्याही पक्षाचा असो, त्याच्यावर अंकुश ठेवणं हे माझं प्रधान कर्तव्य,' असं मानणारा तो यतिधर्मी. विनोबा हे काम करतील अशी अपेक्षा होती, तथापी ती सफल झालेली नाही. जयप्रकाश नारायण हेच आजचे आदर्श यतिधर्मी आहेत. जयप्रकाशजींचं काम अजूनही याच मार्गानं जाणारं आहे. गांधी-तत्त्वावर आधारलेला हा सत्तानिरपेक्ष यतिधर्मी पक्ष निकोप लोकशाहीसाठी आवश्यक आहे असं मला वाटतं.

शेवटी आणीबाणी उठण्यासाठी काँग्रेसविरुद्ध जोरदार मतदान होण्याची अत्यंत गरज आहे. लोकमताचा प्रखर अटकाव झाला तरच आणीबाणी पूर्ण उठणं शक्य आहे. एरवी ज्या सरकारनं एकदा हे निर्बंध लादले ते निवडणुकीनंतर दुसऱ्यांदा लादणार नाहीत, असं कोणत्या आधारावर म्हणायचं? ◻

## समारोप

अनेक औपचारिक मूलाखती, काही पत्रोत्तर-चर्चा, काही नाकारल्या गेलेल्या मुलाखती —श्री. ना. सी. फडके हे मूलाखत नाकारणारे एक श्रेष्ठ साहित्यिक-आणि खूप अनौपचारिक गप्पा, या सगळ्या खटाटोपानंतर आपण कुठे येऊन पोचलो आहोत ?

— वाचकांची मला कल्पना नाही, पण प्रामाणिकपणे सांगायचं तर मी माझे स्वतःचे पायसुद्धा किनाऱ्याला लागले आहेतच अशी खात्री मला देता येणार नाही. ' या सगळ्या आठ-दहा पानांचा निष्कर्ष हा असा,' असं सांगण्याइतकं एकपदरी आणि सरळसोट, भरीव असं काही प्रत्येकाला गवसेलच अशी हमीही देता येणार नाही.

मग काय या सगळ्या उद्योगाचा उद्देश फसला असं म्हणायचं ?

मला तसंही वाटत नाही. लेखाच्या प्रारंभी उल्लेखिलेला; संवेदनाक्षम कलाकारवर्गाच्या या विषयातल्या प्रतिक्रिया अजमावण्याचा हेतू असफल झालाय असं मी म्हणणार नाही. एवढंच, की तुमच्या-आमच्या मनात काही प्रश्न आहेत. त्यांच्यापाशी काही स्पष्टीकरणं आहेत. काही समर्थन आहे. ते उत्तर म्हणून स्वीकारून आपले प्रश्न समाधानानं सुटणार आहेत का, ही समस्या आहे. ज्याच्यात्याच्या संकल्पनेवर आणि पातळीवर ते अवलंबून आहे, असं म्हणणं सोपं आहे—पण कदाचित पळवाट ठरण्याइतकं सोपं आहे. शिवाय सामाजिक जबाबदारीचं तत्त्व अमान्य करणाऱ्या कलाकारांच्या ते पथ्यावर पडेल. व्यक्तिनिरपेक्ष आणि सार्वत्रिक असे काही सिद्धांत आपण मांडायचे म्हटले तर ते आणीबाणीतल्या वटहुकुमी वळणावर जायची शक्यता आहे.

कलाकारांनी देऊ केलेल्या स्पष्टीकरण-समर्थनांना महत्त्व आहे ते अशासाठी की, आज कलाकारांवर दोन अगदी परस्पर विरोधी आरोप ठेवण्यात येत आहेत.

सत्ताधारी पक्षाचा आरोप असा की ' या दीड वर्षाच्या नवनिर्माणाच्या काळात साहित्यिक-कलाकारांनी आम्हाला सहकार्य केलं नाही. आपल्या स्फटिकमिनारात मशगूल असलेल्या या मंडळींनी नव्या विधायक कार्यक्रमाची, रचनात्मक प्रवृत्तींची योग्य ती दखल घेतली नाही.'

विरोधी पक्षांचा आरोप असा की आणीबाणीमुळे आविष्कार स्वातंत्र्यासारख्या मूलभूत हक्कावर गदा येऊनही कलाकारांनी त्याविरुद्ध पोटतिडिकीनं आवाज उठवला नाही, विशेष म्हणजे असा आरोप दुर्गाबाईंनीही केलेला आहे.

मग कलाकार-साहित्यिकांनी नक्की केलं तरी काय ?

ते निष्क्रिय किंवा बेफिकीर राहिले हे खरं आहे का ?

या प्रश्नांच्या उत्तराला अनेक पैलू आहेत, वेगवेगळ्या मुलाखतींमधून ते उघड झालेले आहेतही. श्री शि. द. फडणीस, श्री. शाम जोशी व श्री. ग. दि. माडगूळकर यांनी ही निष्क्रियता मान्य केली आहे. त्याविषयीचं आपल्या बाजूचं असमाधानही त्यांनी बोलून दाखविलं आहे. श्री. पु. ल. देशपांडे एकीकडे ही निष्क्रियता मान्य करून तिची कारणंही परखडपणे सांगतात तर दुसरीकडे तिचं काही समर्थनही देतात- 'कलाकार' म्हणून येऊ पाहणारी फाजील जबाबदारी अस्वीकृत करतानाचा त्यांचा पवित्रा, "मी साहित्यिक, म्हणून मी रस्तासफाईतही आघाडीवर असलं पाहिजे ही अपेक्षा गैर-प्राथमिक शिक्षक झाला म्हणून त्यानं नसबंदीची गिऱ्हाइकं आणलीच पाहिजेत, अशातला हा प्रकार आहे." असा आहे.

श्री. प्रभाकर पाध्ये यांनी या प्रश्नावर अगदी वेगळी भूमिका घेतलेली आहे. तिचं सविस्तर समर्थन त्यांच्या मुलाखतीत आलेलंच आहे.

सकृद्दर्शनी यातला कोणताच मुद्दा आक्षेपार्ह वाटत नाही. पण प्रत्यक्षात जरा खोल जायचं म्हटलं की, अनेक प्रश्नोपप्रश्न निर्माण होतात, आणि दोन्ही पक्षांची बाजू मांडणाऱ्या कलाकारांकडे त्यातल्या काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरं नाहीत, ही गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली आहे. उदाहरणार्थ,

'कृतिशीलता ही विचारवंत, कलाकारांची प्रवृत्ती-प्रकृतीच नव्हे,' अशी बाजी श्री. पाध्ये मांडतात. (हे झालं कलाकारवर्गाविषयीचं सामान्यीकृत विधान. याच्याच जोडीला, कलाकार हा काही एकसंध व नव्हे, त्यांची प्रतिक्रिया uniform असणं शक्य नाही. प्रत्येक कलाकाराला इतर कुठल्याही नागरिकाप्रमाणे स्वतःचं वेगळं मत राखायचा हक्क आहे, तुरुंगात जाणं-न जाणं हे प्रत्येकाला भासणाऱ्या निकडीवर अवलंबून आहे, अशी विधानंही त्यांनी केली आहेत. या दोहोंत एक बारीक विसंगती आहे असे लक्षात येते.) अर्थात या कृतिहीनतेला संतुलन (balance) करण्यासाठी कलाकारांना समाजात वेगळं स्थान-मान मिळू नये हा त्यांनी मांडलेला मुद्दा निश्चित विचारार्ह आहे. (प्रत्यक्षात मात्र असं घडत नाही, घडण्याची शक्यताही दिसत नाही. कलाकारांना वेगळं स्थान, प्रतिष्ठा, अधिकार तर मिळतातच पण लोकप्रिय कलाकारांना समाजात सर्व बाबतीत अगदी नैतिक सुद्धा उदार सवलती मिळत आलेल्या आहेत. आचार्य अत्रे यांच्यावर सर्व दोष पोटात घालून जनतेनं केलेल्या अलोट प्रेमाचं ठळक उदाहरण इथे देता येईल. अशा बाबतीत समाज साहजिकच अधिक returns ची, चांगल्या परतफेडीची अपेक्षा करतो. आणीबाणीतील निष्क्रियतेबाबत फक्त कलाकारांवरच ठपका का, याचं उत्तर या रिटर्नसविषयक अपेक्षाभंगाच्या संदर्भात देता येईल काय ?) पण महत्त्वाचा प्रश्न असा की, कृतिशीलता ही आमची प्रकृतीच नव्हे.' ही कलाकारांची सबब मान्य करून त्यांची निष्क्रियता चालवून घेणं आपल्याला, आपल्या समाजाला परवडण्यासारखं आहे का ? 'आमच्या कलाकृती दर्जेदार आहेत की नाही ते पहा. जास्त अपेक्षा आमच्याकडून ठेवू नका. कलाबाह्य मूल्ये लावू नका.' हा कलाकारांचा आग्रह.

समजा, हाच दावा उद्या बुद्धिवादी, विचारवंत, उद्योगपती, उच्चपदस्थ, प्राध्यापक-शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी, उच्चभ्रू व्यावसायिक (डॉक्टर्स, इंजिनिअर्स वगैरे) कामगार, शेतकरी इत्यादींनी आपापल्या क्षेत्रांसंबंधी केला तर? म्हणजे आजूबाजूला काहीही चालू असलं तरी, चित्रकार निसर्ग रंगवणार, विचारवंत पुस्तक लिहिणार आणि जळणाऱ्या रोमची फिडल् वाजवून करमणूक करण्यात येणार की काय ?

ज्या देशात साक्षरांची संख्या एकूण लोकसंख्येच्या एक पंचमांशहूनही कमी आहे,

तिथल्या निवडक बुद्धिमंत–प्रतिभावंत–कर्तृत्ववान मंडळींना, 'आमची प्रकृती अमूकअमूक नाही', असल्या कारणासाठी निष्क्रीय राहण्याची सवलत आपण देऊ शकणार आहोत का? कृतीला पात्र असणाऱ्या प्रत्येकानं प्रकृतीच्या आडोशाला दडायचं ठरवलं तर अखेरीस कृती करायची कुणी? आणि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे प्रकृतीची ही सबब कोणत्या मर्यादेपर्यंत? दुर्गाबाई म्हणतात त्याप्रमाणे ही प्रकृती बाजूला सारून कलाकारांनीही राजकारणाच्या रणधुमाळीत उतरावं, अशी वेळ आलेली नाही काय?

ठीक आहे, कृतीची प्रवृत्ती तुमची नाही तेही मान्य केलं. पण आविष्करणाची प्रवृत्ती तर निसर्गतःच असणार. अन्यायाविरुद्ध लढणं शक्य नसेल तरी, त्याला वाचा फोडणं शक्य आहे की नाही? कलाकारांनी चालू परिस्थितीची पुरेशी दखल आपल्या कलामाध्यमातनं घेतली असं आपण म्हणू शकतो का? त्यांच्या संवेदनाक्षमतेपर्यंत या अनुभवाची जाण पोचली आहे असं दिसतं का?

कुणास ठाऊक, कदाचित काही कलाकार समर्थन करतात त्याप्रमाणे निव्वळ कलाकारांवरच उदासीनतेचा ठपका ठेवणं आणि इतर सर्व समाजघटकांना जबाबदारीतून मोकळं करणं अन्यायाचं असेलही. या मुद्यावर प्रभावी उत्तर प्रतिपक्षाकडे नाही, असं दिसतं. कदाचित 'संपर्कसाधनांची गळचेपी झाल्यामुळे काही करता आलं नाही', हा कलाकारमंडळींचा युक्तिवाद रास्त असेलही. मला स्वतःला आणि आपणांपैकी प्रत्येकाला आपला स्वतःचा दुबळेपणा, भ्याडपणा सलत असताना, दहशतीला बळी पडल्याचा दोष एकटचा कलाकारांच्या माथी कोणत्या तोंडानं मारणार?

पण कलाकारांकडून ही जी वेगळी आणि इतरांपेक्षा अधिक अपेक्षा केली जाते, त्याचं एक कारण त्यांच्या प्रतिभेचं वेळोवेळी प्रत्ययाला आलेलं सामर्थ्य हे आहे. सामान्य माणसाजवळ जे नाही असं प्रभावी expression ज्याला लाभलेलं आहे त्यानं त्याचा उपयोग सामान्य माणसासाठी कधी ना कधी करावा, अशी त्याला डोक्यावर घेणाऱ्या सामान्यांनी अपेक्षा केली तर ती गैरवाजवी म्हणता येईल का?

श्री. प्रभाकर पाध्ये यांनी याबाबत मुळावरच घाव घालायचा प्रयत्न केला आहे. कलाकाराचं वेगळं स्थानच ते 'ब्राह्मणगिरी'चा आरोप करून अमान्य करतात. इथे थोडी गल्लत होते आहे. चातुर्वर्ण्यातली ब्राह्मणगिरी वाईटच; कारण तिथे ब्राह्मणत्व जन्मावरून ठरत होतं; आणि समाजातलं श्रेष्ठ स्थान कर्तृत्वाचा विचार न करता दिलं जात होतं. कलाकारांचं क्रमांक एकचं ब्राह्मणपद हे त्यांचं स्वकष्टार्जित आहे. अलौकिक प्रतिभेला असामान्य गौरव लाभला तर त्यात गैर काय आहे? तेव्हा कलाकारांना समाजात मान मिळणं आणि ते समर्थ असल्यानं साहजिकच अधिक अपेक्षा केली जाणं या दोन्हीत थोडं फार तथ्य नक्कीच आहे.

इथे ललितकलांचा प्रश्न उद्‌भवतो. 'ललितकलांच्या आविष्काराला आणीबाणीचा काहीही अडथळा झाला नाही, त्यामुळे ललितकलावंतांनी विरोधी आवाज उठवण्याचा सवालच आला नाही.' असं सर्रास समर्थन कलाकारांनी केलं आहे. 'ललितकलांकडून समाजाला नेतृत्व मिळण्याची अपेक्षा करणंच चुकीचं आहे', असा निर्वाळाही वरील समर्थनाच्या समर्थनार्थ दिला गेला आहे. हेही सगळं अर्धसत्य आहे. पहिली गोष्ट अशी की, ललितकलांना त्रास झाला की नाही हा मुद्दा गौण आहे. आविष्कारस्वातंत्र्य हे तत्त्व म्हणून, मूल्य म्हणून तुम्हाला मान्य आहे की नाही? असेल तर त्याचा संकोच तुम्हाला तिरस्करणीय वाटायला हवा. फक्त विचारवंतांच्या आणि पत्रकारांच्याच घराला आग लागली होती हे खरं आहे, पण तुमचं घर त्यांच्या शेजारीच आहे त्याची वाट काय?

तेव्हा वर उल्लेखिलेल्या आणि इतर अनेक प्रश्नांची रामबाण उत्तरं अनेक कलाकारांपाशी नाहीत. ते देत असलेली स्पष्टीकरणं किंवा उत्तरं प्रामाणिक असली तरी, या समारोपाच्या प्रारंभी म्हटल्याप्रमाणे संयुक्तिक आहेतच असं नाही.

अर्थात या सगळ्याचा अर्थ, आणीबाणीचं समर्थन करणाऱ्या कलाकार–साहित्यिकांची जीत झाली आहे असा बिलकुल होत नाही. त्या पक्षाच्या मंडळींनाही आपली बाजू पुरेशा सामर्थ्यानं मांडता आली आहे, असं मला वाटत नाही. अनेक प्रश्नांची समाधानकारक सोडवणूक तेही करू शकत नाहीत. उदाहरणार्थ, आणीबाणीच्या उद्दिष्टांमागचा प्रामाणिकपणा अनेक समर्थकांना साधार पटवून देता येत नाही. श्री. ग. दि. माडगूळकर व श्री. राम जोशी या उभयतांनी राष्ट्रीय शिस्तीसाठी आणीबाणीची आवश्यकता प्रतिपादन केली, तथापि आणीबाणीखेरीज इतर कायदेशीर तरतुदी या शिस्तीसाठी पुरेशा नव्हत्या काय,' हा प्रश्न 'तांत्रिक असल्यामुळे अनुत्तरित ठेवला. अठरा महिन्यांत घडलेल्या अन्यायाच्या वार्ता, त्या 'चक्षुर्वैसत्य' नसून ऐकीव, अनधिकृत आहेत म्हणून कानाआड करणं सोयीचं असलं तरी, औचित्यपूर्ण ठरेलच असं नाही. तसं असेल तर, अठरा महिन्यांतल्या प्रगतीच्या कथाही ऐकीव नाहीत काय?

आणीबाणीमध्ये communication media वर जी अभूतपूर्व–अश्रुतपूर्व बंधनं लादली गेली होती, त्याचं पुरेसं समर्थन कलाकारांना करता आलेलं आहे, असं मला वाटत नाही. वृत्तपत्रे–समाचार, टी. व्ही. आणि आकाशवाणी (लोकशिक्षण वगैरे बाजूलाच राहू द्या, पण–) प्रचारमाध्यम बनल्यामुळे, नाण्याला दोन बाजू असतात ही गोष्टसुद्धा ऐकीव–खोटी वाटू लागली होती, त्याचं काय? आणि सगळ्यांत महत्त्वाचा पण समाधानकारक सोडवणूक न झालेला प्रश्न म्हणजे, आणीबाणीतून जे आणि जेवढं मिळवलं, त्यासाठी एवढी सगळी किंमत द्यायलाच हवी होती का? जे गमावलं आणि जे मिळवलं त्याच्या बॅलन्सशीटमध्ये 'बॅलन्स' कुठे आहे का?

तर असा हा सगळा मुलाखतींचा प्रपंच प्रश्न–उत्तर–आणि पुन्हा प्रश्न या चक्रात सापडण्याआधीच पूर्ण केला पाहिजे. शेवटी एवढंच की, कलाकारांची भूमिका ही अशी असताना तुम्हा आम्हा सामान्यांचं स्थान नक्की कुठे आहे? कलाकारांवर निष्क्रीयतेचा, बेपर्वाईचा आरोप करीत असताना, आपण एखादेवेळी तरी आपली सद्सद्विवेकबुद्धी चाचपून पहावी की नाही?

असं आत्मप्रदर्शन प्रत्येकाला सहन होणार आहे की नाही, हा प्रश्न महत्त्वाचा आहेच.

पण, आणखी महत्त्वपूर्ण प्रश्न आहे तो असा की, रोम जळतंय् आणि नीरो फिडल् वाजवतोय्. अशा वेळी रोमन्सनी काय करावं?

ज्वाळांचे चटके समजू नयेत म्हणून फिडल् ऐकण्यात रमून जावं?

आपल्या असमर्थतेला दोष देत गप्प रहावं?

आपल्या शक्तीप्रमाणे पाणी आणायला धावावं?

हे आपलं कामच नव्हे, असं समाधान मानून घ्यावं?

की नीरोला बेजबाबदारपणाचा ठपका देऊन मोकळं व्हावं?

MANOOS ( Marathi Weekly )    Rs. : Five    Regd. No. PNC-68

जनविराट अंकासाठी योजलेला सर्व मजकूर जागेअभावी
या एका अंकात समाविष्ट होऊ न शकल्याने
यापुढील अंक

# माणूस : जनविराट विशेषांक
# दोन

प्रसिद्धी : १२ मार्च १९७७
पृष्ठसंख्या : ?    किंमत : ?

## आर. डॉक्युमेंट

या खळबळजनक पुस्तकाचा प्रदीर्घ परिचय माणूस दिवाळी अंकात (७६)
अशोक जैन यांनी करून दिला होता. तुरुंगात या परिचयाची पारायणे झाली.
बाहेर अंक मिळेनासा झाला होता.

**वरील जनविराट (दोन) अंकासाठी योजलेले पुस्तक**

## स्काउंड्रल टाईम । बदमाश काळ

लेखन-स्वातंत्र्यासाठी तुरुंगवास भोगणाऱ्या 'एका'ची विदारक आत्मकथा

**प्रदीर्घ परिचय : अशोक जैन**